# वासिली शुकशीन

# सोयरीक



प्रस्तुत संग्रहात वासिली शुकशीन (१९२९-१९७४) यांच्या १५ कथा समाविष्ट आहेत. शुकशीन एक सुप्रसिद्ध सोविएत गद्यलेखक, नट आणि चित्रपट दिग्दर्शक होते. त्यांना लेनिन पारितोषिकाचा बहुमान लाभला होता.

शुकशीन यांना नेमकी कशामुळे प्रचंड लोकप्रियता लाभली हे सांगणे अवघड होते: त्यांच्या कथांमुळे अथवा 'तळयाकाठी' चित्रपटातील चमकदार प्रमुख भूमिकेमुळे; 'लाल झुपकेदार फुलाचे झाड' ह्या व इतर चित्रपटांच्या निर्मितीमुळे अथवा शेतकऱ्यांच्या युद्धाचा नेता स्तेपान राझिन ह्याच्याबद्दलच्या कादंबरीमुळे... काहीही असले तरी शुकशीन यांची कथा सांगण्याची हातोटी विलक्षण होती हे निर्विवाद. लोकांच्या वेगवेगळया स्वभावांचा, ज़ीवनातील विविध घटनांचा, घडामोडींचा, सत्य घटनांचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. वासिली शुकशीन स्वतःच्या कथांमधून आजच्या सोविएत खेड्यांमधील आत्मिक, भावनिक आणि सामाजिक संघर्षांचे निवेदन करतात व त्याद्वारे सद्यःकालीन जीवनाचे नाट्यमय वास्तव चित्र सादर करतात.

ISBN 5-05-000233-8

40

वासिली शुकशीन

# सोयरीक

रादुगा प्रकाशन
मॉस्को
लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई

अनुवाद : **अनिल हवालदार**
सजावट : अंतोनीना कुद्र्याशोवा
चित्रे : न. न. श्चेरबाकोवा

**В. Шукшин**
**РАССКАЗЫ**
*на языке маратхи*

**Vasily Shukshin**
**STORIES**
*in Marathi*

© कथा, प्रस्तावना, चित्रे, रादुगा प्रकाशन, १९८५
© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८६

सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-000233-8

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | ५ |
| उत्तम ड्रायव्हर | ८ |
| मोयरीक | ३२ |
| कोकिळेचे अश्रू | ४३ |
| ग्राम निवासी . | ५२ |
| विक्षिप्त . . | ६३ |
| गाववाले | ७६ |
| लांडगे . . . | ८९ |
| चौखूर धावले घोडे मैदानात | ९९ |
| अपघाती गोळीबार . . . . . . . . . | १११ |
| अंतगाळ, मज्जासंस्था आणि डुकराच्या चरबीचा तुकडा . | १२२ |
| दुःख | १३६ |
| हट्टी | १४३ |
| बेशरम | १६४ |
| विचार | १७८ |
| बूट | १८६ |

# प्रस्तावना

"सर्वप्रथम मी लेखक आहे ..." वासिली शुकशीन स्वतःबद्दल म्हणाले होते. पण वाचकांना प्रथम माहीत झाले कुणाशीही साधर्म्य नसलेले, आश्चर्यकारक नट शुकशीन. त्यांच्यातील ह्या नटाचे दर्शन 'दोन फ्योदर' नामक त्यांच्या पहिल्याच चित्रपटातील नायकाच्या भूमिकेत झाले. त्यानंतर त्यांनी प्रेक्षकांना अधिक अविस्मरणीय आणि हृदयस्पर्शी भूमिका सादर केल्या. नट म्हणून त्यांनी २० चित्रपटांमध्ये काम केले. " 'तळ्याकाठी' चित्रपटात सर्वांत ठळकपणे जाणवतात – वासिली शुकशीन. ते नट नाहीतच, तर माणूस आहेत. अत्यंत विश्वसनीय ... इथे एकमेव महत्त्वाचा. रशियन अभिनयपठडी या ठिकाणी नवे शिखर पादाक्रांत करतेय आणि तिची कशाचीही तुलना करता येणार नाही," – नामवंत सोविएत नाटककार अलेक्सेय आर्बूझोव यांनी लिहिले होते. 'तळ्याकाठी' चित्रपटातील प्रमुख भूमिकेबद्दल वासिली शुकशीन यांना सोविएत संघाचे सरकारी पारितोषिक मिळाले. पुढे आणखी चित्रपट आले – 'शिळोप्याच्या गप्पा,' 'लाल झुपकेदार फुलाचे झाड,' 'मायभूमीसाठी ते लढले ...'

दिग्दर्शक म्हणून शुकशीन यांची कारकीर्द काहीशी वेगाने, अपूर्वरीत्या सुरू झाली. 'राहतो असा एक पोरगा' हा चित्रपट त्यांनी स्वतःच्या पटकथेवरच निर्माण केला. सोविएत रजतपटावर त्याला अभूतपूर्व यश तर मिळालेच, शिवाय व्हेनिस चित्रपटमहोत्सवात त्याला 'सुवर्ण सिंह' सर्वोच्च पदक लाभले. 'तुमचा मुलगा आणि भाऊ' ह्या दुसऱ्या दिग्दर्शित चित्रपटाला रशियन फेडरेशनचे सरकारी पारितोषिक मिळाले. 'विचित्र माणसे', 'शिळोप्याच्या गप्पा', 'लाल झुपकेदार फुलाचे झाड' ह्या चित्रपटांनी ग्वाही दिली की, सोविएत चित्रपटकलासृष्टीत वासिली

शुकशीन नामक खास आणि फलदायी दिग्दर्शक-पठडी अस्तित्वात आहे.

पण तरीही वासिली शुकशीन—"सर्वप्रथम लेखक." त्यांच्या 'खेड्यातील माणसे' ह्या पहिल्या कथासंग्रहाने वाचकांचे व टीकाकारांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतरच्या 'गाववाले,' 'नमूनेदार स्वभाव', 'चांदण्यातील बैठकी' ह्या कथासंग्रहांनी व 'सौंदर्याचे पुजारी', 'मी तुम्हाला स्वातंत्र्य द्यायला आलोय' ह्या कादंबऱ्यांनी यश पक्के केले. अत्यंत गुणी सोविएत शब्दप्रभूंच्या पहिल्या रांगेत शुकशीन यांचे नांव समाविष्ट झाले.

'लितेरातूर्नोये अबोझ्रेनिये' ('साहित्यसमीक्षा') ह्या मॉस्कोतील नामवंत नियतकालिकाने १९७४ साली जेव्हा 'गेल्या वर्षातील तीन सर्वोत्तम साहित्यकृती' ह्या विषयावर वाचकांची मते मागविली, तेव्हा वासिली शुकशीन ह्यांच्या पुस्तकाला "बहुमत" लाभले होते. लोकांच्या स्वभावांचा, जीवनातील वेगवेगळ्या घटनांचा, वस्तुस्थितींचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. तुर्गेनेव यांच्या काळातील रशियन अभिजात साहित्यातील लोकप्रिय लेखनशैलीचे शुकशीन यांनी सुरेख पुनरुज्जीवन केले. त्यांना विनोदाची जाणीव फार छान होती, लेखनात खोडकरपणा होता.

ग्रामीण जीवनाचा अतुलनीय अभ्यास, स्वतःच्या जगाबद्दलच्या जाणीवेचा त्या जीवनाशी जैव संबंध ह्यामुळे अर्थातच शुकशीन यांनी सर्वप्रथम ग्रामीण जीवनाबद्दलच कथा लिहिल्या. त्या जीवनाच्या समस्यांमध्ये, त्यातील घटनांमध्ये आणि संघर्षांमध्ये त्यांना सर्वप्रथम कुठल्यातरी एकाकी आणि विदेशी जगताच्या नशीबांचे प्रतिबिंब केवळ दिसले नाही, कुठल्यातरी पुराणकालीन पितृप्रधान जीवनाचे दर्शन घडले नाही, तर लोकजीवनातील प्रक्रियांचे आणि त्याहूनही महत्त्वाच्या अशा एकूण मानवतेच्या अर्थपूर्ण क्रमांचे प्रतिबिंब दिसले. शहरापेक्षा खेडे श्रेष्ठ आहे असे नाही, तर क्षुद्रप्रवृत्तीपेक्षा, पंखहीन उपभोगी मध्यमवर्गीयापेक्षा माणूस श्रेष्ठ आहे; पितृप्रधान कुटुंबसंस्था नष्ट होण्याबद्दल खेद नाही, तर बेजबाबदार गृहविहीनतेबद्दल वेदना आहे; लोकांच्या शतकानुशतकांच्या जीवनपरंपरांकडे काहीवेळा आपण कसे पाहतो? शुकशीन यांचा जगाकडे पाहण्याचा असा दृष्टिकोन होता.

वासिली शुकशीन यांची जीवनयात्रा फार लौकर, वयाच्या अवघ्या ४५ व्या वर्षी, संपली. मिखायल शोलोखोव यांच्या 'मातृभूमीसाठी ते

लढले' नामक कादंबरीवर त्याच नांवाच्या चित्रपटात भूमिका करीत असताना शुकशीन यांना १९७४ साली शरदात मृत्यूने गाठले. त्या चित्र-पटात शुकशीन यांनी आंद्रेय लोपाखिनची भूमिका केली – मजूर आणि लढवय्या. जीवनात ते तसेच होते.

शुकशीन यांच्या जीवनाच्या वाटचालीचा आरंभ अवघड होता. त्यांना सतत अवघड वाटांवरूनच चालावे लागले. फॅसिझमविरुद्ध महान पितृभूमीरक्षक युद्धकाळात ते लहानाचे मोठे झाले. वयाच्या १६ व्या वर्षी सामुदायिक शेतांवर राबू लागले. पुढे ट्रॅक्टरच्या कारखान्यात मजूर म्हणून काम करू लागले. शुकशीन यांनी शालेय शिक्षण बाहेरून पूर्ण केले. नंतर शाळेत साहित्य हा विषय शिकविला, शाळेचे डायरेक्टर म्हणून काम केले ... केवळ १९५४ साली त्यांनी सरकारी चित्रपट अभ्या-साच्या संस्थेत प्रवेश घेतला. वयाच्या ३० व्या वर्षी शुकशीन यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. पण ह्याबद्दल खेद वाटून घेण्याचे कारण नव्हते. त्यांच्या असाधारण बुद्धिमत्तेने जीवनाचा सखोल थांग घेतला होता. दर कलाकृतीगणिक त्यांची वाढ होत होती. लोकांना काहीतरी सांगायची त्यांची इच्छा होती व ते कसे सांगायचे हेही त्यांना माहीत होते. लोकांनी शुकशीन यांचे सांगणे अवधानपूर्वक ऐकले, शुकशीन यांना स्वतःच्या हृदयाशी धरले.

१९७६ साली, वासिली शुकशीन यांना मरणोत्तर सन्मानपदक देण्यात आले – साहित्य व कला क्षेत्रातील लेनिन-पारितोषिक.

# उत्तम ड्रायव्हर

वसंताच्या मोसमात, पेरणीच्या सुरवातीला, बीस्त्र्यान्कामध्ये एक नवा पोरगा अवतरला होता – ड्रायव्हर पाश्का खोल्मान्स्की. सडपातळ, चिवट आणि चपळ पायांचा. टपोरे पिवळट छटेचे राखी धीट डोळे, सरळ धारदार नाक, तोंडावर देवीचे किंचित वण, उंच कमानदार भुवया. फारसा रागीट नाही, फारसा देखणा नाही. त्याला पाहताच एखाद्या पक्ष्याची आठवण व्हायची.

पाश्का जुन्या आस्तिक कुटुंबात जन्मला होता. अल्ताई पर्वता-मधल्या कातून नदीच्या वरच्या अंगाला वसलेल्या एका खेड्यातून तो आला होता. पण पूर्वजांच्या जुन्या चालीरीती मात्र त्याच्या स्वभावात मुळीच उतरल्या नव्हत्या.

बीस्त्र्यान्कामध्ये त्याचे आगमन असे झाले:

स्थानिक सामुदायिक शेताचे अध्यक्ष येर्मोलाय प्रोखोरोव सामुदायिक शेताच्या मोटारीमधून शहरातून परत येत होते. वाटेत त्यांच्या मोटारीच्या मागच्या स्प्रिंगा तुटल्या. आपल्या ड्रायव्हरवर यथेच्छ तोंडसुख घेतल्यानंतर प्रोखोरोव रस्त्यावर उभे राहून येणाऱ्या मोटारींना हाताने थांबण्याच्या खुणा करू लागले. दोन मोटारी थांबल्या नाहीत, पण तिसरी लॉरी थांबली. ड्रायव्हरने खाडकन दार उघडले.

"कुठं?"

"बीस्त्र्यान्का."

"साल्तोन आणखी पुढं किंवा अलिकडं आहे?"

"थोडंसं अलिकडं. का?"

"साल्तोनपर्यंत बैस. रस्ता दाखव."

"चला."

आसनाच्या पाठीशी रेलून ड्रायव्हर बसला होता. उजवा हात चक्रावर, डावा कोपर केबिनच्या दारावर टेकवून. समोर रस्त्यावर नजर रोखलेली. विचारात गढल्यामुळे डोळ्यांच्या कोपऱ्यांशी किंचित चुण्या पडलेल्या.

लॉरी बेफाम वेगाने धावत होती. रस्त्यामधील खळग्यांना आश्चर्यकारक रीतीने टाळत होती. समोरून येणाऱ्या ॱ ॱगीच्या ते एवढे जवळून गेले की, अध्यक्षांच्या तोंडून भीतीचा चीत्कार उमटला. त्यांनी ड्रायव्हरकडे तिरपा कटाक्ष टाकला. जणू काहीच घडले नव्हते अशा थाटात तो पोरगा बसला होता. डोळ्याच्या कोपऱ्याशी तशाच चुण्या पडलेल्या.

"अजून कधी डोकं फोडून घेतलं नाहीस?" प्रोखोरोवनी विचारले.

"आं?.. घाबरू नको, काका. विमानविद्येत महत्त्वाचं काय?" स्मित करत ड्रायव्हर म्हणाला. त्याचे स्मित साधे, प्रेमळ होते.

"विमानविद्येत महत्त्वाचं – मला वाटतं, दिमाख दाखवू नये!"

"नाही, हे नव्हे." पोरग्याने चक्रावरचा हात पूर्ण सोडला व सिगारेटसाठी खिसा चाचपू लागला. आपला उतारू घाबरट आहे ह्याची त्याला बहुधा मजा वाटली होती.

प्रोखोरोवनी दात आवळले व चेहरा दुसरीकडे फिरवला.

त्याचक्षणी लॉरी हवेत उडाली. प्रोखोरोवनी अंतःप्रेरणेने दार पकडले आणि ड्रायव्हरकडे क्रुद्ध नजरेने पाहिले.

"ए!.. वैमानिका!"

पोरग्याने परत स्मित केले.

"वेगात जायला आवडतं," त्याने कबुली दिली.

प्रोखोरोवनी लक्षपूर्वक त्या तरुणाच्या डोळ्यांकडे पाहिले. त्या तरुणातले त्यांना काहीतरी आवडले होते.

"साल्तोनला कशासाठी चालला आहेस?"

"काम करायला."

"पेरणीसाठी?"

"होय... शेतकऱ्यांना मदत पाहिजेय!"

धूर्त प्रोखोरोव काही वेळपर्यंत गप्प बसले. त्यांनी सिगारेटसुद्धा पेटवली. स्वतःच्या सामुदायिक शेतावर ह्या तरुणाला आकर्षित करण्याचे त्यांनी ठरवले.

"खुद्द साल्तोनमध्ये अथवा आसपासच्या प्रदेशात?"

"जवळच्या प्रदेशात. लीस्तव्यान्का खेड्यात... इथं तुमचा भाग छान आहे."

"तुझं नांव काय?"

"माझं? पावेल. पावेल येगोरीच."

"आपल्यात सारखेपणा आहे," प्रोखोरोव म्हणाले. "माझ्या वडलांचं नांवसुद्धा येगोर. माझ्याकडं येतोस, येगोरीच?"

"म्हणजे काय?"

"लीस्तव्यान्काचे अध्यक्ष माझ्या ओळखीचे आहेत. त्यांच्यापाशी तुझ्याबद्दल बोलतो. मीसुद्धा अध्यक्ष आहे. लीस्तव्यान्का अगदी भिकार आहे – मी तुला हे सांगितलं पाहिजे. पण आमच्या खेड्यात..."

"मला समजलं नाही. मला आदेश दिलाय की..."

"तुला काय फरक पडतोय? मी तुला तसाच कागद लिहून देईन... की पेरणीवर तू काम केलंस. सगळं कायद्याप्रमाणं. आपण त्या अध्यक्षां-बरोबर बोलू. आम्हाला तसं ते देणं लागतात. मग?"

"क्लब आहे?" पाश्काने विचारले.

"क्लब? अर्थात आहे!"

"काढला फोटो!"

"काय?"

"कबूल आहे, म्हणालो! रंगीत!"

प्रोखोरोवनी ओशट स्मित केले.

"विदूषक आहेस तू... (पेरणीच्या वेळी लॉरीसकट एक जादा ड्रायव्हर – म्हणजे रंगीत फोटोच!) विनोदी आहेस तू येगोरीच."

"प्रयत्न करतोय. म्हणजे क्लब आहे?"

"आहे, पाशा. मस्त क्लब आहे – पूर्वी चर्च होतं!"

"प्रार्थना करू," पाश्का म्हणाला.

प्रोखोरोव आणि पाश्का असे दोघेही हसले.

अशा रीतीने पावेल येगोरीचचे बीस्त्र्यान्कात आगमन घडले.

पाश्का प्रोखोरोवांच्या घरीच रहात होता. प्रोखोरोवांच्या बायकोशी त्याची लौकर मैत्री जमली. संध्याकाळच्या वेळांना तिच्याशी गप्पा मारायला त्याला आवडायचे.

"बायकोला भावना असल्या पाहिजेत!" हंसाचे मांस आणि शेवया यांचा दाट सार भुरकत एके संध्याकाळी पाश्काने विधान केले.

"बरोबर, येगोरीच," पायामधील घट्ट बूट खेचून काढत येर्मोलाय दुजोरा देत म्हणाले. "जिला भावना नाहीत ती कसली आलीय बायको?"

"जेव्हा मी घरी येईन," पाश्का पुढे बोलू लागला, "थकलेला मळलेला ... तेव्हा सगळयात प्रथम मला उत्साही बायको दिसली पाहिजे. उदाहरणादाखल मी तिला म्हणीन: 'रामराम मारूस्या!' आणि ती मला मजेने म्हणेल: 'रामराम, पावलीक! तू दमलास?'"

"पण ती बिच्चारी जर आख्खा दिवसभर स्वत: राबत असली, तर कुठला उत्साह आणणार ती?" घरधनीणीने शेरा मारला.

"तरीसुद्धा! जर ती रडवं, आंबटतोंड करून बसली तर मी तिला म्हणीन: 'रंगीत फोटो!' मग माझं लक्ष दुसऱ्या पोरींकडं जाईल. बरोबर, येगोरीच?"

"अगदी बरोबर!" प्रोखोरोवनी त्याला दुजोरा दिला.

घरधनीण कमालीची चिडली व सगळे पुरुष बायकांपाठी धावत असतात असे म्हणाली.

स्वत:च्या आगमनाच्या दुसऱ्या दिवशी पाश्का क्लबात अवतरला. विलक्षण उत्साही, ठळक आकृती. मोकळया कॉलरचा गडद तांबडा सदरा, क्रोम लेदरचे गुडघ्यांपर्यंतचे बूट, नव्या धर्तीची लष्करी टोक-दार टोपी. त्या टोपीच्या टोकावर भडक तपकिरी गोंडा रूळत होता.

"इथली माणसं कशी आहेत ... ठीक?" एका पोराला त्याने नि-र्विकारपणे विचारले आणि नाचणाऱ्या जोडयांकडे एक थंड नजर फिरवली. "स्थानिक जनतेवर" त्याने स्वत:ची कितपत छाप पाडली होती ह्याचा तो अंदाज घेत होता.

"ठीक आहेत," पोरगा उत्तरला.

"पण तू उदाहरणादाखल, असा आंबट का?"

"तू कोण लागून गेलास मला प्रश्न विचारणारा?" पोरगा अपमानीत झाला होता.

पाश्काने समझोत्याचे स्मित केले.

"मी तुमचा नवा सरकारी वकील. शिस्त लावायला आलोय."

"सांभाळ, नाही तर इथं तुलाच शिस्त लावतील!"

“बिघडत नाही,” पाश्काने पोरग्याला डोळा घातला व हॉलमधील मुली आणि मुले न्याहाळणे त्याने चालू ठेवले.

त्यालासुद्धा सगळे निरखून पहात होते.

पाश्काला असले क्षण आवडायचे. अपरिचित, अनोळखी, तुसडे असे काहीही आरंभी त्याला अस्वस्थ करायचे. अर्थात, मुलींमध्ये त्याला सर्वांत जास्त रस होता.

नाच संपला. जोडया आपापल्या जागी परतल्या.

“कोण ती पोरगी?” पाश्काने मघाच्याच पोराला विचारले. त्याने पाहिलेली मुलगी म्हणजे स्थानिक सुंदरी नास्त्या प्लातोनोवा होती.

पोरग्याला त्याच्याशी संभाषण करण्याची इच्छा नव्हती. तो पाश्कापासून दूर गेला.

वॉल्तझ वाजवू लागले.

सबंध हॉल आडवा चालत पाश्का नास्त्यापाशी गेला, तिच्यासमोर किंचित झुकला आणि मोठ्यांदा म्हणाला:

“वॉल्तझ नाचायला बोलावतोय!”

पाश्काच्या रुबाबदार वागण्याने सगळे चकित झाले. त्याच्याकडे उघड आणि मजेदार कुतूहलाने पाहू लागले.

नास्त्या सावकाशपणे उठली. पाश्काच्या पातळ खांद्यावर तिने आपला वजनदार हात ठेवला. पाश्का पापणी न लववता प्रेमळ नजरेने तिच्याकडे पहात होता.

त्यांनी वॉल्तझची वर्तुळे घातली.

नास्त्याच्या नृत्यामधील हालचाली काहीशा बोजड आणि मंद होत्या. पण पाश्काने अशी चमकदार सुरवात केली की, काहीजण अक्षरशः नाचायचे थांबून त्याच्याकडे पहात राहिले. शेवटी तर त्याने कमाल केली. नास्त्यापासून तो थोडासा अलग झाला, पण तिचा हात न सोडता त्याने तिच्याभोवती अशा गिरक्या घेतल्या, अशा गिरक्या मारल्या... सगळे “पब्लिक” गार पडले! पाश्काने “स्थानिक जनतेच्या” डोक्यावर कुठेतरी नुसती नजर फेकली. जणू त्याला म्हणायचे होते: “एवढ्यावरच संपलं नाही. कधीतरी मूड आला म्हणजे आणखी गंमत दाखवीन. मी पट्टीचा नाचणारा होतो एके काळी!”

नास्त्याचे गाल लाल लाल झाले. ती तशाच मंद, संथ हालचाली करत राहिली.

"तुला दिमाख दाखवायला आवडतो!" पाश्काच्या नजरेला नजर भिडवत ती मजेने म्हणाली.

पाश्काने न ऐकल्यासारखे केले.

"कुठून उगवलास?"

"मॉस्कोहून," पाश्काने सहज उत्तर फेकले.

"तुमच्याकडं सगळे असेच?"

"असेच म्हणजे?"

"असे... भावखाऊ!"

"तुमच्या अज्ञानाचं मला आश्चर्य वाटतं," पाश्का म्हणाला. नास्त्याच्या गडद, गूढ डोळयांमध्ये खोलवर आपला अर्थपूर्ण स्नेहल कटाक्ष त्याने खुपसला.

नास्त्या हळूच हसली.

पाश्का गंभीर होता.

"तुम्ही मला आवडलात," तो म्हणाला. "असा आदर्श मी खूप दिवसांपासून शोधतोय."

"फार वेगवान आहेस," नास्त्याने पाश्काच्या डोळयांना डोळे भिडवले.

"मी अगदी गंभीरपणं बोलतोय."

"म्हणून काय झालं?"

"आज मी तुमच्या घरापर्यंत तुम्हाला सोडायला येईन. अर्थात तुमचा दुसरा कुणी शिलेदार नसेल तर! ठरलं?"

नास्त्या हसली व तिने नकारार्थी मान हलवली. पाश्काने या गोष्टी-कडे मुळीच लक्ष दिले नाही.

वॉल्तझ संपला.

पाश्काने त्या मुलीला तिच्या आसनापर्यंत नेऊन सोडले, परत रुबाब-दारपणे तो किंचित झुकला आणि इतर पोरांबरोबर धूम्रपान करण्या-साठी हॉलबाहेर गेला.

पोरे पाश्काकडे शत्रुत्वाच्या नजरांनी पहात होती. हे असे नेहमी घडायचे ह्याची पाश्काला जाणीव होती.

"इथं जवळपास पटकन घसा ओला करायची एखादी जागा नाही?" धूम्रपान करणाऱ्यांच्या एका घोळक्यापाशी जात त्याने विचारले.

सगळे गप्प राहिले व पाश्काकडे टवाळीच्या नजरांनी बघत राहिले.

"काय झालं? जिभा गिळून टाकल्यात?"

"तुला असं वाटत नाही, की तू जरा जास्तच पुढाकार घेतो आहेस?" नाचापूर्वी पाश्काबरोबर बोलणाऱ्या पोरग्याने आता विचारले.

"नाही, मला नाही तसं वाटत."

"पण मला वाटतं!"

"क्रूस चिन्ह कर, तसं वाटत असेल तर!"

पोरग्याचे डोळे अप्रियपणे आकुंचित झाले.

"चल बाहेर एक मिनिट... बोलू या एकमेकांशी?"

पाश्काने नकारार्थी मान हलवली.

"शक्य नाही."

"का?"

"निष्कारण मला पांगळं बनवाल... नंतर कधीतरी बोलू. पण तुम्ही सगळे माझ्याशी असं एकदम वैर का धरताय? अजून मी कुणाच्या कुरूपावर पाय ठेवलाय असं मला वाटत नाही."

मुलांची अशी अपेक्षा नव्हती. पाश्काचा प्रांजलपणा त्यांना आवडला. हळूहळू ते त्याच्याशी गप्पा मारू लागले.

त्यांच्या गप्पा चालू असतानाच टँगोचे सूर वाजले आणि नास्त्याला दुसऱ्या तरुणाने नाचाला निमंत्रण केले. पाश्काने संतापाने सिगारेटचे थोटुक बुटांखाली चुरडले. त्याला सांगण्यात आले की, मॉस्कोहून आलेल्या एका इंजिनिअरबरोबर नास्त्याचे सूत जमले होते आणि लौकरच बहुधा त्यांच्या लग्नाचा धडाका उडणार होता. पाश्का लक्षपूर्वक नास्त्याचा मागोवा घेत होता. जणू त्या मुलांच्या बोलण्याकडे त्याचे लक्षच नव्हते. मग त्याने टोपी मागे खेचली व कपाळाला आठ्या घातल्या.

"बघू, कोण कुणाचा फोटो काढतो," तो म्हणाला आणि त्याने टोपी सरळ केली. "कुठं आहे तो?"

"कोण?"

"इंजिनिअर."

"आज तो इथं नाही."

"ह्या जास्त शिकलेल्यांना मी डाव्या थपडीत ठिकाणावर आणतो."

टँगो संपला.

पाश्का नास्त्यापाशी गेला.

"तुम्ही माझ्या एका प्रश्नाचं अजून उत्तर दिलं नाहीत."

"कोणत्या प्रश्नाचं ?"

"आज मी तुम्हाला घरापर्यंत सोडू ?"

"मी एकटी जाऊ शकते. धन्यवाद."

पाश्का तिच्याशेजारी बसला. त्याचे गोल मांजरीसारखे डोळे परत गंभीर बनले.

"सभ्य गृहस्थांप्रमाणं बोलू या..."

"देवा रे!" नास्त्याने उसासा टाकला, ती उठली व हॉलच्या दुसऱ्या टोकापाशी गेली.

पाश्का तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहिला. भोवतालची सहानुभूतीदर्शक हास्याची खसखस त्याने ऐकली. त्याला शरम वाटली नाही. फक्त पोटाच्या खळगीत वेदना उमटली. गरम, खुपसणारी वेदना. तोसुद्धा उठला आणि क्लबातून निघून गेला.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पाश्काने आणखीच ऐटबाज पोषाख केला. प्रोखोरोव यांच्याकडून त्याने विणकाम केलेला सदरा मागून घेतला, त्याला फिकट निळा रेशमी पट्टा आवळून बांधला, गडद निळी तुमान चढवली, लोकरी सुताचा कोट अंगात घातला आणि त्याची स्वारी स्थानिक ग्रंथालयापाशी हजर झाली (योग्य वेळच्या चौकशीतून पाश्काला समजले होते की, नास्त्या ग्रंथपालिका म्हणून काम करत होती).

"नमस्ते!" प्रशस्त लाकडी कॉटेजमध्ये शिरत दमदार आवाजात तो म्हणाला. ह्या कॉटेजमध्ये खेड्याचे ग्रंथालय होते आणि वाचनालयही तेथेच होते.

ग्रंथालयात फक्त नास्त्या होती आणि टेबलापाशी एक तरुण 'अगोन्योक' पहात बसला होता.

नास्त्याने पाश्काला प्रतिअभिवादन केले आणि तो जणू जुना ओळखी-चा असावा असे स्मित केले.

पाश्का तिच्या टेबलापाशी गेला आणि शांतपणे पुस्तके पहायला त्याने आरंभ केला. नास्त्याकडे त्याने पूर्ण दुर्लक्ष केले. 'अगोन्योक' वाचणारा तरुण म्हणजेच इंजिनिअर, नास्त्याचा भावी पती, असे त्याने मनातल्या मनात ताडले.

"काहीतरी वाचायला पाहिजे?" नास्त्याने विचारले. पाश्काने

तिला ओळखले नाही ह्याचे तिला काहीसे आश्चर्य वाटले होते.

"होय, पाहिजे, तुम्हाला माहीत आहे..."

"काय पाहिजे तुम्हाला?" नास्त्या अनिच्छेने "तुम्ही" वर आली होती.

"कार्ल मार्क्सचं 'भांडवल.' त्यातलं एक प्रकरण वाचायचं राहून गेलंय."

तरुणाने 'अगोन्योक' बाजूला ठेवले व पाश्काकडे पाहिले.

नास्त्याला हसण्याची अनिवार इच्छा झाली होती, पण पाश्काची करडी नजर पाहताच तिने स्वत:ला आवरले.

"काय तुमचं आडनांव?"

"खोल्मान्स्की पावेल येगोरीच. जन्म – एकोणीसशे पस्तीस, ड्रायव्हर-मेकॅनिक, दुसऱ्या श्रेणीचा."

हे सर्व नास्त्या लिहून घेत होती तोवर तिच्या नकळत पाश्का हळूच तिरप्या नजरेने तिला न्याहाळत होता. मग त्याने सभोवती पाहिले. इंजिनिअर त्याचे निरीक्षण करत होता. त्यांच्या नजरा एकमेकींना भिडल्या, पाश्काचा संयम सुटला आणि... त्याने त्याला डोळा घातला.

"क्रॉसवर्ड सोडवताय?"

इंजिनिअरला पटकन उत्तर देता आले नाही.

"होय... पण तुम्ही काहीतरी सखोल घेताय असं मला दिसतंय."

"बरं का, गेना, हेसुद्धा मॉस्कोहून आलेत," नास्त्या म्हणाली.

"असं?" गेनाला प्रामाणिक आनंद झाला होता. "केव्हा सोडलंत मॉस्को? तिथल्या काही नव्या बातम्या सांगा आम्हाला."

पाश्काने कार्डावर सही करायला जरूरीपेक्षा जास्त वेळ लावला. तो गप्प राहिला.

"धन्यवाद," तो नास्त्याला म्हणाला. अवजड ग्रंथ घेऊन टेबलापाशी गेला. जाडजूड ग्रंथ टेबलावर आपटत त्याने गेनापुढे हात केला. "पावेल येगोरीच."

"गेन्नादी. खूप आनंद झाला!"

"मॉस्को का?" काही नियतकालिके स्वत:कडे ओढून घेत पाश्काने उलट विचारले. "मॉस्कोत धामधूम चालू... नेहमीचा गोंगाट..." आणि इंजिनिअरला ताळ्यावर येण्याची संधी न देता तो भडाभडा पुढे बोलू लागला: "विनोदी मासिकं मला फार आवडतात! विशेषत:

दारुड्यांवरचे विनोद – मजेदार चित्रं काढतात नेहमी !..”

“होय, गंमतीदार असतात. मॉस्को केव्हा सोडलंत ?”

“केव्हा सोडलं ?” पाश्काने मासिकाचे पान उलटले. “तिथं मी जन्मल्यापासून कधीच गेलेलो नाही. ह्या मला दुसराच कुणीतरी चुकून समजल्यात.”

“पण काल रात्री क्लबात तुम्ही स्वतःच तर मला तसं सांगितलंत !” नास्त्याने निषेध व्यक्त केला.

पाश्काने तिच्याकडे कटाक्ष फेकला.

“मला आठवत नाही.”

नास्त्याने गेनाकडे पाहिले, गेनाने पाश्काकडे.

पाश्का चित्रे न्याहाळत होता.

“कमाल आहे,” नास्त्या म्हणाली. “म्हणजे मला स्वप्न पडलं !”

“घडतं असं,” मासिकातील चित्रे पाहणे पुढे चालू ठेवत पाश्का म्हणाला. “हे बघा – “भोंदू”,” मासिक गेनापुढे धरत तो म्हणाला. “भयानक !”

गेनाने स्मित केले.

“तुम्ही पेरणीच्या कामाला आमच्याकडं आला आहात ?”

“अगदी बरोबर,” पाश्काने नास्त्याकडे नजर टाकली. तीसुद्धा कुतूहलाने त्याला न्याहाळत होती. पाश्काने ह्याची नोंद घेतली. “सोंगट्या खेळायच्या ?” त्याने इंजिनिअरला सुचविले.

“सोंगट्या ?” चकित होऊन इंजिनिअरने विचारले. “पण त्यापेक्षा बुद्धिबळ खेळलो तर ?”

“बुद्धिबळात कंटाळा येतो,” पाश्का म्हणाला (त्याला बुद्धिबळ खेळता येत नव्हते). “विचार करावा लागतो. सोंगट्यांमध्ये सगळं फटाफट.”

“ठीक आहे, सोंगट्या खेळू,” गेनाने संमती दिली व नास्त्याकडे पाहिले.

नास्त्या उठून बाहेर आली आणि त्यांच्याजवळ बसली.

“सोंगटी घ्यायची ?” पाश्काने विचारले.

“म्हणजे काय ?”

“म्हणजे मारायचं असतानासुद्धा माणूस मारत नाही, तेव्हा सोंगटी घेतात,” नास्त्याने खुलासा केला.

"आं ... ठीक आहे. घेऊ."

पाश्काने पटापट पटावर सोंगट्या मांडल्या. दोन सोंगट्या हातात घेऊन पाठीशी लपवल्या.

"कोणत्या?"

"डाव्या."

"तुमची खेळी नाही." पाश्काने पहिली खेळी केली. "असं करू या," खुर्चीवर अधिक आरामशीरपणे बसत तो म्हणाला; त्याच्या मुद्रेवर धूर्त समाधान विलसत होते. "अर्थात इथं धूम्रपानाला मनाई असेल ना?" त्याने नास्त्याला विचारले.

"अर्थातच मनाई आहे."

"ठीक आहे!" पाश्काने दुसरी खेळी केली. "फ्रेंच म्हणतात त्या-प्रमाणं आपण काही रंगीत फोटो काढू."

इंजिनिअर खेळात कच्चा होता हे ताबडतोब दिसून आले होते. नास्त्या त्याला सूचना करू लागली. त्यावर त्याने निषेध व्यक्त केला.

"थांब! हे बरोबर नाही ... तू कशाला मला सल्ला देतेस?"

"तू चुकीच्या खेळी करतो आहेस!"

"मग काय झालं? खेळतोय तर मी!"

"शिकायला पाहिजे."

पाश्काने स्मित केले. तो आत्मविश्वासाने आणि भराभर खेळत होता.

"ती बघ गेना ... कोपऱ्याची," नास्त्याने न राहवून परत सुचवले.

"छे:! मला शक्य नाही तसं!" गेना संतापला. "मी स्वत: आत्ता हीच खेळी करणार होतो, पण तत्त्व म्हणून तसं करणार नाही."

"एवढा का खवळतोस? विचित्रच आहेस!"

"खवळू नको तर काय करू?"

"खवळणं प्रकृतीला चांगलं नव्हे," पाश्का खोचून बोलला व त्याने नास्त्याला हळूच डोळा घातला.

नास्त्या लाजून लाल झाली.

"तर आता हरशील – तत्त्व म्हणून!"

"नाही, कशाला?.. अजून माझे फोटो काढण्याच्या खूप संधी आहेत," पाश्का विनयाने म्हणाला. "बरं, मला राजा मिळाला. तुमची खेळी."

"आता हरला," निराशेने नास्त्या म्हणाली.

"स्वतःपुरतं पहा!" अपमानीत होऊन गेना उद्गारला. "खरंच, मग अशक्य आहे. तू जा बघू!"

"आणि म्हणे इंजिनिअर!" नास्त्या उठली व स्वतःच्या जागेकडे गेली

"हे काही... फार हुषारीचं नव्हे. इथं इंजिनिअरचा काय संबंध?"

"वाटे भीती मला, आवडून जायची त्याला!" नास्त्या गाण्याची ओळ गुणगुणली व ग्रंथालयाच्या आतल्या भागात निघून गेली.

"बाईची जात!" काही कारणाने पाश्का म्हणाला.

इंजिनिअरने पटावरच्या सोंगट्या गोळा केल्या आणि किंचित घोगऱ्या आवाजात तो म्हणाला:

"मी हरलो."

"सिगारेट ओढायला बाहेर जाऊ या?" पाश्काने प्रस्ताव केला.

"चला!"

कॉरीडॉरमध्ये सिगारेट पेटवत इंजिनिअरने कबूल केले:

"काय असा स्वभाव, मला समजत नाही! हमखास प्रत्येक बाबतीत ढवळाढवळ करते!"

"काही विशेष नाही," पाश्का संदिग्धपणे म्हणाला. "खूप दिवसां-पासून इथं आहेस?"

"काय?"

"मी विचारलं, खूप दिवसांपासून इथं राहतोस?"

"राहतो? दुसरा महिना चाललाय!"

"लग्न करणार आहेस?"

इंजिनिअरने चकित नजरेने पाश्काला न्याहाळले.

"तिच्याशी? होय. काय झालं?"

"काही नाही. छान मुलगी आहे. तिचं प्रेम आहे तुझ्यावर?"

इंजिनिअर आता मात्र पुरता गोंधळला.

"प्रेम?.. मला वाटतं, असावं!.."

दोघे गप्प राहिले. पाश्काने धूम्रपान केले व सिगारेटचे थोटूक तो न्याहाळत बसला. इंजिनिअरने खाकरत विचारले:

"तू 'भांडवल' खरंच वाचतो आहेस?"

"अर्थातच नाही," पाश्का सहजपणे सिगारेट ओठांमध्ये तोंडाच्या

कोपऱ्याशी धरत म्हणाला. त्याने कपाळाला आठ्या घातल्या, कमरेशी हाताचा पंजा आत खुपसला व झटकन सदरा ओढून व्यवस्थित केला. "सिनेमाला जाऊ या?"

"आज काय आहे?"

"कसला तरी विनोदी चित्रपट आहे म्हणतात."

"जाऊ या."

"मात्र... तिला बोलाव आपल्याबरोबर..." पाश्काने ग्रंथालयाच्या दाराच्या दिशेने मान उडवली व सहानुभूतीदर्शक चेहरा केला.

"अर्थातच!" इंजिनिअर गंभीरपणे म्हणाला. "मी आत्ता जातो तिच्यापाशी... बोलतो तिच्याशी..."

"जा, जा लौकर!"

इंजिनिअर आत गेला व पाश्का बाहेर कठड्याशी रेलून रस्ता न्याहाळू लागला.

...सिनेमाला तिघे एकत्र बसली. इंजिनिअर आणि पाश्का यांच्या-मध्ये नास्त्या बसली होती.

दिवे मालवताच पाश्का नास्त्याच्या जवळ सरकला आणि त्याने तिचा हात धरला. नास्त्याने मुकाटपणे स्वतःचा हात सोडवून घेतला व त्याच्यापासून ती दूर सरली. जणू काहीच घडले नाही अशा थाटात पाश्का पडद्याकडे पहात राहिला. दहा मिनिटे असे बघितल्यावर परत त्याने हळूच नास्त्याचा हात चाचपडायला सुरुवात केली. नास्त्या अचानक त्याच्याजवळ सरकली व ऐकू जाईल अशा आवाजात त्याच्या कानात कुजबुजली:

"जर परत माझ्या अंगाला हात लावलास, तर सबंध क्लबासमोर मी तुझी शोभा करीन!"

पाश्काने झटदिशी हात मागे घेतला.

आणखी पाच मिनिटे तो चूप बसला. नंतर नास्त्याच्या अंगावर झुकत तिच्या कानात कुजबुजला:

"माझं हृदय ग्रेनेडसारखं फुटतंय!"

नास्त्या हळूच हसली. पाश्का परत तिचा हात चाचपडू लागला. नास्त्या गेनाला म्हणाली: "मी तुझ्या खुर्चीवर बसते."

"त्याचं डोकं मधे येतंय ना? ए कॉम्रेड, बाजूला घे तुझं डोकं!" पाश्काने आज्ञा केली.

पुढे बसलेल्या कॉम्रेडने डोके "बाजूला" घेतले.

"आता ठीक?"

"ठीक!" नास्त्या म्हणाली.

प्रेक्षागृहात खूप गोंगाट होता आणि लोक मोठ्यांदा हसत होते.

पाश्का खाली झुकला, त्याने सिगारेट पेटवली व घाईघाईने गोडूस धूर तो गिळू लागला. प्रोजेक्टरच्या प्रकाशकिरणांमध्ये निळया धुराच्या रेषा उमटल्या. नास्त्याने त्याच्या कुशीत ढोसले:

"तू काय करतोस हे?"

पाश्काने सिगारेट विझवली... नास्त्याचा हात पकडून त्याने जोरात दाबला व खाली वाकून तो बाहेर गेला. जाताना तो गेनाला म्हणाला:

"हा विनोदी चित्रपट फक्त वाघच बघू शकतील!"

बाहेर रस्त्यावर पाश्काने सदऱ्याची कॉलर मोकळी केली व सिगारेट पेटवली. सावकाशपणे तो घरी गेला.

अंगातील कपडे न उतरवता घरी तो तसाच पलंगावर आडवा झाला.

"तू असा कष्टी का?" येर्मोलायनी विचारले.

"असंच..." पाश्का म्हणाला. काही मिनिटे तो तसाच पडून राहिला. मग अचानक त्याने विचारले: "खरंच, अजून बायकांना पळवून नेतात अथवा नाही?"

"म्हणजे?" न समजून येर्मोलायनी विचारले.

"म्हणजे पूर्वीसारखं... पूर्वी बायकांना पळवून न्यायचे!"

"आं... हं! कुणास ठाऊक! त्यांना पळवून कशाला न्यायचं? मला वाटतं, त्या तर स्वतःच राजीखुषीनं येतात!"

"अर्थात हे खरं आहे म्हणा! मी आपलं सहज..." पाश्काने कबुली दिली. आणखी थोडा वेळ तो गप्प बसला. "अर्थात ह्याला कायद्यानं काही शिक्षा नाही?"

"बहुतेक नसावी. मला माहीत नाही, पावेल."

पाश्का पलंगावरून उठला आणि खोलीत येरझाऱ्या घालू लागला. कसल्यातरी गोष्टीचा तो खूप विचार करत होता.

"अठरावं वरीस एकदाच येतं..." अचानक त्याने गाण्याची लकेर मारली. "येगोरीच, सदऱ्याबद्दल थँक्यू!"

"अचानक काय झालं?"

"असंच!" पाश्काने प्रोखोरोवांचा कशीदाकाम केलेला सदरा अंगातून काढला व स्वतःचा सदरा घातला. खोलीच्या मध्यभागी उभा राहून तो परत विचारात गढला. "फोटो काढला, येगोरीच!"

"कुठल्यातरी पोरीला पळवून न्यायचा विचार तुझ्या टाळक्यात घोळतोय काय?" येर्मोलायनी विचारले.

पाश्का हसला, काहीही न बोलता रस्त्यावर गेला.

ओली, अंधारी रात्र होती. नुकताच जोरदार पाऊस पडून गेला होता. सगळ्या गोष्टी ठिपकत होत्या. कुत्रे भुंकत होते. कुठेतरी इंजिनाचा आवाज होत होता.

पाश्का डेपोत गेला. तेथे त्याची लॉरी ठेवलेली होती.

डेपोच्या आवारात त्याला हटकण्यात आले.

"आपलाच," पाश्का म्हणाला.

"कोण आपला?"

"खोल्मान्स्की."

"कामगिरीवर इथं आलेला काय?"

"होय."

प्रकाशाच्या वर्तुळात म्हातारा राखणदार आला. त्याने पायघोळ मेंढकातडी कोट घातला होता व खांद्यावर बंदूक टाकली होती.

"कुठंतरी जायचंय?"

"जायचंय!"

"सिगारेट आहे का?"

"आहे."

त्यांनी सिगारेटी पेटविल्या.

"आणखी पाऊस कोसळणार," म्हातारा म्हणाला आणि त्याने लांब जांभई दिली. "पावसात फार झोप येते."

"तू झोप," पाश्काने सल्ला दिला.

"मनाई आहे. मी आत्ता डुलकी मारीन आणि तो यायचा..."

पाश्काने त्या बडबड्या म्हाताऱ्याला मध्येच अडवले.

"ठीक आहे बाप्पा, मी घाईत आहे."

"बरं, बरं, जा," म्हाताऱ्याने परत जांभई दिली.

पाश्काने स्वतःची लॉरी सुरू केली व डेपोच्या दारातून तो बाहेर पडला.

नास्त्या कुठे रहात होती हे त्याला माहीत होते – नदीपाशी, कड्याच्या टोकावर.

दिवसा तो प्रोखोरोवांशी बोलत होता, तेव्हा त्यांनी पाश्काला हे घर दाखवले होते. पाश्काने ध्यानात ठेवले होते की, खोलीच्या खिडक्या बागेच्या दिशेला होत्या.

आत्ता पाश्काला एक प्रश्न छळत होता: प्लातोनोवांच्या घरात कुत्रा होता अथवा नव्हता?

खेड्यातील रस्ते पूर्ण सामसूम होते. प्रणयी जोडपीसुद्धा कुठेतरी लपली होती. कुठेतरी खड्ड्यात पडू नये म्हणून पाश्का अगदी मंद गतीने लॉरी चालवत होता.

नास्त्याच्या घरापाशी येताच त्याने पेट्रोल जवळ जवळ बंद केले व केबिनमधून तो खाली उतरला. इंजिन मात्र चालू ठेवले.

"तर आता," तो हळूच म्हणाला आणि हाताचा तळवा त्याने छातीवर चोळला. तो घाबरला होता.

घरात उजेड नव्हता. अंधाराला डोळे सरावल्यानंतर, झाडांच्या भुंड्या फांद्यांमधून पुढच्या खोलीच्या खिडक्यांची मंद चमकणारी तावदाने पाश्काला दिसली. त्याच्या छातीमधील धडधड वाढली.

"कुत्रा नसला म्हणजे मिळवली!"

तो खोकला आणि सावधपणे त्याने कुंपण हलवले. आवारात चूपचाप शांतता. पूर्ण स्तब्धता. छपरावरून ठिपकणाऱ्या पाण्याच्या थेंबांचा तेवढा आवाज.

"तर पाश्का... आता कपाळावर एक तर सोटा बसेल, नाही तर..."

सखल कुंपणावरून तो हळूच चढून आत आला आणि खिडक्यांकडे गेला. पाठीशी त्याच्या विश्वासू लॉरीच्या इंजिनाची मंद घरघर ऐकू येत होती, त्याच्या स्वतःच्याच पावलांचा आवाज येत होता व पाण्याची टिप टिप मोठ्यांदा ऐकू येत होती. वसंत रसात न्हाऊन निघत होता. कुजकट दर्प सुटला होता.

बागेतून चोरपावलांनी जात असताना पाश्का मनातल्या मनात अठराव्या वर्गाबाबतच्या गाण्याची एकच एक ओळ सारखा म्हणत होता: "अठरावं वरीस एकदाच येतं..." आज सबंध दिवसभर तो हेच गाणे गात होता.

अगदी खिडकीपाशी पोहोचल्यावर एकदम त्याच्या पायांखाली वाळकी

काटकी काडकन वाजली. पाश्का गोठून गेला. शांतता. टिप टिप आवाज. पाश्काने शेवटची दोन पावले टाकली व भिंतीपाशी उभा राहिला. त्याने श्वास सावरला.

"इथं ती एकटीच झोपते अथवा नाही?" नवा प्रश्न मनात उमटला.

त्याने खिशातून विजेरी काढली व बटण दाबून खिडकीवर प्रकाश-झोत टाकला. विजेरीचा पिवळट ठिपका भिंतींवरून सरकत अंधारातील एकेक वस्तू उजळू लागला: भिंतीमधील फरशांचा चुलाणा, दार, पलंग... ठिपका थरथरला आणि थांबला. बिछान्यात कुणाचीतरी हालचाल झाली. डोके वर झाले – नास्त्या! घाबरली नाही. चटकन उठली आणि फक्त रात्रीच्या तलम सदऱ्यात खिडकीपाशी चालत आली. पाश्काने विजेरी विझवली.

नास्त्याने कड्या काढल्या व खिडकी उघडली.

खोलीमधून उबदार झोपाळू वास आला.

"तू काय करतोस है?" हळू आवाजात तिने विचारले. तिच्या आवाजातील वेगळेपणामुळे पाश्का एकदम सावध बनला.

"ओळखलं की काय मला?" तो घाबरला. तात्पुरता तो स्वतःची ओळख देऊ इच्छित नव्हता. तो गप्प राहिला.

नास्त्या खिडकीपासून दूर झाली. पाश्काने विजेरी पेटवली. नास्त्या खोलीच्या दारापाशी गेली, तिने ते दार पक्के बंद केले व परत ती खिडकीपाशी आली. पाश्काने विजेरी विझवली.

"नाही ओळखलं! नाहीतर नुसत्या सदऱ्यात फिरली नसती!"

पाश्काला तिच्या केसांचा गंध जाणवला. डोक्यात गरम धुंदी चढली. त्याने तिला बाजूला सारले व खिडकीत चढू लागला.

"अखेरीस टाळक्यात प्रकाश पडला तुझ्या?" नास्त्या किंचित मृदु आवाजात म्हणाली.

"पडलाय, पडलाय, चांगला प्रकाश पडलाय," पाश्का मनाशी म्हणाला. "आता होईल तमाशा!"

"अरे पाय तरी पूस," पाश्का जेव्हा खोलीत आला व निकट उभा राहिला तेव्हा नास्त्या म्हणाली.

पाश्काने मौन चालू ठेवले. त्याने तिला मिठी घातली. उबदार, मऊ मऊ. एवढे घट्ट आवळले की, तिच्या सदऱ्याची कुठलीतरी एक गुंडी तुटली.

“आह् !” नास्त्या धाप टाकत म्हणाली. “तू काय करतो आहेस? सैतान!”

पाश्काने तिची चुंबने घ्यायला सुरुवात केली. इथे नास्त्याची काही-तरी गडबड झाली: अचानक तिने त्याच्या मिठीतून स्वतःला सोडवून घेतले आणि भिंतीशी धावत जाऊन दिव्याचे बटण ती चाचपू लागली.

“झालं! संपलं सगळं!” पाश्काने अत्यंत वाईटाला तोंड देण्याची मनाची तयारी केली. आत्ता ती किंचाळेल, तिचा बाप धावत येईल आणि त्याचा फोटो काढेल! सावधगिरी म्हणून पाश्का खिडकीपाशी सरकला.

दिवा उजळला... नास्त्या एवढी स्तंभित झाली होती की, परक्या माणसासमोर ती जवळ जवळ नागव्या अवस्थेत उभी होती, हे तिच्या ध्यानातच आले नाही.

पाश्काने तिच्याकडे पाहून मधाळ स्मित केले.

“घाबरलीस?”

नास्त्याने खुर्चीवरून पटकन स्कर्ट खेचून घेतला व ती स्कर्ट घालू लागली. कपडे घातल्यानंतर ती पाश्कापाशी आली. विचार करायला त्याला सवड मिळायच्या आतच त्याच्या डाव्या गालावर सणसणीत चपराक बसली. आणि पाठोपाठ उजव्या गालावर.

नंतर ती दोघे एकमेकांसमोर नजरेला नजर देऊन उभी राहिली... रागापायी नास्त्याचे गाल लालबुंद बनले होते. ह्या क्षणी ती विलक्षण सुंदर दिसत होती.

“इंजिनिअरची मजा आहे,” नकळत पाश्काच्या मनात विचार आला.

“आत्ताच्या आत्ता इथून चालता हो!” दबत्या आवाजात नास्त्याने हुकूम केला.

ती किंचाळणार नाही, तशांपैकी ती नाही, हे पाश्काला समजले.

“सभ्य गृहस्थांप्रमाणं बोलू या,” सिगारेट पेटवत पाश्का म्हणाला. “अर्थात मी निघून जाऊ शकतो, पण ते अगदीच सामान्य ठरेल. अगदीच पुळचट.” त्याने काडेपेटी खिडकीतून बाहेर फेकली व काहीशा घाईने तो विचार करू लागला, कारण नास्त्या एखादी अवजड वस्तू उचलील आणि परत त्याला तेथून तोंड काळे करण्याची आज्ञा करील, अशी त्याला भीती वाटत होती. बेचैनीपायी पाश्का खोलीत येरझाऱ्या घालू

लागला – खिडकीपासून टेबलापर्यंत आणि माघारी. "मी तुझ्या प्रेमात आहे. ही वस्तुस्थिती, जाहिरात नव्हे. फक्त एकच मला समजत नाही: त्या इंजिनिअरपेक्षा माझ्यात काय कमी आहे? तुला पाहिजे तर मी सहजपणं समाजसत्तावादी श्रमवीराचा किताब मिळवीन. फक्त मला त्याबद्दल तू सांग. बास्स! उगाच कशाला टाळ्या वाजवायच्या? आवर सामान आणि चल माझ्याबरोबर. शहरात राहू." पाश्का बोलायचा थांबला. पापणी न मिटता गंभीरपणे त्याने नास्त्याकडे पाहिले. त्याचे तिच्यावर प्रेम बसले होते. आयुष्यात आजवर कुणावरही त्याने एवढे प्रेम केले नव्हते.

तिला हे समजले.

"किती मूर्ख पोरगा आहेस रे तू..." दुःखाने आणि सरळपणे ती म्हणाली. "इथं काय दळत बसला आहेस?" ती खुर्चीवर बसली. "असला उद्योग केला आणि वर फोटो काढतोय. त्याचं प्रेम आहे!" नास्त्याने डोळ्यांची विचित्र उघडझाप केली व मान फिरवली. पाश्काला समजले: ती रडत होती. "तू प्रेम करतोस आणि तुला वाटतं, मी प्रेम करत नाही?" अश्रुभरल्या नजरेने नास्त्याने एकदम त्याच्याकडे वळून विचारले.

आता ती खरोखरच अत्यंत सुंदर दिसत होती. या क्षणी पाश्काला समजले: आयुष्यात कधीही तो तिला जिंकू शकला नसता! नेहमी त्याच्या बाबतीत असेच घडत आले होते: जरा काही गंभीर, सखोल मामला बनला, की पोरगी त्याच्या हातातून जायची!

"तू रडतेस का?"

"कारण तुम्ही फक्त स्वतःचा विचार करता... अहंकारी अभागी! प्रेम करतोय!" तिने आसवे पुसली. "प्रेम करत असलास तर निदान थोडा आदर बाळग, ही रीत नव्हे..."

"असं मी काय केलं? खिडकीत चढलो फक्त – त्यात काय विशेष? नेहमीच असं घडत आलंय!"

"खिडकीचं नाही म्हणत मी! तुम्ही सगळे मूर्ख आहात असं सांगायचंय मला! तोसुद्धा मूर्खच... मत्सरापायी पुरता वाळून गेलाय! तुझा त्याला मत्सर वाटतोय. इथून निघून जाणार म्हणतोय!"

"निघून जातोय? कुठं?" हा मूर्ख कोण ते पाश्काला समजले.

"कुठं?.. विचार तूच त्याला!"

पाश्काने कपाळाला आठ्या घातल्या.

"अगदी खरंच?"

नास्त्याने हाताच्या तळव्याने परत आसवे पुसली. ती काहीही बोलली नाही.

पाश्काला तिची दया आली. त्याच्या काळजात बारीक कळ उमटली.

"तयार हो!" त्याने आज्ञा ठोकली.

नास्त्याने त्याच्याकडे चकित कटाक्ष टाकला.

"त्याच्याकडं जाऊ या. माणसाचं प्रेम म्हणजे काय हे त्या मॉस्को-वाल्याला मी चांगलं समजावून सांगतो!"

"बैस... उगीच दिमाख आणू नकोस!"

"अहो तुम्ही, ऐका!.. तरुण, सुंदर..." पाश्काने स्वतःला आवरले. "मला थोबाडीत मारलेली चालेल. पण ही मूर्ख वटवट मी सहन करणार नाही. काय अर्थ याचा – दिमाख आणू नकोस?"

"आत्ता तू कुठं जाशील? ऐन रात्रीच्या वेळी..."

"कुणाला फिकीर रात्रीची! घाल कपडे. हे घे तुझे पोलके."

पाश्काने खुर्चीच्या पाठीवरून पोलके उचलले व नास्त्याच्या अंगावर फेकले. नास्त्याने ते पकडले आणि अनिश्चितपणे ती उठली. पाश्का परत खोलीत येरझाऱ्या घालू लागला.

"कशाबद्दल त्याला मत्सर वाटला?" त्याने विचारले. आत्म-समाधानाची छटा त्याच्या आवाजातून लपत नव्हती.

"आपण नाचलो... त्याला कुणीतरी सांगितलं. नंतर सिनेमा पाहताना एकमेकांच्या कानात कुजबुजत राहिलो. तो अगदी महामूर्ख आहे!"

"तू त्याला समजावून सांगू शकली नाहीस?"

"अडलंय माझं समजावून सांगायला! मी कुठंही येणार नाही!"

पाश्का येरझाऱ्या मारायचा थांबला.

"तीनपर्यंत आकडे मोजतो: एक, दोन... नाहीतर तुझ्या पाप्या घ्यायला सुरवात करीन!"

"प्रयत्न तर करून बघ! त्याला तू काय सांगणार?"

"मला माहीत आहे काय सांगायचं ते!"

"पण मी कशाला तिथं येऊ?"

"आवश्यक आहे."

"पण कशाला?"

“तो कुठं राहतो, मला माहीत नाही. एकूण जायला पाहिजे. पूर्णविराम!”

नास्त्याने पोलके अंगात घातले, पायात सँडल चढवले.

“उतर. मी तुझ्यामागून. आत्ता जर कुणी आपल्याला पाहिलं...”

पाश्का खिडकीतून बागेत उतरला. नास्त्याला खाली उतरायला त्याने मदत केली. ती दोघे रस्त्यावर आली.

लॉरी मालकावर गुरगुरत होती.

“बैस, रडूबाई!.. इथं रात्रीचं फिरवा तुम्हाला!”

पाश्काला ही नवीन अकल्पित भूमिका आवडली.

नास्त्या केबिनमध्ये चढून बसली.

“मला लॉरीतून घेऊन जाणार होतास? ह्या?”

“आता कुठलं! तुमच्याबरोबर सुरुवात होईतो माझे केस पांढरे होतील!”

“असं काय बोलतोस रे पावेल...”

“काय?” कडक आवाजात पाश्काने विचारले.

“काही नाही.”

“हे ठीक.” पावेलने जोरात गिअर बदलला आणि तो निघाला.

पाश्काने खिडकीवर टक टक केले तेव्हा इंजिनिअर झोपलेला नव्हता.

“कोण आहे?”

“मी.”

“कोण मी?”

“पाश्का. पावेल येगोरीच.”

इंजिनिअरने दार उघडले व पावेलला आत घेतले. उघड आश्चर्याने तो पाश्काकडे पहात होता.

कागदांचा पसारा पडलेल्या टेबलाकडे पाश्काने मानेने खूण करीत विचारले:

“दुःखी कविता रचतो आहेस?”

“मला समजत नाही, ऐक...”

“समजेल.” पाश्का टेबलावर बसला. हाताच्या कोपराने त्याने कागद बाजूला सारले. “नास्त्यावर प्रेम करतोस?”

“ऐक!..” इंजिनिअरचा चेहरा लाल होऊ लागला.

“करतोस प्रेम. तर मग असं कर: तिला इथं घेऊन ये–ती लॉरीत

बसलीय."

"कुठं? कुठल्या लॉरीत?"

"रस्त्यावरच्या. निष्कारण माझ्यावर जळलास: चांगल्या बाया माझ्या नशिबी नाहीत!"

इंजिनिअर पटकन रस्त्यावर धावला आणि पाश्का, पावेल येगोरीच, डोळे मिटून हातांवर डोके टेकवून बसून राहिला. एकदम त्याला थकवा आला होता. सबंध दिवसभर त्याला कंटाळा आणणारे गाणे परत आठवले होते: "अठरावं वरीस एकदाच येतं.." छातीत वेदना होत होत्या.

इंजिनिअर आणि नास्त्या घरात आली.

पाश्का उठला. काही वेळपर्यंत त्यांच्याकडे पहात राहिला. जणू निरोपाचे शब्द बोलण्याची तयारी करत असल्याप्रमाणे.

"झालं?" त्याने विचारले.

"होय," इंजिनिअर उत्तरला.

नास्त्याने स्मित केले.

"ठीक आहे. तर," रागीट स्वरात पाश्का म्हणाला. "छान रहा!" आणि तो बाहेरच्या दाराकडे गेला.

"कुठं निघालास? थांब!.." इंजिनिअर त्याला अडवायचा प्रयत्न करत म्हणाला.

मागे वळून न पाहता पाश्का निघून गेला.

पाश्का ह्या खेड्यातून निघून गेला. साल्तोनमध्ये गेला. प्रोखोरोव यांच्या दाराखाली त्याने स्वतःच्या मोटार-डेपोच्या पत्त्यासह चिठी सरकवून ठेवली. तीन दिवस त्याने पेरणीचे काम प्रामाणिकपणे केल्याबद्दलचा दाखला पाठवून द्यावा, अशी त्याने चिठीत विनंती केली होती. आपल्या निघून जाण्याने प्रोखोरोव किती संतापतील ह्याची कल्पना असल्यामुळे पाश्काने शेवटी लिहिले होते: "मला माफ कर, पण मी दोषी नाही."

पाश्काला खूप दुःख झाले होते. तो अखंड धूम्रपान करत होता.

पावसाची भुरभुर सुरू झाली.

इग्रीनेवोत, साल्तोनच्या अलिकडच्या खेड्यात, रस्त्यावर समोर दोन मानवी आकृत्या अवतरल्या. त्या जोरजोराने हात हलवत होत्या. पाश्काने लॉरी थांबवली.

तरुण लष्करी अंमलदार एका तरुणीसह पळत आला.

"साल्तोनपर्यंत सोड कृपा करून!" अंमलदार विशेष आनंदात दिसत होता.

"बैस!"

तरुणी केबिनमध्ये बसली. तिची चुळबुळ सुरू झाली, कपडे साफसूफ करू लागली. लेफ्टनंट उडी मारून मागील भागात बसला. ती दोघे एकमेकांशी ओरडून बोलू लागली, खो खो हसू लागली.

पाश्काने तिरप्या नजरेने तरुणीकडे पाहिले – छान होती! शुभ्र दात, गुलाबाच्या कळीप्रमाणे ओठ – अगदी साक्षात बाहुली! अर्थात नास्त्याची सर तिला नव्हती.

"एवढ्या रात्री कुठं निघालात?" पाश्काने विचारले.

"भेटायला जातोय," तरुणी पटकन उत्तरली. परत केबिनबाहेर मुंडके काढून आपल्या मित्राशी गप्पा मारू लागली. "साशा? साश!.. तू तिथं कसा आहेस?"

"झकास!" मागील भागातून लेफ्टनंट ओरडला.

"दिवस पुरत नाही काय?" परत पाश्काने विचारले.

"काय?" तरुणीने पाश्काकडे किंचित कटाक्ष टाकला व परत "साशा? साश!.."

"सगळे प्रेमात बुडालेत," पाश्का गुरगुरला. "सगळ्यांची डोकी फिरलीत!" त्याला परत नास्त्याची आठवण झाली. अगदी थोड्या वेळापूर्वी त्याच्याशेजारी ती बसली होती – पण परकी. आणि हीसुद्धा परकी.

"साशा? साश!.."

"साशा! साश!" पाश्का स्वतःशी उपहासाने पुटपुटला. "तुझा साशा आधीच आनंदामुळं स्वतःला विसरलाय. आत्ता सोड – मोटारीपुढं धावत जाईल!"

"तिथं काय घडेल याची मी कल्पना करू शकतो!" मागून साशा ओरडला.

तरुणीचे सारे शरीर हसण्यामुळे गदगदले.

"छे:, वर्षाच्या ह्या काळात माणसं चक्रमसारखी वागायला लागतात," चिडून पाश्का स्वतःशी म्हणाला.

पाऊस जोराने कोसळू लागला.

"साशा! तू कसा आहेस तिथं?"

"ठीक! सब ठीक!"

"सांग त्याला – तिथं टायरखाली ताडपत्री आहे. डोक्यावर घे म्हणावं," पाश्का म्हणाला.

तरुणी केबिनमधून खाली पडायची थोडक्यात वाचली.

"साशा! साश!.. तिथं टायरखाली कुठलीतरी ताडपत्री आहे!.. डोक्यावर पांघर!"

"ठीक! आभार!"

"आभार कसचे!" पाश्का म्हणाला. त्याने नवी सिगारेट पेटवली आणि समोरच्या रस्त्यावर विचारमग्न नजर रोखली.

# सोयरीक

वसंतामधल्या एका दिवशी, एप्रिल महिन्यात, स्तेपान येमेल्यानोव प्रेमात पडला. एलोच्का नांवाच्या तरुणीच्या. ही तरुणी सैबेरियात आली होती पडिक जमीन लागवडीखाली आणण्याच्या मोहीमेत. त्याने तिला फक्त दोनदा पाहिले होते. पहिल्या वेळी त्याने तिला शहरातून खेड्यापर्यंत आपल्या लॉरीतून 'लिफ्ट' दिली होती. काही खास पोरगी नाही असे त्याला त्यावेळी तिच्याविषयी वाटले होते. ते एकमेकांशी एक अक्षर बोलले नव्हते. रस्त्यावरच्या खड्ड्यांवर लॉरीला हादरे बसत होते आणि दरवेळी जेव्हा ती तरुणी स्तेपानच्या अंगावर येऊन आदळायची तेव्हा शरमेने चूर होऊन ती त्याच्याकडे एक चोरटा कटाक्ष टाकायची. जणू तिला म्हणावयाचे असायचे, "तुला ठाऊक आहे, तुला धक्का मारण्याचा माझा मुळीच इरादा नव्हता." अशा धक्क्या-नंतर ती सीटच्या दुसऱ्या कोपऱ्याला अधिकच दूर सरकून बसायची. स्तेपानला तिची पर्वा वाटत नव्हती. त्याने त्या तरुणीकडे धड पाहिलेसुद्धा नाही. 'अमूरच्या लाटां'चे संगीत तो शीळेवर वाजवीत राहिला आणि आपल्या बॅटरीची चिंता करीत राहिला (ती साफ उतरली होती).

ती दोघे खेड्यात आली तेव्हा पैशासाठी ती तरुणी आपल्या पिशवीत चाचपू लागली.

स्तेपानची गालफडे किंचित लाल झाली.

"राहू दे."

"पण का?" आपल्या हिरवट, पारदर्शी डोळ्यांनी त्याच्याकडे कटाक्ष फेकीत ती तरुणी म्हणाली. "काय बिघडलं?"

"काही विशेष नाही" स्तेपानने गीअर टाकला, पाय खाली दाबला आणि फर्रर्र आवाज करीत लॉरी निघून गेली.

काही पोरी मस्त देखण्या असतात, आपल्या प्रवासिनीचा विचार करीत असता क्षणभर त्याच्या डोक्यात आले. पण तेवढेच. नंतर तो तिच्याबद्दल पार विसरून गेला.

त्यानंतर दूर अल्ताई प्रदेशातल्या कठीण रस्त्यांवर तो काही आठवडे काम करीत होता. जेथे शक्य होई तेथे तो रात्रीचा मुक्काम करी, इतर पोरी पाही, काही सुंदर असत, काही तेवढ्या सुरेख नसत – सर्व प्रकारच्या पोरी तो पाही. जगात खूप पोरी आहेत! जर त्या सर्वांबद्दल तुम्ही विचार करीत बसलात तर डोके दुखायला लागायचे!

मग एप्रिल महिना उजाडला.

एका शनिवारी स्तेपान आपली लॉरी घेऊन घरी आला. हमामखान्यात त्याने मनसोक्त बाष्प-स्नान घेतले, कशीदाकाम केलेल्या कॉलरचा स्वच्छ सदरा अंगात चढवला, नवे नरम कातड्याचे बूट पायात घातले, मध-पाण्याची पेलाभर कडक दारू घशाखाली ओतली आणि नवा खेळ पहायला खेड्यातल्या क्लबात गेला.

त्या रात्री स्थानिक नाटक मंडळीचा प्रयोग होता. आपल्या ओळखीच्या लोकांना रंगभूमीवर पाहण्यात स्तेपानला भारी गंमत वाटे. भलतीच मौज यायची. एखादा माणूस वर्षानुवर्ष तुमच्या ओळखीचा असतो, मग तुम्ही क्लबात येता आणि तिथे तोच ग्रीश्का नोवोस्योलोव असतो, कमरेपर्यंत लोंबणारी दाढी लावून तो स्टेजवर पळापळ करीत असतो आणि भयानक आवाजात ओरडत असतो: "तू अमूक अमूक... मी तुला जिवंत पुरला असता!"

अशा क्षणांना स्तेपान खो खो हसायचा आणि त्याच्या शेजारचे प्रेक्षक त्याला गप्प बसण्याबाबत दटावायचे, त्याला नाटक समजत नाही असे म्हणायचे.

स्तेपानने पुढच्याच रांगांपैकी एका रांगेत खुर्ची पकडली व नाटक पहायला तो बसला. आणि त्याने काय पाहिले? शहरामधून आपल्या लॉरीतून त्याने ज्या तरुणीला आणले होते तीच तरुणी रंगमंचावर होती. कमालीची सुंदर दिसत होती. पण ज्या ऐटबाजपणे तिने आपली मान कलती ठेवली होती, खांद्यावर भुऱ्या वेण्या सोडल्या होत्या आणि पायात लाल बूट चढवले होते, त्यामुळे ती धीरगंभीर आणि खास वाटत होती. तिने मंद पावले टाकली आणि सावकाशपणे मान वळवली, पण तिच्या आवाजात काहीतरी मृदुता आणि लाडिकता होती. स्तेपानच्या

अंतरंगात खळबळ माजायला आरंभ झाला. त्याने तिला ताबडतोब ओळखले. पण ती एवढी सुंदर आहे असे त्याला कधीच वाटले नव्हते, म्हणजे ती सुंदर होती हे त्याला ठाऊक होते, पण या अशा रीतीने ठाऊक नव्हते.

नंतर एक मिजासखोर माणूस, सामुदायिक शेताचा हिशेबनीस, वास्का सेम्योनोव, टोपी आणि चष्मा चढवून रंगमंचावर अवतरला. तो पण कुणी बडा खास माणूस वाटत होता. इतर कोणत्याही वेळी त्याला असा पाहून स्तेपान खो खो हसत सुटला असता, पण आत्ता मात्र स्तेपानला तसे हसावेसे वाटले नाही. तो त्या तरुणीला पहात राहिला, तिच्यात आणि वास्कामध्ये काय घडते त्याची वाट पहात राहिला. तिचे डोळे चकाकलेले त्याने पाहिले, कशाचीतरी भीती वाटल्यागत क्षणभर ती मागे सरलेली त्याने पाहिले. त्याला तिच्याबद्दल अनुकंपा वाटली.

"का आलास तू?" तिने विचारले.

"मी तुझ्यावाचून जगू शकत नाही!" त्या मूर्खाने एवढ्या मोठ्यांदा जाहीर केले की त्या हॉलमध्ये सर्वांना त्याचा आवाज ऐकू गेला.

"तू निघून जा," ती तरुणी म्हणाली. पण ती अशा तऱ्हेने म्हणाली की, "तू जाऊ नको" असाच अर्थ त्यातून ध्वनीत होत होता.

"मी जाणार नाही," वास्का म्हणाला आणि अधिकच तिच्या जवळ सरकला.

स्तेपानने खुर्चीची कडा गच्च पकडली. हा वास्का तसा सरळ माणूस नाही हे त्याला ठाऊक होते. आणि डोळ्याची पापणी लवते न लवते तोच, हा प्रसंग कसा संपेल याचा काही अंदाज करण्यापूर्वीच, त्या हिशेबनीसाने त्या तरुणीच्या खांद्यांभोवती सफाईदारपणे आपल्या हातांचा विळखा टाकला, आपल्या डाव्या दंडावर तिला खाली झुकवले आणि तिचे चुंबन घेतले. त्या चुंबनानंतर स्तेपानने त्या तरुणीचे ओठ निरखले – किंचित सुजलेले, ओलसर आणि किंचित विलग. त्या ओठांवर लाजरे, आनंदी हास्य थरथरत होते. स्तेपानच्या डोळ्यांसमोर अंधेरी आली. तो उठला आणि तडक क्लबातून बाहेर पडला.

बाहेर एका खांबाशी टेकून तो उभा राहिला. भानावर यायला त्याला खूप वेळ लागला.

"असं कसं शक्य आहे..." तो पुटपुटला.

...त्यानंतर तीन दिवस स्तेपान कमालीचा अस्वस्थ होता. (त्याची लॉरी दुरुस्तीला गेली होती). त्याला समजले की, त्या तरुणीचे नांव एला होते, ती वोरोनेझ नांवाच्या शहरातून आली होती आणि ट्रॅक्टर पथकात टाईम-कीपर म्हणून काम करीत होती. बस्स, एवढेच त्याला समजले होते. रंगभूमीवर आणखी पुढची मजल मारली नाही ना, असे वास्का सेम्योनोवला विचारावे असे एकदा स्तेपानला वाटले. पण वेळीच त्याने स्वतःला सावरले. सरतेशेवटी नाटक म्हणजे काही खरे आयुष्य नव्हे. तसे विचारून त्याने स्वतःचेच हसे करून घेतले असते.

एके संध्याकाळी स्तेपानने आपल्या नरम कातडी बुटांना कमालीचे चकचकीत पॉलीश केले आणि तो एलोच्काला भेटायला बाहेर पडला! पण त्याची मजल फाटकापर्यंत गेली (कुक्सीन नांवाच्या एका म्हाता-ऱ्या जोडप्याच्या घरात ती रहात होती), थोडा वेळ तो तिथेच घुटमळत राहिला आणि नंतर तिथून निघून गेला. खेड्यातून तो निरुद्देशपणे फिरत राहिला आणि अखेरीस नदीच्या किनारी ओलसर जमिनीवर जाऊन बसला. आपल्या गुडघ्यांभोवती त्याने हातांचा विळखा घातला, डोके त्यात खुपसले आणि चक्क पहाटेपर्यंत तो विचार करीत तेथेच बसून राहिला.

त्या थोडक्या दिवसात त्याने वजन एकदम उतरले आणि डोळ्यां-खाली काळजीची काळी वर्तुळे उमटली. तो अजिबात खाई-पिईना, काहीही करीना, फक्त सिगरेटी ओढीत आणि विचार करीत राहिला...

"काय रे पोरा, काय झालंय तुला?" त्याच्या वडिलांनी विचारले.

"काही नाही..." स्तेपानने बुटाखाली सिगरेट चुरगाळली आणि दुसरी सिगरेट घ्यायला हात पाकिटात घातला. आपली नजर त्याने बाजूला फिरवली. या सर्व काळात त्याने एलोच्काला एकदाही पाहिले नव्हते. पुन्हा तो क्लबाकडे फिरकला नव्हता.

चौथ्या दिवशी स्तेपानने आपला मनोदय आपल्या वडिलांजवळ जाहीर केला. "मला लग्न करायचंय!"

"अच्छा? कुणाशी?" येगोर सेवेऱ्यानिच यांनी, त्याच्या वडिलांनी, कुतूहलाने विचारले.

"ती... नवी मुलगी... टाईम-कीपर," स्तेपान शांतपणे उत्तरला व वडिलांच्या पाठीशी असलेल्या खिडकीपलिकडे कपाळाला आठ्या घालून पाहू लागला.

येगोर विचारात पडले. "ती तुझ्या ओळखीची आहे?"

"होय..." स्तेपान घुटमळला. "म्हणजे... तशी... नाही."

"मग तुझी सोयरीक जमवणं मला जमायचं नाही," ठाम आवाजात येगोर म्हणाले.

"का नाही?"

"या म्हातारपणात मला माझी अब्रू घालवायची इच्छा नाही. काय होतं ते मला चांगलं माहीत आहे. तुम्ही मारे सोयरीक जमवायला जाता आणि त्या पोरीला कशाचा काही पत्ताच नसतो. पहिल्यांदा तू तिच्याशी नीट बोल. इतर चार माणसं करतात त्याप्रमाणं तिच्याशी थोडं हिंड-फीर; मग आम्ही सोयरीक जमवायचं बघू. नाहीतर... लेका, तू नेहमी तसाच शिंगावर घेणाऱ्या बैलासारखा! तुला किती शिकवायचा प्रयत्न केला. पण तुझं आपलं ये रे माझ्या मागल्या!"

सेवेऱ्यान आजोबा, येगोर यांचे वडील, हे संभाषण ऐकत होते. भिंतीतल्या चुल्यावरच्या* पलंगावर ते आजारी अवस्थेत पडले होते.

"ऐका या थोर पुरुषाचं! म्हणे मी सोयरीक जमवायला जाणार नाही," रागावून आजोबा उद्गारले. "तुझ्या नवरीचं मन वळवायला मला किती यातायात पडली होती ते विसरलास वाटतं? आँ?"

कपाळाला आठ्या चढवून येगोरनी सिगरेट पेटवली. मधला बराच वेळ शांततेत गेला. काय बोलणार ते? तरुणपणी तेसुद्धा स्तेपान-सारखेच होते – पोरीच्या डोळ्याला डोळा भिडवायला घाबरायचे.

"तसा... मी जाऊ शकेन", ते म्हणाले, "पण... पण लक्षात ठेव, ती काही तुझ्याशी लग्न करायची नाही."

"ती नाही तिचा बाप करील!" आजोबा सेवेऱ्यान गरजले. "आमच्या पोराला कुठलीही पोरगी हसत माळ घालील."

"ती माझ्याशी लग्न करणार नाही असं कशावरून वाटतं तुम्हा-ला?" पोटात खड्डा पडल्याची जाणीव होत स्तेपानने विचारले.

"ती शहरातली पोरगी आहे... त्यांना काय पाहिजे असतं ते केवळ सैतानालाच ठाऊक! तू मागासलेला आहेस असं ती म्हणेल."

"तूच मागासलेला आहेस लेका!" पुन्हा आजोबांनी येगोर यांना अडवले. "आजकाल या गोष्टीची कुणी दखल घेत नाही. या आजच्या पोरी भलत्या हुशार झाल्यात. अरे मी म्हातारा असलो तरी मला सारं ठाऊक आहे."

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी गुरुवारी, भल्या सकाळीच बाप आणि मुलगा मोहिमेसाठी सजायला लागले.

स्तेपानने पुन्हा एकदा आपला कशीदाकामाचा सदरा अंगात घातला आणि आपले सरळ, राठ केस चापूनचोपून बसवण्यात आरशासमोर बराच वेळ घालवला.

आपल्या पँटीच्या बटणपट्टीवरचे छोटे निसटणारे बटण त्रासिक मुद्रेने पकडण्याचा येगोर यांचा प्रयत्न चालला होता. अखेरीस आपल्या गाठाळ बोटांमध्ये त्यांनी ते बटण पकडले व अरुंद काजामध्ये कोंबण्याचा प्रयत्न करू लागले.

"लेकाचे शिंपी नाहीत, विदूषक आहेत," चडफडत ते उद्गारले. "तुमचे तुटून दोन तुकडे पडतील, पण बटण काजात घालायला जमायचं नाही!"

स्तेपानने एकदाचे केस विंचरणे संपवले आणि आपला मुखडा सजवण्यासाठी आणखी काय केले पाहिजे याचा विचार करीत तो खोलीच्या मध्यावरच उभा राहिला.

"टाय अडकव," आजोबांनी सल्ला दिला.

"कशीदाकाम केलेल्या शर्टावर टाय शोभत नाही," स्तेपानने खुलासा केला.

अखेरीस ते तयार झाले.

येगोरनी आपला प्रचंड पंजा डोक्याच्या मागे दाबून धरला आणि आपल्या म्हाताऱ्या वडिलांकडे, गोंधळल्या नजरेने पहात विचारले:

"बरोबर बाटली घेऊ की नको? आजकाल नव्या रीती पडल्यात. कशाचीच खात्री वाटत नाही."

आजोबांनी थोडा विचार केला.

"खिशात टाकून एक घेऊन जा," त्यांनी सल्ला दिला. "गरज पडलीच तर वापरता येईल."

ते निघाले.

दिवस मोठा प्रसन्न होता, स्वच्छ सूर्यप्रकाश झळाळत होता. पाण्याचे छोटे छोटे ओहळ सर्वत्र वहात होते. डबक्यांमध्ये आकाशाचे प्रतिबिंब पडले होते; काळ्या धरतीवर निळ्या आकाशाचे तुकडे इतस्ततः चमकत होते. एप्रिल महिन्याचा फुलोरा रस्त्यांवर सर्वत्र जाणवत होता.

ते मुकाटपणे चालत होते, आपले बूट स्वच्छ राखण्यासाठी डबक्यांना टाळून काळजीपूर्वक वाट काढीत होते.

कुक्सीन कुटुंब आपल्या स्वतःच्या मोठ्या घरात रहात होते. पहिल्या दोन खोल्यांमध्ये कुणीच नव्हते. येगोर यांचा धीर खचला; म्हातारबाबा कुक्सीन यांच्याशी प्रथम चार गोष्टी कराव्यात आणि गप्पांच्या ओघात "एका छोट्या कामासाठी आलो होतो..." अशी प्रस्तावना करावी, असा त्यांचा बेत होता. म्हातारबाबा कुक्सीननी त्यांना नक्की मदत केली असती. पण आता त्यांना सरळ "त्या" खोलीकडे जाणे भाग होते, जिथे एला रहात होती!

बाप-लेकांनी एकमेकांकडे दृष्टिक्षेप टाकला आणि ते "त्या" खोलीकडे निघाले.

येगोर यांनी दारावर हळूच टिचक्या वाजवल्या.

"दार उघडंच आहे. आत या!" प्रतिसाद आला.

स्तेपानच्या काळजात कळ उमटली.

दाराची एक फळी थोडीशी उघडून येगोर आत घुसले. स्तेपान त्यांच्या पाठोपाठ आत गेला. ते दोघे दारातच थांबले.

त्यांच्या समोरच, टेबलाशी वास्का सेम्योनोव बसला होता आणि त्याच्या शेजारी, अगदी त्याच्या शेजारी, एलोच्का बसली होती.

ती चहा पीत होती. वास्काने आपला कोट काढून ठेवला होता आणि पिवळ्या रेशमी शर्टात तो बसला होता: गुळगुळीत दाढी घोटलेले त्याचे गाल चकाकत होते. जणू आपल्या स्वतःच्याच घरात आराम करीत बसावे अशा थाटात तो तेथे बसला होता. येमेल्यानोव पिता-पुत्रांकडे तो स्नेहभावाने आणि खुळ्यासारखा चेहरा करून पहात राहिला.

एलोच्का हलकेच उठली आणि पाहुण्यांसाठी तिने दोन खुर्च्या पुढे सरकवल्या.

"या ना. आत या आणि बसा."

वास्काकडे एकटक पहातच येगोर खुर्चीवर बसले. नंतर त्यांनी आपल्या मुलाकडे नजर वळवली. स्तेपानचे गाल लालबुंद झाले होते. जणू तो भुईला खिळल्यासारखा उभा होता.

"खुर्चीवर बसा ना. असे उभे कशासाठी राहिलात?" एलोच्का चिवचिवली. "तुमची पहिली ओळख नाही?"

स्तेपान खुर्चीवर बसला आणि आपली टोपी त्याने मांडीवर ठेवली.

काही वेळ तेथे स्तब्धता पसरली.

एलोच्काला हसू आवरणे मुष्कील झाले होते. स्तेपान, येगोर, वास्का या तिघांकडेही ती आळीपाळीने पहात होती. वास्काही आता गोंधळला होता.

"कॉम्रेडहो, मी तुमच्यासाठी काय करू? आणि तुम्ही मला चांगले आठवता," स्तेपानला उद्देशून एलोच्का प्रसन्नपणे म्हणाली. "तुम्ही मला शहरातून इथपर्यंत लिफ्ट दिली होती. पण त्यावेळी तुम्ही रागावलेले होता."

स्तेपानने तिच्याकडे पाहून एक कसनुसे हास्य केले.

मंडळींना विनोद सांगून हसवण्याची कामगिरी वास्काने आपणहून ओढवून घेतली.

"म्हणजे काही प्रवासी आम्ही अगदी गुपचुप उचलतो, होय की नाही स्तेपान येगोरिच? ह्ये बरं न्हवं ऽऽ..."

येगोर यांनी वास्काच्या तुळतुळीत चेहऱ्यावर एकदा नजर टाकली, मारक्या बैलाप्रमाणे आपले डोके खाली घातले आणि दाण्कन बाँब टाकला, "आम्ही इथं सोयरीक जमवायला आलोय!"

एलोच्काने आश्चर्यचकित होऊन अक्षरशः आ वासला.

"पण कशी?.."

"कशी! सोयरीक कशी जमवतात? हा माझा मुलगा," येगोर यांनी स्तेपानकडे मानेनेच निर्देश केला. "त्याला तुझ्याशी लग्न करायचंय. अर्थात् तुझी मान्यता असली तरच!"

एलाने स्तेपानकडे कटाक्ष टाकला.

हाताच्या मुठी पांढऱ्याफटक पडेपर्यंत त्याने त्या आपल्या गुडघ्यांवर आवळून धरल्या होत्या आणि एकटक तो त्यांचे निरीक्षण करीत होता. त्याच्या कपाळावर घामाचे बारीक थेंब जमले होते. ते पुसून टाकण्याचा प्रयत्न त्याने अजिबात केला नाही.

"लग्न?" एलाने विचारले आणि ती लाजेने लालेलाल झाली.

"दुसरं काय?" स्तेपानने एक निःश्वास टाकला आणि वास्काकडे रोखून पाहिले. वास्का खिदळला आणि एलाकडे पहायला खुर्चीवरून गर्रकन मागे वळला. ती टेबलाशी उभी होती, शरमेने तिचा चेहरा गुलाबी झाला होता आणि आपल्या शुभ्र सडपातळ बोटांनी आपल्या फ्रॉकवरचा एक सुती धागा काळजीपूर्वक बाजूला काढीत होती.

"स्तेपान, हा विचार तुला खूप उशिरा सुचला," वास्का मोठ्यांदा म्हणाला आणि पुन्हा त्याने खुर्चीची एक गिरकी घेतली. "तुला फारच उशीर झाला."

पण यावेळी स्तेपानने त्याच्याकडे फारसे लक्षच दिले नाही, तो अत्यंत गंभीर अपेक्षेच्या चर्येने एलाकडे डोळे लावून बसला.

तो वाट पहात राहिला. कोणत्या तरी नकळत कारणाने त्याच्या मनातला गोंधळ पार पळून गेला होता.

एलोच्काने अचानक मान वर केली आणि आपल्या नितळ हिरव्याशार डोळयांनी स्तेपानकडे पाहिले. त्या नजरेत विनम्रता होती, प्रेम होते, रुसवा होता, संमती होती आणि आणखीही दुसरे काही होते; वर्णन न करता येण्याजोगे असे आवाहन, बुजरेपण, असहायता त्या नजरेत होती. स्तेपानच्या काळजात आनंदाची कारंजी उसळली. त्या क्षणाला त्या दोघांमध्ये काय निर्माण झाले आणि का निर्माण झाले त्याचा खुलासा कुणीही करू शकले नसते. फक्त त्या दोघांनाच ते समजले, किंवा खरे म्हणजे जाणवले.

नेमका त्याच क्षणाला वास्का बरळला, "स्तेपान, आम्ही लौकरच लग्न करणार आहोत."

त्याचे ते बोलणे एवढे मूर्खपणाचे वाटले, की आपण असे बरळायला नको होते याची त्याची त्यालाच जाणीव झाली.

येगोर खुर्चीवरून उठले आणि खोलीमधून बाहेर जाण्याच्या बेतात होते, पण एलोच्का एकदम गडबडीने पुढे झाली आणि घाईघाईनेच म्हणाली, "तुम्ही कुठं निघालात? सोयरीक जमवायला आला म्हणता ना? मी अजून तुम्हाला उत्तर दिलेलं नाही."

तिने चटकन स्वतःला पुन्हा सावरले आणि स्तेपानपासून आपले डोळे दुसरीकडे वळवले. पण स्तेपान... आता ती आपल्याकडे पाहते आहे किंवा नाही याची स्तेपानला पर्वा वाटत नव्हती. लज्जा आणि आनंद यांच्या संमिश्र भावनांनी तो पेटून उठला होता. पृथ्वीवरची कोणतीही शक्ती त्याला तेथून उठवून घालवू शकत नव्हती.

येगोर थबकले. एव्हाना गोंधळून वास्का लालबुंद झाला होता. त्यालाही सत्याची जाणीव होऊ लागली होती.

"खाली बसा. आपण प्रथम थोडा चहा पिऊ या, नाही का?"

एला प्रथम बावरली होती, पण आता ती आत्मविश्वासपूर्वक आणि

एका अननुभूत आनंदाने – विलक्षण प्रसन्नपणे बोलत होती.

काय घडणार अशा अपेक्षेने प्रत्येकजण उत्सुक होऊन वाट पहात होता.

"मला वाटतं मी जाणं बरं ना?" वास्काने मोठ्या आवाजात विचारले. त्याच्या आवाजात निराशेचा कंप होता. वास्का सरळ सरळ पराभूत होत होता. त्याने स्वत:ला वाचवण्याचासुद्धा प्रयत्न केला नाही.

"मला वाटतं हो." स्तेपानही तेवढ्याच मोठ्या आवाजात म्हणाला. त्याने असे बोलण्यात जरा घाई केली होती. अशी घाई त्याने करायला नको होती... पण आता काही इलाज नव्हता. ते दोघेही तेथे होते आणि त्यांच्यापैकी एकाने जाणे भाग होते. दोघेही निकराने प्रयत्न करीत होते आणि त्यांच्यापैकी एकालाच एला क्षमा करणार होती.

यावेळी वास्काने स्तेपानकडे दुर्लक्ष केले व एलाकडे सरळ नजर लावली. एला पुन्हा लाजली आणि तिने येगोर यांच्याकडे पाहिले. येगोर अद्याप खोलीच्या मध्यभागी उभे होते आणि आळीपाळीने त्या तिघांकडे पहात होते. त्यांचा पुरता गोंधळ माजला होता. एला किंचित विषण्ण हसली.

"किती विचित्र परिस्थितीत मी सापडलेय! जर कुणी मदत केली... तुम्ही असे उभे का राहिलात? कृपा करून खाली बसा!"

तिने अक्षरश: आपला पाय हलकेच आपटला. तिची परिस्थिती खरेच कठीण झाली होती.

वास्का खुर्चीवरून उठला आणि अंगात कोट चढवायला त्याने आरंभ केला. पण कोट चढवताना त्याची हालचाल मात्र कमालीची मंथ होती. त्याचा कोट चढवून केव्हा पुरा होतो याची प्रत्येकजण वाट पहात होता.

"स्तेपान, मला तुझ्याबद्दल खरंच फार वाईट वाटतं," वास्का म्हणाला.

आणि तो खोलीबाहेर चालता झाला. दाराशी त्याने मागे वळून गर्वावर एक कुचकट, मत्सरी कटाक्ष टाकला आणि पाठीशी दाण्कन दार आपटून तो निघून गेला.

खोलीत थोडा वेळ शांतता पसरली.

स्तेपानने काळजीपूर्वक आपल्या कपाळावरचा घाम पुसला व स्मित केले.

"हुश्श, इतर कुणाचं मला काही ठाऊक नाही, पण मी मात्र पिणार बुवा," असे म्हणत येगोर सरळ टेबलाकडे गेले. "ही सोयरीक जमवता जमवता मला फार थकवा आलाय! खरंच शिणलोप!"

# कोकिळेचे अश्रू

जंगलाच्या कडेने ते जात होते.

धुळकट रस्त्यावरून चार चाकांची गाडी पळत होती, गाठाळ मुळांवर आदळत होती. पुढचा लोखंडी दांडा आपटला म्हणजे टणत्कार उमटत होता.

सूर्य मावळतीकडे कलत चालला होता, पण अजून गरम होत होते. वातावरणात दमटपणा होता. हवेत धुळीचा, राळेचा आणि रानफळांचा गंध दाटला होता.

घोडागाडीत दोघे होते: पुरुष आणि स्त्री. दोघांची वये जवळ जवळ सारखीच – तिशीच्या आसपास.

बाई पुढे बसली होती, लगाम हाती धरून गाडी चालवत होती. पुरुष तिच्या मागे हिरव्या गवताच्या ढिगावर उताणा पडला होता. निरभ्र आकाशाकडे टक लावून धूम्रपान करत होता.

दोघेही गप्प होते.

बाईने डोके खाली झुकवले आणि स्वतःच्या बुटावर लगामाच्या वादीच्या टोकाचा फटका मारला. ती कशाचा तरी विचार करत होती.

स्टेशनपासून एव्हाना दोन तास त्यांचा प्रवास चालला होता. स्थानिक प्रदेशाबाबत आणि इतर वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी गप्पा मारल्या होत्या... आता गप्प बसले होते.

भक्कम खसी घोडा एका तालात धावत होता. नाकाने फुरफुरत होता, लगामाच्या घंटा खुळखुळ वाजवत होता... बाई अधूनमधून डोके वर उचलत होती, लगाम हलवत होती आणि आळशीपणाने म्हणत होती:

"काय रे!.. झोपलास?"

घोडा आपल्या जांभळ्या डोळ्याचा तिरपा कटाक्ष टाकायचा, कान टवकारायचा, पण वेग मात्र वाढवायचा नाही. बाई परत डोके खाली घालायची आणि लगामाच्या वादीच्या टोकाने स्वतःच्या बुटांवर फटके मारू लागायची. गाडी जेव्हा तिच्या बाजूला कलंडायची, तेव्हा ती गाडीच्या दोन्ही कडांना हात धरून किंचित मागे झुकायची. त्यावेळी तिचे पांढरे पोलके तिच्या पाठीला घट्ट चिकटायचे. पुरुष मान वळवायचा आणि खूप वेळपर्यंत बाईला एकटक पहात रहायचा, तिची सुंदर मान निरखायचा, कानांजवळच्या तांबूस कुरळ्या केसांच्या छोट्या बटा बघायचा. मग परत धूम्रपान सुरू करून वर आकाशाकडे नजर लावायचा.

आकाशातून चंडोलांच्या रुपेरी लकेरी कोसळत आहेत. गरम वातावरणात नाकतोड्यांची अखंड कोरडी किरकिर चालू आहे. जंगलात आणि मैदानात पूर्ण शांतता नांदतेय. सभोवार सर्वत्र शांतता आणि गरम सुस्ती पसरलीय.

पुरुष उठून बसला. सिगारेटचे थोटुक त्याने रस्त्यावर फेकून दिले. नवी सिगारेट पेटवली.

"कशाबद्दल विचार करताय?" त्याने विचारले.

"असंच. खास कशाबद्दलच नाही," बाईने हळू आवाजात उत्तर दिले व लगामाचे टोक स्वतःच्या बुटांवर आपटणे चालू ठेवले.

पुरुषाने आपल्या सुंदर भव्य कपाळावरून सोनेरी केसांचे झुलूप मागे झटकले आणि बाईपाशी तो येऊन बसला. तिने त्याच्याकडे पाहिले. तिचे डोळे राखी रंगाचे, नितळ होते.

"आज खूप उष्मा आहे. तुमच्याकडं एवढं गरम होत असेल अशी माझी कल्पना नव्हती. काही म्हटलं तरी सैबेरिया."

"होतो काहीवेळा उकाडा," बाईने प्रतिसाद दिला आणि लगामाला झटका दिला.

पुरुषाने सिगारेटचा जोरदार झुरका मारला... त्याच्या डोक्यावर धुराचा बारीकसा निळा ढग तरंगला आणि विरला.

"तुम्ही मुद्दाम कुणाला भेटायला स्टेशनावर येता?"

"नाही. आम्ही आमच्या डॉक्टरीणबाईंची वाट पहात होतो. पण त्या काही आल्या नाहीत." बाईने परत आपला चेहरा सहप्रवाशाकडे वळवला. त्याने घाईने स्वतःचे डोळे दुसरीकडे फिरवले... त्याने अंग ताणून दिले आणि भावनावेगाने तो म्हणाला:

"एकूण फार मस्त आहे तुमच्या इथं! सुखी!"

"होय, छान आहे," बाईने साधा होकार भरला व दूर मैदानात नजर फेकली.

"पण बहुधा कंटाळवाणं वाटत असेल ना? काय?" पुरुषाने स्मित केले.

"ज्याच्यात्याच्यावर अवलंबून आहे. आम्हाला नाही कंटाळवाणं वाटत. कशाचा कंटाळा करायचा?"

"म्हणजे कधीच कंटाळा येत नाही?" पुरुषाच्या मुद्रेवर अजूनही स्मित होते.

बाईने आपले उतरते खांदे उडवले.

"नाही."

"असं कसं काय बुवा?"

बाईने त्याच्याकडे पाहिले, काहीशी गूढपणे ती हसली आणि परत तिने लगामाची वादी स्वतःच्या बुटावर आपटायला सुरुवात केली.

"तुमचा नवरा आहे?" अचानक पुरुषाने विचारले.

बाईने सभोवार नजर टाकली.

"नाही. का?"

"असंच विचारलं. का कुणास ठाऊक, पण तुम्हाला नवरा नसणार असंच मला वाटलं होतं."

बाईने आपले नितळ डोळे आकुंचित केले. ते धूर्त बनले. तिचे रसरशीत ओठ किंचित विलगले आणि तिच्या तोंडाच्या कोपऱ्यांना खाली चुण्या पडल्या.

"असं का वाटलं?"

"माहीत नाही. तसा तर्क केला, एवढंच. वेगळे झालात?"

"समजा, वेगळे झालो असलो."

"काय कारण?"

बाईने तोंड फिरवले. तिची त्यावर चर्चा करायची इच्छा नव्हती.

"असंच," ती म्हणाली. "सबळ कारण होतं."

"अस्सं..." पुरुषाने परत स्वतःचे केस व्यवस्थित केले. "घडतं असं!"

काही वेळपर्यंत दोघे गप्प राहिले.

"मग आता काय?" पुरुषाने विचारले.

"काय ?"

"एकूण आयुष्य कसं चाललंय ?"

बाईने त्याच्याकडे न वळताच किंचित हास्य केले.

"ठीक आहे."

"ठीक आहे, म्हणजे विशेष चांगलं नाही." पुरुष खदखदून हसला. "ठीक आहे म्हणजे ठीक नाही."

"देवा रे देवा!.." बाईने डोके हलवले व पुरुषाच्या डोळ्यांमध्ये पाहिले.

पुरुष हसायचा थांबला... काही वेळ एकमेकांकडे पहात राहिले. तो शोधकपणे, ती खोटया आश्चर्याने. आणि एकदम दोघांनाही हसू कोसळले. बाईच्या राखी डोळ्यांमध्ये ठिणग्या चमकल्या.

"तुम्ही हसताय का? आं?.. नाही, सांगाच!.. कशाबद्दल हसताय?.." बाईकडे बोट दाखवून पुरुषाने विचारले आणि तो स्वत: आनंदून हसला.

"तोंडात हसण्याचा किडा पडला." बाईने मान फिरवली आणि रुमालाने डोळे पुसले. आता तिने गंभीरपणे विचारले: "तुम्ही आमच्या इथं कशासाठी आला आहात? कुठल्यातरी कचेरीचे प्रतिनिधी म्हणून?"

ते हसण्याचे थांबले ह्याचे पुरुषाला वाईट वाटले. आणखी हसण्याची त्याची इच्छा होती.

"मी चित्रकार आहे," तो म्हणाला. "निसर्गाचं चित्रण करायला आलोय."

बाईने त्याच्याकडे कुतूहलाने पाहिले.

"काय?" चित्रकाराने विचारले.

"काही नाही. आमच्या क्लबातसुद्धा चित्रकार आहेत."

"असं?.." क्लबातील चित्रकारांविषयी काय बोलावे याबद्दल चित्रकाराला काही सुचले नाही. त्याने मान डोलावली. "चित्रकार खूप आहेत."

"तुम्ही काय चितारता?"

"सगळं. तुझंसुद्धा चित्र काढू शकेन. आहे इच्छा?"

बाईने स्मित केले.

"माझं... माझं काय चित्र काढायचं? पण आमच्याइथं खूप चांगली ठिकाणं आहेत. नदीकिनारी. कधीतरी नदीवर पाण्याला गेले

म्हणजे नजर काढवत नाही. अतिशय सुंदर! मनात येतं – हा देखावा चितारावा!"

"प्रयत्न नाही केलास?"

"तेवढंच राहिलंय... तुम्ही खरंच ती जागा पहा. मात्र सकाळी लौकर गेलं पाहिजे. मला एक सांगा: चित्रं काढणं शिकतात अथवा माणसाला उपजत ही कला येते?"

"दोन्ही... उपजत असते आणि शिकावीही लागते... खूप काळ शिकावं लागतं..." चित्रकाराला ह्या विषयावर बोलायची इच्छा नव्हती. "त्यापेक्षा तू मला सांग. तू कशी राहतेस?" अचानक त्याने गाडीमधून खाली उडी मारली व तो गाडीबरोबर चालू लागला. हसऱ्या मुद्रेने त्याने बाईकडे पाहिले. "तर? ह्या प्रदेशात तू कशी राहतेस?" त्याने हात पसरले व सभोवार नजर टाकली.

बाईनेही स्मित केले.

"छान राहते!"

पुरुषाने खोल श्वास घेतला... तो रस्त्याच्या कडेला धावत गेला, त्याने काही धुळकट उबदार रानफुले तोडली, परत गाडीला धावत गाठले आणि फुले बाईला दिली. तिने कृतज्ञ स्मिताने त्या फुलांचा स्वीकार केला.

"ह्यांना कोकिळेचे अश्रू म्हणतात," ती म्हणाली आणि त्या फुलांचा छोटासा गुच्छ बनवू लागली. "तिला स्वत:चं घरटं नाही, म्हणून ती रडतेय. जिथं अश्रू सांडतो, तिथं फूल उमलतं."

"आवडली?" चित्रकाराने गाडीत उडी घेतली. तसे करताना त्याच्या हाताचा बाईच्या गुडघ्याला स्पर्श झाला. त्याने झटकन तिच्याकडे कटाक्ष फेकला.

बाईने स्कर्ट सरळ केला व गुच्छ बनवण्याचे काम पुढे चालू ठेवले. क्षणभर चित्रकाराच्या नजरेसमोर चित्र उभे राहिले: रसरशीत, सुंदर, शांत स्त्री फिकट निळ्या छोट्या फुलांचा – कोकिळेच्या अश्रूंचा – गुच्छ बनवते आहे. पण भावनेच्या प्रभावी लाटेने तो हेलावून गेला आणि चित्र अदृश्य झाले. अचानक जग अत्यंत क्षणभंगुर आणि मर्त्य भासू लागले.

"एकूण आयुष्य म्हणजे तरी काय?" तो मोठ्यांदा म्हणाला. "सगळं नष्ट होणार आणि खलास!" त्याने बाईकडे कटाक्ष टाकला.

त्याला ती समजून घेईल अशा अपेक्षेने तो वाट पहात राहिला. "आपण आपलं काम पूर्ण करू अथवा निदान प्रयत्न करू!.." चित्रकार एकदम दचकला. त्याचे शब्द मूर्खपणाचे, उथळ होते. "छी:!.. तुला कळतंय? केलं काम पुरं – तर मग काय? आणि सारं आयुष्य स्वत:ला नरड्याशी पकडून धरणार! आपण किती छान आहोत असं स्वत:ला सांगत बसणार... पण बघ – जंगल, स्तेप, आकाश... सगळं आवेगानं भरलंय! अत्यंत सुंदर! प्रेम केलं पाहिजे – बास्स! फक्त प्रेम! बाकी सर्व व्यर्थ!" तो जणू कुणाशीतरी वाद घालत असल्याप्रमाणे बोलत होता. हातवारे करत अगदी पोटतिडिकेने बोलत होता. आणि हा सारा वेळ त्याचे डोळे बाईवर खिळलेले होते. तो वाट पहात होता.

ती लक्षपूर्वक ऐकत होती. समजून घ्यायची तिची इच्छा होती. पुरुषाने तिच्या बाहूवर स्वत:चा हात ठेवला.

"अशी बघतेस काय? माझं बोलणं समजत नाही?" त्याने तिच्या मांसल नरम खांद्यावर हात ठेवला आणि स्वत:कडे तिला ओढून घ्यायचा प्रयत्न केला.

बाईने झटदिशी खांदा मोकळा करून घेतला आणि त्याच्याकडे शांतपणे, थंड नजरेने पाहिले. त्या नजरेने जणू त्याच्या गालावर जोरदार चपराक मारली होती. परकेपणाने कठोर आवाजात ती म्हणाली:

"समजतं." आणि तिने तोंड फिरवले.

जणू आगीचा चटका बसावा त्याप्रमाणे चित्रकाराने हात मागे घेतला... गोंधळून त्याने स्मित केले.

"ओ!.. ओ, कसे आहोत आपण!" बाईकडे काही वेळ टक लावून पहात तो गप्प राहिला. मग चिडून म्हणाला: "आयुष्य जगून संपेल... आणि आपण असणार नाही. खलास. सगळ्यालाच काही अर्थ नाही!" थकल्या सुरात दबत्या रागाने तो पुढे म्हणाला. त्याने आपले लोंबते पाय गाडीत वर ओढून घेतले, तो आडवा झाला आणि गंधित गवतात त्याने तोंड खुपसले.

बराच वेळपर्यंत त्यांचा तसाच प्रवास चालला.

गाडीची पुढची चाके खडखडत होती. घोडा फुरफुरत होता. जंगलात उतरती किरणे पसरली होती. पक्षीवृंदाची किलबिल चालू होती. काहीतरी प्रचंड, तेजोमय गवतावरून हलकेच पावले ठेवत जमिनीवरून चालत जात होते.

बाई एक-दोनदा मागे वळली आणि तिने आपल्या सहप्रवाशावर नजर टाकली. तो मुळीच हालचाल न करता गप्प पडून राहिला. त्याच्या भारी रेशमी सदऱ्यामधून त्याच्या खांद्याची टोकदार हाडे डोकावत होती. त्याच्या कानशीलावरील निळसर शीर ताडताड उडत होती.

"आता काय वेळ झालीय?" बाईने विचारले.

पुरुष उठून बसला व समोरच्या रस्त्यावर नजर लावत हळू आवाजात म्हणाला:

"तुम्ही... मला क्षमा करा. आत्ता जे काही बोललो त्याची माझी मलाच किळस आलीय." त्याने कपाळाला आठ्या घातल्या, टायची गाठ सैल केली व बाईकडे पाहिले... तीसुद्धा त्याच्याकडे पहात होती. जणू त्याचा अभ्यास करत होती.

"विसरून जा," ती म्हणाली आणि तिच्या ओठांच्या कोपऱ्यांवर उपहासात्मक, पण तरीही स्नेहल असे स्मित उमटले. "जंगल आणि मैदानं... सगळी मागं पडली ना?"

पुरुषानेही कसनुसे स्मित केले.

"तेच तर म्हणतो – तत्त्वज्ञान चटकन आठवलं!" त्याने चेहऱ्यावरून हात फिरवला. "चोरलेला पाव खाल्ल्यासारखं वाटतंय!"

"आता दुःख करत बसू नकोस. तुम्ही सगळे... जरा संधी मिळायची खोटी!"

पुरुषाने सिगारेटच्या डबीतून सिगारेट काढली व पेटवली. स्वतःच्या बारीक पायांभोवती लांब हातांचा विळखा घालून तो विचारात गढला. अप्रिय आश्चर्याचा आणि निराशेचा भाव त्याच्या मुद्रेवर उमटलेला होता.

"सगळे?"

"माझं खरं नाही?"

"नाही. अर्थातच सगळे तसे नसतात. आपल्याला अजून खूप वेळ लागणार मुक्कामावर पोहचायला?"

"आणखी दोन किलोमीटर."

"सगळे नसतात तसे... निष्कारण तू तसं बोलतेस," तो परत म्हणाला.

बाई ह्यावर काहीही बोलली नाही.

जंगल संपले. रस्ता गव्हाच्या शेतांमधून जात होता.

संध्याकाळ हळुवारपणे उतरत होती. धरतीवर सौम्य विचारमग्न खिन्नता पसरली. लाव पक्ष्याची पहिली आर्त साद उमटली.

पुरुष धूम्रपान करत होता, बाईचा धारदार तिरपा चेहरा पहात होता.

"तू फार छान आहेस," अचानक तो सहजपणे उद्‌गारला. "तुझं नांव काय?"

"नीना."

"छान आहेस तू, नीना."

"काहीतरीच..." तिने त्याच्याकडे वळून पाहिले नाही. तिच्या आवाजात लज्जा आणि आनंद यांचा संयोग होता. अजून न विसरलेला अलिकडील वर्षांमधील शांत आनंद होता.

"मी तुझं चित्र काढीन."

"म्हणजे?" नीनाने त्याच्याकडे वळून पाहिले व तात्काळ परत मान फिरवली.

"तुझ्याबद्दलचं... चित्राचं शीर्षक असेल – 'कोकिळेचे अश्रू'!"

"देवा रे!" नीनाच्या तोंडून एवढा एकच शब्द उमटला.

थोडा वेळ दोघांनीही मौन पाळले.

"आणि तुझं नांव काय?" नीनाने विचारले.

"सेर्गेय."

"राहणार कुठं?"

"ठाऊक नाही..."

"आमच्याकडं रहा. मी आणि माझी आई – आम्ही दोघीच आहोत. घर खूप मोठं आहे. अर्धं घर नेहमी रिकामंच असतं. नदी-किनाऱ्यापाशीच आहे..."

सेर्गेय गप्प राहिला.

"मला... म्हणजे... तुझा मी अपमान केला का?"

"पुरे आता. लाज वाटली तुला हे खूप झालं!" ती पुढे झुकली आणि घोड्याच्या पाठीवर तिने लगामाचा सपकारा ओढला. गाडीला हिसका बसला आणि रस्त्यावर ती जोराने खडखडू लागली.

"नीना!" चित्रकाराने हाक मारली.

"काय..." नीनाने मागे वळून पाहण्याचे निग्रहाने टाळले.

"तुला अपमान वाटतोय?"

"जाऊं दे आता! .. तुम्हा सगळ्यांचा अपमान वाटून घेत बसले तर आयुष्य पुरणार नाही. ह्यावर आणखी बोलायची गरज नाही. ते पहा आमचं बेर्योझोवका दिसायला लागलं."

समोर खेडे दिसू लागले होते. सूर्यास्ताच्या पहिल्या प्रकाशात घरांची छपरे जांभळट दिसत होती. पिकणाऱ्या गव्हाच्या नव्हाळी-च्या सोन्यामधून ती मंदपणे धुमसत होती.

"अशी संध्याकाळ रंगवू शकशील?" नीनाने विचारले. "बघ, किती सुंदर!"

"होय," चित्रकार हळूच म्हणाला. थोडा वेळ गप्प बसून पुन्हा एकदा म्हणाला "होय."

आणि खरेच छान होते.

# ग्राम निवासी

"तर काय, आई? तरुणपणी वागायचीस तशी वाग – इकडं ये. मॉस्को बघशील आणि एकूण खूप काही पाहशील. प्रवासखर्चासाठी पैसे पाठवतो. मात्र विमानानं येणं जास्त चांगलं – स्वस्त पडेल. आणि ताबडतोब तार पाठव, म्हणजे विमानतळावर तुला घ्यायला केव्हा यायचं हे मला समजेल. मुख्य म्हणजे, घाबरू नको."

आजीबाई मालान्याने हे पत्र वाचले, आपल्या सुकल्या ओठांचा चंबू केला आणि ती विचारात गढली.

"पावेल स्वतःकडं बोलावतोय," शूर्काला ती म्हणाली व चष्म्याच्या काचांवरून तिने त्याच्याकडे कटाक्ष टाकला. (शूर्का – आजीबाई मालान्याचा नातू, तिच्या मुलीचा मुलगा. मुलीचे वैयक्तिक आयुष्य फारसे यशस्वी ठरले नव्हते [तिसऱ्यांदा पाट लावला होता], आजीबाईने शूर्काला तात्पुरते स्वतःपाशी ठेवून घेतले होते. नातवावर तिचे प्रेम होते, पण कडक शिस्तीत ती त्याचे संगोपन करत होती.)

शूर्का टेबलापाशी बसून अभ्यास करत होता. आजीचे शब्द ऐकताच त्याने खांदे उडवले – "बोलावतो आहे तर जा."

"तुला सुटी केव्हा लागणार?" आजीने कडक आवाजात विचारले.

शूर्काने कान टवकारले.

"कुठली? हिवाळ्याची?"

"मग कुठली? उन्हाळ्याची विचारतेय मी?"

"एक जानेवारीपासून. का?"

आजीने परत ओठांचा चंबू केला व ती विचारात गढली.

शूर्काच्या हृदयात आनंदी हुरहुर सुरू झाली.

"कशाबद्दल विचारतेस?" त्याने परत विचारले.

“काही नाही. अभ्यास कर,” आजीने मलवस्त्राच्या पुढच्या खिशात पत्र कोंबले, अंगात कोट चढवला आणि घरातून ती बाहेर पडली.

शूर्का खिडकीपाशी धावत गेला — आजी कोणत्या दिशेला जाते हे बघण्यासाठी.

फाटकापाशी आजीबाई मालान्याला शेजारीण भेटली व तिला ती मोठमोठ्यांदा सांगू लागली:

“पावेल मला मॉस्कोला बोलावतोय. काय करावं समजत नाही. डोकंच चालत नाही. ‘निघून ये — म्हणतो — आई, तुझी फार आठवण येते!’”

शेजारणीने तिला काहीतरी उत्तर दिले. शूर्काला ते ऐकू आले नाही. पण आजी परत तिला मोठ्या आवाजात म्हणाली:

“तसं जाणं शक्य आहे म्हणा. नातवंडांना अजून पाहिलेलं नाही. नुसते फोटोच पाहिलेत त्यांचे. पण मला भीती वाटते...”

त्यांच्यापाशी आणखी दोन बाया थांबल्या. मग आणखी एक आली, नंतर आणखी एक... लौकरच मालान्या आजीभोवती बरीच गर्दी जमली. ती परत परत सांगत होती:

“पावेल मला मॉस्कोला बोलावतोय. काय करावं समजत नाही...”

असे दिसत होते की, सर्वजण तिला जाण्याचा सल्ला देत होते.

शूर्काने हात खिशांमध्ये खुपसले व तो घरात येरझाऱ्या मारू लागला. त्याच्या चेहऱ्यावर स्वप्नाळू भाव उमटला होता आणि आजीप्रमाणे त्याची मुद्राही विचारमग्न बनली होती. त्याचे आजीशी खूप साम्य होते — तशीच सडसडीत अंगकाठी, तशीच गालांची हाडे वर आलेली, तसेच बारीक चतुर डोळे. पण त्यांचे स्वभाव मात्र अगदी भिन्न होते. आजी — उत्साही, चिवट, आरडाओरड करणारी, महाचौकस. शूर्का-सुद्धा चौकस होता, पण मठ्ठ वाटावा एवढा लाजाळू होता, विनयशील होता आणि सहज दुखावला जायचा.

संध्याकाळी त्यांनी मॉस्कोला पाठवण्याच्या तारेचा मजकूर तयार केला. शूर्का लिहीत होता, आजी तोंडाने मजकूर सांगत होती.

“प्रिय मुला पाशा, जर तुझी इच्छा असेल की मी यावं, तर अर्थातच मी येऊ शकेन, जरी मला म्हातारपण आलंय...”

"वा, वा!" शूर्का म्हणाला. "तार अशी लिहितात होय?"

"तुझ्या मताप्रमाणं कशी लिहिली पाहिजे?"

"येत आहोत. पूर्णविराम. किंवा: नव्या वर्षानंतर येत आहोत. पूर्णविराम. सही: आई. बास्स!"

आजीला फार अपमान वाटला.

"सहावीत शिकतो आहेस तू शूर्का, पण काडीची अक्कल नाही अजून तुला! थोडं तरी शहाणपण असावं माणसाच्या अंगी!"

शूर्कालाा सुद्धा फार अपमान वाटला.

"ठीक आहे," तो म्हणाला. "आपल्या तारेचे पैसे किती होतील ठाऊक आहे? जुन्या पैशात वीस रूबल."

आजीने ओठांचा चंबू केला व ती विचार करू लागली.

"असं लिही: मुला, मी इथं काहींचा सल्ला घेतला..."

शूर्काने पेन खाली ठेवले.

"असं शक्य नाही मला. कुणाला ह्याच्याशी कर्तव्य आहे – तू कुणाचा काय सल्ला घेतलास? पोस्टात आपल्याला हसतील!"

"लिही, तुला सांगतात तसं!" आजीने आज्ञा केली. "मुलासाठी मी काय वीस रूबल खर्च करणार नाही?"

शूर्काने पेन उचलले आणि कपाळाला किंचित आठ्या घालून तो कागदावर झुकला.

"प्रिय मुला पाशा, इथं मी शेजाऱ्यांशी बोलले – सगळे जाण्याचा सल्ला देतात. अर्थात म्हाताऱ्या वयात मला थोडी भीती वाटते..."

"पोस्टात नक्कीच परत लिहायला लावतील," शूर्का म्हणाला.

"नुसता प्रयत्न तर करून बघूं देत!"

"तुला समजणारच नाही!"

"पुढं लिही: मला अर्थातच थोडी भीती वाटते, पण... ठीक आहे. नव्या वर्षानंतर येत आहोत. पूर्णविराम. शूर्काबरोबर. आता तो मोठा झालाय. पण पोरगा आज्ञाधारक आहे..."

शूर्काने हे शब्द गाळले – म्हणजे तो मोठा झालाय आणि आज्ञाधारक आहे.

"तो बरोबर असला म्हणजे मला तेवढी भीती वाटणार नाही. तात्पुरता निरोप घेते, मुला. मला स्वतःला तुमची लई..."

शूर्काने लिहिले: "फार."

"...आठवण येते. तुझ्या मुलांना निदान बघायला मिळेल. पूर्णविराम. आई."

"मोजू या," उत्साहाने शूर्का म्हणाला आणि पेनच्या साह्याने शब्द मोजत पुटपुटू लागला: "एक, दोन, तीन, चार..."

आजी त्याच्या पाठीशी उभी राहून वाट पहात होती.

"...अठ्ठावन्न, एकोणसाठ, साठ! काय? साठ गुणिले तीस – एक हजार आठशे? काय? भागिले शंभर – भागाकार अठरा... जवळ जवळ वीस रूबल!" विजयी मुद्रेने शूर्काने जाहीर केले.

आजीने तारेचा कागद खेचून घेतला व खिशात कोंबला.

"स्वतःच पोस्टात जाईन. इथं तू जास्त मोजलेस, आला मोठा शिकलेला!"

"ठीक आहे. तिथंसुद्धा एवढेच भरतील. कदाचित काही कोपेकची चूक निघेल!"

* * *

...अकरा वाजण्याच्या सुमाराला त्यांचे शेजारी येगोर लीझूनोव आले. खेड्यातील शाळेचे ते पुरवठा-व्यवस्थापक होते. आजीने त्यांच्या घरच्या माणसांपाशी निरोप ठेवला होता की, कामावरून ते परतले म्हणजे भेटून जायला सांगा. येगोरनी स्वतःच्या तारुण्यात बराच प्रवास केला होता, विमानप्रवासही केला होता.

येगोरनी अंगातील गरम कोट काढला, केसाळ टोपी उतरवली, घट्टे पडलेल्या तळव्यांनी स्वतःचे पांढरे होत चाललेले राठ केस व्यवस्थित केले व टेबलापाशी ते बसले. गवताचा आणि खोगीराचा दर्प खोलीत पसरला.

"तर विमानानं जाणार म्हणता?"

आजी तळघरात गेली आणि मधाच्या दारूची छोटी बाटली घेऊन आली.

"होय, येगोर. सगळं संगतवार सांग बाबा. काय काय आणि मग कसं."

"सांगण्यासारखं ह्यात आहे काय?" येगोर यांनी आजीबाई ग्लासात दारू ओतत होती तेव्हा लोभी नव्हे, पण काहीशा लीन नजरेने पाहिले. "शहरापर्यंत जा, तिथं बीयस्क-तोम्स्क आगगाडीत बसा,

नोवोसीबिर्स्कपर्यंत जा, तिथं विचारा – शहरातली विमान तिकीट कचेरी कुठं आहे म्हणून. किंवा सरळ विमानतळावर गेलं तरी चालेल."

"जरा थांब! केलं सुरू – हे चालेल, ते चालेल! तू सांग – काय केलं पाहिजे, काय चालेल ते नको! आणि जरा सावकाश. सगळा गठ्ठा एकदम टाकू नको." आजीने येगोरसमोर ग्लास ठेवला आणि कडक नजर टाकली.

येगोर बोटांनी ग्लास कुरवाळू लागले.

"तर नोवोसीबिर्स्कपर्यंत जा आणि ताबडतोब विचारा – विमान-तळापर्यंत कसं जायचं? लक्षात ठेव, शूर्का."

"लिहून घे, शूर्का," आजी म्हणाली.

शूर्काने वहीमधून कोरा कागद फाडून घेतला आणि लिहायच्या सज्जतेत तो बसला.

"तोल्माचेवापर्यंत जा आणि तिथं परत विचारा – मॉस्कोची तिकीटं कुठं विकतात? तिकीटं घ्या, 'तू-१०४' विमानात बसा आणि पाच तासानंतर तुम्ही मॉस्कोत. आपल्या मायभूमीच्या राजधानीत."

म्हातारीने आपल्या सुरकुतल्या मुठीचा हनुवटीला आधार दिला होता आणि भयाकुल मुद्रेने ती येगोरांचे बोलणे ऐकत होती. ते जेवढे अधिक बोलत होते आणि प्रवास त्यांना जेवढा अधिक सोपा वाटत होता, तेवढा आजीबाईचा चेहरा जास्त चिंताग्रस्त बनत चालला होता.

"अर्थात स्वेर्दलोवस्कला विमान थांबतं..."

"कशाला?"

"तसं आवश्यक आहे. तिथं आपल्याला विचारत नाहीत. उतरवतात आणि बास्स!" आता प्यायला हरकत नाही असा येगोरनी निर्णय केला. "...तर?.. सुखरूप प्रवासासाठी!"

"सावकाश. स्वेर्दलोवस्कमध्ये आम्हाला उतरवा असं आम्ही स्वतःच सांगितलं पाहिजे किंवा तिथं सगळ्यांना उतरवतात?"

येगोरनी ग्लास रिकामा केला, ओठ चाटले आणि मिशीवरून हात फिरवला.

"सगळ्यांना! तुझी दारू छान आहे, मालान्या वासिल्येवना. कशी बनवतेस तू? माझ्या बायकोला शिकवशील तर बरं होईल..."

आजीने त्यांचा ग्लास परत भरला.

"जेव्हा कद्रूपणा करायचं थांबवाल, तेव्हा दारू चांगली बनेल."

"म्हणजे?" न उमजून येगोरनी विचारले.

"साखर जास्त घाला. तुम्हाला नेहमी स्वस्तात पाहिजे सगळं. तुमच्या मिश्रणात साखर जास्त घाला, म्हणजे चांगली बनेल दारू. पण तंबाखू घालून तिला कडक करणं–शरमेची बाब!"

"खरंच," विचारमग्न होत येगोर म्हणाले. त्यांनी ग्लास उचलला, आजीकडे आणि शूर्काकडे पाहिले व ग्लास रिता केला. "खरं... च," परत ते म्हणाले. "तसं अर्थातच छान. मात्र नोवोसीबिर्स्कला जेव्हा पोहचाल, तेव्हा चूक होणार नाही याची खबरदारी घ्या."

"म्हणजे?"

"हो... म्हणजे काहीही होऊ शकतं." येगोरनी तंबाखूचा बटवा बाहेर काढला, सिगारेट वळून पेटवली आणि मिशांखालून धुराचा प्रचंड पांढरा ढग सोडला. "मुख्य म्हणजे अर्थातच, जेव्हा तोल्माचेवाला पोहचाल, तेव्हा तिकीटांच्या खिडक्यांचा गोंधळ करू नका. नाही तर व्लादीवस्तोकलासुद्धा जाऊन पोहचाल!"

आजी घाबरली आणि येगोरना तिने तिसरा ग्लास ओतला.

येगोरनी ताबडतोब तो रिचवला, जिभेने ओठ चाटले आणि स्वतःचा विचार फुलवून सांगू लागले:

"म्हणजे असं घडतं की, माणूस पूर्वेच्या तिकीट खिडकीपाशी जातो आणि म्हणतो: "मला तिकीट द्या." पण कुठलं तिकीट हे मात्र तो विचारत नाही. आणि माणूस नेमका विरुद्ध दिशेच्या विमानात बसतो. तेव्हा ही खबरदारी घ्या!"

आजीने येगोरना चौथा ग्लास ओतला. येगोर आता अगदी ऐसपैस बसले. बोलण्यात त्यांना मजा वाटू लागली.

"विमानातून प्रवास करायचे म्हणजे खंबीर मन पाहिजे–खंबीर! विमान वर उडालं की ताबडतोब तुला टॉफी देतात..."

"टॉफी?"

"अर्थातच. म्हणजे जणू सांगायचं असतं–विसर सगळं! लक्ष देऊ नकोस... पण प्रत्यक्षात हाच खरा धोक्याचा क्षण असतो. किंवा तुला म्हणतात: 'पट्टे आवळा!'–'कशाला?'–'तसा नियम आहे.'–'ह्यँ, नियम म्हणे! सरळ सांग, उलटे पडू, बास्स.'"

"देवा रे देवा!" आजी म्हणाली. "असं असेल तर कशाला आम्ही विमानानं जायचं?.."

"म्हण आहे ना – लांडग्यांची भीती वाटत असेल, तर जंगलात जाऊ नको." येगोरनी दारूच्या बाटलीकडे पाहिले. "अर्थात जेट विमानं जास्त खात्रीशीर आहेत. पंख्याचं विमान कोणत्याही क्षणी बंद पडू शकेल ... आणि खलास! .. शिवाय, त्यांच्या इंजिनांना अनेकदा आग लागते. एकदा मी ब्लादीवस्तोकहून विमानानं येत होतो ..."

येगोरनी खुर्चीवर अधिक आरामशीर आसन ठोकले, नवी सिगारेट पेटवली, परत बाटलीकडे पाहिले. आजीने काहीही हालचाल केली नाही. "तर विमान उडत होतं, मी खिडकीतून बाहेर पाहिलं: आग पेटलेली ..."

"देवा, आमचं रक्षण कर!" आजी म्हणाली.

शूर्कानेसुद्धा आ वासला व तो ऐकू लागला.

"होय. अर्थातच मी ओरडलो. वैमानिक धावत आला ... पण काही विशेष घडलं नाही – फक्त त्यानं माझ्या आईचा उद्धार केला! म्हणाला, उगाच काय घबराट माजवतोस? तिथं पेटतंय, तू भिऊ नको, बैस ... ह्या विमानांमध्ये ही अशी परिस्थिती."

शूर्काला हे खोटे वाटले. त्याची अपेक्षा होती की, आगीच्या ज्वाला पहिल्यानंतर वैमानिकाने वेग वाढवून त्या विझवण्याचा प्रयत्न केला असता, अथवा कुठेतरी विमान उतरवले असते. पण त्याऐवजी वैमानिकाने येगोर यांची खडसून हजेरी घेतली होती. विचित्र होते!

"मला एक समजत नाही," येगोर शूर्काला उद्देशून पुढे म्हणाले, "उतारूंना हवाई छत्र्या का देत नाहीत?"

शूर्काने खांदे उडवले. उतारूंना हवाई छत्र्या देत नाहीत हे त्याला माहीत नव्हते. जर हे खरे असले तर त्याच्या दृष्टीने आश्चर्यकारक होते.

येगोरनी फुलदाणीत सिगारेटचे थोटूक चिरडले, ते अर्धवट उठले आणि त्यांनी बाटली उचलून स्वतःच ग्लास भरला.

"मालान्या, तुझी दारू फार मस्त आहे!"

"तू अति करू नको – झिंगशील!"

"नुसतं मधपाणी तर आहे ..." येगोरनी मुंडीला झटका दिला व ते घटघटा प्यायले. "फू:! जेट विमानंसुद्धा धोक्याची. जर काही बिघाड झाला, तर कुऱ्हाड पडल्यागत खाली कोसळतं. इथं मामला झटपट ... हाडंसुद्धा गोळा करता येत नाहीत. माणसाचे फक्त तीनशे

ग्राम शिल्लक राहतात. कपड्यासकट." येगोरनी कपाळाला आठ्या घातल्या आणि बाटलीकडे पाहिले. आजीने बाटली उचलली आणि व्हरांड्यातील खोलीत नेऊन ठेवली. येगोर आणखी थोडा वेळ बसले व उठले. त्यांचा किंचित तोल गेला.

"एकूण भ्यायचं कारण नाही!" मोठ्यांदा ते म्हणाले. "केबिन-पासून थोडं लांब बसा. शेपटीपाशी. बास्स! बरं आहे, मी चलतो..."

जड पावलांनी ते दारापर्यंत चालत गेले. त्यांनी कोट-टोपी चढवली.

"पावेल सेर्गेयेविचना नमस्कार सांगा. वा! मालान्या, तुझी दारू मस्त! अगदी..."

येगोर एवढ्या लौकर झिंगले याबद्दल आजी नाराज होती. संभाषण व्यवस्थित घडले नव्हते.

"तू फार दुबळा बनलायस, येगोर."

"कारण दमलोय," कॉलरवरील गवताची काडी काढून टाकत येगोर म्हणाले. "आमच्या माणसांना म्हणालो होतो – उन्हाळ्यात गवत वाहून नेऊ या – पण नाही! आणि आता बर्फाच्या वादळानंतर, सगळे रस्ते निसरडे बनलेत. आख्खा दिवस राबत होतो. जवळच्या गंजीपर्यंत जेमतेम पोचलो. वा, तुझी दारू फार मस्त..." डोक्याला झटके देत येगोर हसले. "अच्छा, जातो. अजिबात भिऊ नका – जा विमानानं! मात्र केबिनपासून लांब बसा. भेटू परत!"

"परत भेटू!" शूर्का म्हणाला.

येगोर निघून गेले. उंच व्हरांड्यातून खाली उतरताना त्यांची पावले सावध होती. ते दारापर्यंत गेले. फाटकाचा करकर आवाज झाला. रस्त्यावर जाताच ते हळूच गाऊ लागले:

आला खुषीत समींदर...

आणि एकदम गप्प झाले.

अंधाऱ्या खिडकीकडे आजीने विचारमग्न आणि कष्टी नजरेने पाहिले. येगोरांबरोबर बोलताना लिहिलेली टिपणे शूर्का परत वाचू लागला.

"भीती वाटते, शूर्का," आजी म्हणाली.

"पण माणसं तर विमानानं प्रवास करतात..."

“त्यापेक्षा आगगाडीनं जाऊ या?”

“आगगाडीनं? म्हणजे माझी सगळी सुटी प्रवासातच संपायची!”

“देवा रे देवा!” आजीने उसासा टाकला. “पावेलला पत्रच लिहू या. तार रद्द करू.”

शूर्कानें वहीतून आणखी एक कागद टरकावला.

“म्हणजे, विमानानं जात नाही?”

“कुठलं आलंय विमान! फार भीती वाटते बाप्पा! नंतर फक्त तीनशे ग्राम वेचतील...”

शूर्का विचारात गढला.

“लिही: प्रिय मुला पाशा, इथं मी ओळखीच्या माणसांचा सल्ला घेतला...”

शूर्का कागदावर झुकला.

“ह्या विमानांमधून प्रवास कसा करतात याची माहिती त्यांनी आम्हाला सांगितली... तेव्हा मी आणि शूर्कानं असं ठरवलंय: उन्हाळ्यात आगगाडीनंच येऊ. आत्तासुद्धा आम्ही येऊ शकलो असतो, पण शूर्काची सुटी फारच लहान असल्यामुळं जमायचं नाही...”

शूर्का एक-दोन सेकंद घुटमळला आणि पुढे लिहू लागला:

“आता, पाशामामा, मी माझ्या वतीनं लिहितोय. आजीला आमच्या शाळेचे व्यवस्थापक येगोर लीझनोव यांनी घाबरवलं. तुम्हाला कदाचित ते आठवत असतील. त्यांनी आम्हाला असं सांगितलं: त्यांनी विमानाच्या खिडकीमधून बाहेर पाहिलं की, इंजिनाला आग लागली होती. तसं जर खरंच घडलं असतं, तर वैमानिकानं वेग वाढवून आग विझवली असती – जसं नेहमी करतात. मला वाटतं की, त्यांनी हवा बाहेर काढून टाकायच्या नलिकेतली ज्वाला बघितली असावी आणि घाबरले असावे. तुम्ही कृपया आजीला पत्र लिहा की, यात घाबरण्या-सारखं काही नाही. मात्र हे मी तुम्हाला लिहिलंय, असं कळवू नका. नाहीतर उन्हाळ्यातसुद्धा ती यायची नाही. इथं भाजीच्या वाफ्याची मशागत करायचीय, डुकरं – कोंबड्या – बदकं बघायचीत – ह्या जंजा-ळातून ती कधीच बाहेर पडायची नाही. आम्ही खेड्यात राहणारी माणसं. पण मला मॉस्को पहायची फार इच्छा आहे. शाळेत आम्ही भूगोलात आणि इतिहासात मॉस्कोबद्दल वाचतो, पण हे म्हणजे सर्व नव्हे – तुम्ही जाणताच. आणखी येगोरकाका म्हणाले की, उतारूंना

हवाई छत्र्या देत नाहीत. ही शुद्ध फसवेगिरी आहे. पण आजीचा विश्वास बसतो. कृपया, मामा, तिला लाजवा. तुमच्यावर तिचं फार प्रेम आहे. तर तुम्ही तिला असं सांगा: अहो आईसाहेब, तुमचा मुलगा खुद्द वैमानिक, सोविएत संघाचा वीर, अनेक पदकं मिळवलेला आणि तुम्ही साध्या उतारूवाहू विमानातून प्रवास करायला घाबरता, हे कसं काय? आवाजाच्या वेगालासुद्धा आम्ही पार केलंय अशा काळात! तुम्ही असं लिहा—ती ताबडतोब विमानानं येईल! तुमचा तिला फार अभिमान वाटतो. अर्थात—तो योग्यच आहे. मला स्वतःलासुद्धा तुमचा फार अभिमान वाटतो. मला मॉस्को पहायची फार फार इच्छा आहे. तात्पुरता निरोप घेतो. नमस्कार.—अलेक्सान्द्र."

दरम्यान आजी पत्राचा मजकूर सांगत होती:

"...शरदाच्या मोसमाच्या जवळपास तिकडं येऊ. तेव्हा भुईफोड्या असतील. त्यांना खारवून मी तुमच्यासाठी घेऊन येईन. मुरंबे बनवीन. मॉस्कोत सगळ्या दुकानच्या वस्तू. घरच्या बनावटीची त्यांना सर नाही. तर असं आहे मुला. तुझ्या बायकोला आणि मुलांना माझ्याकडून आणि शूर्काकडून नमस्कार. तूर्त एवढेच... लिहिलंस?"

"लिहिलं!"

आजीने कागद घेतला, लिफाफ्यात घातला व स्वतः पत्ता लिहिला:

"मॉस्को, लेनिन्स्की प्रॉस्पेक्त, घर ७८, गाळा १५६. सोविएत संघाचे वीर ल्यूबाविन पावेल इग्नात्येविच यांना.

सैबेरियातील त्यांच्या आईकडून."

पत्रावरचा पत्ता ती नेहमी स्वतः लिहायची. तरच खात्रीने पत्र पोहोचेल अशी तिची श्रद्धा होती.

"बास्स! कष्टी होऊ नको, शूर्का. उन्हाळ्यात जाऊ."

"मी मुळीच कष्टी होत नाही. पण तरीसुद्धा तू हळूहळू तयारी कर. अचानक विचार बदलशील आणि विमानानं जाशील."

आजीने नातवाकडे रोखून पाहिले. ती काहीही बोलली नाही.

रात्री भिंतीतल्या चुलाण्यावर आजी झोपेत सारखी चुळबुळत होती, उसासत होती आणि काहीतरी पुटपुटत होती. शूर्का हे सर्व ऐकत होता. शूर्कालासुद्धा झोप येत नव्हती. तो विचार करत होता. नजीकच्या भविष्यकाळात अनेक अघटित घटना घडणार होत्या. त्यांची त्याने कधी स्वप्नातसुद्धा कल्पना केली नव्हती.

"शूर्का!" आजीने हाक मारली.

"काय?"

"पावेलला बहुतेक क्रेमलिनमध्ये सोडत असतील?"

"बहुतेक. काय झालं?"

"तिथं निदान एकदा जावं म्हणत्ये... बघायला!"

"आता तिथं सगळ्यांना सोडतात."

आजी काही वेळ गप्प राहिली.

"सगळ्यांना सोडतात म्हणे..." अविश्वासाने ती म्हणाली.

"आम्हाला निकोलाय वासिल्येविचनी सांगितलं."

आणखी मिनिटभर दोघे गप्प राहिली.

"आजी, तुझीसुद्धा कमाल आहे! एरवी तू एवढी धीट, आणि आज घाबरलीस..." शूर्का नाराजीने म्हणाला. "एवढी कशाला भ्यायलीस?"

"झोप आता..." आजीने आज्ञा केली. "आलाय मोठा धीट! स्वत: पहिल्यांदा चड्डी पिवळी करील!"

"पैज लावणार – मी घाबरणार नाही, म्हणून?"

"झोप मुकाट! नाही तर उद्या शाळेला जायला वेळेवर उठायचा नाहीस!"

शूर्का शांत झोपला.

# विक्षिप्त

बायको त्याला "विक्षिप्त" म्हणायची. कधी कधी प्रेमाने.

विक्षिप्तचे एक खास वैशिष्टच होते. नेहमी त्याच्या बाबतीत काही ना काही घडायचे. तसे काही घडावे अशी त्याची इच्छा नसायची, तसे घडले म्हणजे त्याला त्रासही व्हायचा, पण तरीही त्याला त्या घटनांना तोंड द्यावे लागायचे. घटना क्षुल्लक असल्या तरी त्यांच्यामुळे तो बेचैन व्हायचा.

त्याच्या एका प्रवासाची हकीकत बघा.

त्याला सुटी मिळाली, उरालमधल्या भावाकडे जायचे त्याने ठरवले. बारा वर्षे त्यांची भेट झाली नव्हती.

"माझा गळाचा आकडा कुठाय... मोठ्ठा चमच्याच्या आकाराचा?" कोठीच्या खोलीतून विक्षिप्त ओरडला.

"मला कुठून माहीत."

"इथंच सगळे पडले होते!" विक्षिप्तने आपल्या निळसर-पांढऱ्या टप्पोऱ्या डोळयांमध्ये कठोर भाव आणण्याचा प्रयत्न केला. "बाकी सगळे आहेत, पण तेवढा एकच गायब!"

"कसा आहे तो?"

"पाईक धरायचा आकडा!"

"मला वाटतं, मी चुकून त्याला तळला."

विक्षिप्त काही वेळ गप्प बसला.

"मग?"

"काय?"

"चवदार लागला? हा-हा-हा!.." त्याला विनोदी बोलणे अजिबात जमायचे नाही, पण विनोदी बोलण्याची त्याला भारी हौस. "सगळे

दात शाबूत आहेत ना? मजबूत ॲल्युमिनियमचा बनवलेला आहे तो!..

...खूप वेळपर्यंत प्रवासाची तयारी चालली होती – मध्यरात्रीपर्यंत.

पण भल्या सकाळीच विक्षिप्त हातात सूटकेस घेऊन खेड्यातून चालत निघाला होता.

"उरालला चाललो! उरालला चाललो!" कुठे निघाला होता ह्या प्रश्नाला तो उत्तर देत होता. त्याच्या गोल गुबगुबीत चेहऱ्यावर आणि टप्पोऱ्या डोळ्यांमध्ये दूरच्या प्रवासाबद्दल एक बेफिकीर भाव होता. त्याला प्रवासाची भीती वाटत नव्हती. "उरालला चाललो! जरा पाय मोकळे केले पाहिजेत!"

पण उराल अजून खूप दूर होते.

शहरापर्यंत तो सुरक्षितपणे पोहोचला. तेथे त्याला आगगाडीचे तिकीट काढायचे होते.

भरपूर वेळ होता. विक्षिप्तने पुतणे-मंडळींसाठी भेट-वस्तू खरीदण्याचे ठरवले: टॉफी, चित्रांची बिस्कीटे... तो दुकानात गेला आणि ग्राहकांच्या रांगेत उभा राहिला. त्याच्या पुढ्यात फेल्ट हॅट घातलेला एक पुरुष उभा होता आणि हॅटवाल्याच्या पुढे ओठ भडक रंगवलेली एक लठ्ठ बाई उभी होती. ती बाई त्या हॅटवाल्याशी हळू आवाजात, भरभर, तावातावाने बोलत होती:

"कल्पना करा, किती उद्धटपणा, किती बिनहिकमतीपणा! त्याला विस्मरण होतं, त्याला एव्हाना सात वर्षं विस्मरणाचा आजार आहे, पण त्यानं पेन्शन घ्यावं असं मात्र त्याला कुणीही सांगत नाही. आणि हा नुकता आलेला साहेब म्हणतो: 'अहो अलेक्सान्द्र सेम्योनिच, तुम्ही पेन्शन घेणं चांगलं नाही का?' हल-कट!"

हॅटवाला आवश्यक उत्तरे देत होता.

"होय, होय... आता तसेच आहेत सगळे. विस्मरण होत असेल तर त्यात काय एवढं! त्या सूम्बातिचचं काय?.. शेवटच्या काळात ओळी आठवायच्या नाहीत. आणि ती, काय तिचं नांव?.."

विक्षिप्तला शहरवासियांबद्दल आदर होता. अर्थात सर्वांबद्दल नव्हे: डांबरट माणसांबद्दल आणि विक्रेत्यांबद्दल त्याला आदर वाटत नव्हता. त्यांची त्याला थोडी भीतीच वाटायची.

ओळीत त्याची पाळी आली. टॉफी, चित्रांची बिस्कीटे, तीन चॉकलेटे त्याने खरीदली. त्या वस्तू सूटकेसमध्ये भरण्यासाठी तो किंचित एका बाजूला गेला. फरशीवर सूटकेस उघडून वस्तू भरू लागला... त्याची फरशीवर नजर फिरली आणि त्याला दिसले की, काऊंटरपाशी, रांगेत, लोकांच्या पायांपाशी पन्नास रूबलची नोट पडली होती. ती वेडपट हिरवी नोट मुकाट तिथे पडून होती आणि कुणाचेही तिच्याकडे लक्ष जात नव्हते. विक्षिप्तचे काळीज आनंदाने धडधडले, डोळे चमकू लागले. दुसऱ्या कुणी त्याला अडवू नये म्हणून, रांगेतल्या लोकांना ह्या नोटेबद्दल विनोदी पद्धतीने कसे सांगावे ह्याचा तो घाईघाईने विचार करू लागला.

"छान जगताय, नागरिकहो!" तो मोठ्यांदा आणि उल्हासीपणाने म्हणाला.

त्याच्याकडे सर्वांच्या नजरा वळल्या.

"आमच्याकडं अशा नोटा कुणी वाटेवर उधळत नाही!"

सर्वांची थोडीशी धांदल उडाली. ही काही तीन किंवा पाच रूबलची नोट नव्हती–चक्क पन्नास रूबल. अर्ध्या महिन्याचा पगार. आणि त्या नोटेला तेथे कुणी मालक नव्हता.

"बहुतेक त्या टोपीवाल्याची नोट असावी," विक्षिप्तने तर्क केला.

नोट काऊंटरवर सर्वांना दिसेल अशा जागी ठेवण्याचे ठरले.

"आत्ता धावत येईल कुणी-तरी विचारायला," विक्रेती म्हणाली.

विक्षिप्त मोठ्या खुषीत दुकानाबाहेर आला. "आमच्याकडं अशा नोटा कुणी वाटेवर उधळत नाही," ह्या स्वतःच्या विनोदी वाक्याला मनाशी पुनःपुन्हा उगाळून तो स्वतःचेच कौतुक करत होता. अचानक त्याला घाम फुटला. त्याला आठवण झाली की, खेड्यातील बँकेतून त्याला नेमकी तशीच हिरवी नोट आणि आणखी पंचवीस रूबलची एक नोट देण्यात आली होती. पैकी पंचवीस रूबलची नोट आत्ताच त्याने मोडली होती... पन्नास रूबलची नोट खिशात असणे आवश्यक होते... त्याने खिशात हात खुपसला–नोट नव्हती. सगळे खिसे चाचपले –नोटेचा पत्ता नव्हता.

"म्हणजे ती नोट माझीच होती!" विक्षिप्त मोठ्यांदा म्हणाला. "च्यायला!.. माझीच नोट होती तर!"

त्याच्या काळजात दुःखाने ठसठसू लागले. प्रथम उमाळा आला

होता जाऊन सांगावे : "नागरिकहो, नोट माझी आहे. बँकेतून मी दोन नोटा घेतल्या होत्या – एक पंचवीस रूबलची आणि दुसरी पन्नासची. एक, पंचवीस रूबलची आत्ता मोडली आणि दुसरी – हरवलीय." पण त्याच्या ह्या निवेदनानंतर सगळी माणसे कशी चकित होतील आणि नोटेचा अजून कुणी मालक आला नाही म्हणून तो ही नोट लाटायला बघतोय असा कित्येकांच्या मनात कसा विचार येईल, ह्याचे विक्षिप्तने मनाशी चित्र उभे केले. नाही, त्या नतद्रष्ट नोटेवर स्वतःचा मालकीहक्क सांगण्याचा धीर त्याच्याने होईना. कदाचित त्याला नकारही मिळाला असता...

"मी असा कसा झालो?" विक्षिप्तने मोठ्या आवाजात स्वतःला दूषण दिले. "आता काय करायचं?.."

घरी परतणे भाग होते.

तो दुकानापाशी परत गेला. दुरून नोटेला पहायची त्याची इच्छा होती. दारापाशी उभा राहिला... पण आत गेला नाही. आणखीच दुःख झाले असते. काळजाला ताण सोसला नसता.

बसमधून खेड्यात परत येताना हळू आवाजात शिव्या घालत होता – बायकोपुढे खुलासा करण्यासाठी बळ एकवटत होता.

बँकेमधून त्यांनी आणखी पन्नास रूबल काढले.

स्वतःच्या मानहानीपायी चिरडलेला विक्षिप्त अखेरीस आगगाडीत बसला. त्याचा कमीपणा सिद्ध करणारी बायकोची मुक्ताफळे त्याला परत एकदा ऐकावी लागली होती – (तिने त्याच्या डोक्यावर दोन ठोसेही लगावले होते). पण आगगाडी सुरू झाल्यावर हळूहळू त्याची निराश मनःस्थिती पालटत गेली. खिडकीबाहेरून जंगले, राया, खेडी पसार होत होती... वेगवेगळी माणसे येत-जात होती, वेगवेगळ्या गोष्टी सांगत होती. डब्यामधील कॉरीडॉरच्या टोकाशी धूम्रपान करता करता बुद्धिजीवी वर्गातल्या दिसणाऱ्या एका सहप्रवाशाला विक्षिप्तनेही एक किस्सा ऐकवला होता.

"आमच्या शेजारच्या खेड्यातसुद्धा एका वेडपटानं असंच केलं... जळतं लाकूड घेऊन स्वतःच्या आईमागं धावायला लागला. दारूनं झिंगला होता. ती त्याच्यापासून लांब पळताना ओरडत होती: 'अरे

बाळा, हात सांभाळ, तुझे हात भाजतील!' तिला त्या परिस्थितीतही त्याचीच चिंता. आणि तो दारुडा हरामखोर खुद्द आईला मारायला धावतोय! कल्पना करा, किती उद्धटपणा, बिनहिकमतीपणा!"

"तुम्ही ही हकीकत स्वतः रचून सांगितली ना?" त्या बुद्धिजीवी-वर्गीय कॉम्रेडने विक्षिप्तकडे चष्म्याच्या काचांवरून पहात विचारले.

"कशाला रचून सांगू?" विक्षिप्तला समजले नाही. "आमच्या नदीपलिकडं रामेन्स्कोये खेडं आहे..."

बुद्धिजीवीवर्गीय कॉम्रेडने खिडकीकडे तोंड फिरवले आणि पुढे तो अजिबात बोलला नाही.

आगगाडीच्या प्रवासानंतर स्थानिक विमानामधून आणखी दीड तासाचा प्रवास विक्षिप्तला करायचा होता. यापूर्वी आयुष्यात त्याने एकदाच हवाई प्रवास केला होता. फार फार पूर्वी. काहीशा घाबरल्या मनानेच तो विमानात बसला. "ह्या दीड तासात विमानात काही बिघाड झाला तर!" त्याच्या मनात विचार आला. पण नंतर त्याची भीती चेपली. शेजाऱ्याशी गप्पा मारण्याचाही त्याने यत्न केला, पण शेजारी वर्तमानपत्र वाचण्यात गढला होता आणि वर्तमानपत्रात त्याला एवढा रस वाटत होता, की जिवंत माणसाचे बोलणे ऐकण्याची त्याला मुळीच इच्छा नव्हती. विक्षिप्तला जाणून घ्यायचे होते: त्याने ऐकले होते की, विमानांमध्ये खायला देतात. पण अजून काहीच खायला मिळाले नव्हते. विमानात बसून खाण्याची त्याची फार इच्छा होती. केवळ एक अनुभव म्हणून!

"काटकसर केली असावी," त्याने मनाशी ठरवले.

तो खाली पाहू लागला. ढगांचे पर्वत खाली दिसत होते. ते दृश्य सुंदर होते अथवा नव्हते ह्याबाबत विक्षिप्त ठाम मत व्यक्त करू शकत नव्हता. पण भोवताली उद्‌गार उमटत होते: "ओह्! किती सुंदर!" विक्षिप्तच्या मनात अचानक वेडपट इच्छा झाली: कापसाच्या ढिगावर उडी मारतात तशी त्या ढगांवर उडी मारावी. त्याच्या मनात आणखी विचार आला: "मला आश्चर्य का वाटत नाही? तसं पाहिलं तर माझ्याखाली किमान पाच किलोमीटर अंतरावर जमीन आहे." त्याने मनाशी ह्या पाच किलोमीटरचे अंतर मोजले आणि स्वतःच्या बुडाखाली त्याला ठेवून चकित होण्याचा प्रयत्न केला, पण त्याला आश्चर्य वाटले नाही.

"माणसाची कमाल आहे! काय काय शोधून काढतो..." तो शेजाऱ्याला म्हणाला. शेजाऱ्याने त्याच्याकडे पाहिले. पण काही न बोलता परत वर्तमानपत्रात डोके खुपसले.

"पट्टे बांधा!" प्रसन्नवदना तरुणीने सांगितले. "आता लौकरच खाली उतरू."

विक्षिप्तने आज्ञाधारकपणे पट्टा बांधला. पण शेजाऱ्याने ढिम्म लक्ष दिले नाही. विक्षिप्तने हळूच त्याला ढुशी दिली:

"पट्टे बांधा म्हणून सांगताहेत."

"काही विशेष नाही," शेजारी म्हणाला. त्याने वर्तमानपत्र बाजूला ठेवले आणि आसनावर मागे रेलून बसत जणू काहीतरी आठवण झाल्यासारखे तो म्हणाला:

"मुलं म्हणजे जीवनाची फुलं, त्यांची रोपणी डोकं खाली पाय वर अशी केली पाहिजे."

"म्हणजे कशी?" विक्षिप्तला समजले नाही.

वाचक मोठ्यांदा हसला आणि पुढे काही बोलला नाही.

विमान वेगाने खाली जाऊ लागले. हाताच्या अंतरावर जमीन दिसू लागली, वेगाने मागे पसार होऊ लागली. पण अजून धक्का बसला नव्हता. माहीतगार लोकांनी नंतर खुलासा केला की, वैमानिकाचा "नेम हुकला" होता. शेवटी हादरा बसला आणि सगळे एवढे जागचे उडाले की, दातांची कडकड ऐकू येऊ लागली. वर्तमानपत्राचा वाचक तर आसनावरून खाली पडला, विक्षिप्तच्या अंगावर त्याचे टक्कल आपटले, मग बाजूच्या खिडकीवर तेच टक्कल आदळले आणि शेवटी त्याच्या देहाने पायांशी लोळण घेतली. पण ह्या सर्व काळात त्याने तोंडातून ब्र काढला नाही. भोवतालचे सारे लोकही चूप होते. विक्षिप्तला ह्याचे अत्यंत आश्चर्य वाटले. तोही चूप राहिला. विमान थांबले. सर्वांत प्रथम भानावर आलेल्यांनी खिडक्यांमधून बाहेर पाहिले, तेव्हा बटाट्याच्या शेतात विमान उभे असल्याचे त्यांच्या ध्यानात आले. वैमानिकाच्या केबिनमधून गंभीर मुद्रेचा वैमानिक बाहेर आला व दाराकडे गेला. कुणीतरी सावधपणे त्याला विचारले:

"आपण बटाट्यावर उतरलो काय?"

"तुम्हाला काय स्वतःला दिसत नाही?" वैमानिकाने उलट उत्तर दिले.

भीती नाहीशी झालेल्या काही उत्साही प्रवाशांनी विनोद करण्याचे प्रयत्न केले.

टकल्या वाचक स्वतःची दातांची कवळी शोधत होता. विक्षिप्तने पट्टा सोडला व तोही शोधात सामील झाला.

"ही?!" आनंदाने तो उद्गारला आणि वाचकाच्या हाती त्याने कवळी दिली. टकल्याचे टक्कलसुद्धा जांभळे-निळे झाले.

"हात लावायची काय गरज होती?" टकल्या खेकसला.

विक्षिप्त गोंधळला.

"मग द्यायची कशी तुमची कवळी?"

"आता उकळू कुठं? कुठं?!"

विक्षिप्तपाशी ह्या प्रश्नाला उत्तर नव्हते.

"माझ्याबरोबर चलणार?" त्याने सुचविले. "इथं माझा भाऊ राहतो, त्याच्याकडं उकळू... मी तुमच्या कवळीवर जंतू पसरले अशी तुम्हाला भीती वाटते? पण तसं काही नाही."

वाचकाने आश्चर्याने विक्षिप्तकडे पाहिले व तो ओरडायचा थांबला.

विमानतळावर विक्षिप्तने बायकोला तार लिहिली:

"जमिनीवर उतरलो. नीलपुष्पीची डहाळी छातीवर पडली, लाडके ग्रूशा, मला विसरू नको. वास्यातका."

तार पाठवणारी बाई कठोर, शुष्क होती. तिने तारेचा मजकूर वाचल्यानंतर सुचवले:

"वेगळ्या शब्दात लिहा. तुम्ही प्रौढ माणूस आहात, बालोद्यानातलं बाळ नव्हे."

"का म्हणून?" विक्षिप्तने विचारले. "मी तिला पत्रात नेहमी असंच लिहितो. माझी बायको आहे ती!.. तुम्हाला कदाचित वाटलं..."

"पत्रात काय वाट्टेल ते लिहू शकता, पण तार हे दळणवळणाचं साधन आहे. मजकूर उघडा असतो."

विक्षिप्तने परत मजकूर लिहिला:

"जमिनीवर उतरलो. सगळं ठीक. वास्यातका."

तारवालीने स्वतःच दोन शब्द दुरुस्त केले:

"जमिनीवर उतरलो" आणि "वास्यातका." त्याऐवजी तिने लिहिले: "पोहोचलो," "वासिली."

"म्हणे जमिनीवर उतरलो... तुम्ही काय, अंतराळवीर?"

“ठीक आहे,” विक्षिप्त म्हणाला. “तुमच्या म्हणण्याप्रमाणं होऊं दे.”

...विक्षिप्तला माहीत होते – त्याला द्मित्री नांवाचा भाऊ होता आणि तीन पुतणे होते... पण आणखी भावजय असणार हे मात्र तो साफ विसरून गेला होता. त्याने तिला कधीच पाहिले नव्हते. आणि त्या भावजयीनेच त्याच्या सगळ्या सुटीचा विचका केला. का कुणास ठाऊक, पण पहिल्याच भेटीत तिला तो आवडला नाही.

संध्याकाळी दोघे भाऊ प्यायले आणि विक्षिप्त तारस्वरात गाऊ लागला:

तोपाल्या-आ-आ ...
तोपाल्या-आ-आ ...*

सोफ्या इवानोवनाने – विक्षिप्तच्या भावजयीने – दारातून डोकावून संतापाने विचारले:

“ओरडलं नाही तर चालेल ना? तुम्ही स्टेशनावर तर नाही ना?” आणि तिने धाडदिशी दार बंद केले.

बंधू द्मित्री अवघडून गेला.

“त्याचं काय आहे... तिथं मुलं झोपलीत. तशी ती चांगली आहे.”

आणखी प्यायले. लहानपणीचे दिवस, आई, वडील यांच्या आठवणी काढत बसले...

“तुला आठवतं?..” बंधू द्मित्रीने आनंदाने विचारले. “पण तुला काय आठवणार म्हणा! दूधपिता होतास. मला तुझ्याबरोबर ठेवायचे आणि मी तुझ्यावर मुक्यांचा पाऊस पाडायचा. एकदा तर तू काळानिळा पडलास. चांगली शिक्षा झाली मला त्याबद्दल. मग तुला माझ्याबरोबर ठेवेनासे झाले. पण तरीही: जरा कुणाची पाठ फिरायचा अवकाश – ताबडतोब मी तुझा मुका घ्यायचा. कुणास ठाऊक कुठून अशी सवय लागली होती मला. स्वतःचा शेंबूड नीट पुसायची अजून अक्कल नव्हती... आणि पापे घेत होतो...”

“आणि तुला आठवतं?” विक्षिप्तही रंगात येऊन बोलू लागला. “काय तू मला...”

---

* पॉप्लर झाडाबद्दलचे एक लोकप्रिय रशियन गीत – अनु.

"तुम्ही ओरडायचं थांबवता की नाही?" सोफ्या इवानोवनाने परत अत्यंत चिडून विचारले. "तुमच्या शेंबडचा मुक्यांच्या आठवणी कुणाला ऐकाव्याशा वाटतात? तिकडंच का नाही गप्पा मारत?"

"चल, बाहेर रस्त्यावर जाऊ," विक्षिप्त म्हणाला.

बाहेर देवडीवर जाऊन बसले.

"तुला आठवतं?.." विक्षिप्तने पुराण पुढे चालू केले.

पण तेवढ्यात बंधू द्मित्रीला काहीतरी झाले: तो रडू लागला आणि गुडघ्यावर बुक्क्या मारू लागला.

"हे बघ, माझं आयुष्य! पाहिलंस? माणसात किती राग भरलेला असतो!.. किती संताप!.."

विक्षिप्त भावाचे सांत्वन करू लागला.

"असा त्रास करून घेऊ नकोस. कुणीही चिडकं नाही, फक्त मनाचे रोगी आहेत. माझी बायकोसुद्धा तशीच आहे."

"काय तिला आवडलं नाही? कशाबद्दल? तिला तू आवडला नाहीस... पण कशाबद्दल?"

आत्ता कुठे विक्षिप्तच्या डोक्यात प्रकाश पडला की, त्याच्या भावजयीला तो आवडला नव्हता. पण खरेच, कारण काय?

"कारण तू कुणी मोठा माणूस नाहीस, पदाधिकारी नाहीस. त्या मूर्खेला मी ओळखतो. स्वतःच्या जबाबदारीत गोंधळ करून ठेवला! पण ती स्वतः कोण? एका कचेरीत कँटीनवाली! तिथं बघते एकेक गोष्टी आणि टकळी सुरू करते... माझासुद्धा राग करते, मी मोठ्या पदावर नाही म्हणून, मी खेड्यातून आलोय म्हणून!"

"कुठल्या कचेरीत?"

"आपल्या त्या... खाणवाल्यांच्या आता बोलत नाही. पण लग्न कशाला केलं? तिला काय माहीत नव्हतं?"

आता विक्षिप्तला उमाळून आले.

"पण त्यात काय एवढं विशेष?" त्याने भावाला नव्हे, तर दुसऱ्या कुणालातरी उद्देशून मोठ्यांदा विचारले. "जर ठाऊकच करून घ्यायचं असेल, तर जवळ जवळ सर्व मोठी माणसं मूळची खेड्यातून आलेली आहेत. वर्तमानपत्रात अंत्यसंस्काराची काळी चौकट वाचली म्हणजे समजतं की, तो माणूस खेड्यातून आला होता. वर्तमानपत्रं वाचायला पाहिजेत!.. शेतकरी वयात यायच्या आतच कामाला लागला!"

“किती वेळा मी तिला पटवून दिलं: खेड्यातली माणसं जास्त चांगली असतात. कुणाच्या वाटेत आडवी येत नाहीत.”

“स्तेपान वोरोब्योव आठवतो? तुझ्या ओळखीचा होता...”

“अर्थात, ओळखीचा होता.”

“खेड्यातला!.. घ्या: सोविएत संघाचा वीर. नऊ रणगाडे फोडले. धडक मारत गेला. त्याच्या आईला आता आयुष्यभर साठ रूबल पेन्शन देणार आहेत. पण नुकतीच ही हकीकत समजली. तोवर वाचलं होतं – बेपत्ता...”

“आणि इल्या माक्सिमोव!.. आम्ही बरोबरच बाहेर पडलो होतो. पण घ्या: तीन फितींचा मान. पण स्तेपानबद्दल तिला बोलू नको... नको!”

“ठीक आहे. आणि तो..!”

मनःक्षोभ झालेले ते बंधूद्वय आणखी खूप वेळपर्यंत बोलत बसले. विक्षिप्त तर देवडीवर फेऱ्या मारत हातवारे करत होता.

“खेडं म्हणे! तिथं नुसती हवा किती मोलाची! सकाळी खिडकी उघडली म्हणजे जणू हवा तुला आंघोळ घालतेय असं वाटतं. भरपूर पिऊन घ्यावी – वेगवेगळया गवतांचा, फुलांचा वास भरलेली...”

मग ते दमले.

“छप्पर शाकारलंस?” मोठ्या भावाने हळूच विचारले.

“शाकारलं,” विक्षिप्तनेही हळूच उसासा टाकला. “व्हरांडा परत बांधून काढला. छान दिसतो. संध्याकाळी व्हरांड्यात आलास म्हणजे... मनात एकेक कल्पना यायला लागतात: आई-बाबा जिवंत असते, तू पोरांना घेऊन आला असतास – सगळे व्हरांड्यात बसलो असतो, रानफळांच्या मुरंब्याबरोबर चहा प्यायलो असतो. अलिकडं रानफळं खूप झालीत. तू द्मित्री, तिच्याशी भांडू नकोस. नाही तर तिला मी आणखीच आवडेनासा होईन. आणि मी गोडीगुलाबीनं वागतो – तू बघ – ती विरघळेल.”

“तसं पाहिलं तर ती स्वतः खेड्यातलीच!” द्मित्री काहीसा हळू आवाजात नवल करत खेदाने म्हणाला. “पण मूर्ख बाई पोरांना छळतेय. एकाला पियानो वाजवायला लावतेय, दुसऱ्याला बर्फावरच्या नाचाच्या वर्गात नोंदवून आलीय. काळजातून रक्त ठिपकतंय, पण बोलायची सोय नाही – ताबडतोब भांडण!”

"हं!.." विक्षिप्तला परत उमाळून आले. "ह्या वर्तमानपत्रांचं मला काही समजत नाही: तिकडं एक दुकानात काम करताना उर्मट वागते!.. बघा! आणि घरी आली तरी तसंच वागते! दु:ख ह्याचं वाटतं! आणि मला समजत नाही!" विक्षिप्तनेही गुडघ्यावर बुक्क्या मारल्या. "नाही समजत! का त्या अशा चिडक्या बनल्यात?"

सकाळी विक्षिप्त जेव्हा झोपेतून जागा झाला, तेव्हा घरात कुणीही नव्हते. बंधू द्मित्री कामावर निघून गेला होता, भावजयसुद्धा कामावर गेली होती. मोठी मुले अंगणात खेळत होती आणि धाकटयाला पाळणाघरात पोहचवण्यात आले होते.

विक्षिप्तने बिछाना आवरून ठेवला, तोंड धुतले व भावजयीला आवडेल असे काय करावे, याबाबत तो विचार करू लागला. तेवढ्यात त्याच्या डोळयांना बाबागाडी दिसली. "अरेच्चा," विक्षिप्तने विचार केला, "ह्या बाबागाडीला रंगवतो." घरी त्याने भिंतीमधला चुलाणा रंगवला होता तेव्हा सगळे चकित झाले होते. त्याने मुलांची रंगपेटी आणि कुंचला शोधून काढले व तो कामाला लागला. तासाभरानंतर काम संपले तेव्हा बाबागाडी ओळखू न येण्याइतपत वेगळी दिसू लागली होती. बाबागाडीच्या वरच्या भागात विक्षिप्तने सारस पक्ष्यांना सोडले होते – कोपऱ्यांना आणि खाली – वेगवेगळी फुले, गवत, दोन कोंबडे, काही कोंबडीची पिले... त्याने बाबागाडी सर्व बाजूंनी निरखून पाहिली. आता ती नुसती बाबागाडी नव्हती – एक सुंदर खेळणे. आश्चर्यचकित भावजयीला किती आनंद वाटेल ह्याच्या काल्पनिक चित्रापायी त्याला हसू फुटले.

"आणि तू खेडयाबद्दल बोलतेस. विचित्र कुठली!" त्याला भावजयीशी समेट हवा होता. "पोर अगदी करंडीत फूल ठेवल्यासारखं वाटेल."

सबंध दिवस विक्षिप्त शहरात भटकत होता, शोभा-खिडक्या पहात होता. एका पुतण्यासाठी त्याने खेळण्यातली मोटरबोट विकत घेतली. छान पांढरी, दिवेवाली मोटरबोट. "हिलासुद्धा मी रंगवीन," त्याने मनाशी ठरवले.

संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमाराला विक्षिप्त भावाच्या घरी

परतला. देवडीवर पोहचताच त्याला ऐकू आले की, बंधू द्‌मित्रीचे बायकोशी भांडण जुंपले होते. म्हणजे, बायको तणतणत होती आणि बंधू द्‌मित्री फक्त पुन:पुन्हा म्हणत होता :

"त्यात काय एवढं!.. ठीक आहे... सोन्या... आता जाऊं दे ना..."

"उद्या हा मूर्ख ह्या घरात दिसता कामा नये!" सोफ्या इवानोवना किंचाळली. "उद्याच जाऊं दे त्याला!"

"ठीक आहे ग! सोन्या..."

"काही ठीक नाही! मुळीच ठीक नाही! मुळीच थांबू नको म्हणावं – फेकून देते रस्त्यावर त्याची सूटकेस! खड्डयात जाऊं दे मेला!"

विक्षिप्त घाईघाईने देवडीपासून दूर गेला... पण पुढे काय करावे ते त्याला समजेना. परत त्याला वाईट वाटले. जेव्हा त्याचा कुणी तिटकारा करत, तेव्हा त्याला फार वाईट वाटायचे आणि भीती वाटायची. भासायचे: आता संपले, पुढे जगण्यात काय अर्थ? माणसांपासून कुठेतरी दूर दूर जायची इच्छा व्हायची – त्याचा तिटकारा करणाऱ्या अथवा त्याला हसणाऱ्या माणसांपासून.

"असा कसा झालो मी?" बागेतील आडोशाखाली बसत तो खेदाने पुटपुटला. "मला आधीच समजायला पाहिजे होतं: तिला नाही समजायची, नाही समजायची लोककला."

अंधार पडेपर्यंत तो तेथेच बसून राहिला. सारा वेळ काळीज ठणकत होते. नंतर बंधू द्‌मित्री तेथे आला. त्याला आश्चर्य वाटले नाही – जणू माहीत होते की, बंधू वासिली केव्हापासून बागेतील आडोशात बसून होता.

"हे बघ..." तो म्हणाला. "ती... परत तिनं गोंधळ घातला. बाबागाडी तू रंगवायला नको होतीस."

"मला वाटलं, तिला आवडेल. जातो मी, भाऊराया."

बंधू द्‌मित्रीने उसासा टाकला... तो काहीही बोलला नाही.

विक्षिप्त घरी परतला तेव्हा छान उबदार पावसाची सर कोसळत होती. विक्षिप्त बसमधून खाली उतरला, त्याने पायातील नवे बूट काढून हातात घेतले आणि एका हाती सूटकेस व दुसऱ्या हाती बूट

धरून उबदार, ओल्या मातीवरून तो धावत सुटला. उड्या मारत तो मोठ्यांदा गात होता:

तोपाल्या-आ-आ ...

अर्धे आकाश एव्हाना स्वच्छ झाले होते, निळे बनले होते आणि जवळच कुठेतरी सूर्य जाणवत होता. पाऊस ओसरला होता, डबक्यांमध्ये मोठमोठ्या थेंबांची शिंपण घडत होती; त्यांच्यातून फेस उमटत होता आणि बुडबुडे निघत होते.

एका जागी विक्षिप्तचा पाय घसरला आणि थोडक्यात पडायचा वाचला.

... त्याचे नांव होते वासिली येगोरीच क्न्याझेव. त्याचे वय एकूण-चाळीस वर्षांचे होते. खेड्यात तो सिनेमा दाखवायचे काम करत होता. त्याला डिटेक्टिवांची आणि कुत्र्यांची आवड होती. आणि तो लहान-पणापासून हेर बनण्याचे स्वप्न पहात होता.

# गाववाले

रात्री पाऊस पडला होता. दूरवर ढगांचा गडगडाट झाला होता... पण सकाळ उजाडली आणि तिने सूर्याला धुक्यामधून बाहेर काढले. थरथरत्या ओल्या पानांमधून रुपे वाहू लागले. खळग्यांमध्ये धुके गोळा झाले. मग अनिच्छेने जमिनीला सोडून धुक्याचे ढग वर चढले.

मरणाबद्दल शांतपणे विचार करणे हे म्हातारपणचे काम. तेव्हाच माणसासमोर जीवनातील सर्व लपलेले अद्भुत आणि चिरंतन सौंदर्य उघडे होते. माणसाने अखेरच्या वेळी कष्टाने त्या सौंदर्याचा पूर्ण आस्वाद घ्यावा अशी कुणाची इच्छा असते. आणि मग जग सोडून जावे.

आणि लोक असे जग सोडून जातात. त्यांच्या जाण्याचा संथ नाद ऐकू येतो – थकलेल्या घोड्यांच्या तोंडांमधल्या उबदार लगामाला अडकवलेल्या छोट्या घंटांच्या नादाप्रमाणे. छान, किती पीडादायी छानदारपणे आयुष्य सरले. जाण्याची इच्छा होत नव्हती!

ओल्या वाटेवरून पांढऱ्या केसांचा म्हातारा चालत होता. गायी-साठी गवत कापायला तो जात होता.

त्याचे खेडे टेकाडांमागे राहिले होते. आता तो ज्या दिशेने चालला होता त्या ठिकाणाचे नांव होते कुचूगूरी. डोंगरपायथ्यावरचे अफाट चढउतारांचे खोरे. पुढच्या टेकाडाच्या माथ्यावर चढलास म्हणजे सबंध खोरे दिसायचे. खोऱ्याच्या तीन बाजूंना मूक डोंगर उभे होते. हिरव्यागार झाडीचा प्रदेश. पुरातन काळापासून माणसे इथे गवत कापत होती.

टेकड्यांच्या "कपाळां" वर आणि "आयाळीं" वर घोड्याच्या पोटापर्यंत टेकेल एवढे उंच गवत वाढायचे. खाली खळग्यांमध्ये थंडगार असायचे आणि दाट झुडुपांना ओलसर कुबट वास यायचा. तेथून सुपीक, तांबूस जमिनीतून नितळ थंडगार पाण्याचे निर्झर खळखळ

वाहतात. त्यांचे पाणी किती चवदार! तेथे जाऊन बसण्याची अनिवार इच्छा होते. थंडया धूसर उजेडात. का कुणास ठाऊक पण खिन्नतेची आणि एकाकीपणाची भावना मनाला लपेटते. अर्थात तुमच्याबद्दल आस्था बाळगणारी माणसे असतात: तुम्ही जिवंत आहात अथवा मेलात याची कदर ठेवणारी माणसे असतात... पण तरीही? इथे स्वत:लाच समजत नाही: हे असह्य सौंदर्य का दिलेय? त्याचे काय करायला हवे होते?.. किती वाईट! जवळून गेलो – घाई केली आणि तिकडे डोळे भरून पाहिलेच नाही.

जेव्हा दिवसाच्या उजेडात येता, तेव्हा स्वत:ची खिन्नता गमावायला दु:ख होते. असा भास होतो की, पहाटेप्रमाणे स्तब्ध आणि हळुवार अशा कशाचा तरी तुमच्या काळजात नुकताच प्रवेश झाला आहे; पूर्ण आनंदाचे तुम्हाला भरते आले आहे आणि तो आनंद जतन करून ठेवण्याची तुमची इच्छा आहे. पण तसे घडत नाही. तऱ्हेतऱ्हेचे विचार मनात गर्दी करतात आणि आनंदाला तुम्ही विसरून जाता.

सूर्य वर चढला. धुकेही वर चढले आणि विरून गेले. जमिनीमधून किंचित वाफा उमटत होत्या. पण ह्या वाफेने उजेडाला अडथळा आणला नाही. तिने प्रकाशाला जमिनीपासून किंचित वाकडे केले आणि जमिनीला थोडे वर उचलले.

भोजाची पाने कोरडी झाली, पण आंघोळीनंतरचा यौवनसुलभ ताजेपणा अद्याप त्यांच्यावर टिकून होता. उन्हात ती पाने चमकत होती. अदृश्य पक्ष्यांच्या सूक्ष्म लकेरी सकाळच्या प्रगाढ शांततेचा भंग करत होत्या.

वातावरण उबदार बनले. डोंगरउतारांवरून उबदार हवेच्या लाटा घरंगळत स्तब्ध, ओलसर दरीत कोसळत आहेत. धरतीला तिच्या विपुल हिरव्या सामर्थ्याचा उग्र गंध येतोय.

म्हातारा अधिक वेगाने पावले टाकू लागला. पण चालून थकवा येईल एवढया वेगाने नव्हे. आता अंगी फारसे बळ उरले नव्हते. बळाचा जपून काटकसरीने वापर करणे भाग होते.

ह्या रस्त्यावरून तो कितीकदा चालला होता अगर घोडयावर बसून गेला होता – सबंध आयुष्यभर. रस्त्याचे प्रत्येक वळण त्याला ठाऊक होते. घोडयाचा लगाम कुठे ढिला सोडायचा आणि कुठे खेचून धरायचा, हे त्याला माहीत होते. म्हणजे घोडयाची ताकद सकाळीच

संपायची नाही आणि दिवसभर तो काम करू शकायचा. आता त्याच्यापाशी घोडा नव्हता. आयुष्यात त्याच्यापाशी असलेल्या सर्व घोड्यांची त्याला आठवण होती. कुणाची ऐकायची इच्छा असली तर त्या प्रत्येक घोड्याच्या लकबींसकट सर्व तपशीलवार माहिती तो सांगू शकत होता. स्वतःच्या घोड्यांची त्याला जेव्हा आठवण येई, तेव्हा त्याच्या काळजात बारीक कळ उमटायची. विशेषतः शेवटच्या घोड्याबद्दल त्याला फार वाईट वाटायचे: त्या घोड्याला त्याने विकले नव्हते, त्याच्या बदल्यात दुसरा घोडा घेतला नव्हता, लमाणांनी तो घोडा चोरला नव्हता – त्याने स्वतःच त्या घोड्याचा प्राण घेतला होता.

१९३३ सालात ही घटना घडली होती. म्हातारा (तेव्हा तो म्हातारा नव्हता, कणखर शेतकरी आनिसिम क्वासोव होता, त्याला सारेजण आनिसिमका म्हणून हाक मारत) एव्हाना सामुदायिक शेतावर काम करत होता. शेताच्या राखणदारीचे काम त्याच्यावर सोपवलेले होते. त्यावेळी मोठा दुष्काळ पडला. माणसे हंसपाद वनस्पती खात होती, खाजकुयली शिजवत होती. धान्य पाखडताना जमिनीवर उरलेले आणि हिवाळाभर पडून राहिलेले धान्याचे कण गोळा करून काहीजण भूक भागवत होते. नव्या पिकाची वाट पहात होते. अजून उन्हाळा निभवून न्यायचा होता. सगळी मदार गायींवर. उपासमारीने पोटे फुगलेल्या मुलांना दूध पाजत होते.

एके दिवशी, गवतकापणीच्या मोसमात, खेड्याचा गुराखी – जो अगदी दुबळा होता आणि आता पुरता खंगला होता – गायींमागून फिरता फिरता चक्कर येऊन बेशुद्ध पडला. तशा बेशुद्धीत तेथे तो किती वेळ पडून होता हे केवळ देवच जाणे. नंतर तो म्हणाला होता – खूप वेळपर्यंत. दरम्यान गायी क्लोव्हर गवतात घुसल्या होत्या. संध्याकाळी खूप उशिरा त्याने सगळ्या गायींना खेड्यात दामटत आणले. गायींची पोटे फुगली होती. खेड्यातील पहिला माणूस भेटताच गुराखी ओरडला: "वाचवा, गायींनी क्लोव्हर गवत खाल्लंय!" एकच गोंधळ माजला!.. बायका विव्हळू लागल्या, पुरुषांनी चाबूक घेतले आणि ते गायींमागून धावू लागले. हे फार मोठे संकट कोसळले होते. खेड्यावर शोककळा पसरली. गायी थकून लटपटत कोसळल्या, माणसेसुद्धा दमून खाली कोसळली. आनिसिमपाशी घोडा होता (आनिसिमवर जेव्हा राखणदारीचे काम सोपवण्यात आले, तेव्हा सामुदायिक शेताने त्याला

घोडा दिला होता. हा खसी घोडा मीष्का पूर्वी आनिसिमच्याच मालकीचा होता ) ; घडला प्रसंग ध्यानी घेऊन आनिसिम घोड्यावर स्वार झाला आणि गायींना पळवू लागला. सबंध रात्रभर गायींना पळवत ठेवण्यात आले. सकाळच्या प्रहराला आनिसिमच्या मांडीखालील मीष्काला धाप लागली आणि पुढल्या पायांवर मीष्का खाली पडला. आनिसिमने प्रयत्नांची शर्थ केली, पण मीष्काला तो वाचवू शकला नाही. आनिसिम खूप रडला. घोड्यावर आडवे पडून त्याने खूप शोक केला... आनिसिमवर घातपाताचा आरोप ठेवण्यात आला आणि प्रादेशिक तुरुंगात त्याने दीड महिना शिक्षा भोगली. नंतर तो प्रसंग हळू हळू सारे विसरले.

अखेरीस म्हातारा स्वतःच्या जमिनीच्या तुकड्यापाशी येऊन पोहोचला : रस्त्यापासून जवळच उतरती घळ, तळापाशी दलदल आणि छोटा झरा.

सूर्य एव्हाना तळवाभर उंच चढला होता. म्हाताऱ्याला थोडा उशीर झाला होता.

पावाच्या तुकड्याबरोबर नुकती खारवलेली काकडी खाऊन त्याने झटपट न्याहरी आटपली. म्हाताऱ्याने विळ्याचे पाते दगडावर घासून धार लावली.

गवत कापण्याइतके दुसरे छान काम नाही. शिवाय, एकट्याने गवत कापायला म्हाताऱ्याला खूप आवडायचे. दिवसभरात अनेक गोष्टींवर विचार करायला मिळायचा!

विळ्याचे पाते गवतामधून सपासप फिरत होते. गवताची थरथर व्हायची आणि ते खाली कोसळायचे. पुढे तीन पाऊल अंतरावर सापाने डोके वर उचलले... आणि सापाचे किळसवाणे चमकते शरीर चपळपणे गवतामधून वळवळत पसार झाले. परत एक आठवण : लहान असताना एकदा तो छान गतीने घोड्यावरून दौडत येत होता. अचानक घोड्याने सापाला पाहिले असावे अथवा सापाच्या अस्तित्वाची त्याला जाणीव झाली असावी – घोड्याने बाजूला उडी मारली. आनिसिम घोड्याच्या पाठीवरून ताडकन उडाला आणि नेमके त्या सापावर त्याचे ढुंगण आदळले. नंतर आठवडाभर त्याला अगदी "धार" लागली होती!

स्तब्ध सरोवराच्या गढूळ पाण्यामधून जसे निर्मळ पाण्याचे झरे वाहू लागतात, त्याप्रमाणे म्हाताऱ्याने जगून झालेल्या आयुष्याच्या खोलीमधून पूर्वीच्या चांगल्या दिवसांच्या आठवणी उमाळून येऊ लागल्या.

सापांचीच गोष्ट... त्यावेळी खेड्यात कूदेल्का आजोबा रहात होता. लहान पोरांना म्हातारा म्हणायचा: एक साप ठार मारलात तर चाळीस पापांना माफी मिळते. आणि जर सापाला आगीत टाकलात, तर त्याच्या पोटावर खूप खूप पाय पहायला मिळतात. म्हणून पोरे उत्साहाने पाप-मुक्ती मिळवत होती. आणि सापाला आगीत फेकले तर खरेच त्याच्या पोटावर बारीक बारीक खूप पाय दिसायचे. पोरे ओरडायची: "बघ! ते बघ पाय!" सगळेजण सापाचे पाय पहात.

दुपारच्या जेवणाच्या वेळेपर्यंत म्हातारा गवत कापत राहिला. एव्हाना गवत पूर्ण कोरडे झाले होते. सूर्य तळपत होता. डोक्यावर अक्षरशः गरम धिरडे ठेवले आहे असे भासत होते.

"देवाची कृपा!" गवतकापणी झालेल्या जमिनीच्या तुकड्यावर नजर टाकत म्हातारा स्वतःशी म्हणाला. त्याने बराच पट्टा स्वच्छ केला होता. मनात त्याला खूप आनंद झाला.

पूर्वी तो कुरणाची पहाणी करायला आला होता तेव्हाच त्याने बांधून ठेवलेल्या छोट्या आडोशात आता तो गेला. निवांतपणे भोजन करायला आता हरकत नव्हती.

कापलेल्या गवताचा मादक, उबदार गंध त्या आडोशात भरून राहिला होता. कुठेतरी एका कीटकाची उच्च स्वरात गुणगुण चालू होती. गरम स्तब्धतेत नाकतोड्यांची अखंड कोरडी किरकिर भरली होती. शिवाय आकाशातून भराऱ्या मारणाऱ्या रुपेरी चंडोलांच्या लकेरी ऐकू येत होत्या.

छान! देवा रे, किती छान!.. छान आहे ही भावना माणसाला फार क्वचित समजते. पण जेव्हा आपल्या बाबतीत वाईट घडते, तेव्हा मनात विचार येतो: "कुणाचेतरी कुठेतरी छान चालले आहे!" पण जेव्हा आपले छान चाललेले असते, तेव्हा आपल्या मनात येत नाही: "कुणाचेतरी कुठेतरी वाईट घडते आहे!" आपले छान असले म्हणजे झाले!

म्हाताऱ्याने गवतावर धुवून विटलेला स्वच्छ कपडा अंथरला. त्यावर काकड्या, पाव, धुतलेली कांद्याची पाती ठेवली... मग तो झऱ्यापाशी गेला. तेथे पाण्यात दुधाची बाटली उभी होती. बाटलीला फडक्याच्या बोळ्याचे गच्च बूच बसवलेले होते. म्हातारा झऱ्यावर खाली झुकला, आधारासाठी त्याने ओलसर निसरड्या काठावर हात

टेकले आणि आधाशीपणा न करता खूप वेळपर्यंत तो पाणी पीत राहिला. निर्झराच्या तांबूस सोनेरी पात्रात फिकट रंगाचे वाळूचे कण एकापाठोपाठ एक धावताना त्याला दिसत होते.

"जणू जिवंत आहेत," म्हाताऱ्याच्या मनात विचार आला. मोठ्या कष्टाने तो उठून उभा राहिला, त्याने बाटली उचलली आणि परत आडोशात तो आला. आडोशापाशी एका झाडाच्या बुंध्याच्या खुंटावर दुसरा एक म्हातारा बसला होता. त्या म्हाताऱ्याच्या डोक्यावर फेल्ट टोपी होती व हातात छडी होती. तो धूम्रपान करत होता.

"राम राम," टोपीवाला म्हातारा म्हणाला. "इथं माणसाची चाहूल दिसली, म्हणून विश्रांतीला बसलो. हरकत नाही ना?"

"हरकत कसली?" आनिसिम म्हणाला. "इकडं ये, इथं फारसं उकडत नाही."

"गरम होतंय खरं!" टोपीवाला म्हातारा आडोशात आला आणि गवतावर बसला. "ऊष्मा होतोय!"

"पाटलूण तर चांगली आहे... हिरवी होणार," आनिसिमच्या मनात विचार आला.

"माझ्याबरोबर जेवणार?" त्याने नवागताला पाचारण केले.

"धन्यवाद, माझं नुकतंच जेवण झालंय." टोपीवाला म्हातारा आनिसिमकडे एवढा टक लावून पहात राहिला, की आनिसिमला शेवटी अवघडल्यासारखे झाले. "गवत कापतोस?"

"कापलंच पाहिजे. इथला दिसत नाहीस?"

"इथलाच!"

आनिसिमने पाहुण्यावर एक नजर टाकली. पण तो काही बोलला नाही.

"तसा मी दिसत नाही?"

"कशावरून? आता सगळ्या प्रकारची माणसं आमच्याकडं आहेत." कुडुम कुडुम आवाज करत आनिसिम काकडी खात राहिला... त्याच्या ध्यानात आले: पाहुण्याची नजर फडक्यावर अंथरलेल्या शेतकऱ्याच्या साध्या खाद्यपदार्थांवर खिळली होती. "बहुधा खायची इच्छा होत असावी त्याला!"

"खा माझ्याबरोबर थोडं!" परत त्याने आग्रह केला.

"नको रे बाबा, तुला अजून अर्धा दिवस राबायचंय!"

“मला भरपूर आहे खायला!”

शहरनिवासी म्हाताऱ्याने डोक्यावरची टोपी उतरवली. त्याचे तुळतुळीत टक्कल चमकू लागले. जवळ सरकून एक काकडी उचलली आणि पावाचा तुकडा मोडून घेतला.

“तुझ्यापाशी वर्तमानपत्र नाही?” आनिसिमने विचारले.

“कशाला?” पाहुण्याला आश्चर्य वाटले.

“पाटलूण हिरवी होईल. छान पाटलूण आहे.”

“आं... खुशाल मळू देत. वा, काय काकडी!”

“काय?”

“चवदार!”

“इथलाच आहे म्हणतोस... कुठचा?”

“इथून जवळचाच...”

पाहुणा आसपासच्या प्रदेशातील होता ह्यावर आनिसिमचा विश्वास बसत नव्हता. अर्थातच तो तसा दिसत नव्हता.

“आत्ता मी इथं रहात नाही. इथला जन्म माझा.”

“आं... पाहुणा म्हणून आलास?”

“जन्मगावाला बघितलं पाहिजे... लौकरच मरण येणार. तू कोणत्या खेड्यातला?”

“लेब्याझ्ये. हा रस्ता जातो...”

“तू आणि तुझी म्हातारी, दोघंच राहता?”

“होय.”

“मुलं आहेत?”

“आहेत. तीन. आणखी दोघं युद्धात ठार झाली.”

“ही तीन कुठं राहतात? शहरात?”

“एक शहरात राहतो – कोल्का. दोन मुलींची लग्नं झालीत... एकीचं घर चेबूर्लानमध्ये. तिचा नवरा सामुदायिक शेताचा पथक-नायक आहे. दुसरी – थोडी आणखी पलिकडं.” दुसऱ्या मुलीचा नवरा रशियन नव्हता हे आनिसिमने सांगितले नाही. “नीन्का वसंतात इथं आली होती. तिची मुलं एव्हाना मोठी झालीत.”

“कोल्का कोणत्या शहरात?”

“तो कधी शहरात असतो, कधी नाही. त्याचं काम सारखं फिरतीचं. धातू शोधतात.”

"पण कोणतं शहर?"

"लेनिनग्राद. आम्हाला पत्रं लिहितो, पैसे पाठवतो... तसा छान राहतोय. भेटायला यायची इच्छा म्हणतो, पण त्याला सवडच सापडत नाही. येईल एखाददिवशी!"

शहरचा म्हातारा थोडे दूध प्यायला आणि रुमालाने त्याने ओठ पुसले.

"धन्यवाद. खूप खाल्लं!"

"उपकार कसले मानतोस!"

"गवत कापायला जाणार?"

"नाही. थोडा थांबीन. अंमळ विश्रांती."

"कोल्का कोणत्या वर्षी जन्मला?" पाहुण्याने आणखी प्रश्न केला.

"तो वीस साली..." इथे प्रथम आनिसिमच्या डोक्यात विचार चमकला: "कशाला हा सगळ्या बारीक चौकशा करतोय?" त्याने पाहुण्याकडे नजर टाकली.

पाहुण्याने किंचित हास्य केले. त्या हसण्यात आनंद नव्हता, पण खेदही नव्हता.

"तर आपण एकाच गावचे," तो म्हणाला.

"विचित्र वल्ली दिसतोय," आनिसिमच्या मनात आले. "म्हातारपणी अशी चेष्टा करणं शोभत नाही!"

"प्रकृती कशी राहते?" शहरनिवासीने प्रश्न चालू ठेवले.

"अजून देवाची कृपा आहे... कधी कधी डोकं दुखतं. आमच्या अर्ध्या खेड्याचं डोकं दुखतं – तरुणांचंमुद्धा!"

"कुणी नातेवाईक आहेत? भाऊ, बहिणी..."

"नाहीत. खूप दिवसांपासून..."

"वारले?"

"बहिणी वारल्या. भाऊ पहिल्या युद्धातून परतला नाही."

"ठार झाला?"

"बहुधा. म्हणूनच तर युद्धावरून परतत नाहीत ना?"

शहरनिवासीने सिगारेट शिलगावली. धुराची निळी रेषा आडोशाच्या दारगाच्या दिशेने तरंगत गेली. आडोशातील हिरवटसर सावलीत ती रेषा स्पष्ट दिसली. पण उघड्यावर उजेडात मात्र ती पटकन नाहीशी झाली. जरी अजिबात वारा नव्हता तरी. नाकतोडे किरकिरत होते.

झुडुपांमध्ये पक्षी किलबिलत होते. तुरेदार चंडोल धरतीच्या उबदार वक्षावर गाण्याच्या अखंड लकेरी सोडत होते.

आडोशाच्या दारापासच्या गवताच्या उंच पात्यावर एक सोनकिडा सरपटत होता. अजिबात न भिता चिकाटीने तो वर चढत होता... दोन्ही म्हाताऱ्यांचे त्याच्याकडे लक्ष गेले. सोनकिडा वर टोकापर्यंत चढला, तेथे त्याने किंचित झोके घेतले, मग पंख पसरले आणि गवतावर त्याने तिरपी झेप घेतली.

"आपलं आयुष्य जगून झालं," शहरनिवासी म्हातारा हळूच म्हणाला.

आनिसिम दचकला. आश्चर्यकारकरीत्या हे वाक्य त्याला ओळखीचे भासले. खुद्द वाक्य नव्हे – तर ते म्हणण्याची तऱ्हा. वडील तसे बोलायचे – विचारात गढलेले असत तेव्हा. किंचित आश्चर्याने हसायचे व त्यापाठोपाठ प्रेमळ स्वरात आई-माईवरून एखादी शिवी हासडायचे.

"गाववाल्या, दुःख नाही होत?"

"दुःख होवो वा न होवो, काय उपयोग?"

"अशा वेळी माणसाला काहीतरी मदत असली पाहिजे ना?"

"तुला काही दुखतंय – खुपतंय?"

"माझं काळीज दुखतंय. थोडंसं. वाईट वाटतं... पुरतं जगून झालं नाही, अजून थकलो नाही. अजून तयारी झाली नाही."

"ह्यॅ!.. आयुष्य कधी पुरतं वाटतं? धरतीमातेवर कायम निजायची कुणाला इच्छा होते?"

"आत्महत्या करणारी माणसं आहेत..."

"ती आजारी असतात. कधी घडतं: माणूस आतून तुटतो. बाहेरून काही ध्यानात येत नाही, पण आतून संपलेला असतो."

"मी खोलवर विचार केलेला नाही... मला स्वतःला समजतं – मूर्खपणा आहे. जे गमावलं, त्याबद्दल पूर्वीच खूप विचार केला." शहरनिवासी थोडा वेळ गप्प बसला. "ह्या शांततेचा खेद होतो... खूप धावपळीचं आयुष्य जगलोय. पण आपली जागा रिकामी करून दिली पाहिजे. होय ना?"

"होय... दिली पाहिजे!"

"नाहीतर अशी जागा शोधली पाहिजे, जिथं तुझ्याबद्दल सगळं विसरून जातील आणि मग दोनशे वर्षं जगायचं! कसं?" म्हातारा मजेने हसला. त्याच्या त्या हसण्यात आनिसिमला अस्वस्थ करणारा

परिचितपणा परत जाणवला. "तिथं जसं आहे तसंच सगळं राहिलं पाहिजे कायमचं! कसं?"

"मला वाटतं, त्याचा वीट येईल."

"पण आत्ता मला मुळीच कशाचा वीट आलेला नाही!"

"तू आधीपासून मरणाचा विचार करू नकोस... म्हणजे भीती वाटायची नाही मरणाची. जेव्हा येईल तेव्हा येईल... थोडासा आजारात लोळशील! अवघ्या आठवड्यात माणसं आटपतात!

"खरं आहे..."

"तू पुढचा विचार करतो आहेस आणि मी सारखा मागं वळून पाहतोय – दोन्ही वाईट. फक्त बेचैनी वाढते."

"आठवणी येतात?"

"हूं!"

"हे छान!"

"असेल छान कदाचित. पण सगळं मन ढवळून निघतं. कशासाठी?"

"नाही, हे छानच. कुठल्या आठवणी येतात? लहानपणच्या?"

"जास्त करून – लहानपणच्या."

"सांग तरी एखाद-दुसरी! खोड्या करायचास?"

"माझा भाऊ होता, ग्रीन्का. तो फार खोडकर होता." आठवणीमुळे आनिसिमच्या मुद्रेवर स्मित उमटले. "कुठून असा खोडकरपणा त्याच्यात आला होता कुणास ठाऊक!.. बहुधा युद्धातसुद्धा दुसऱ्यांआधी त्यानं डोकं वर काढलं असणार..."

"काय करायचा खोड्या तो?" शहरनिवासी म्हाताऱ्याने कुतूहलाने विचारले. "सांग तरी... विश्रांती घेतो आहेस तोवर."

"ह्यॅ!.." आनिसिमने मुंडी हलवली व खूप वेळपर्यंत तो गप्प बसला. "चलाख होता... एकदा आमच्या शेजाऱ्यानं, येगोर चालीशेवनं, त्याच्या परसातल्या वाफ्यात आम्हाला पकडलं. त्यानं आम्हाला चोप दिला – अर्थात आमच्या उपद्व्यापांबद्दल, दुष्टाव्यापायी नव्हे. कलिंगडं अजून कच्ची होती, पण खाण्यापेक्षा आम्ही नासवली जास्त. रात्रीचं दिसायचं तर नाही: गुडघ्यावर कलिंगड फोडायचं, चावा मारायचा, कच्चं असलं तर फेकून द्यायचं. मस्त चोपलं त्यानं आम्हाला. नंतर वडलांनी आमची आणखी कणीक तिंबली. ग्रीन्काला रागानं

झपाटलं. आणि त्यानं काय केलं माहीत आहे? डुकराचं मूत्राशय त्यानं घेतलं – आम्ही नुकतंच डुक्कर कापलं होतं – त्याला राख फासली... त्याचा फुगा कसा बनवतात माहीत आहे?"

"माहीत आहे."

"तर त्यानं ते कोरडं केलं, त्यात हवा भरली, त्यावर भयानक चेहरा रेखाटला..." आनिसिम मनापासून हसला. "असलं थोबाड त्यानं कुठं पाहिलं कोण जाणे?.. तर रात्र पडायची आम्ही वाट पाहिली, हळूच येगोरच्या पुढच्या दारापाशी गेलो आणि दाराच्या खांबाला एका दोरीनं तो फुगा टांगला... सकाळी येगोरनं दार उघडलं आणि बाहेर पडतो तो काय! तो भयानक चेहरा त्याच्याकडे रोखून पहात असलेला त्याला दिसला... येगोर जवळ जवळ पाटलूणीत हगायच्या बेतात होता! धाडकन दार बंद करून घरात पळाला. आणि धुराड्यावरून ओरडायला लागला: 'धावा! माझ्या दारात सैतान उभा आहे!'"

शहरनिवासी म्हातारा पोट धरधरून हसला.

"बाप्यागड्याला छान अद्दल घडली. होय ना? हा-हा!"

"होय, नंतर येगोरला तशीच हाक मारायचे: 'येगोर्का, दारात सैतान उभा!'"

"आणखी एकदा – आम्ही थोडे मोठे झालो होतो – गवताच्या कापणीच्या वेळची गोष्ट... मिकोलाय रोगोदिन नांवाचा एक लबाड माणूस होता. दुसऱ्यांच्या जिवावर चैन करायला आवडायची त्याला. संध्याकाळच्या वेळी म्हणाला: 'ग्रीन्का, एखाद्या घोड्यावर खोगीर चढव, पाहिजे तर माझ्या, वेगात खेड्यात जा आणि कुणाच्यातरी कोंबड्या बगलेत मारून आण. कोंबडी खायची इच्छा झालीय.' ग्रीन्कानं फारसा विचार केला नाही. त्यानं घोड्यावर खोगीर चढवलं आणि खेड्याकडं दौड मारली. थोड्याच वेळात मुंड्या मुरगळलेल्या पाच कोंबड्या घेऊन आला. आम्ही सगळे खुषीत. ताबडतोब तिथंच शिजवल्या... झकास ताव मारला! मिकोलाय मिटक्या मारत म्हणाला: 'शाब्बास तुझी ग्रीन्का!' आणि ग्रीन्का त्याला म्हणतो: 'खा, मिकोलाय काका! खा, जणू आपल्याच समजून खा!'"

दोघे म्हातारे मनापासून हसले. शहरनिवासीने सिगारेट पेटवली.

"नंतर त्यानं खूप शिव्या घातल्या!.. काय करणार, स्वतःच पाठवलं होतं."

"होय ..." शहरनिवासी म्हाताऱ्याने डोळे पुसले. तो विचारात गढला.

खूप वेळपर्यंत ते दोघे आपापल्या विचारांमध्ये गढून गप्प बसले. आडोशाबाहेरचे जग वाढत्या प्रमाणात गुंजत होते, गात होते. तळपत्या सूर्यप्रकाशात त्या जगाचे सौंदर्य अधिक उधळेपणाने आणि गूढपणे प्रकट होत होते.

"आता लागतो परत कामाला," आनिसिम म्हणाला. "उन्हाचा ताप थोडा कमी झालाय."

"अजून खूप गरम होतंय ..."

"काही विशेष नाही."

"गाय बाळगलीच पाहिजे का?"

"अर्थातच!"

आनिसिमने विळा उचलला आणि धारदार बनवायला दगडावर घासला ... कापलेल्या गवताच्या पेंढ्यांवर त्याने नजर टाकली – सकाळपासून काही वाईट काम झाले नव्हते. शहरनिवासी म्हातारा त्याच्याकडे पहात होता ... लक्षपूर्वक. खिन्नपणे.

"बरं, चलतो," आनिसिम परत म्हणाला.

"ठीक आहे," शहरनिवासी म्हणाला. "अच्छा ..." त्याने परत आनिसिमच्या डोळ्यांमध्ये थेट पाहिले. पण तो पुढे काहीही बोलला नाही. हात गच्च आवळून त्याने हस्तांदोलन केले आणि झपझप उतार उतरून तो रस्त्यावर गेला. रस्त्यावर पोहोचल्यानंतर त्याने सभोवार नजर टाकली, क्षणभर तो थांबला आणि निघून गेला. वळणावर तो दिसेनासा झाला.

म्हातारा खूप उशीरापर्यंत गवत कापत होता.

मग तो घरी गेला.

घरी त्याची म्हातारी अत्यंत अधीरपणे त्याची वाट पहात असलेली त्याला आढळली.

"आपल्याकडं कुणीतरी एक माणूस आला होता!.." म्हातारा फाटकापाशी असतानाच ती म्हणाली. "लांबच लांब मोटार होती त्याची. तुझी चौकशी करत होता. म्हणाला, तुझा म्हातारा कुठाय?"

आनिसिम दारापासच्या पायरीवर बसला. "टोपीवाला? म्हातारा..."

"होय, टोपीवाला. छान सुटाबुटातला... मास्तरसारखा."

म्हातारा खूप वेळ गप्प बसला. पायांखालची जमीन निरखत राहिला. दिवसा त्याला चकित करणारा तो विचित्र परिचितपणा त्याने ओळखला. आता त्याला सर्व काही उमजले होते! पण... खरेच का?!"

"ग्रीन्का तर नव्हता तो? तुझ्या काही ध्यानात नाही आलं?"

"कमाल करतोस तू!.. वेड लागलंय का? मेलेला परत जिवंत होतो का?"

मनातील तर्क बाईपाशी कधी बोलून दाखवू नयेत. तिला समजणार नाहीत. जोवर ती तरुण आहे, तोवर न लाजता तिला मूर्खेला काय वाट्टेल त्या थापा मारा – ती तुमच्यावर विश्वास ठेवते. पण म्हातारीला तुमच्या मनात अचानक उमटलेला विचार नुसता बोलून दाखवा – क्षणात तुम्ही स्वतःच मूर्ख ठरता!

"तो निघून गेला?"

"गेला. जेवणानंतरची गोष्ट..."

"ग्रीन्का तर नव्हता तो? खरंच तो होता का?" आनिसिम विचारात पडला.

सबंध रात्र म्हाताऱ्याचा डोळ्याला डोळा लागला नाही. खूप विचार करत राहिला. सकाळच्या सुमाराला त्याने निर्णय केला: नाही, केवळ साम्य होते!

अशी एकमेकांसारखी दिसणारी माणसे काय कमी असतात! आणि त्याने स्वतः का कबूल केले नाही? कदाचित गोंधळ निर्माण करण्याची त्याची इच्छा नव्हती? अगदी लहानपणापासून तो विक्षिप्तच होता...

खरेच ग्रीन्का होता का तो?

एक आठवड्यानंतर म्हाताऱ्या जोडप्याला एक तार आली:

"क्वासोव आनिसिम स्तेपानोविच यांना,

तुमचा भाऊ ग्रीगोरी स्तेपानोविच बारा तारखेला मरण पावला. तुम्हाला कळवा असे म्हणाला होता. क्वासोव कुटुंबीय."

भाऊच होता. ग्रीन्का.

# लांडगे

रविवारी भल्या सकाळच्या प्रहरी इवान देग्त्यारेवकडे त्याचा सासरा, नाऊम क्रेचेतोव, आला. नाऊम अजून म्हातारा नव्हता, दमदार शेतकरी होता, धूर्त होता आणि वागण्यात गोड होता. इवानला सासरा आवडत नसे. नाऊम केवळ आपल्या मुलीपायी इवानला सहन करत होता.

"झोपलायस?" चटकन नाऊम बोलला. "वा! इवाना, अशा रीतीनं स्वर्गात जाईपर्यंत झोपून राहशील. रामराम."

"मला स्वर्गात जायची फारशी इच्छा नाही. मुळीच घाई नाही."

"अरेरे. बरं ऊठ... सर्पणाच्या लाकडांसाठी जाऊ या. माझ्या पथकाच्या प्रमुखाकडून घसरगाड्यांची जोडी मी मागून घेतलीय. अर्थात फुकटात नाही. पण असो. लाकडं तर पाहिजेत."

इवानने पडल्या पडल्या विचार केला... मग उठून तो कपडे करू लागला.

"कशासाठी तरुण माणसं शहरात जातात?" तो म्हणाला. "कारण ठरलेलं काम केलं – गेला भटकायला. माणसाला विश्रांती घ्यायला देतात. पण इथं – सालं दिवस नाही, रात्र नाही – नुसतं राबा. रविवारीसुद्धा निवांतपण नाही."

"सर्पणाशिवाय कसं होणार?" इवानची बायको न्यूरा हिने विचारले. "त्याला घोडा मिळवून दिलाय, तरी स्वारी नाराज!"

"मी ऐकलंय: शहरातसुद्धा काम करावं लागतं," सासऱ्याने शेरा मारला.

"होय, काम करावं लागतं. मी आनंदानं पाण्याच्या नळांसाठी

चर खणायला गेलो असतो. एकदा श्रमलात म्हणजे पुरे. नंतर कटकट नाही. घरबसल्या पाणी मिळतं आणि ऊबही मिळते."

"एका बाजूनं अर्थातच छान आहे – घरबसल्या पाणी ; पण दुसऱ्या बाजूनं संकट – तू कायम अंथरुणातच झोपून राहिला असतास. बरं, आता पुरे. चल."

"न्याहरी करणार?" बायकोने इवानला विचारले.

इवानने नकार दिला. त्याला इच्छा नव्हती.

"काल जास्त ढोसली वाटतं?" नाऊमने कुतूहलाने विचारले.

"होय, महाराज!"

"अस्सं... आणि तू म्हणतोस: नळाचं पाणी... चला!"

दिवस चांगला स्वच्छ सूर्यप्रकाशाचा होता. बर्फाची चकाकी डोळ्यांपुढे अंधार आणत होती. रानात विलक्षण शांतता होती, विचित्र स्तब्धता होती.

खूप दूर जाणे आवश्यक होते. सुमारे वीस वेर्स्ता. गावाजवळ झाडे तोडण्यास परवानगी नव्हती.

नाऊम पुढे गाडी हाकत होता आणि सतत चडफडत होता:

"काय शिंची कटकट!.. एका रानातून दुसऱ्या रानात – फक्त सर्पणासाठी!"

घसरगाडीत इवान पेंगत होता. घोड्याच्या तालबद्ध चालीमुळे त्याला गुंगी आली होती.

रानातून ते मोकळ्या जागेत आले, उघड्या घळीतून खाली उतरले व दुसऱ्या बाजूचा चढ चढू लागले. समोर टेकाडावर नव्याने रानाची निळी भिंत उभी होती.

टेकाडाच्या माथ्यावर ते जवळ जवळ पोहोचले होते... आणि इथे रस्त्यापासून जवळच त्यांना दिसले – पाच नग. रानातून बाहेर येऊन थांबले होते. लांडगे!

नाऊमने घोड्याचा लगाम ओढला आणि हलक्या आवाजात शिव्या घातल्या:

"तुझ्या आयला... भुऱ्या लाडक्यांनो. स्वतःचं काय प्रदर्शन मांडून उभे आहात?"

इवानचा घोडा तरुण, भित्रा होता. तो एकदम मागे सरला आणि

दांड्यावर त्याचे पाय पडले. घोड्याला वळवण्यासाठी इवानने लगामांना झटका दिला, पण घोडा फुरफुरला आणि अडखळला. दांड्यावरून पाय टाकणे त्याला जमेना.

लांडगे उतारावरून धावू लागले.

नाऊम एव्हाना मागे वळला होता आणि ओरडत होता:

"अरे, वाट कसली बघत थांबलास?"

इवानने घसरगाडीमधून खाली उडी मारली व घोड्याला ढकलत ढकलत परत दांड्यांमध्ये उभे केले. तो परत घसरगाडीत चढला. घोडा स्वतःच मागे वळला व धूम धावत सुटला.

नाऊम एव्हाना खूप दूर गेला होता.

"लुटताहेत!" बेंबीच्या देठापासून तो ओरडला – आणि त्याने घोड्यावर चाबूक ओढला.

घसरगाड्यांना गाठण्यासाठी भुऱ्या मातीच्या ढेकळांगत लांडगे उतारावरून गडगडत खाली आले.

"लुटताहेत!" नाऊम ओरडला.

"त्याला वेड लागलं काय?" इवानच्या मनात नकळत विचार आला. "कोण कुणाला लुटतोय?" तो घाबरला होता, पण विचित्र तऱ्हेने: भीतीमध्ये कुतूहल मिसळले होते आणि सासऱ्याचे त्याला हसू येत होते. मात्र लौकरच कुतूहल नाहीसे झाले. आणि आता हसूही मावळले होते. त्याच्या घसरगाडीमागे शंभर मीटर अंतरावरून लांडगे एका ओळीत धावत होते आणि आता घसरगाडीला गाठण्यासाठी त्यांनी वेग वाढवायला आरंभ केला होता. इवानने घसरगाडीचा पुढचा भाग घट्ट पकडला होता आणि मागे वळून लांडग्यांकडे तो पहात होता.

सर्वांत पुढे धावत होता धिप्पाड, रुंद छातीचा, पिवळट जबड्याचा लांडगा... त्याच्यात आणि घसरगाडीत आता अवघे पंधरा – वीस मीटरचे अंतर उरले होते. लांडग्याचे अल्सेशिअन कुत्र्याशी अजिबात साम्य नव्हते ही वस्तुस्थिती इवानच्या ध्यानात आली होती व तो चकित झाला होता. यापूर्वी त्याने लांडग्यांना एवढ्या जवळून कधी पाहिले नव्हते आणि त्याला वाटले होते की, लांडगे बरेचसे अल्सेशिअन कुत्र्याप्रमाणे दिसतात, फक्त जास्त धिप्पाड असतात. पण आता इवानला समजले होते की, लांडगा हा लांडगाच असतो, हिंस्र पशू असतो. अत्यंत पिसाळलेल्या कुत्र्याला शेवटच्या क्षणीसुद्धा भीती दाखवून, गोंजारून

अथवा माणसाच्या अनपेक्षित किंचाळीने थोपवता येते. पण ह्या पिवळट जबड्याच्या पशूला फक्त मृत्यूच थोपवू शकला असता. तो ओरडत नव्हता, भीत नव्हता... फक्त स्वत:च्या भक्ष्याचा पाठलाग करत होता. त्याचे गोल पिवळे डोळे अगदी साधेपणाने आणि थेटपणे पहात होते.

इवानने घसरगाडीत नजर फिरवली. शस्त्र म्हणून वापरण्यासारखी एकही वस्तू नव्हती – साधी छडीसुद्धा नव्हती. दोन्ही कुऱ्हाडी सासऱ्याच्या घसरगाडीत होत्या. फक्त गवताची एक पेंडी आणि हातातील चाबूक एवढ्याच गोष्टी इवानपाशी होत्या.

"लुटता... हेत!" नाऊम ओरडला.

आता मात्र इवानला खऱ्याखुऱ्या भीतीने झपाटले.

पुढचा लांडगा घसरगाडीच्या एका बाजूने धावू लागला होता. घोड्याला टप्प्यात आणण्याचा तो प्रयत्न करत होता. आता तो अवघ्या दोन मीटर अंतरावर होता... इवान उभा राहिला आणि घसरगाडीची कड एका हाताने धरून दुसऱ्या हाताने त्याने लांडग्यांच्या पुढाऱ्यावर चाबूक सपकावला. लांडग्यांच्या पुढाऱ्याला हे काहीसे अनपेक्षित होते. त्याने दात विचकले, किंचित बाजूला उडी मारली व तो अडखळला... बाकीचे मागून धावत येणारे त्याच्यावर आदळले. सगळ्या लांडग्यांनी पुढाऱ्याभोवती कोंडाळे केले. मोठा लांडगा फऱ्यावर बसला, एका लांडग्यावर त्याने सुळ्यांचा प्रहार केला, मग दुसऱ्यावर... मग परत पुढे झेपावला आणि सहजपणे त्याने घसरगाडीला गाठले. इवान दबा धरून बसला होता आणि चाबकाचा नवा प्रहार लांडग्यावर करण्यासाठी संधीची वाट पहात होता. पण ह्यावेळी लांडग्याने सुरक्षित अंतर राखले होते. एव्हाना दुसरा लांडगा कळपापासून वेगळा झाला होता आणि घसरगाडीच्या दुसऱ्या बाजूने धावू लागला होता. इवानने दात रगडले... कपाळाला आठ्या घातल्या... "संपलं. मृत्यू आला." त्याने समोर पाहिले.

"थां... ब!" तो मोठ्यांदा ओरडला. "बाप्पा!.. कुऱ्हाड दे!"

नाऊम घोड्याला चाबूक हाणत होता. त्याने मागे वळून पाहिले तेव्हा लांडगे त्याच्या जावयाला गाठत असल्याचे त्याला दिसले. तो चटकन मागे फिरला.

"जरा थांब, बाप्पा!.. कुऱ्हाड दे! आपण त्यांना पळवून लावू!.."

"लु.. ट.. ता.. हे.. त!"

"जरा थांब, आपण त्यांना पळवून लावू! जरा थांब... हरामखोरा!"

"त्यांच्यावर काहीतरी फेक!" नाऊम ओरडला.

पुढचा लांडगा घोड्याच्या पातळीपर्यंत आला होता आणि घोड्याच्या मानेवर झेपावण्याच्या क्षणाची वाट पहात होता. मागून धावणारे लांडगेही आता खूपच जवळ आले होते.. घसरगाडी क्षणभर जरी थांबली असती, तरी लांडगे आपोआप स्वतःच्या गतीने तिच्यावर येऊन धडकले असते व सर्व मामला संपला असता. इवानने त्यांच्यावर गवत फेकले. लांडग्यांनी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले.

"बाप्पा, कुत्रीच्च्या... वेग कमी कर, कुऱ्हाड टाक!"

नाऊमने मान मागे वळवली.

"वान्का!.. बघ, फेकतो!.."

"तू वेग कमी कर!"

"बघ, फेकतो!" नाऊमने रस्त्याच्या कडेला कुऱ्हाड फेकली.

इवानने अंतराचा अंदाज घेतला... घसरगाडीमधून त्याने खाली उडी मारली व कुऱ्हाड उचलली. त्याच्या उडीमुळे मागचे तीन लांडगे दचकले. ते बाजूला झाले व माणसावर हल्ला चढवण्याचे साहस करण्यापूर्वी क्षणभर थबकले. पण त्याचक्षणी पुढाऱ्याला पंजाखाली घट्ट बर्फ जाणवला आणि त्याने झेप मारली. घोड्याने बाजूच्या खळग्यात उडी घेतली. घसरगाडी उलटली, दांड्यांमध्ये गळपट्ट्याला आढा बसला व घोड्याच्या गळ्याला त्याचा फास बसला. दांड्यांमध्ये घोड्याने घशामधून घरघर आवाज काढला व बाहेर सुटायची धडपड केली. दुसऱ्या बाजूने धावणाऱ्या लांडग्याने घोड्याच्या पोटाखाली उडी मारली आणि पंजाच्या एकाच फटक्यात घोड्याचा कोथळा बाहेर काढला.

इतर तीन लांडगेही भक्ष्यावर तुटून पडले.

पुढच्याच क्षणी पाचही लांडगे अजूनही लाथा झाडणाऱ्या घोड्याच्या शरीराचे लचके तोडू लागले होते. गुरगुरत त्यांनी घोड्याची वाफाळणारी निळसर-लाल आतडी ओढून चकाकत्या बर्फावर टाकली. पहिल्यांदा घोड्यावर हल्ला चढवणाऱ्या लांडग्याने तोंड वळवून आपल्या पिवळ्याजर्द डोळ्यांनी थेट माणसाच्या नजरेला दोनदा नजर भिडवली.

ज्या भयानक वेगाने आणि अत्यंत साधेपणाने तो प्रसंग घडला

होता की, जणू काही स्वप्नात सर्व काही झाल्यासारखे भासत होते. हातात कुऱ्हाड धरलेला इवान त्या हावरट, घाईघाईच्या मेजवानीकडे चकित होऊन पहात उभा होता. लांडग्यांच्या पुढाऱ्याने इवानकडे परत एक कटाक्ष फेकला. त्या दिग्विजयी, मग्रूर कटाक्षाने इवानचा राग उफाळला. त्याने कुऱ्हाड उगारली आणि प्रचंड आरोळी ठोकत तो लांडग्यांवर चालून गेला. लांडगे अनिच्छेने थोडेसे दूर झाले व थांबून आपले रक्तमाखले पंजे चाखत राहिले. त्या कामात ते इतके रमून गेले होते की, जणू कुऱ्हाडधारी माणूस त्यांच्या गावीसुद्धा नव्हता. पण पुढारी लांडगा मात्र इवानवर एक डोळा ठेवून लक्ष देत होता. इवानने माहीत असलेल्या सर्व गलिच्छ शिव्या त्या लांडग्याला उद्देशून उच्चारल्या, कुऱ्हाड हवेत फिरवली आणि त्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. पुढाऱ्याने मुळीच हालचाल केली नाही. इवानही थबकला.

"तू जिंकलास," तो म्हणाला. "गिळा, लांडग्यानो!" आणि तो खेड्याच्या दिशेने चालू लागला. घोड्याच्या छिन्नभिन्न धडाकडे न बघण्याचा त्याने प्रयत्न केला. पण तरीही एकदा त्याची नजर तिकडे वळलीच. त्याचे काळीज करुणेने भरून आले आणि सासऱ्याबद्दल त्याच्या मनात राग भडकून उठला. रस्त्यावर त्याने चालण्याची गती वाढवली.

"जरा थांब! हलकट सापा, जरा थांब! मी दाखवतो तुला इंगा! खरं तर त्यांना पिटाळून लावू शकलो असतो आपण — आणि घोडा वाचला असता. नीच स्वार्थी!"

नाऊम वळणावर जावयाची वाट पहात होता. इवानला जिवंत आणि धडधाकट पाहताच त्याला मनापासून आनंद झाला.

"जिवंत आहेस? देवाची कृपा!" त्याचे मन त्याला खात होते.

"जिवंत आहे!" इवानने प्रतिसाद दिला. "आणि तूसुद्धा जिवंत?"

नाऊमला जावयाच्या आवाजात अशुभाची जाणीव झाली. सावधगिरी म्हणून तो घसरगाडीत चढला.

"ते काय करताहेत तिथं?"

"तुला नमस्कार धाडताहेत. नीच!"

"अरे, असं काय बोलतोस? माझ्यावर भुंकतोस?"

"मी तुला चोपून काढणार, नुसता भुंकणार नाही."

इवान घसरगाडीपाशी गेला. नाऊमने घोड्यावर चाबूक ओढला.

"थांब!" इवान ओरडला आणि घसरगाडीमागे धावला.

नाऊम घोड्यावर सपासप चाबूक ओढत होता... आता नवा पाठलाग सुरू झाला होता: एक माणूस दुसऱ्या माणसाचा पाठलाग करत होता.

"थांब म्हणतो ना तुला!" इवान ओरडला.

"वेडा!" नाऊम उलट ओरडला. "काय खूळ घेतलंस तू डोक्यात? टाळकं फिरलं काय? माझा काय दोष यात?"

"काय दोष? आपण त्यांना पिटाळलं असतं, पण तू विश्वासघात केलास."

"कसं पिटाळलं असतं? शुद्धीवर आहेस का तू?"

"माझा घात केलास, सापा! मी तुला अद्दल घडवीन! माझ्या तावडीतून सुटणार नाहीस. त्यापेक्षा थांबलास तर बरं होईल. तुला एकट्याला पिटलं, तर तेवढी अब्रू जाणार नाही. नाहीतर सगळ्या लोकांसमक्ष तुझी कणीक तिंबून काढीन. शिवाय कारण प्रत्येकाला सांगीन... त्यापेक्षा थांब!"

"आत्ता थांबतो... वाट बघ!" नाऊमने घोड्यावर चाबूक उडवला. "रिकामटेकडा सैतान... कुठून आमच्या मानगुटीवर येऊन बसला कुणास ठाऊक!"

"माझा भला सल्ला ऐक: थांब!" इवानला धाप लागली. "तुझ्याच हिताचं आहे: तुला चोपतो आणि कुणाला त्याबद्दल अक्षरानं सांगणार नाही."

"हलकट सैताना, आम्ही तुला कुटुंबात आपला म्हणून घेतला आणि तू माझ्यावर कुऱ्हाड उगारतोस! तुला काही शरम आहे किंवा नाही?"

"पहिल्यांदा बडवून काढतो आणि मग शरमेबद्दल बोलू. थांब!" इवान हळू धावत होता, एव्हाना तो खूप मागे पडला होता. शेवटी त्याने पाठलागाचा नाद सोडून दिला. तो चालू लागला.

"तुला शोधून काढीन. जातोस कुठं?" सासऱ्याच्या पाठी तो ओरडला.

इवानला घरात कुणीही आढळले नाही: दारावर कुलूप लटकत होते. कुलूप काढून तो आत गेला. त्याने कपाट धुंडाळले... काल अर्धवट प्यायलेली वोदकाची बाटली त्याला सापडली. ग्लासभर वोदका तो प्यायला आणि सासऱ्याकडे गेला.

सासऱ्याच्या घराच्या आवारात गाडीपासून सोडवलेला घोडा उभा होता.

"म्हणजे घरात आहे," इवान खुषीत उद्गारला.

त्याने दाराला धक्का मारला – दाराला कडी लावलेली नव्हती. इवानची अपेक्षा होती की, दाराला कडी असणार. इवान घरात गेला... तेथे त्याची वाट पहात होते: घरात सासरा, इवानची बायको आणि एक पोलीस एवढी माणसे बसलेली होती. पोलीसाने स्मित केले.

"काय रे, इवान?"

"अस्सं... एव्हाना धावलास?" सासऱ्याकडे पहात इवानने विचारले.

"धावलो, धावलो. आणि तू ढोसलीस एवढ्यात?"

"जीभ जरा सैल सुटावी म्हणून थोडी घेतली." इवान स्टूलावर बसला.

"काय रे इवान असं? डोकं फिरलं का?" न्यूरा उठली. "काय झालंय तुला?"

"तुझ्या बापाला धडा शिकवायची इच्छा होती... माणसाला कसं चोपलं पाहिजे!"

"सोडून दे हा विचार, इवान," पोलीस म्हणाला. "वाईट प्रसंग घडला हे खरं... दोघंही घाबरलात... असं घडेल अशी कुणाची अपेक्षा होती? निसर्गाची करणी!"

"आम्ही सहज त्यांच्यावर मात केली असती. नंतर मी त्यांच्याबरोबर एकटा होतो..."

"मी तुला कुऱ्हाड टाकली नाही? तू मागितली – मी टाकली. आणखी मी काय करू शकणार होतो?"

"अगदी छोटी गोष्ट: माणसासारखं वागायला पाहिजे होतं. पण तू स्वार्थी. तुला मी धडा शिकवणारच!"

"वा रे मास्तर! शेंबडचा... कंगाल भिकाऱ्यासारखा घरात आला, जिथं सगळं आयतं तयार होतं आणि आता मला धमक्या घालतोय! वर नाक वाकडं करतोय: म्हणे घरात नळाचं पाणी नाही!"

"हे बघ नाऊम, त्याचा इथं संबंध नाही," पोलीस म्हणाला. "इथं पाण्याच्या नळाचा प्रश्न कुठं येतो?"

"खेड्यात वाईट!.. शहरात त्यापेक्षा चांगलं," नाऊम पुढे

बोलत राहिला. "इथं आला कशाला बोंबलायला? स्वत:ची नाराजी दाखवायला? लोकांना चिथावायला?"

"कुत्तरडा साला!" इवान चकित होऊन उद्गारला आणि उठला.

पोलीससुद्धा उठला.

"पुरे करा दोघंही! चल, इवान..."

"असल्या चिथावणीखोरांना कुठं पाठवतात माहीत आहे?" नाऊम माघार घ्यायला तयार नव्हता.

"माहीत आहे!" इवान उत्तरला. "बर्फातल्या भोकात, डोकं प्रथम..." आणि त्याने सासऱ्याच्या दिशेने एक पाऊल टाकले.

पोलीसाने इवानचा दंड पकडला आणि त्याला घराबाहेर नेले. रस्त्यावर थांबून त्यांनी सिगारेटी पेटवल्या.

"अस्सल बांडगूळ आहे की नाही?" इवानचे आश्चर्य अजूनही कमी झाले नव्हते. "आणि आता मला उलथायला बघतोय!"

"सोडून दे रे त्याला!"

"नाही. मी त्याला चोपणारच."

"मग बसशील कोठडीत! नालायकापायी!"

"तू मला कुठं घेऊन चाललास?"

"चल, आजची रात्र आमच्याकडं घालव... डोकं थंड होईल. नाही तर स्वत:चा घात करून घेशील. उगीच लफड्यात गुंतू नको."

"नाही, पण... असा कसा हा माणूस?"

"नाही इवान, असं चालत नाही. मुठींनी काहीही सिद्ध करणार नाहीस."

खेड्यातील पोलीस ठाण्याकडे दोघे रस्त्यावरून चालत निघाले.

"तिथं नाही जमलं?" अचानक पोलीसाने विचारले.

"त्याला गाठणं जमलं नाही!" दु:खाने इवान म्हणाला. "नाही जमलं गाठायला!"

"आता काय करणार... आता फार उशीर झाला."

"घोड्याबद्दल वाईट वाटतं!"

"हं..."

दोघे गप्प राहिले. खूप वेळ मुकाट चालत राहिले.

"हे बघ, तू सोड मला." इवान थांबला. "रविवारचा मी तिथं कशाला बसू? मी त्याला हात लावणार नाही."



7-131

"नाही, चलच तू! चल! नाही तर नंतर कशालाच अंत राहणार नाही... तुझ्या हितासाठी बोलतोय. चल, बुद्धिबळ खेळू... खेळतोस ना बुद्धिबळ?"

इवानने सिगारेटचे थोटुक बर्फावर थुंकले आणि दुसऱ्या सिगारेट-साठी खिसे चाचपले.

"खेळतो."

# चौखूर धावले घोडे मैदानात

चौखूर धावले घोडे मैदानात,
तुडवली टापांखाली सारी संध्याकाळ.
ते काय करताहेत?
कुणाचं नशीब
मैदानात तुडवताहेत?
माझं तर नव्हे?
मैदान शांत झालंय.
घोडे दमलेत...
शांत झालंय मैदान –
कितीही साद घाला – तरी येत नाहीत.
झोपलेल्या सरोवरावर, तसबिरीप्रमाणं –
संध्यारंगाची महिरप बसलीय.

मीन्का मॉस्कोत अभिनयाचा अभ्यास करत होता.

उन्हाळयाच्या आरंभाचे दिवस. परीक्षा नुकत्याच संपल्या होत्या.

दिवसभरातील घडामोडींची मनाशी उजळणी करत मीन्का वसतीगृहाकडे परत आला. त्याने परीक्षा नुसती चांगली नव्हे, तर उत्तम दिली होती. त्याला मनात हलके वाटत होते. उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने तो पहात होता. स्वतःच्या ठायी प्रचंड सामर्थ्य आल्याचे त्याला भासत होते.

"उन्हाळयात कला बिषयावरची वीस पुस्तकं वाचतो," त्याने मनाशी निश्चय केला. "अभिजात साहित्याचा फडशा पाडतो, स्वतः-साठी म्हणून सामुदायिक शेतजीवनावर एक नाटक लिहितो, मग पाहू काय होतं ते!"

वसतीगृहावर त्याचे वडील, कोन्द्रात ल्यूतायेव, त्याची वाट पहात होते.

कोन्द्रात विश्रांतीसाठी एका आरोग्य-स्थळी गेले होते आणि परतीच्या वाटेवर मुलाला भेटण्यासाठी थांबले होते. आत्ता ते मुलाच्या पलंगावर बसून होते – भव्य शरीर, उन्हात रापलेली कांती, लोकरी सुताचा सूट. ते वाट पहात थांबले होते. काहीच उद्योग नव्हता म्हणून एक सचित्र परदेशी नियतकालिक चाळत होते. तंबाखूमुळे पिवळे पडलेले

जाडजूड बोट ओठाला लावून ओले करत होते आणि गुळगुळीत पातळ पाने उलटत होते. जेव्हा नग्न स्त्रियांची चित्रे आढळली, तेव्हा ते अधिक लक्षपूर्वक निरखून पाहू लागले. मग त्यांनी आपले प्रचंड डोके वर उचलले आणि शेजारच्या पलंगावर निजून वाचणाऱ्या मीन्काच्या साथीदाराकडे पाहिले. खूप वेळपर्यंत त्यांनी रोखून पाहिले. कोन्द्रात यांचे डोळे विलक्षण निळे होते—जणू ते त्यांच्या चेहऱ्यावरचे नव्हते असे भासायचे. त्यांना काहीतरी विचारायची इच्छा झाली होती, पण त्यांनी विचारले नाही. परत बोट ओले करून पुढची पाने उलटत राहिले.

कोन्द्रात ल्यूतायेव गेली सात वर्षे अल्ताय स्तेप प्रदेशातील एका मोठ्या सामुदायिक शेताचे अध्यक्ष होते. शेताचा कारभार ते उत्तम चालवत होते, त्यांच्या कामाची वाहवा होत होती आणि कोन्द्रातना मनातून त्या गोष्टीचा अभिमान वाटायचा. गेल्या वर्षी, मीन्काने दहावी-पर्यंतचे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, अगदी ध्यानीमनी नसताना अचानकपणे अभिनयाचा अभ्यास करण्याचा स्वतःचा मनोदय जाहीर केला, तेव्हा बाप-लेकाचे कडाक्याचे भांडण झाले होते. मुलाचे मन जाणून घेण्याचा कोन्द्रातनी प्रामाणिक प्रयत्न केला होता, पण तरीही त्यांना काही उलगडा झाला नव्हता. "तू मला विचारलंस-आँ!" तेव्हा कोन्द्रात गरजले होते आणि चहाच्या किटलीएवढ्या मोठ्या आकाराच्या मुठीने त्यांनी स्वतःच्या छातीवर प्रहार केले होते. "तू मला विचार: असे शेकड्यांनी नट पाहिलेत मी! युद्धआघाडीवर दर आठवड्याला आमच्याकडं यायचे. सगळे दारुडे! बायकासुद्धा. आणि वटवटे!" मीन्काने स्वतःचा हट्ट कायम ठेवला आणि त्यांनी एकमेकांचा निरोप घेतला होता. बापाला पाहताच मीन्का चकित झाला.

कोन्द्रात कसनुसे हसले आणि त्यांनी मासिक बाजूला ठेवले.

त्यांनी एकमेकांशी हस्तांदोलन केले. दोघांनाही काहीसे अवघडल्या-सारखे झाले होते.

"तुझं इथं कसं काय चाललंय?" कोन्द्रातनी विचारले.

"ठीक आहे."

काही वेळ दोघेही गप्प बसले.

"तुमच्या इथं प्यायला हरकत नाही ना?" दुसऱ्या विद्यार्थ्याकडे कटाक्ष फेकत कोन्द्रातनी विचारले.

त्याने स्वतःचा अर्थ लावला :

"आत्ता कुणाकडून तरी उसने पैसे घेऊ... उद्या आमचे पैसे मिळायचा दिवस आहे."

कोन्द्रात शरमेने लाल झाले.

"तुमचं काय डोकं फिरलंय! माझ्या विचारण्याचा तो अर्थ नव्हता! मला विचारायचंय की, इथं जर आपण थोडीशी दारू प्यायलो, तर त्याबद्दल तुमच्यावर काही शेकणार नाही ना?"

"तशी परवानगी नाही..." मीन्का म्हणाला आणि त्याने स्मित केले. बापाला असे गोंधळलेल्या अवस्थेत आणि नव्या सुटात पहायला मीन्काला विचित्र वाटत होते. "फक्त अपवादात्मक प्रसंगी चालतं..."

"चला तर!" कोन्द्रात उठले. "नंतर सांगा, अपवादात्मक प्रसंग होता म्हणून!"

ते दुकानात गेले.

कोन्द्रात यांच्या अंगी कसलातरी संचार झाला होता. त्यांनी भराभरा खरेदी सुरू केली: महागडे कबाब, कन्याक, डबाबंद मासे... जवळ जवळ चाळीस रूबल खर्चले. मीन्काने त्यांना आवरायचा प्रयत्न केला. त्यावर कोन्द्रात चिडून म्हणाले: "तू गप्प रहा, तुझा संबंध नाही!"

दुकानातून बाहेर पडल्यानंतर त्यांच्यात संभाषण सुरू झाले. किंचित अवघडलेपण नाहीसे झाले होते. कोन्द्रातना स्वतःचा नेहमीचा वडीलधारा स्वर गवसला.

"जेव्हा प्रसिद्ध नट होशील तेव्हा विसरू नको... तरीही विसरशी-लच ना?"

"काय हा मूर्खपणा! कुणाला विसरेन?"

"जाऊं दे... तू पहिला नव्हेस आणि अखेरचाही नव्हेस. प्रथम नांव मिळवणं आवश्यक आहे... काय?"

"अर्थात!"

चौघेजण प्यायले – मीन्काचा आणखी एक मित्र त्यांच्यात सामील झाला होता.

कोन्द्रात लालबुंद बनले. लोकरी सुताचा कोट त्यांनी अंगातून काढला आणि एकदम त्यांचे खांदे प्रचंड रुंद दिसू लागले. तलम सदऱ्या-खाली त्यांचे पिळदार शरीर उठून दिसत होते.

“अवघड जातंय?” त्यांनी मुलांना विचारले.

“विशेष नाही...”

“मला दिसतंय, विशेष काय नाही... इच्छा होईल तेव्हा प्यायला-सुद्धा परवानगी नाही. असं जगणं फार कठीण नाही वाटत? कधी पोरीबरोबर भटकायला जावंसं वाटेल, पण इथं–पुस्तकं वाचत बसलं पाहिजे. काय?”

मुले हसली. कन्याक प्यायला मिळाल्यामुळे ती आता रंगात आली होती. बाप उघडपणे समझोत्याला आला ह्याचा मीन्काला आनंद झाला होता. कदाचित विश्रामस्थळी कुणीतरी बापाची समजूत पटवली असावी–सगळेच नट काही दारुडे नसतात; आणि अभिनय म्हणजे अगदीच वेळ वाया घालवणे नव्हे.

“मला वाटतं, हे बरोबर आहे!” कोन्द्रात गडगडाटी आवाजात म्हणाले. “जर शिक्षण घ्यायला आलात, तर शिका. पोरी तुमच्यापासून कुठंही पळून जात नाहीत. आणि एवढ्या लहान वयात दारूची काही गरज नाही. अजून शेंबूड पुसता येत नाही... गेल्या वर्षी मिन्काचा मला राग आला होता... पण आता माझा हट्ट मी मागे घेतो मीन्का. शिका. आणि समजा, शिक्षण संपल्यावर जर तुम्हाला कामं मिळाली नाहीत, तर माझ्यापाशी या. आमच्या क्लबात काम करा. मीन्काला ठाऊक आहे माझा क्लब–एकदम एक नंबरी. इथं मॉस्कोत टाचा घासण्यापेक्षा...”

“बाबा...”

“भलतंच बोललो का? ठीक आहे, ठीक आहे... तुम्ही शिकलेली मंडळी, मी विसरलोच. आमचं शेत किती छान आहे म्हणून सांगू!.. मीन्काला ठाऊक आहे...”

नंतर कोन्द्रात आणि मीन्का प्रदर्शनाला गेले... वेदेन्खा* या ठिकाणी.

मीन्काला आपल्या परीक्षेची आठवण झाली व त्याला दुप्पट छान वाटू लागले.

“तुझंच उदाहरण घेऊ, तू एक माणूस आहेस,” किंचित लटपटत्या

---

* वेदेन्खा–सोविएत संघाच्या आर्थिक यशःसिद्धीचे कायम प्रदर्शन. मॉस्कोत येणाऱ्या प्रवाशांचे एक आकर्षणस्थळ–अनु.

पावलांनी चालत तो म्हणाला. "आणि मला सांगण्यात आलं की, मी तुझा अभिनय करायचा. आता तू म्हणजे मी नव्हे – खरं ना? समजलं?"

"समजलं." कोन्द्रात ठाम पावलांनी चालत होते. त्यांचा झोक जात नव्हता. "हे मूर्खालाही समजण्यासारखं आहे."

"तर मग मला तुझा अभ्यास केला पाहिजे: तुझा स्वभाव, तुझ्या तऱ्हा, तुझी चाल... आमच्या भाषेत म्हणजे तुझ्या सर्व लकबी."

"त्या तुला माहीत नाहीत?"

"मी उदाहरणाचं बोलतोय."

"ठीक आहे. माझ्यासारखं चालून दाखव बघू," कोन्द्रातनाही आता कुतूहलं वाटू लागले होते.

"हात्तिच्या!" मीन्का उद्गारला. "अगदीच सोप्पं!" तो थोडासा पुढे गेला आणि बापाच्या चालीत चालू लागला – पाटलोणीच्या खिशांमध्ये हात खुपसून, किंचित डोलत, संथपणे, जमिनीवर ठाम पावले टाकत.

कोन्द्रातनी गडगडाटी हास्य केले.

"अगदी हुबेहूब!" ते मोठ्यांदा ओरडले.

आजूबाजूची माणसे त्यांच्याकडे पाहू लागली.

"माझ्यासारखं हुबेहूब चालतो ना!" मीन्काकडे बोट दाखवत ते लोकांना उद्देशून म्हणाले. "मी कसं चालतो हे मला नक्कल करून दाखवतोय."

मीन्का शरमला.

"शाब्बास!" कोन्द्रातनी गंभीरपणे मुलाची वाखाणणी केली. "शीक – यशस्वी होशील."

"ह्यात विशेष काही नाही!.. हे महत्त्वाचं नव्हे." मीन्का आनंदला होता "मुख्य आहे तुझ्या स्वभावाचं, मनाचं दर्शन घडवणं... आत्ता जे काही मी करत होतो त्याला माकडचेष्टा म्हणतात. ह्याबद्दल आमची कानउघाडणी करतात."

"का म्हणून?"

"कारण ही कला नव्हे. कला त्यात आहे... समज, मी तुझा अभिनय करतोय, काय?"

"बरं, मग?"

"तर त्यातून असा माणूस शेवटी उभा झाला पाहिजे ज्यात तू

आणि मी असे दोघेही आहोत. समजलं? तेव्हा मी कलाकार ठरतो..."

"आता एका घोड्याला बघायला जाऊ," अचानक कोन्द्रात गंभीरपणे म्हणाले. "प्रदर्शनातला घोडा नमुनेदार ठरलाय!" संतापाने ते थुंकले आणि त्यांनी निषेधदर्शक मान हलवली. "आपला बूयान आठवतो तुला?"

"आठवतो."

"अलिकडंच एक कमिशन आलं होतं बघायला – मी बूयानला प्रदर्शनात पाठवणार होतो. पण त्या बांडगूळांनी त्याला अपात्र ठरवलं. आज वेदेन्खाला आलो तर त्यांचा नमुनेदार घोडा नजरेला पडला... मला अगदी अक्षरश: मळमळलं. च्यायला, कसला हा घोडा निवडलाय त्यांनी! माझ्या बूयानसमोर हा अगदी ससा ठरेल! माझ्या मुठीच्या एका दणक्यात त्याला गुडघ्यांवर बसायला लावीन – नमुनेदार म्हणे!"

मीन्काला बूयान आठवला – मानी काळाभोर उमदा घोडा. मीन्काच्या काळजात एक सुखद बारीक कळ उमटली. वाऱ्याबरोबर आयाळ फडकवत स्तेपमध्ये दूरवर दौडत जाणाऱ्या त्या घोड्याचे अर्ध-रानटी सौंदर्य मीन्काच्या नजरेसमोर उभे राहिले... पश्चिम क्षितिजा-वरची लाली – गवताची गंज पेटल्याप्रमाणे भडकलेले अर्धे आकाश आणि गोल गोल वळसे घेणारे काळे ठिपके... घोड्यांच्या टापांचे आवाज अजिबात ऐकू येत नाहीत – पूर्ण स्तब्धता.

"अर्थात मला बूयान आठवतो," मीन्का हळू आवाजात म्हणाला. "फार छान घोडा."

कोन्द्रात खूप वेळ गप्प राहिले. आपल्या निळ्या डोळ्यांनी ते रोखून समोर पहात होते आणि त्यांच्या नजरेतून संताप ओसंडत होता.

"अलिकडं खुद्द मी त्याची सरबराई करत होतो," ते म्हणाले. "त्याचा तबेला एखाद्या नव्या नवरीच्या खोलीप्रमाणं सजवलाय. पोटच्या पोरासारखा त्याचा अभ्यास केला. एक मैलावर खिंकाळला तरी मला ऐकू येतं. पण त्यांनी त्याला नालायक ठरवलं!.." कोन्द्रात एकदम बोलायचे थांबले. त्यांना फार दु:ख झाले होते.

मीन्कासुद्धा चूप झाला. कलेबद्दल बोलण्याची त्याची इच्छा नाहीशी झाली होती. कलावंताच्या गौरवशाली, सुंदर कारकीर्दीबद्दल विचार करण्याची त्याची इच्छा नाहीशी झाली होती... घरी जाण्याची ओढ लागली. स्तेपवरचा दवण्याच्या वासाने भरलेला वारा छाती भरून

प्यावासा वाटत होता. उबदार टेकाडावर बसून शांतपणे विचार करावासा वाटत होता. परत डोळ्यांसमोर चित्र उभे राहिले: स्तेपमधून घोड्यांचा कळप दौडत होता आणि त्या कळपाच्या अग्रभागी मानेला डौलदार बाक देऊन बूयान वायुगतीने धावत होता. पण स्तेपमध्ये आश्चर्यकारक स्तब्धता होती.

"होय," तो म्हणाला.

"आसपासच्या सगळ्या भागातली माणसं त्याला पहायला येत होती..."

"ठीक आहे, आता काय बोलून उपयोग."

नमुनेदार घोडा त्याच्या नमुनेदार तबेल्यात सखल कठड्यामागे उभा होता. अधूनमधून आपला फिकट जांभळा डोळा लोकांकडे फिरवत होता, सावधपणे छोट्या डोक्याला झटका देत होता आणि कान खाली पाडत होता.

बाप-लेक घोड्यापाशी थांबले.

"हा?"

"हूं!" ज्याच्या दुष्ट वागण्याचा चांगला परिचय घडला आहे अशा वाईट माणसाकडे पहावे, तशा नजरेने कोन्द्रातनी घोड्याकडे पाहिले. "तोच हा!"

"ओर्लोव पैदाशीचा."

"वशील्यानं उभा केलाय."

"सुंदर आहे."

"शुंदल आहे" कोन्द्रातनी मुलाची नक्कल केली. "तू लोकांच्या चालण्याचा अभ्यास केलेलाच जास्त बरं, जर तुला ह्यातलं काही समजत नसेल!"

"असं काय बोलतोस?" मीन्काला अपमान वाटला.

"त्याच्यावर स्वारी करून पन्नास वेर्स्ता दौडून ये – मग ह्या सौंदर्यातलं काय शिल्लक उरेल ते बघ."

"पण तो सुंदर नाही असं म्हणता येणार नाही!"

"ह्या सौंदर्यापायीच तो इथं आला. आमच्याकडं नेहमी असंच... अर्थात ज्याला घोड्यातलं ठो समजत नाही त्यानं खुशाल कौतुक करावं.

पण तू जरा नीट पहा!" कोन्द्रातनी कठड्यावरून पाय टाकून तो ओलांडला व घोड्यापाशी ते चालत गेले. घोडा एकदम बिथरला आणि त्याने पाय आपटले. "तर्रर्र, थांब!" कोन्द्रात ओरडले. "इकडं बघ – ही काय छाती? ही चिमणीची टांग – छाती नव्हे! वीस वेर्स्तात ह्याला धाप लागेल..."

तेवढ्यात निळ्या सैल डगल्यातील कर्मचारी तेथे आला.

"अहो, तुम्ही तिथं कशाला गेलात?"

"तुमच्या घोड्याचं कौतुक करतोय."

"इथूनही पाहता येतं. बाहेर पडा."

"पण जवळून पहायची माझी इच्छा असली तर?"

"मी तुम्हाला स्पष्ट शब्दात सांगितलं: बाहेर पडा. तिथं जायला मनाई आहे."

कोन्द्रातनी आपल्या मुलाकडे एक सूचक कटाक्ष टाकला आणि ते कठड्याबाहेर आले.

"समजलं? फक्त लांबूनच पहायचं. कारण जाणकार माणसं पटकन बिंग फोडतील. चतुर काम!"

कर्मचाऱ्याला ह्या शब्दांचा उलगडा झाला नाही.

कोन्द्रात एव्हाना तेथून जायला निघाले होते, पण अचानक कर्म-चाऱ्यापाशी माघारी वळले आणि अत्यंत गंभीरपणे त्यांनी विचारले:

"एक प्रश्न विचारू?"

"जरूर." कर्मचाऱ्याने ऐटीत मान कलती केली.

"हा घोडा – कोण आहे: नर अथवा मादी?"

कर्मचाऱ्याने स्वतःचे पोट हातांनी गच्च आवळून धरले... तो मनापासून खो खो हसला. बहुधा गेल्या कित्येक वर्षात तसा तो हसला नसावा.

कोन्द्रात त्याच्याकडे लक्षपूर्वक, कष्टी नजरेने पहात थांबून राहिले.

"अस्सं, म्हणून तू... हा-हा-हा!... अग आई ग! म्हणून तू तिथं गेला होतास? समजून घ्यायला? हा-हा-हा!.."

"पोट दुखणार नाही याची काळजी घे!" कोन्द्रात म्हणाले.

कर्मचाऱ्याने डोळे पुसले.

"नर, नरच आहे हा, भल्या माणसा!"

"नक्की?"

“काय ‘नक्की’?”

“खरंच घोडा आहे?”

“अर्थात घोडा आहे.”

“म्हणजे मी – सुंदर वासिलिसा!”

“इथं वासिलिसाचा काय संबंध?”

“संबंध असायचं कारण तो घोडा नाही. हा गाढव आहे.”

कर्मचारी रागावला.

“बहुधा काल बरीच ढोसली वाटतं? जा, झिंगेवर उतारा घे.”

“तूच जा उतारा घ्यायला! नाही तर – स्वतःच्या घोड्यावर बसून जा. फक्त गुत्त्यापर्यंत जायलाच तो उपयोगी आहे.”

कर्मचाऱ्याला हा शेरा अत्यंत अपमानकारक वाटला.

“चालते व्हा इथून! जा, जा... नाहीतर आता पोलीसाला बोलवीन.” त्याने कोन्द्रातांच्या हाताला धक्का दिला.

कोन्द्रात तरातरा चालत तबेल्यापासून दूर गेले. त्यांच्या पाठोपाठ मीन्का गेला.

“बघितलास घोडा?” कोन्द्रातनी सिगारेट पेटवली आणि तिचे भराभरा खोल झुरके मारले. “परत गेलो म्हणजे त्या कमिशनच्या लोकांना भेटणार आहे... दोन शब्द सुनावतो माझ्या मनातले. तू इथून ह्या घोड्याचा सगळा तपशील लिहून पाठव. मग त्या कमिशनच्या मेंबरांची चांगली हजेरी घेतो मी... सैतान साले!”

मीन्कानेही सिगारेट पेटवली.

“आता कुठं?”

“स्टेशनावर. नऊ पंधराला आगगाडी आहे.”

मीन्काच्या काळजात कळ उमटली. बापाबरोबर किती छान वाटते, किती आनंदी आणि मजेदार वाटते, ह्याची आत्ता त्याला खरी जाणीव झाली.

“तुमचं तिथं कसं चाललंय?” त्याने विचारले.

“काही विशेष नाही. धडधाकट जगतो आहोत. आईला तुझी फार आठवण येते. एकदा रात्रीची एकदम ताडकन उठली – खिडकीमधून कुणीतरी हाक मारतंय असा तिला भास झाला. मी बाहेर जाऊन पाहिलं – चिटपाखरू नव्हतं! तुझा ध्यास घेतलाय असं दिसतं!”

मीन्काने कपाळाला आठ्या घातल्या.

"कशाला असं वागते ती?"

"आम्ही आता तरणे राहिलो नाही... 'कश्याला' म्हणे!"

"खेड्यात कसं आहे?"

"खेड्यात काय असायचं?"

"काहीही बदललं नाही?"

"सगळं तसंच आहे. यंदा पेरणी लौकर केली. खारट दलदली-पलिकडचं ते कुरण आठवतं? तिथं नेहमी नाचणीची पेरणी करायचे..."

"हूं..."

"ती सगळी जमीन फळबागेखाली आणली. काय निष्पन्न होईल माहीत नाही. म्हातारी माणसं म्हणताहेत, निष्कारण खटाटोप केला."

आणखी काय विचारावे ते मीन्काला सुचेना. "संध्याकाळचे अॅकॉर्डियन वाजवत फिरतात का?" असे विचारणे तर शक्य नव्हते. बाष्कळपणा वाटला असता. आणि विचारण्यात अर्थ नव्हता – अर्थात फिरत होते. किती दूर सगळे! वडील तिथे जाणार. तिथे आई, मुले-मित्र..."

"आणखी तीन दिवसांनी घरी पोचशील."

"तू उन्हाळ्याच्या सुटीत येणार नाहीस?"

"माहीत नाही. इथं एका अभ्यास-वर्तुळाचा मी मुख्य आहे... माहीत नाही, कदाचित येईन."

"पुढच्या वर्षी तो इथं असेल," कोन्द्रात ठामपणे म्हणाले. "मी माझं म्हणणं खरं करीन."

"कोण?"

"बूयान. त्याला आगगाडीमधून कसं पाठवायचा ह्याबद्दलची योजना मी एव्हाना तयार केलीय. ह्यावेळी त्यांनी मोठा घास घेतला – पण मी त्यांनाच नालायक ठरवीन."

"आता आपल्याइथं छान असेल नाही? रात्रीचं खूप छान असेल ना?.."

"घरची आठवण येते?"

"छे: छे:, तसं नाही! इथंही छान आहे. कधी गोर्की पार्कमध्ये जातो – खूप मजा येते!"

"मॉस्को..." कोन्द्रात विचारमग्न होत म्हणाले. "काही झालं तरी राजधानीचं शहर. आपण आता कसं जायचं?"

"मेत्रोमधून जाऊ शकतो, ट्रॉलीबसमधून जाऊ शकतो. अर्थात

मेत्रोमधून जाणं जास्त चांगलं – एकदा गाडी बदलावी लागेल, बास्स!"

कोन्द्रातनी मुलाकडे पाहिले.

"तुला इथले सगळे रस्ते माहीत झालेत?"

"सगळे नाहीत, पण बरेच..."

"मॉस्को..." कोन्द्रात परत म्हणाले. "युद्धाच्या काळात मी इथं आलो होतो. अर्थात तेव्हा शहर आजच्यासारखं दिसत नव्हतं."

स्टेशनवर मीन्काला जवळ जवळ वेदनेसारख्या जाणीवेने जबरदस्त झपाटले. अचानक दु:खाचे दडपण वाटू लागले.

वडिलांनी लॉकरमधून सामानाच्या पेटचा काढून घेतल्या. आगगाडीच्या डब्याकडे ते दोघे निघाले. हॉलमधून फलाटापर्यंत मुकाटचाने चालत राहिले. डब्यात चढले. वरच्या फळीवर सामान ठेवण्यात वडिलांनी खूप काळ घेतला. नंतर मुलासमोर टेबलापाशी ते बसले. परत गप्प बसून खिडकीबाहेर पाहू लागले.

फलाटावरून लोकांची वर्दळ चालू होती. काही लोक घाईघाईने येत होते, तर मुरब्बी प्रवासी सावकाशपणे येत होते.

"आता ते सगळे आगगाडीतून जातील," मीन्काच्या मनात विचार आला.

कूपेमध्ये रंगाचा अथवा चामडचाचा ताजा वास सुटला होता.

नंतर रेडिओवरून घोषणा करण्यात आली की, सोडायला आलेल्या लोकांनी आगगाडीच्या डब्यांमधून आता बाहेर पडावे आणि जे प्रवास करणारे लोक होते त्यांना तिकीटे द्यायला विसरू नये.

मीन्का डब्यामधून बाहेर पडला व वडील बसले होते त्या खिडकीपाशी येऊन उभा राहिला.

त्यांनी एकमेकांकडे पाहिले. कोन्द्रात लक्षपूर्वक आणि गंभीरपणे पहात होते.

"असं काय पाहतात? जणू अखेरची वेळ असल्याप्रमाणं!" मीन्काच्या मनात आले.

आगगाडी अजून हलली नव्हती.

अखेरीस हलली.

मीन्का खिडकीलगत खूप अंतर चालत गेला. तो वडिलांकडे टक लावून पहात होता. वडीलसुद्धा त्याच्याकडेच पहात होते. छोटचा टेबलावर किंचित झुकून अगदी स्तब्धपणे ते बसले होते. त्यांचे केस

पांढरे होते, मुद्रा दुःखी होती आणि अजूनही तशाच कठोर, लक्षपूर्वक नजरेने ते पहात होते.

मीन्का थांबला. अखेरच्या वेळी त्याला दिसले की, त्याचे वडील अर्धवट उठले होते आणि खिडकीच्या काचेला त्यांनी चेहरा चिकटवला होता... बस्स. इंजिनाने एक लांब शिटी वाजवली आणि आगगाडी हळूहळू वेग घेऊ लागली.

मीन्का घरी गेला.

स्वतःच्या वसतीगृहापर्यंत तो चालत गेला. त्याचे मन शून्यवत बनले होते. खूप दमावे आणि खोलीवर पोहोचताच पटकन झोप लागावी म्हणून तो मुद्दाम गल्लीबोळांमधून वळणे घेत लांबच्या वाटेने चालत होता.

खोलीत कुणीही नव्हते. टेबलावर अजूनही वेगवेगळे खाद्यपदार्थ आणि रिकामी न झालेली महागडी कन्याकची बाटली उभी होती.

मीन्काने बिछाना उलगडला... कपडे न उतरवता खूप वेळ तसाच बसून राहिला. मग त्याने कपडे काढले व तो आडवा झाला.

चंद्र उगवला. खोलीत चांदण्याचा उजेड पसरला. वडील ज्या आगगाडीतून गेले होते ती आगगाडी आत्ता स्तेपमधून कशी भणाणत जात असेल, ह्याचे चित्र मीन्काने कल्पनेने उभे केले... वडील बहुधा खिडकीबाहेर पहात असतील. आणि चांदणी रात्र स्तेपभूमीवर पांढऱ्या चादरी अंथरत चाललीय...

मीन्का पोटावर पालथा झाला आणि त्याने उशीमध्ये डोके खुपसले. परत त्याच्या नजरेसमोर दृश्य आले: स्तेप आणि त्यावरून दौडत जाणारा घोड्यांचा कळप.

ह्याबरोबर मीन्काला झोप लागली. शेजारच्या खोलीतील रेकॉर्ड प्लेयरचा आवाज त्याला ऐकू येत होता. त्याला स्वप्न पडले की, प्रदर्शनातील तो कर्मचारी त्याच्यापाशी उभा राहून खो खो हसत होता – खूप मोठ्यांदा आणि मूर्खासारखा.

# अपघाती गोळीबार

पाय लूळा होता. जन्मापासूनच. बारीक, वाकडा... सुकलेल्या चाबकाच्या वादीसारखा. त्याला ह्या पायाची हालचाल करणे अजिबात जमत नसे.

काही काळपर्यंत कोल्काने ह्या वस्तुस्थितीला विशेष महत्त्व दिले नव्हते. जेव्हा इतर मुले दोन पायांवर चालायला शिकली, तेव्हा तो तीन पायांवर चालायला शिकला – एवढेच. कुबड्यांचा त्याला अडथळा वाटला नाही. दुसऱ्या पोरांबरोबर तो वाढत होता, परक्यांच्या फळबागांची कुंपणे ओलांडत होता, नऊ दांडक्यांचा खेळ खेळत होता – आणि फार छान खेळायचा! एक कुबडी तिरपी उभी करायचा, डाव्या हाताचा आधार घ्यायचा आणि नेम धरून – ठाक्! अर्धा डझन दांडकी चौफेर उडायची.

पण वर्षे उलटली. कोल्का आता देखणा, बळकट तरुण बनला. कुबड्या त्रासदायक वाटू लागल्या. त्याचे समवयस्क एव्हाना पोरींना क्लबामधून घरी पोचवायला जाऊ लागले होते. पण तो आपल्या दोन अप्रिय सोबत्यांना खरडत गल्ल्यांमधून एकटाच फिरत होता.

कोल्काचे तीक्ष्ण, चतुर डोळे विचारमग्न बनले.

शेजारच्या पोरांना दरवर्षी सैनिकी प्रशिक्षणासाठी पाठवण्याचे प्रसंग साजरे होऊ लागले : कधी एक, कधी दोन, तर कधी एकाचवेळी बरेच... हे पाठवणी समारंभ धूमधडाक्याने साजरे होत. तशा प्रसंगी कोल्का स्वतःच्या घराच्या देवडीमध्ये लपून बसायचा आणि फळ्यांच्या फटींमधून डोकावून पहायचा. सैनिकी सेवेचे आपल्यालाही बोलावणे यावे, असे त्याला फार वाटायचे.

एके दिवशी कोल्काच्या वडिलांनी, सामुदायिक शेतावरचे मेकॅनिक

आन्द्रेय वोरोन्त्सोव यांनी, आपल्या मुलाला ह्या उद्योगात गढलेले पाहिले. ते मुकाट घरात निघून जाणार होते, पण कोल्काला त्यांच्या पावलांची चाहूल लागली व त्याने मागे वळून पाहिले.

"तू काय करतोस इथं?" वडिलांनी जणू सहजपणाचा आव आणून विचारले.

कोल्का शरमेने लाल झाला.

"असंच..." तो म्हणाला. आणि स्वतःच्या बाकड्याकडे गेला (तो घड्याळे दुरुस्त करायचा. खेड्यात आलेल्या एका पाहुण्यापासून तो हा व्यवसाय शिकला होता.)

काळ उलटला. आणि प्रत्येकाच्या बाबतीत जे घडते, ते कोल्काच्या बाबतीतही घडले. तो प्रेमात पडला.

रस्त्यापलिकडेच, रंगवलेल्या झडपांच्या एका छोट्या घरात, मोठ्यांदा बोलणारी ग्लाश्का नांवाची मुलगी रहात होती. कोल्का स्वतःच्या खिडकीमधून रोज तिला पहायचा. झटपट हालचाली करणारी ग्लाश्का सकाळपासून संध्याकाळपर्यंत आवारात धावपळ करत असायची: आत्ता तळघरात धावायची, तर आत्ता हंसांना बागेतून पळवून लावायची, कधी कुंपणात घुसलेल्या डुकरांबद्दल शेजाऱ्यांवर तणतणायची... सबंध दिवस गल्लीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फक्त तिचा आवाज ऐकू यायचा.

एक दिवस कोल्का तिच्याकडे पहात होता आणि अचानक काही कारण नसताना त्याच्या मनात विचार आला: "जर ही एवढी सुंदर नसती, तर हिच्याशी लग्न करून मोकळा झालो असतो." त्या क्षणापासून दररोज ग्लाश्का त्याच्या मनात ठाण मांडून बसली. तिचा विचार त्याला छळू लागला. कुठल्यातरी अज्ञात शक्तीने त्याला त्याच्या बाकामागून खेचले आणि घराच्या देवडीवर ढकलले.

"ग्लाश्का!" तो मुलीला ओरडून हाक मारायचा. "केव्हा लग्न करणार ग तू सुंदरी? निदान तुझ्या लग्नात मनसोक्त मजा करीन म्हणतो!"

"मला नवरी म्हणून कुणी घेत नाही रे कोल्या!" बडबडी ग्लाश्का उत्तर द्यायची. "मी केव्हाची तयारी करून बसल्येय!"

"अग वा ग तू" कोल्काच्या मनात यायचे आणि त्याच्या विचारमग्न राखी डोळ्यांमधून स्नेह ओसंडू लागायचा.

खेड्यावर जुलैमधील निळे आकाश भगभगत होते. उष्णतेच्या उफाळणाऱ्या वाफांमधून सुखाची आणि आनंदाची परीकथांमधील चित्रे उमटत होती. नदीच्या पाण्यात संध्यारंगांनी बुड्या मारल्या आणि शांतपणे ते विझून गेले. रात्री स्तब्ध बनायच्या... ही स्तब्धता काळजात एक गोड बोचणारी हुरहुर निर्माण करायची.

उन्हाळ्यात कोल्का छोट्या पडवीत झोपायचा. पडवीची एक भिंत रस्त्याच्या दिशेला होती.

एकदा ह्या भिंतीलगत एका प्रणयी युग्माची कोल्काला चाहूल लागली. कोल्काचे हृदय धडाडले. कसे कुणास ठाऊक, पण त्याने ग्लाश्काला तात्काळ ओळखले होते. वस्तुतः आरंभी बराच वेळपर्यंत ते युग्म गप्प होते. मग त्या युग्माची निरर्थक कुजबुज आणि खिदळणी ऐकत कोल्का निजून होता. स्वतःच्या कुबड्यांना ह्या रात्री त्याने खूप शिव्याशाप मोजले. उशीत तोंड खुपसून तो रडला. इतःपर तसे जगणे त्याला अशक्य झाले होते!

जेव्हा दिवस उजाडला, तेव्हा गावातील डॉक्टरच्या घरी तो थेट गेला. डॉक्टर त्याच्या ओळखीचा होता – अनेकवेळा ते एकत्र शिकारीला आणि मासे धरायला गेले होते.

"एवढ्या सकाळीच कसा काय उगवलास?" डॉक्टरने विचारले.

कोल्का देवडीवर बसला आणि कुबडीच्या टोकाने जमीन उकरू लागला...

"जादा काडतूसं आहेत? माझ्याजवळची संपलीत."

"काडतूसं? बघायला पाहिजेत." डॉक्टर घरात गेला आणि मिनिटभरानंतर मूठभर काडतूसे घेऊन आला. "घे."

कोल्काने काडतूसे खिशात टाकली आणि सिगारेट शिलगावली... वाकडे स्मित करत विचित्र एकटक नजरेने त्याने डॉक्टरकडे पाहिले. मग तो उठला.

"काडतूसांबद्दल आभार."

"त्यात कसले आभार मानतोस. मी स्वतःसुद्धा शिकारीला आलो असतो..." डॉक्टरने उसासा टाकला आणि टक्कल खाजवले. "पण... सुटी फक्त ऑगस्टमध्ये."

कोल्का फाटक ओलांडून थोड्या अंतरापर्यंत गेला आणि थांबला. रस्ता निरखत खूप वेळ उभा राहिला.



8–131

मागे वळला आणि डॉक्टरपाशी परत आला.

"टोपणं म्हणशील तर," तो डॉक्टरला म्हणाला, "माझ्यापाशी रग्गड आहेत."

डॉक्टरच्या भुवया उंचावल्या.

"मला समजेनासं झालंय."

कोल्काने कपाळाला आठ्या घातल्या.

"माझा पाय बघ... मला कृत्रिम पाय वापरून बघायची इच्छा आहे. असं जगायचा कंटाळा आला."

"अस्सं..." डॉक्टरने कोल्काच्या डोळ्यांमध्ये पाहिले... आणि तो स्वतःच शरमला. "बघू दे मला."

दोघांनी एकत्रपणे खूप वेळपर्यंत पाय तपासला.

"इथं जाणीव आहे?"

"होय."

"आणि इथं?"

"परत दाब... आहे."

"हलव. आणखी. आता – एका बाजूला. हालचाल कर, आणखी. ठीक." डॉक्टर सरळ बसला. "मी तुला असा सल्ला देईन: प्रयत्न करून बघ. आत्ता ठाम काही सांगणं अवघड आहे, पण प्रयत्न करायला हरकत नाही. हा इथपर्यंत कापून काढावा लागेल. समजलं?"

"समजलं."

"प्रयत्न करून बघ. कदाचित ताबडतोब काही जमणार नाही. बरीच मेहनत करावी लागेल. समजलं?"

कोल्का घरी आला आणि प्रवासाची तयारी करू लागला. शहरातील इस्पितळात जाण्याची. त्याने आईला आपल्या प्रवासाचे खरे कारण सांगितले नाही, पण वडिलांना मात्र रस्त्यावर बोलावून खुलासा केला:

"पाय कापून घ्यायला जातोय."

"म्हणजे?" आंद्रेय यांचे डोळे विस्फारले.

"कृत्रिम पाय बसवून घ्यायचा इरादा आहे."

एक आठवड्यानंतर कोल्काचा लुळा पाय कापून काढण्यात आला. त्याचा उरलेला पाय सत्तावीस सेंटीमीटर लांब होता.

जखम किंचित भरून येताच पांघरुणाखाली त्याने थोटच्या पायाची हालचाल सुरू केली. सरावासाठी.

त्याचे वडील त्याला भेटायला आले होते. थोटच्या पायाकडे बघण्याचे टाळून बराच वेळपर्यंत ते मुलाच्या बिछान्यापाशी बसून राहिले. पहिला पाय कसाही असला तरी तो पाय होता. आता काहीच नव्हते.

नंतर कोल्का घरी न जाता थेट शहरात गेला.

पंधरा दिवसांनंतर तो घरी अवतरला... त्याच्या पडशीत कसलीतरी लांबोडी वस्तू होती.

कोल्काला "पायाविना" पाहताच आईच्या तोंडून भीतीचा चीत्कार उमटला. कोल्का हसला.

त्याने पडशी उघडली आणि चमकता, वॉर्निश लावलेला खोटा पाय जमिनीवर टाकला.

"हा बघ... पाय!"

सगळेजण कुतूहलाने तो कृत्रिम पाय निरखू लागले. कोल्का मात्र एका बाजूला उभा राहून हसत होता. वाटेवर त्याने त्या पायाला पोटभर पाहून घेतले होते.

"किती चमकतोय... देवा रे!" आई म्हणाली.

वडिलांनी तो पाय हातात उचलून घेतला व मेकॅनिकच्या नजरेने तपशीलवार न्याहाळून पहायला आरंभ केला.

"छान बनवलाय," ते शेवटी म्हणाले. "म्हाताऱ्या कूझ्माच्या लाकडी ठोकळ्यासारखा नाही."

सर्वांना कृत्रिम पाय आवडला. सर्वांची खात्री होती आणि खुद्द कोल्काची खात्री होती की, मूर्खातला मूर्खसुद्धा ह्या पायावर चालू शकला असता. अत्यंत सुबक, अचूक, भक्कम अशी त्या पायाची बनावट होती. त्याला वॉर्निशची चकाकी होती आणि त्याचे बोलट, पट्टेसुद्धा चमकत होते.

"केव्हा वापरून बघणार?" हातामध्ये खोटा पाय तोलून धरत वडिलांनी विचारले.

"पाय नीट बरा झाला म्हणजे वापरीन. घाई करू नको म्हणून सांगितलंय."

अंधारी रात्र. दूरवर उन्हाळी पावसाच्या विजा चमकत होत्या.

कोल्का स्वतःच्या पडवीत लौकर गेला होता. बिछान्यावर पडून वाट पहात होता.

सगळ्या खेड्यात शांतता पसरली.

कोल्का आणखी थोडा वेळ पडून राहिला. मग त्याने दिवा पेटवला आणि खोटा पाय बांधायला सुरुवात केली. पाय बांधून झाला. त्याने सिगारेट पेटवली... धूम्रपान करत तो पाय निरखत बसला.

"पाय काही वाईट नाही. ह्यँ!" त्याने स्मित केले.

सिगारेटचे थोटुक त्याने काळजीपूर्वक विझवले. उभा राहिला. दारुड्याप्रमाणे त्याचा एका बाजूला झोक गेला. पलंगाची मागील बाजू हातांनी पकडून त्याने तोल सावरला. उभे राहून त्याने आपल्या धडधाकट पायाने पुढचे पाऊल टाकले. पण डावा, खोटा पाय मात्र त्याला हलवता येईना. तो खाली पडू लागला. परत त्याने हातांनी पलंग पकडला... खोटा पाय पुढे टाकण्याचा प्रयत्न केला. छातीत जोरजोराने धडधड होत होती.

"काही हरकत नाही. अर्थातच बरीच मेहनत करावी लागणार," तो स्वतःशी म्हणाला.

आणखी एक प्रयत्न – पण व्यर्थ. डावा पाय पुढे हलला नाही. तेव्हा कोल्काने उजवे पाऊल खूप लांब टाकले आणि सबंध अंगाला रेटा देऊन डावा पाय पुढे ढकलायचा प्रयत्न केला. तो पडला. जमिनीत बोटे खुपसून खूप वेळ तसाच पडून राहिला. डावा पाय मुळीच हलत नव्हता. अगदी अजिबात, अर्धे पाऊलसुद्धा पुढे सरकला नाही.

"ठीक आहे... बांडगूळा! सवय नाही म्हणून..." तो परत उठला. आणखी एक प्रयत्न. आणखी. पण यश नाही.

कोल्का दमला.

"आता धूम्रपान केलं पाहिजे," चिडून तो म्हणाला. यशाबद्दल आता त्याची खात्री नव्हती. पण हे कबूल करणे अवघड झाले होते. अगदी अशक्य. छे:! कसे शक्य होते?..

सिगारेट संपल्यानंतर त्याने परत एकदा निकराचा प्रयत्न केला. आणखी एकदा – पण नाही. कणभरही यश लाभत नव्हते.

कोल्काने आईमाईवरून शिव्या हासडल्या आणि तो पलंगावर आडवा पडला. पलंगाजवळच्या भिंतीवर टांगलेल्या बंदुकीवर त्याची नजर

पडली... तो उठला... आणि डावा पाय हलवण्याची परत खटपट करू लागला.

"चालशील, बेट्या! चल... ओप्प! आळशी साला!" चिडून हळू आवाजात तो पुटपुटला.

एव्हाना पायाचा खुंट सोलवटून निघाला होता, पायाची आग आग होत होती. कोल्काने पायाचे पट्टे सोडले व तापल्या मांसावर तो फुंकरी घालू लागला. नंतर वेदना सोसत त्याने परत पाय बांधला.

"आता?. चाल बघू!.. परत नाही?"

उजाडत होते.

"हरामखोर," कोल्का म्हणाला आणि पलंगावर आडवा झाला. काहीही दिसू नये म्हणून त्याने डोळे मिटून घेतले. कुठलातरी तेलकट हिडीस चेहरा त्याच्यावर ओणवा होऊन वाकड्या तोंडाने हसत होता. कोल्काने डोळे उघडले... "अरे नीचा," परत तो म्हणाला. आणि भिंतीवरची बंदूक त्याने काढली...

वडिलांना दुसऱ्या दिवशी संध्याकाळी अनर्थाची बातमी कळली (यंत्रांचे सुटे भाग घेण्यासाठी ते तालुक्याच्या गावी गेले होते). घरी परत येत असताना त्यांना ही बातमी सांगण्यात आली. त्यांनी घोडा-गाडी वळवली व इस्पितळाकडे पिटाळली.

"आत्ता न भेटणं जास्त बरं," डॉक्टरनी समजावण्याचा प्रयत्न केला. "आत्ता तो..."

वडिलांनी डॉक्टरना बाजूला सारले व ते मुलाच्या वॉर्डात गेले.

अनेक बँडेजांच्या गुंडाळयांमध्ये कोल्का उताणा पडला होता. त्याचा चेहरा खूप फिकटल्यामुळे तो ओळखू येत नव्हता. त्याची अवस्था मुळीच आशादायक दिसत नव्हती. वॉर्डात आयोडिनचा दर्प सुटला होता.

वडिलांना दरदरून घाम सुटला.

"मला का नाही विचारलंस – मी नेमका नेम धरला असता... म्हणजे चटकन..." वडिलांचा कंठ दाटून आला. त्यांनी कपाळावरचा घाम पुसला व कॉटजवळच्या स्टूलावर ते बसले.

कोल्काने त्यांच्या डोळयांकडे तिरपे कटाक्ष टाकले... त्याचे ओठ हलले...

" दुखतं ?" वडिलांनी विचारले.

कोल्काने डोळे मिटले: दुखत होते.

" छ्या: ..." वडील उठले आणि वॉर्डबाहेर गेले.

" तर परिस्थिती अशी आहे: त्याला स्वत:ला जगण्याची कितपत जोरदार इच्छा आहे, त्यावर सगळं अवलंबून आहे. समजलं? खुद्द शरीरानंच साद दिली पाहिजे ..."

वडिलांचे दु:खाने डोके फिरले. त्यांनी डॉक्टरांचा अंगरखा छातीशी गच्च पकडला.

" मग तू कशाला इथं? शरीर म्हणे!.."

" असं वागायची गरज नाही. सोडा. आम्ही शक्य आहे तेवढं सगळं करू."

वडिलांनी डॉक्टरांचा अंगरखा सोडला. परत वॉर्डात जायची त्यांची इच्छा होती. पण ऐन दारापाशी ते थबकले ... आणि इस्पितळातून बाहेर पडले. खूप दूर चालत गेल्यानंतर त्यांना आठवण झाली की, ते घोडागाडी घेऊन आले होते. परत येऊन ते गाडीत बसले आणि त्यांनी घोड्याला चाबूक हाणला ...

कोल्काच्या आईने दु:खापायी अंथरुण धरले होते.

" तो कसा आहे?" नवरा घरात येताच तिने दुबळ्या आवाजात विचारले.

" जर मेला तर तुझंही भलं होणार नाही. तुला ठार मारीन. कुऱ्हाड घेऊन तुझी खांडोळी करीन." निराशेपायी आंद्रेयचा चेहरा फिकट आणि भयानक बनला होता.

आई धाय मोकलून रडली.

" देवा, देवा रे ..."

" देवा, देवा रे!.. फक्त स्वत:चा देव ठाऊक तुला! अवघ्या एका पोराला नीट जन्म देऊ शकली नाहीस ... दोन पायांसकट! तुझ्या ह्या देवाची मी आत्ता मुंडी मुरगाळतो." आंद्रेयनी संत निकोलाय-ची तसबीर खेचून काढली आणि फरशीवर आपटली. " ही त्याला शिक्षा! हरामखोर साला!"

" आन्द्रयूशा!.. देवा ... त्या ग्लाश्कापायी तो तसा वागला. तो तिच्या प्रेमात पडला, नागिणीच्या ... छान व्यवस्थित पोरगा होता आणि एकदम जणू सुई गिळली!"

आंद्रेय काही वेळपर्यंत बायकोकडे मख्खासारखे पहात राहिले.

"कुठली ग्लाश्का?"

"कुठली ग्लाश्का!.. एकच ग्लाश्का आहे इथं!"

आंद्रेय मागे वळले आणि ग्लाश्कापाशी धावले.

"आंद्रेयकाका, खरंच त्यानं माझ्यापायी असं केलं? आता काय करायचं?"

"तो बरा होईल." आंद्रेयनी हाताने गाल घासत म्हटले. "जर त्याला सांगितलं.. अं... तर तो बरा होईल... त्याच्याशी लग्न करायला तू तयार आहे असं सांगशील... डॉक्टर म्हणतात: जर त्याची इच्छा असेल तर... सांग त्याला खोटं. आं?"

ग्लाश्का रडू लागली.

"मला शक्य नाही. मला त्याच्याबद्दल फार फार वाईट वाटतं, पण शक्य नाही. दुसऱ्याला मी एव्हाना वचन दिलंय..."

आंद्रेय उठले.

"तू रडू नकोस तेवढी... नवीन फॅशन काढलीय – जरा काही घडलं की गळा काढतात. शक्य नाही – तर शक्य नाही. रडायचं काय त्यात? मी तुझ्यापाशी आलो होतो हे कुणाला बोलू नको." आंद्रेय परत इस्पितळात गेले.

-

कोल्का त्याच अवस्थेत निजला होता. अंगाशी दोन्ही हात ताठ धरून छताकडे टक लावून पहात होता.

"आत्ता घरी गेलो होतो...," आंद्रेयनी आपला खरबरीत हात ताणलेल्या गुडघ्यावरून फिरवला... बुटाचा वरचा भाग नीट केला. "वाटेत ग्लाश्काकडे गेलो होतो..."

कोल्काने बापाकडे चकित डोळ्यांनी पाहिले.

"रडतेय ती. म्हणाली, त्या मूर्खानं मला काहीच सांगितलं का नाही. म्हणाली, मी त्याच्याशी आनंदानं लग्न केलं असतं..."

कोल्काच्या गालांवर किंचित रक्तिमा चढला... त्याने डोळे मिटून घेतले आणि नंतर त्यांना उघडलेच नाही.

वडील बसून वाट पहात राहिले – खूप वेळ वाट पहात राहिले. मुलाला ऐकण्याची इच्छा का नाही, हे त्यांना समजले नाही.

"मुला," त्यांनी हाक घातली.

"नको," केवळ त्याचे ओठ हलले. त्याने डोळे उघडले नाही. "खोटं बोलू नको, बाबा... आधीच शरमिंदं वाटतंय."

आंद्रेय उठले आणि खांदे पाडून वॉर्डबाहेर गेले.

इस्पितळापासून जवळच त्यांना ग्लाश्का भेटली. ती त्यांच्या भेटीला धावत येत होती.

"मी सांगत्ये त्याला, आंद्रेयकाका... काय होईल ते होवो! मी कबूल आहे म्हणून सांगत्ये – त्याला बरा होऊं दे!"

"आता गरज नाही," आंद्रेय म्हणाले. कपाळाला आठ्या घालून स्वतःच्या पायांकडे पहात राहिले. "तो तसाच बरा होईल. खोटं बोललो तर आणखी वाईट."

कोल्का बरा झाला●

दोन आठवड्यांनंतर एव्हाना तो कॉटवर बसून चिमट्यांनी घड्याळांशी खुडबूड करू लागला होता. त्याच्या शेजारच्या पेशंटने स्वतःचे बिघडलेले घड्याळ दुरुस्त करण्याची त्याला विनंती केली होती.

वॉर्डाच्या खिडकीतून झळझळीत सूर्यप्रकाश आत येत होता. ऑगस्ट-मधील दुपारच्या वेळचे खिडकीबाहेरील प्रकाशित जीवन मंद तालात झणकारत होते. हवेमध्ये बडीशोपेचा आणि उन्हामुळे तापलेल्या छपराच्या नव्या रंगाचा दर्प दरवळत होता. उष्म्यामुळे बेचैन बनलेला कोंबडा इस्पितळाच्या आवारात वारंवार आरवत होता.

"तो निष्कारण आरवत नाही," कुणीतरी म्हणाला. "त्याच्या कोंबडीनं त्याला फसवलं. मी स्वतः पाहिलं: तांबडा कोंबडा आला, त्यानं आपल्या पंखाखाली कोंबडीला धरलं आणि तो तिला घेऊन निघून गेला."

"आणि आत्ता जो ओरडतोय तो त्यावेळी कुठं पहात होता?"

"हा?.. तो कामासाठी गेला होता – शेजारच्या वाफ्यात."

उशीमध्ये डोके खुपसून कोल्का खुदुखुदु हसला.

हे सगळे कसे काय घडले याबद्दल त्याला जेव्हा कुणीतरी विचारत असे, तेव्हा कोल्का शरमेने लालबुंद व्हायचा आणि अनिच्छेने उत्तर द्यायचा:

"अपघातानं." आणि घड्याळावर नजर खिळवायचा.

वडील दररोज इस्पितळात येत होते... कॉटजवळच्या स्टूलावर खूप वेळ बसून रहायचे. मुलगा घड्याळाशी कसा खुडबुडतो ते पहात बसायचे.

"घरी कसं काय?" कोल्काने विचारले.

"विशेष काही नाही. सगळं ठीक. ते छोटं चाक हरवेल बघ..."

पांघरुणाच्या घड्यांमधून त्याच्या वडिलांनी ते छोटे चाक कष्टाने शोधले आणि मुलाच्या हाती दिले.

"त्याला लंबक म्हणतात."

"किती छोटा! कशा काय बनवतात अशा गोष्टी?"

"बनवतात. कारखान्यात सर्व काही करतात."

"पण मला कुणी ठार मारायची धमकी घातली, तरी जन्मात असली वस्तू मी बनवली नसती."

कोल्काने स्मित केले:

"तुला जमत नाही. पण तिथं लोकांना जमतं."

आंद्रेयनीसुद्धा स्मित केले... हाताच्या पंजाने गुडघा चोळत ते म्हणाले:

"होय... तिथं – अर्थातच... तिथं लोकांना जमतं. तिथं सगळं जमतं त्यांना."

# अंतराळ, मज्जासंस्था आणि डुकराच्या चरबीचा तुकडा

म्हाताऱ्या नाऊम येवस्तीग्नेइचचे डोके अतिमद्यपानापायी भणभणत होते. भिंतीमधील चुलाण्यावरच्या बिछान्यावर तो कण्हत तळमळत पडला होता.

दर महिन्याला एकदा, पेन्शन मिळत असे त्या दिवशी, येवस्तीग्नेइच नियमतपणे चिक्कार दारू प्यायचा आणि मग तीन दिवसपर्यंत अंथरुणात तळमळत रहायचा, शिव्या मोजायचा:

"च्यायला, नरकातले सगळे सैतान आपल्या खुरांनी मला हाणताहेत. आता मरणार मी..."

टेबलापाशी अभ्यासाची पुस्तके उघडून आठवीत शिकणारा यूर्का गृहपाठ करत होता. यूर्का येवस्तीग्नेइचकडे भाडेकरू म्हणून रहात होता.

"मरतोय रे यूर्का, भुताच्या तावडीत सापडतोय रे!"

"एवढी दारू प्यायला नको होती."

"अशी भाषा करायला अजून तू लहान आहेस."

स्तब्धता. यूर्काची लेखणी कुरूकुरू चाललीय.

म्हाताऱ्याला बोलायची सुरसुरी आलीय. त्यामुळे त्याला थोडे हलके वाटते.

"जर दारू प्यायची नाही तर मी करायचं तरी काय? महिन्यातून निदान एकदातरी मी दिवस साजरा केला पाहिजे..."

"कशाला?"

"मी काय माणूस नाही?"

"हं ... भूदास पद्धतीच्या काळातले विचार." यूर्का वेताच्या खुर्चीवर मागे रेलला आणि घरमालकाकडे त्याने तिटकाऱ्याने पाहिले. "त्यावेळी समजूत होती की, माणसानं दारू प्यायलीच पाहिजे."

"भूदासांच्या काळाची तुला कुठून माहिती?" म्हाताऱ्याने वेदनेने तोंड वाकडे करत वरून खाली कुतूहलाने पाहिले. यूर्का कधी कधी स्वतःच्या ज्ञानाने म्हाताऱ्याला चकित करायचा आणि जरी म्हातारा हार मानत नसला, तरी यूर्काचे बोलणे ऐकायला त्याला आवडायचे. "तुला कुठून माहीत, आं? अजून मिसरुड धड फुटली नाही तुला!"

"आम्ही शिकलोय."

"मास्तरांनी सांगितलं काय?"

"हो."

"पण त्यांना कुठून ठाऊक? तुमच्या शाळेत एकही म्हातारा नाही."

"ते शिकले. पुस्तकांमध्ये लिहिलंय..."

"पुस्तकांमध्ये... मग त्यांना हेसुद्धा माहीत आहे का, आदल्या संध्याकाळी दारू प्यायल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी माणसाचं डोकं का ठणकतं?"

"विषारी तेलकट द्रवामुळं शरीराला गुंगी येते."

"कुठं असतं तेल? वोदकात?"

"हो."

येवस्तीग्नेइचला खरे म्हणजे मळमळतेय, पण तरीही त्याला नकळत हसू फुटते:

"वा रे तुझा अभ्यास!"

"तुझी इच्छा असेल तर मी तुला फॉर्म्युला दाखवतो. आत्ता तुला नजरेसमोर सिद्ध करून देतो..." यूर्काने रसायनशास्त्राचे क्रमिक पुस्तक उचलले, पण म्हातारा जोराने कण्हला आणि त्याने हातांनी डोके गच्च दाबून धरले.

"ओ-ओ... परत सुरू झालं! च्यायला..."

"तर मग उतारा म्हणून परत दारू पी. उगीच कशाला त्रास सोसतो?"

ह्या सूचनेवर म्हातारा मुळीच प्रतिक्रिया व्यक्त करत नाही. त्याने उतारा म्हणून परत दारू घेतली असती, पण पैसे खर्चायला त्याला वाईट वाटत होते. एकूण तो कंजूस म्हातारा होता. तसा चांगला जगत होता, पेन्शन वाईट नव्हते, शहरातून मुलगे आणि मुलगी मदत करत होती. आणि त्याच्या तळघरात कोणती गोष्ट नव्हती – गेल्या

वर्षीची डुकराची चरबी, खारवलेल्या काकड्या, कोबी, कलिंगडे, अळंब्या ... बरण्या, टीपे, टोपल्या, लाकडी पिंपे ... खाद्यपदार्थांचा भरगच्च साठा. त्याच्या कपाटात दीड पोते उत्तम पीठ होते आणि सुमारे दीड पूड वजनाचा डुकराच्या मांसाचा तुकडा टांगलेला होता. परसदारी बटाट्याचा वाफा होता. गेल्या वर्षीचा, अद्याप न वापरलेला. डुकरांना, बदकांना आणि कोंबड्यांना त्यातून तो खाऊ घालत होता. जेव्हा म्हातारा आजारी नसतो, तेव्हा पहाटे उठतो आणि संध्याकाळी अंधार पडेपर्यंत घरकामात गढलेला असतो. अनेकदा तो तळघरात जातो, शेवटच्या पायरीवर बसतो आणि खूप वेळपर्यंत विचारात गढून जातो. "सैतान लेकाचे! इथं का रहात नाहीत?" मनाशी असा विचार करत तो वर चढून दिवसाच्या उजेडात येतो. त्याचे हे उद्‌गार त्याच्या मुलग्यांना आणि मुलीला उद्देशून असतात. ते शहरात निघून गेले ह्याचा म्हाताऱ्याला मनस्वी संताप आहे.

यूर्काची परिस्थिती अगदी वेगळी आहे. त्याचे घर शेजारच्या खेड्यात आहे, पण तेथे दहावीपर्यंतची शाळा नाही. त्याला बाप नाही. आईपाशी तो सोडून आणखी तीन मुले. नदीतून लाकडांचे तराफे नेत असताना वडील बुडून मेले. आईपासची तीन मुले यूर्कापेक्षा धाकटी. आई रात्रं-दिवस काबाडकष्ट करते. यूर्काने दहावी पास करावी अशी तिची फार इच्छा आहे. यूर्काचीही दहावी पास करायची इच्छा आहे. एवढेच नव्हे तर पुढे इन्स्टिटयूटमध्ये शिकण्याची तो स्वप्ने पाहतोय. वैद्यकीय.

पण यूर्काच्या दारिद्र्याची म्हातारा विशेष दखल घेत नाही. दर महिन्याला भाडे म्हणून यूर्काकडून चोपून पाच रूबल घेतो. आणि स्वयंपाक वेगवेगळा करतात. म्हातारा स्वत:साठी वेगळे शिजवतो, यूर्का स्वत:साठी वेगळे जेवण बनवतो. कधी कधी महिनाअखेरी यूर्काचे सामान संपलेले असते. म्हातारा बराच वेळपर्यंत तिरपे कटाक्ष टाकतो – यूर्का कोरडा पाव चघळत असतो. मग म्हातारा विचारतो:

"सगळं संपलं?"

"होय."

"मी देतो ... नंतर परत कर."

"ठीक आहे."

म्हातारा एक-दोन किलो बाजरी तोलून देतो आणि यूर्का स्वत:साठी खीर बनवतो.

सकाळच्या प्रहरी गरम चुलाण्यापाशी बसून कधी कधी ते गप्पा मारतात.

"शिक्षण पुरं करायची अजून इच्छा आहे?"

"हो. सर्जन व्हायचंय."

"आणखी किती वर्षं लागणार?"

"आठ. कारण मेडिकलला सहा वर्षं असतात. इतर विषयांप्रमाणं पाच नाही."

"सर्जन होईपर्यंत तुझे पाय ताठ होतील. तुझी आई कुठून एवढे पैसे आणणार?"

"मला स्टायपेंड मिळेल. इतर पोरं अशीच शिकतात... आमच्या खेड्यातले दोघेजण स्टायपेंडवर शिकताहेत."

आगीकडे नजर रोखून म्हातारा गप्प राहतो. बहुधा त्याला स्वतः-च्या मुलांची आठवण झाली.

"तुम्हा सगळ्यांना त्या शहराची एवढी ओढ का वाटते?"

"शिक्षण... त्याची ओढ वाटते. सर्जनला नंतर खेड्यात काम करणंही शक्य आहे. मला खेड्यात काम करायलाच जास्त आवडेल."

"त्यांना खूप पगार मिळतो काय?"

"कुणाला? सर्जनना?"

"हो."

"उलट, त्यांना फार कमी पैसे मिळतात. सगळ्यांपेक्षा कमी. आता त्यांच्या पगारात वाढ केलीय हे खरं, पण तरीही..."

"मग एवढी वर्षं नस्ता त्रास कशाला करून घ्यायचा? त्यापेक्षा ड्रायव्हर म्हणून शीक आणि काम कर. बक्कळ पैसा कमावतात ते! शिवाय वरकमाई चालतेच त्यांची: कुणाला रानातून लाकडं आणून दे, कुणाला सरकारी शेतावरचं गवत नेऊन दे. पैसाच पैसा. आईलाही मदत होईल तुझ्या. तीन तोंडं खाऊ घालायची जबाबदारी आहे ना तिच्यावर!"

यूर्का काही वेळ गप्प बसतो. आईचा आणि धाकट्या भावांचा उल्लेख त्याच्या काळजाला बोचतो. अर्थात आईला अवघड जात होते... पण तरीही त्याला म्हाताऱ्याचा आणखीच तिटकारा वाटू लागतो.

"आम्ही जमवून घेऊ," तुटकपणे यूर्का बोलतो. "दुसऱ्या कुणाचा त्याच्याशी संबंध नाही."

“अर्थातच,” म्हातारा मान्य करतो. “तुमच्या टाळक्यांमध्ये हे अभ्यासाचं खूळ भरवून देतात आणि मग जगभर तुमची वणवण सुरू होते, त्या…” त्याला योग्य ते शब्द सुचत नाहीत. “पूर्वी कुठल्याही शिक्षणाविना माणसं रहात होती. छान चालायचं देवाच्या कृपेनं. कधी उपासमार झाली नाही.”

“तुमच्या डोक्यात फक्त एकच विचार – पूर्वी!”

“आता ही विमानं बांधतात – भिकारडी!”

“तुला घोडागाडीतून जायला बरं वाटतं? का चुलाण्यावर झोपून रहायला जास्त आवडतं?”

“काय वाईट घोडागाडी? जर घोडागाडीतून प्रवासाला निघालो, तर निवांतपणं मुक्कामाला पोचणार हे मला ठाऊक असतं. पण एखाद्या विमानात बसला असताना ते कोसळलं, तर खाली जमिनीवर हाडंसुद्धा सापडायची नाहीत.”

अशा रीतीने रोज सकाळी त्यांचे संभाषण चालते – यूर्काची शाळेत जायची वेळ होईपर्यंत. म्हाताऱ्याला बोलणे अत्यावश्यक वाटते – नंतर सबंध दिवसभर त्याला मुकाट्याने वावरावे लागते. यूर्काला जरी म्हाताऱ्याची कंटाळवाणी कुरकुर त्रासदायक वाटत असली, तरी नव्या गोष्टींचे – विमाने, शिक्षण, शहरी जीवन, पुस्तके, चित्रपट – समर्थन केल्याचे समाधान त्याला लाभते.

विचित्र आहे, पण म्हाताऱ्याचा देवावरसुद्धा विश्वास नाही.

“त्यांना काही उद्योग नाही – म्हणून केकाटत असतात लेकाचे,” धर्मश्रद्धांबद्दल म्हातारा बोलतो. “श्रमलं पाहिजे, मग भरपूर शांती आणि संपत्ती मिळेल.”

पण काम करणे म्हणजे त्याच्या दृष्टीने फक्त स्वतःसाठी, स्वतःच्या जमिनीवर, स्वतःच्या वाफ्यात. पूर्वीच्या काळाप्रमाणे. सामुदायिक शेतावर काम करायचे त्याने केव्हाच बंद केले आहे. वस्तुतः त्याच्या वयाचे दुसरे म्हातारे अजूनही सटरफटर कामे करतात – कुणी मधमाशांची पोळी पाहतो, कुणी शेतावर राखण करतो, कुणी पिकांवर नजर ठेवतो.

“आजोबा, तुझ्यात काहीतरी जमीनदारी वृत्ती आहे,” एक दिवस यूर्का चिडून म्हाताऱ्याला म्हणाला.

त्यावर म्हातारा खूप वेळ गप्प राहिला. नंतर तो विचित्रपणे

म्हणाला : “ ऊठ , धरतीनं शापिता ! ” मग त्याने मोठ्यांदा एक नाकपुडी शिंकरली , नंतर दुसरी . सदऱ्याच्या टोकाने नाक पुसून त्याने समारोप केला : “ मला वाटतं , त्यावेळी तू कमिस्सार असावास . तेव्हा कमिस्सार तरुण होते . ”

यूर्का ह्यावर खूष झाला .

“ धरतीच्या शापिता – धरतीनं नव्हे , ” त्याने म्हाताऱ्याची चूक दुरुस्त केली .

“ त्या जमीनदारी वृत्तीबद्दल कुठं बरळू नको . नाहीतर माझा वाफा कमी करतील . माझा वाफा नियमापेक्षा जरा जास्त मोठा आहे ... ”

“ मला काय करायचंय ! ”

देवाचा विषय त्यांच्या संभाषणात वारंवार निघायचा .

“ तुमच्या इथं त्याच्याबद्दल बोलतात ? ”

“ कुणाबद्दल ? ”

“ देवाबद्दल . ”

“ काहीही बोलत नाहीत . देवच नाही . ”

“ मग माणसं त्याची एवढी प्रार्थना का करतात ? ”

“ तू कशाला त्याची सारखी आठवण काढतोस ? तुझा तर देवावर विश्वास नाही . ”

“ काय पण तुलना ! मी शिव्या घालतो . ”

“ तरीही देवाची आठवण काढतोस . ”

म्हाताऱ्याला काय बोलावे समजेना .

“ मी एकटाच तसं करतो का ? सगळेच करतात . ”

“ मूर्खपणा . अशा वयात तर लाजिरवाणं ! ”

थोड्या वेळाने म्हातारा म्हणाला : “ आता जरा बरं वाटतंय . मला एकदम डोळ्यांसमोर अंधेरी आली होती . ”

यूर्काला अधिक संभाषणाची इच्छा नाही . त्याला गृहपाठ पूर्ण करायचा आहे .

“ आत्ता कसला अभ्यास करतो आहेस ? ”

“ खगोलशास्त्र , ” यूर्का तुटकपणे आणि शुष्क आवाजात उत्तरतो . त्याची संभाषणाची इच्छा नसल्याचे त्यातून तो सूचित करतो .

"कशाबद्दल आहे ते ?"

"अंतराळाबद्दल. जिथं आपले अंतराळवीर उडताहेत."

"गागारीन काय ?"

"एकटा गागारीन नव्हे... आता खूप आहेत."

"कशाला तिथं उडतात ते ? काय कारण ?"

"नमस्ते !" यूर्का उद्गारला आणि परत खुर्चीच्या पाठीशी रेलला. "तू कमालच करतोस. मग काय त्यांनी चुलाण्यावर झोपून राहणं चांगलं ?"

"काय सारखा चुलाण्याचा उद्धार करतो आहेस ?" म्हातारा दुखावून म्हणाला. "माझ्या वयापर्यंत जगून बघ आणि नंतर बकबक कर."

"मी तुला दुखावण्याच्या हेतूनं बोललो नाही. पण हा काय प्रश्न झाला : माणसं अंतराळात का उडतात ?"

"तर मग मला समजावून सांग. कशासाठी तुला शिकवतात ? म्हाताऱ्यांवर तू चिडावा म्हणून ?"

"ठीक, तर पहिल्यांदा : अंतराळाचं संशोधन... हे आवश्यक आहे. असा एक काळ येईल जेव्हा माणसं चंद्रावर उतरतील. पुढं असा एक काळ येईल, जेव्हा शुक्रापर्यंत माणसं उड्डाण करतील. आणि शुक्रावर कदाचित माणसांची वस्ती असेल. त्यांना पाहण्यात मजा नाही वाटणार ?"

"ती आपल्यासारखीच आहेत का ?"

"हे मला नक्की माहीत नाही. कदाचित थोडी कुरूप असतील, कारण तिथं वातावरण वेगळं आहे – जास्त दाब आहे."

"आपल्याशी मारामारी करतील ?"

"कशासाठी ?"

"कदाचित म्हणतील : कशाला आलात ?" म्हाताऱ्याचे कुतूहल आता जागे झाले. "अनामंत्रित पाहुणा तातारापेक्षा वाईट !"

"नाही भांडणार. त्यांनासुद्धा आनंद होईल. सर्वांत अधिक हुषार कोण हे अजून माहीत नाही – बहुतेक आपल्यापेक्षा ते लोक जास्त हुषार असतील. तसं असेल तर आपण त्यांच्यापासून शिकू. नंतर, तंत्रशास्त्राचा विकास झाल्यावर आणखी पुढं उड्डाण करू..." खुद्द यूर्कालाही मानवजातीच्या भवितव्याच्या कल्पनेने झपाटले. खुर्चीवरून तो उठला

आणि खोलीत फेऱ्या मारू लागला. "अजून आपल्याला माहीत नाही — पृथ्वीसारखे आणखी किती ग्रह आहेत! कदाचित लाखो असतील! आणि सगळीकडं सजीव सृष्टी असेल. आणि आपण एकमेकांकडं उड्डाणं करू... शेवटी असं होईल... वैश्विक मानवता. सगळे सारखे असू."

"एकमेकांशी लग्नं करणार की काय?"

"मी शिक्षणाबद्दल बोलतोय! कदाचित कुठंतरी एवढी प्रगत माणसं असतील, की त्यांच्यापासून आपण काही शिकू शकू. कदाचित त्यांनी एव्हाना सगळे शोध पूर्ण केलेत आणि आम्ही अजून पहिली पावलंच टाकत आहोत. मग आपण धर्मात ज्याचं स्वर्ग म्हणून वर्णन करतात अशा राज्यात राहू. समज, इथं चुलाण्यावर पडल्या पडल्या तुला तुझ्या मुलांना पहायची इच्छा झाली — नुसतं व्हिडिओ सेटचं बटण दाबायचं, योग्य लहरीवर काटा आणायचा — मुलं समोर हजर. बोल त्यांच्याशी. नातवाचा सांभाळ करायला मुलीकडं जायची इच्छा झाली — छपरावर चढ, छोटंसं हेलीकॉप्टर सुरू कर आणि काही क्ष वेळानंतर मुलीपाशी... नातवाचं वय काय?"

"आठवं लागलंय."

"नातू तुला 'युद्ध आणि शांतता' ही कादंबरी वाचून दाखवील, कारण मुलांचा विकास फार लौकर होईल. वैद्यकाची एवढी प्रगती होईल की, माणसं शंभर — एकशेवीस वर्षांपर्यंत जगू लागतील."

"ए, हे मात्र तू... खोटं बोलतोस!"

"काय म्हणून? उलट आता ह्या समस्येची उकल करताहेत. एकशेवीस वर्षं — हे सर्वसामान्य वय मानलं जातंय. आमच्यापाशी अजून पुरेसा तपशील नाही. आम्ही तारांगणातल्या शेजाऱ्यांकडून तो आणू."

"पण तुम्हाला स्वतःला जमत नाही — एकशेवीस?

"अजून आम्हाला नाही जमलेलं. ही प्रक्रिया फार हळू घडतेय. कदाचित असा टप्पा येईल, जेव्हा आपण एकशेवीस वर्षं जगायला लागू, पण ते इतक्यात घडणार नाही. त्यापेक्षा तारांगणात उडणारं अंतराळयान लौकर बनवता येईल. आणि शक्यता आहे की, हा प्रश्न तिथं एव्हाना सोडवलेला आहे. एखादं औषध त्यांनी शोधून काढलंय..."

"एकशेवीस वर्षं स्वतःलाच नकोशी होतील. कंटाळा येईल."

"तुला नकोशी असतील, पण दुसऱ्यांना आनंदानं हवीशी वाटतील. तसं एखादं औषध असेल..."

"औषध म्हणे... दारूनंतरचा हा आजार नाहीसा करणारं एखादं औषध का नाही शोधत? माझ्या खोपडीत हातभट्टी गाळताहेत असं वाटतंय!"

"माणसानं दारू पिऊ नये!"

"च्यायला तुझी..."

दोघे गप्प झाले.

यूर्का अभ्यासाच्या पुस्तकांपाशी बसला.

"तुमच्या जिभेवर सदा हे होईल नि ते होईल!" म्हाताऱ्याने परत सुरुवात केली. "नुसते वटवटे. तू सोळा वर्षं शिकण्यात घालवणार, पण माणूस मरायला टेकेल तेव्हा काय करशील?"

"काहीतरी कापून काढीन त्याच्या शरीरातून."

"पण त्याची मरायची वेळ झाली असेल, तर काय कापणार तू?"

"मी असल्या... मूर्ख प्रश्नांना उत्तर देत नाही."

"द्यायला उत्तरच नाही, म्हणून!"

"उत्तर नाही?.. मग ही माणसं!.." यूर्काने ओंजळभर पुस्तके गोळा करून दाखवली. "ह्या माणसांपाशीसुद्धा उत्तर नव्हतं? तू ह्यातलं निदान एक तरी पुस्तक वाचलं आहेस?"

"तिथं वाचण्यासारखं काही नाही – सगळ्या थापा!"

"ठीक आहे!" यूर्का परत खुर्चीवरून ताडकन उठला आणि खोलीत येरझाऱ्या घालू लागला. "पूर्वी प्लेग होता?"

"कॉलरा?"

"बरं, कॉलरा."

"होता. पूर्वी वीसनंतरच्या..."

"आता कुठं आहे? आहे?"

"देवा, नको रे बाबा! कदाचित परत यायचा..."

"हीच तर महत्त्वाची बाब आहे, की आता ती साथ येणार नाही. त्याच्याशी सामना कसा करायचा ह्याचा लोकांनी अभ्यास केला. पुढं: जर पूर्वी तुला पिसाळलेला कुत्रा चावला असता, तर तुझं काय झालं असतं?"

"मी पिसाळलो असतो."

"आणि मेला असतास. पण आता – चाळीस इंजेक्शनं आणि सर्व ठीक. माणूस जगतो. क्षय पूर्वी बरा करणं अशक्य मानायचे?

आता तसं नाही – सहा महिने उपचार आणि माणूस परत काकडीसारखा टवटवीत. कुणी हे सगळं शोधलं? शास्त्रज्ञांनी! थापा म्हणे... समजत नसेल तर निदान माणसानं गप्प बसावं!"

यूर्काच्या ह्या हल्ल्याने म्हाताऱ्यालासुद्धा चेव चढला.

"ठीक. मान्य करतो. कुत्र्याच्या बाबतीत तुझं मानतो. पण साप चावला तर?.. पूर्वी डॉक्टर होते? नव्हते. पण म्हातारी मांत्रिक पुटपुटत मंत्र म्हणायची आणि वीष झटक्यात उतरायचं. आणि कुठल्याही इन्स्टिटयूटमध्ये ती शिकलेली नसायची."

"सर्पदंश विषारी नसायचा, म्हणून!"

"जाऊन अनुभव घे. तुला एकदा सापाचा चावा बसला पाहिजे..."

"जरूर! त्यापूर्वी मी इंजेक्शन घेईन आणि मग खुशाल त्या सापाला हवे तेवढे दंश करू देत. मी फक्त हसत राहीन."

"बढाईखोर!"

"पण ह्यांना पहा!" यूर्काने परत पुस्तके दाखवली. "लोकांनी स्वतःवर प्रयोग केले. तुला माहीत आहे – जेव्हा अकादमीशिअन पावलोव मरत होते, तेव्हा त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना बोलावून घेतलं आणि ते कसे मरत होते ह्याचं वर्णन करून विद्यार्थ्यांना लिहून घ्यायला लावलं."

"म्हणजे?"

"म्हणजे असं – म्हणाले: 'आता माझे पाय गार पडताहेत, लिहून घ्या.' विद्यार्थ्यांनी लिहून घेतलं. नंतर हात बधीर झाले. ते म्हणाले: 'हात बधीर झाले.'"

"आणि पोरं लिहून घेत होती?"

"होय. नंतर हृदयाचे ठोके कमी पडू लागले. ते म्हणाले: 'लिहा.' मुलं रडत होती आणि लिहून घेत होती." यूर्काच्या डोळ्यांमध्येही पाणी तरळू लागले. म्हाताऱ्यावरही ह्या निवेदनाचा फार परिणाम घडला.

"मग?"

"आणि ते वारले. पण शेवटच्या मिनटापर्यंत सगळं तपशीलवार सांगत राहिले, कारण शास्त्रासाठी हे आवश्यक होतं. नाहीतर तुम्ही तुमच्या मांत्रिक बायांबरोबर आणखी हजार वर्ष अडाणीच राहिला असतात... म्हणे पूर्वी असं होतं आणि पूर्वी तसं होतं!

"असं होतं पूर्वी?" यूर्काने रेडिओपाशी जाऊन कळ फिरवली.

कुणी गायिका गात होती. "कुठं आहे ती? इथं तर नाही ती!"

"कोण?"

"ही... गाणं म्हणतेय ती!"

"हा आवाज तारांमधून येतो..."

"ह्या रेडिओलहरी आहेत! तारांमधून म्हणे! तारांमधून फक्त आपल्या इथं, खेड्यात. पण ती कुठं तरी कदाचित साखालीनमध्ये गात असेल. मग काय तिथपर्यंत तारा ताणणार?"

"तारा. गेल्या वर्षी मी वान्काकडं गेलो होतो. तिथं पाहिलं: सबंध रेलरस्त्याच्या कडेनं तारा बांधलेल्या. खांबांना."

यूर्काने हात झटकला.

"तुला समजावून सांगण्यात अर्थ नाही. मला गृहपाठ करायचाय. पुरे आता."

"मग कर अभ्यास."

"पण तू मला अडथळा आणतोस." यूर्का खुर्चीवर बसला, त्याने दोन्ही कानांवर हात धरले आणि वाचायला आरंभ केला.

घरात खूप वेळ शांतता नांदली.

"त्याचा फोटो आहे?" म्हाताऱ्याने विचारले.

"कुणाचा?"

"त्या शास्त्रज्ञाचा – मरत होता त्याचा."

"अकादमीशिअन पावलोव? हा बघ."

यूर्काने म्हाताऱ्याच्या हाती पुस्तक दिले व पावलोव यांचे छायाचित्र दाखवले. म्हातारा खूप वेळपर्यंत आणि लक्षपूर्वक ते चित्र निरखत राहिला.

"वय झालं होतं त्याचं."

"म्हातारपणीसुद्धा ते खणखणीत होते, दारू पिऊन झिंगत नव्हते... काही माणसांसारखे." यूर्काने पुस्तक परत घेतले. "आणि नंतर चुलाण्यावर पडून आईमाईच्या शिव्या घालत नव्हते. शेवटच्या क्षणापर्यंत, आजारी पडेपर्यंत, नऊ काठ्यांचा खेळ खेळत होते. आणि प्रतिक्षिप्त क्रिया दाखवण्यासाठी त्यांनी किती कुत्र्यांवर शस्त्रक्रिया केल्या! ... मज्जासंस्था हा त्यांचा संशोधनाचा विषय. आत्ता तू आजारी का आहेस?"

"अति दारू प्यायल्यामुळं! मला हे पावलोवशिवायही माहीत आहे."

"अति दारू प्यायल्यामुळं हे तर स्पष्टच आहे, पण काल तू स्वतःच्या मज्जासंस्थेला दाबून टाकलंस, थांबवलंस आणि आज ती... परत थाऱ्यावर येतेय. तुझ्यात सवयीची प्रतिक्षिप्त क्रिया निर्माण झालीय: पेन्शन मिळाली रे मिळाली, की हमखास अर्धा लिटर. त्याशिवाय आता तुझं चालत नाही." दारू पिण्यामुळे किती अपाय घडत होता हे म्हाताऱ्याला शांतपणे समजावून सांगणे शक्य झाल्याबद्दल यूर्का एक विशिष्ट समाधान अनुभवत होता. म्हातारा ऐकत होता. "तर तू काय केलं पाहिजेस? ह्या प्रतिक्षिप्त क्रियेवर मात केली पाहिजेस. पोस्टात पेन्शन मिळालं? घरी निघालास... आणि तुझे पाय आपोआप तुला गावातल्या दारूच्या दुकानाकडं घेऊन जातात. पण मन घट्ट कर आणि सरळ दुकान ओलांडून जा. किंवा दुसऱ्याच रस्त्यानं जा."

"माझी परिस्थिती आणखी वाईट होईल."

"एकदा त्रास होईल, दोनदा-तीनदा त्रास होईल, मग सवय होईल. दारूच्या दुकानावरून शांतपणं येऊ शकशील आणि स्वतःच स्वतःला हसशील."

म्हातारा उठला, थरथरत्या बोटांनी त्याने सिगारेट वळली आणि पेटवली. त्याने एक जोरदार झुरका मारला व तो खोकू लागला.

"च्यायला... खॉक! आई ग, सगळं आतडं पिळवटतंय! काय भोग आलेत नशीबी!"

यूर्का परत अभ्यासाची पुस्तके घेऊन बसला.

म्हातारा खोकत खोकत चुलाण्यावरून खाली उतरला, त्याने पायात बूट घातले, अंगात मेंढकातडी कोट चढवला, हातात सुरी घेतली व बाहेरच्या आच्छादित व्हरांड्यात गेला.

"आता कुठं गेला हा?" यूर्काच्या मनात विचार आला.

म्हातारा बराच वेळ गायब होता. सुरी घेऊन म्हातारा कुठे गेला हे पाहण्यासाठी यूर्का एव्हाना उठून जायच्या बेतात होता. तेवढ्यात खुद्द म्हाताराच परत आला. त्याच्या हातात तळपंजाएवढ्या आकाराचा डुकराच्या चरबीचा तुकडा होता.

"पाव आहे का?" त्याने करड्या आवाजात विचारले.

"आहे. कशाला?"

"घे, चरबीबरोबर पाव खा. नाहीतर वर्षाच्या आत तुझ्या त्या

अकादमीशिअनापाठोपाठ वर जाशील... सगळयांचा अभ्यास करायच्या आधीच."

यूर्का पुरता भांबावून गेला.

"पण मी परत कसा करू? आमच्या घरी चरबी नाही..."

"खा. चुलाण्यावर चहाची किटली आहे. मला वाटतं अजून गरम आहे... व्यवस्थित खा."

यूर्काने चुलाण्यावरची चहाची किटली घेतली, अजून गरम असलेला चहा कपात ओतला, पावाचे आणि चरबीचे तुकडे कापले व खाऊ लागला. म्हातारा परत कष्टाने चुलाण्यावर चढला व तेथून यूर्काकडे पाहू लागला.

"डुकराची चरबी कशी आहे?"

"खूप छान! पहिल्या प्रतीची!"

"डुकराला कसं खाऊ घालायचं ते माहीत पाहिजे. काही मूर्ख माणसं डुकराला शरदाच्या मोसमातच खायला घालायला सुरवात करतात. मग नुसती चरबीच, मांसाचा पत्ताच नाही. काहीजण उलट वागतात – जनावराची ते उपासमार करतात – मांस जास्त असावं म्हणून. प्रत्येकाला चरबी आवडतेच असं नाही. मग ते डुक्कर कापतात तेव्हा ना मांस ना चरबी. खरं म्हणजे आठवडाभर डुकराला नीट खाऊ घालावं, मग अर्ध्या शिध्यावर थोडे दिवस ठेवावं, नंतर परत आठवडाभर व्यवस्थित खायला द्यावं आणि परत शिधा कमी करावा... म्हणजे थर मिळतात – एक चरबीचा, तर दुसरा मांसाचा. आणि मीठ लावण्यातसुद्धा कसब आहे..."

यूर्का ऐकत होता आणि आनंदाने थंडगार चविष्ट चरबी चघळत होता. खरेच ती अत्यंत चवदार होती.

"वा! मस्त! खूप उपकार झाले तुमचे!"

"पोट भरलं?"

"हो." यूर्काने टेबलावरील पाव, किटली ह्या वस्तू काढल्या. चरबीचा तुकडा अजून थोडा उरला होता. "हे कुठं ठेवू?"

"बाहेर व्हरांड्यात घेऊन जा आणि टीपात ठेव. संध्याकाळी आणखी खा."

यूर्का चरबीचा उरलेला तुकडा बाहेर घेऊन गेला. परत येऊन त्याने स्वतःचे पोट थोपटले आणि आनंदाने तो म्हणाला:

"आता डोकं जास्त चांगलं काम करील... नाही तर बसून बसून थोडी चक्कर यायला लागते."

"बघितलंस," पाठीवर परत उताणे झोपत म्हातारा म्हणाला. "च्यायला... आहाहा! निजलं रे निजलं की सुरवात होते."

"मी छोटी चवथा-हिस्सा बाटली विकत आणून देऊ का?" यूर्काने सुचविले.

म्हातारा गप्प राहिला.

"काही नाही... जाईल निघून. नंतर कोंबड्यांना थोडे दाणे टाक आणि गायीला एक-दोन पेंड्या गवत टाक. मात्र जाताना फाटक बंद करायला विसरू नको."

"बरं. आता आणखी काय राहिलं? भूगोल. आत्ता त्याचा फन्ना उडवू!" यूर्काला हुरूप चढला होता. त्याला खायला छान मिळाले होते, अभ्यास जवळ जवळ संपला होता – संध्याकाळी बर्फावर घसरपट्ट्या घेऊन चकरा मारायला हरकत नव्हती.

"त्याला कुणी नात्यागोत्याचं नव्हतं?" अचानक म्हाताऱ्याने विचारले.

"कुणाला?" यूर्काला समजले नाही.

"त्या अकादमीशिअनाला. फक्त विद्यार्थी तिथं उभे होते?"

"पावलोवना? होते, कदाचित. मला नक्की ठाऊक नाही. उद्या शाळेत विचारीन."

"मुलं तर होती की नाही त्याला?"

"बहुतेक. उद्या माहीत करून घेतो."

"अर्थातच होती. भोवती सगेसोयरे कुणी नसते, तर फारसा मजकूर त्याला सांगता आला नसता. एकट्याला अवघड जातं!"

यूर्काने वाद घातला नाही. तो म्हणू शकला असता: विद्यार्थी होतेच की! पण तो पुढे काही विरोधी बोलला नाही.

"अर्थातच," त्याने मान्य केले, "एकट्याला अवघड जातं!"

# दुःख

उन्हाळयात अशी एक वेळ येते: दवण्याचा असा घमघमाट सुटतो, की अक्षरशः डोके फिरते. विशेषतः रात्री. चंद्र चमकतोय, निवांत... पण मनात मात्र हुरहुर, कसलीतरी अधीर अपेक्षा. अशा अफाट, चांदण्या, उन्मादक रात्री मन मोकळेपणाने, धीटपणे, मधुरपणे विचार करते. खरे म्हणजे हे विचार करणे नसते; काहीतरी वेगळेच. तो कल्पनांचा खेळ असतो, काहीतरी अद्भुताची वाट पाहणे असते. परसदारीच्या वाफ्यात काटेरी फुलांच्या आणि झुपकेदार पानांच्या एखाद्या झुडूपामागे गुपचूप बसून रहायचे आणि काळजात रहस्यमय आनंद उचंबळत असतो. त्या आनंदाचे कारण मात्र समजत नाही. अशा रात्री आपल्या आयुष्यात फार थोड्या येतात ह्याचे वाईट वाटते. त्यांच्या आठवणी राहतात.

अशी एक रात्र सबंध आयुष्यभर आठवणीत राहिलीय.

मी तेव्हा बारा वर्षांचा होतो. परसदारीच्या वाफ्यात गुडघ्यांभोवती हातांची मिठी घालून हट्टाने डोळयात पाणी येईपर्यंत चंद्राकडे टक लावून पहात बसलो होतो. अचानक कानांवर आवाज आला: जवळच कुणीतरी हलकेच रडत होते. मी डोकावून पाहिले, तेव्हा आमचा शेजारी म्हातारा नेचाय दृष्टीस पडला. छोट्या चणीचा, हडकुळा आणि हातमागाच्या सुताच्या लांब सदऱ्यातील नेचाय रडत, स्वतःशी पुटपुटत जात होता.

नेचाय आजोबाची बायको तीन दिवसांपूर्वी वारली होती. म्हातारी अगदी शांत, बिनतक्रारी होती. ते दोघेच रहात, त्यांची मुले पांगली होती. म्हातारी नेचायखा शांतपणे जगली आणि शांतपणे मेली. सकाळी लोकांना समजले: "अरे नेचायखा आजी... काल रात्री मेली..." थडगे खणले, नेचायखा आजीची कफनपेटी थडग्यात सोडली, त्यावर

माती लोटली आणि – संपले. ती कशी दिसायची हे आता मलासुद्धा धड आठवत नाही. आवारात फिरत कोंबड्यांना साद घालायची. कुणाशी कधी भांडण नाही, खेड्यात कधी गोंधळ माजवला नाही. पूर्वी होती – आणि आता नाही. कायमची निघून गेली.

...त्या चांदण्या सुरेख रात्री मला समजले की, एकाकी माणसाला आयुष्य किती असह्य बनते. जरी भोवती तसे सुंदर वातावरण असले, उबदार आणि आरामदायी जमीन असली, घाबरण्यासारखे काहीही नसले, तरीसुद्धा.

मी मागे लपलो.

म्हाताऱ्याचा गुडघ्यांपेक्षा खाली गेलेला लांब सदरा चांदण्यात अधिकच शुभ्र भासत होता. तो हळूहळू चालत होता आणि बाहीने डोळे पुसत होता. मला तो ठळक दिसत होता. तो माझ्यापासून जवळच बसला. मी त्याचे पुटपुटणे ऐकू लागलो.

"काही हरकत नाही... आत्ता चित्त शांत होईल... मग शांतपणं गप्पा मारू," म्हातारा हळू आवाजात म्हणाला, पण तरीही त्याच्या डोळ्यातील आसवे थांबत नव्हती. "तिसरा दिवस आज... काय करावं तेच समजत नाही. हातून काहीही घडत नाही!"

तो किंचित शांत झाला.

"फार दुःख होतंय, प्रास्कोव्या. शेवटच्या क्षणी काहीच का बोलली नाहीस? मनात काही अपमान ठेवलास? सांगून टाकलं असतंस, तर माझं मन हलकं झालं असतं. आता नको नको ते विचार येतात..." तो गप्प झाला. "तुला स्वच्छ आंघोळ घातली, छान कपडे घातले – सगळं व्यवस्थित केलं. तुझ्या चुलतभावानं, सेर्गेयनं कफनपेटी बनवली. खूप रडले सगळे. अर्थात मर्तिकाला माणसं फार नव्हती हे खरं. बेदाणे घालून भात शिजवला. आणि टोकाशी, दादोवनापाशी, तुला पुरलं. जागा छान, कोरडी आहे. माझ्यासाठीसुद्धा मी तिथं जागा निवडून ठेवलीय. पण आता एकट्यानं काय करू? काही कळत नाही. घर बंद करून सेर्गेयकडं जाऊ का?.. पण ते धोक्याचं. तो स्वतः ठीक आहे, पण त्याची बायको... तुला माहीतच आहे. ती काही बोलायची नाही, पण घशात घास अडकायचा. काय तरी संकट!.. काय देतेस सल्ला?"

स्तब्धता.

मी घाबरलो. मी वाट पाहू लागलो – नेचायखा आजी आपल्या मधुर, सहनशील आवाजात आत्ता बोलू लागेल!

"मी तर्क करतोय," नेचाय आजोबा पुढे बोलू लागला, "आता कुठं आसरा धुंडाळू? सगळं संपवून टाकावंसं वाटतं. काल रात्री जरा डुलकी लागली, तेवढ्यात तू दिसलीस: टोपलीत अंडी घेऊन आवारातून चालत येत होतीस. मी निरखून बघितलं: अंडी नव्हती, तर कोंबडीची छोटी छोटी जिवंत पिलं होती. आणि तू एकेक पिलू खायला सुरवात केलीस. आणि वर वाहव्वा करत होतीस किती चवदार म्हणून! बाप रे! मला जाग आली... तुला झोपेतून उठवणार होतो, तू आता नाहीस हेच विसरलो. प्रास्कोव्या... थुत् तुझी!.." नेचाय आजोबा परत रडू लागला. मोठ्यांदा. माझ्या सबंध अंगातून शहारा गेला. लांब हेल काढून तो विव्हळत होता. "अँ... अँ... ऊ... ऊ... गेलीस? पण विचार केला नाहीस: आता मी कुठं जाऊ? निदान मला सांगायचंस... मी शहरातून डॉक्टरला बोलावून आणलं असतं... माणसं आजारातून बरी होतात. पण तू – ना एक शब्द, ना अर्धा शब्द – एकदम ताठ झालीस! मीसुद्धा तसं करू शकतो..." नेचायने नाक शिंकरले, डोळे पुसले आणि उसासा टाकला. "तिथं फार त्रास आहे का प्रास्कोव्या? इथं परत यायची इच्छा होते का? म्हणून माझ्या स्वप्नात येतेस. तुझी मला सारखी स्वप्नं पडतात... पण नीट वागत जा. नाहीतर कोंबडीची पिलं काय खातेस... देवा रे देवा! इथं..." नेचाय हळूच पुटपुटला, मला अर्धे शब्द ऐकू आले नाहीत. "पापकर्म आहे, पण काय बिघडलं? लोकांना चुकून जिवंत पुरतात असं ऐकलंय मी. क्रायूश्कीनोमध्ये एका बाईला असं पुरलं... कण्हायला लागली. थडगं उकरलं तर ती जिवंत आढळली. गेल्या दोन रात्री तुझ्या थडग्यापाशी येऊन कान देऊन बसलो होतो: पण सामसूम. नाहीतर माझा विचार होता... काहीवेळा फार विचित्र गाढ झोप लागते आणि लोकांना वाटतं, माणूस मेला... खरं म्हणजे माणूस मेलेला नसतो, त्याला गाढ झोप लागलेली असते..."

आता मात्र मी पुरता घाबरलो. मी सरपटत सरपटत परसदारातून बाहेर पडलो आणि माझ्या आजोबापाशी धूम ठोकली. माझ्या आजोबाला मी सर्व हकीकत सांगितली. आजोबाने अंगात कपडे घातले आणि आम्ही दोघे घराच्या मागे गेलो.

"तो स्वतःशी बोलतो किंवा तिच्याशी?" आजोबाने मला विचारले.

"तिच्याशी. आता कसं वागायचं याबद्दल तिचा सल्ला विचारतो..."

"म्हाताऱ्या बोकडाचं डोकं फिरेल. खरंच जाऊन थडगं उकरायचा. झिंगला होता का?"

"नाही, तो झिंगलेला असला म्हणजे गाणी गातो आणि देवाच्या गोष्टी बोलतो." मला ते माहीत होते.

आमच्या पावलांचा ऐकून नेचाय गप्प झाला.

"कोण आहे इथं?" आजोबाने कडक आवाजात विचारले.

नेचायने खूप वेळ उत्तर दिले नाही.

"मी विचारतो – कोण आहे इथं?"

"काय पाहिजे तुला?"

"नेचाय, तू?"

"हो..."

आम्ही त्याच्यापाशी गेलो. तातार पद्धतीने मांडी घालून नेचाय बसला होता. त्याने आमच्याकडे वर नजर टाकली – आमचे येणे त्याला मुळीच आवडले नव्हते.

"आणखी कोण होतं इथं?"

"कुठं?"

"इथं... तू कुणाशीतरी बोलत होतास. मी ऐकलं."

"तुला काय करायच्यात नसत्या चौकशा?"

"आत्ता मी एक काठी घेतो आणि तुला घरापर्यंत पिटाळत नेतो – म्हणजे मूर्खपणा करणार नाहीस. एवढा म्हातारा झालास आणि वेड्यासारखं वागतोस... लाज नाही वाटत?"

"मी तिच्याशी बोलतोय, दुसऱ्या कुणाला त्रास देत नाही."

"कुणाशी बोलतोस? ती नाही आता! बोलायला कुणीच नाही! मेलं माणूस – आता जमिनीत आहे."

"ती माझ्याशी गप्पा मारते, मला तिचं बोलणं ऐकू येतं," नेचाय हट्टाने म्हणाला. "आम्हाला उगीच त्रास देऊ नको. निष्कारण पाळत ठेवतात, चोरून ऐकतात..."

"हे बघ, चल माझ्याबरोबर." आजोबाने हलकेच नेचायला जमिनीवरून उठवले. "माझ्या घरी चल, माझ्यापाशी घरच्या दारूची बाटली आहे. आपण पिऊ या. मन हलकं होईल."

नेचाय आजोबाने विरोध केला नाही.

"फार कठीण जातंय गड्या, माझ्यात आता बळ उरलं नाही." तो पुढे चालत होता, अडखळत होता आणि हाताने सतत आसवे पुसत होता. मी त्याची दु:खाने वाकलेली पाठमोरी आकृती पहात होतो आणि मलासुद्धा रडू फुटले होते. पण माझ्या रडण्याचा आवाज येत नव्हता, नाहीतर आजोबाची टप्पल खावी लागली असती. नेचायची मला खूप दया आली.

"कुणाला सोपं जातं?" आजोबा त्याचे सांत्वन करत होते. "आपल्या जवळच्या माणसाला जमिनीत गाडायला कुणाला सोपं जातं? पण दु:खानं वेडंपिसं होऊन मेलेल्याशेजारी सगळेच थडग्यात उड्या टाकायला लागले, तर काय होईल बरं? मी आतापर्यंत किती वेळा उडी मारायला पाहिजे होती थडग्यात? सहन कर. दात घट्ट आवळ आणि सहन कर."

"वाईट वाटतं."

"अर्थात, वाईट वाटणार... नाही असं कोण म्हणतो? पण आता काहीही उपयोग नाही. फक्त स्वत:ला त्रास होईल आणि तूही खपशील."

"तसं मला सारं समजतं... पण इथं गच्च आवळून बसलंय आणि गाठ सुटत नाही. प्रयत्न केला – दारू पिऊन बघितलं: काही जमत नाही."

"जमेल. सेर्गेय का नाही आला? दुसरी मुलं खूप लांब राहतात तेव्हा समजण्यासारखं आहे. पण हा तर?.."

"कचेरीच्या कामासाठी फिरतीवर गेलाय. गड्या, फार त्रास होतो रे! कधी विचारसुद्धा आला नव्हता!"

"आपण नेहमीच असं वागतो: माणूस जिवंत असतो तेव्हा सगळं नेहमी तसंच राहणार असं वाटतं. आणि माणूस मेला म्हणजे वाईट वाटतं. पण दु:खापायी वेडं बनणं... हासुद्धा मूर्खपणा!"

ती सुंदर, निवांत रात्र ह्या मिनिटापासून माझ्या दृष्टीने शून्यवत ठरली. माझे सगळे सुंदर विचार विरले. आनंदाची गूढ जाणीव नष्ट झाली. त्या छोट्या चणीच्या म्हाताऱ्याच्या दु:खाने सबंध जगावर सावट टाकले. फक्त एकच आठवते: दवण्याचा उग्र कडू दर्प मात्र तसाच दरवळत होता.

आजोबाने नेचायला आमच्याच घरात ठेवून घेतले. एका मोठ्या मेंढकातडी पांघरुणाखाली ते दोघे शेजारी शेजारी खाली झोपले.

"तुला एक हकीकत सांगतो," माझा आजोबा हळू आवाजात बोलू लागला. "तू कधी लढाईवर गेला नाहीस – तिथं काय घडतं हे तुला माहीत नाही ... बंधू, तिथं इथल्यापेक्षा फार वाईट गोष्टी घडतात. हाच एक प्रसंग घे: मी स्ट्रेचर वाहून न्यायचं काम करत होतो. घायाळ लोकांना पिछाडीला उचलून नेत होतो. एकदा असेच चाललो होतो. आमची 'स्टूडबेकेर' खच्चून भरली होती. सगळे कण्हत होते, हळू जा म्हणून विनवत होते ... पण माझ्याच वयाचा आमचा ड्रायव्हर मिकोलाय इग्नीनेव ट्रकचा तोल कसाबसा सांभाळत होता. माघार घेत होतो त्यामुळं सावकाश जाणंही शक्य नव्हतं. रस्त्याच्या एका फाटया-पाशी आलो, तर पुढयात एक छोटी मोटार उभी. ऑफिसरनं आम्हाला हातानं थांबायची खूण केली. पण आम्हाला कडक हुकूम होता: सैतान आडवा आला तरी थांबायचं नाही! आणि ते योग्यच होतं. आणखी कितीतरी घायाळ माणसं रणांगणावरून उचलून न्यायची वाट पहात पडली होती. चढाई होत असती तर गोष्ट वेगळी, पण आमची माघार चालली होती. आम्ही तसेच पुढे गेलो, तेव्हा त्या छोटया मोटारीनं आमचा पाठलाग करून आम्हाला गाठलं आणि ऑफिसरनं अक्षरश: पिस्तूल रोखून आम्हाला थांबवलं. अशक्य ठरल्यामुळं आम्ही थांबलो. असं आढळलं की, त्यांच्यापाशी एक अत्यंत घायाळ ऑफिसर होता आणि त्यांना दुसऱ्या दिशेला जायचं होतं. आम्हाला थोपवणाऱ्या ऑफिसरनं आणि मी मिळून त्या घायाळ ऑफिसरला आमच्या ट्रकमध्ये कसंबसं कोंबलं. मिकोलाय केबिनमध्ये बसला होता. त्याच्या शेजारीही एक कप्तान अत्यंत वाईट परिस्थितीत पडलेला होता. मिकोलाय एका हातानं त्याला सावरून धरत होता आणि दुसऱ्या हातानं चाक फिरवत होता. इकडं ज्याला आम्ही नुकतंच ट्रकमध्ये कोंबलं होतं, त्याचीसुद्धा वाईट अवस्था होती. मी माझ्या मांडीवर त्याचं डोकं धरलं होतं – रक्तानं त्याचं डोकं संपूर्ण माखलं होतं. तेव्हा मला वाटलं होतं – तो इस्पितळापर्यंत जगणार नाही. तरुण लेफ्टनंट होता. नुकताच दाढी घोटायला लागला असावा. शेवटी इस्पितळापर्यंत पोचलो – घायाळांना ट्रकमधून उतरवू लागलो ..." आजोबा खाकरला आणि गप्प बसला ... त्याने सिगारेट पेटवली. "मिकोलायसुद्धा मदत करू लागला ... त्या लेफ्टनंटला मी त्याच्या हाती दिला आणि ... म्हणालो, काही उपयोग नाही ... तो मेलाय! मिकोलायनं त्या लेफ्टनंटचा चेहरा पाहिला

मात्र ...” सुस्कारा टाकून आजोबा परत गप्प झाला. खूप वेळ दोघे गप्प होते.

“त्याचा मुलगा होता काय?” नेचाय आजोबाने हळूच विचारले.

“होय.”

“अरे देवा!”

“हं ...” माझा आजोबा नाकात फुरकला. त्याने भराभरा सिगारेट-चे पाच झुरके मारले.

“मग काय झालं?”

“आम्ही दफन केलं त्याचं ... कमांडरनं मिकोलायला घरी जायला आठवडाभर सुटी दिली. तो घरी गेला. पण मुलाचा अंत्यसंस्कार केल्याचं बायकोला त्यानं सांगितलं नाही. कागदपत्रं आणि पदकं लपवून ठेवली. आठवडाभर घरी राहून लढाईवर परत गेला.

“का सांगितलं नाही त्यानं बायकोला?”

“सांगितलं असतं तर! .. पण दुसऱ्या तऱ्हेनं तिच्या मनात आशा राहिली ... बेपत्ता म्हणजे मेला असं नव्हे! नाही सांगू शकला. सांगून टाकावं असं त्याला कितीतरी वेळा वाटलं, पण शक्य झालं नाही.”

“देवा रे देवा,” परत नेचाय आजोबाने उसासा टाकला. “तो स्वतः तरी जिवंत राहिला?”

“कोण? मिकोलाय? माहीत नाही. आमची वेगवेगळ्या ठिकाणी पाठवणी झाली त्यानंतर ... तर ही अशी हकीकत. खुद्द स्वतःच्या मुलाला! .. काय सोपं गेलं? अगदी तरुण होता ...”

म्हातारे गप्प बसले.

खिडकीमधून चंद्राचा मृत गंभीर प्रकाश सतत पाझरत होता. चमक-तोय! इथे आनंद असो वा दुःख असो – तो चमकतोय!

# हट्टी

मोन्या क्वासोवने कुठल्यातरी पुस्तकात वाचले की, सतत चालणारे इंजिन अशक्य आहे आणि तेथून सगळयाचा आरंभ झाला. अमूक अमूक कारणांसाठी – त्यातले एक म्हणजे घर्षण अस्तित्वात आहे. मोन्या... इथे खुलासा करणे आवश्यक आहे की, त्याला मोन्या हे नांव कसे पडले. त्याला मीतका म्हणून हाक मारत, द्मित्री. पण त्याची आजी त्याला मित्री म्हणायची आणि लाडाने कधी कधी मोतका, मोत्या म्हणायची. तेव्हा त्याच्या मित्रांनी त्याचे रूपांतर मोन्या असे केले – एक तर ते अधिक सोपे होते आणि सतत फिरणाऱ्या व चळवळया मीतकाला मोन्या हे नांव अधिक योग्य होते. ह्या नांवामुळे इतरांपासून त्याचे वेगळेपण चटकन प्रस्थापित व्हायचे आणि त्याचा हट्टी, अस्वस्थ स्वभाव ठळकपणे दिसायचा.

मोन्याने वाचले की, "सतत चालणारे इंजिन" अशक्य आहे. त्याने वाचले की, अनेक लोकांनी तसे इंजिन बनविण्याचा तरीसुद्धा प्रयत्न केला होता... वेगवेगळया काळांमधील "सतत चालणाऱ्या इंजिनां" ची आरेखने त्याने काळजीपूर्वक अभ्यासली. आणि तो विचारात गुंतला. घर्षण आणि यंत्रशास्त्राचे नियम यांच्याकडे त्याने दुर्लक्ष केले. पण पूर्वी कधीही न बनवलेले असे "सतत चालणारे इंजिन" बनविण्याच्या कल्पनेने त्याला झपाटले. असे इंजिन बनविणे अशक्य आहे ह्यावर त्याचा काही कारणाने विश्वासच बसत नव्हता. कुठल्याही समंजस विचाराबाबत त्याचे असे व्हायचे... कोणताही समंजस विचार तो मान्य करायचा नाही आणि स्वतःशी म्हणायचा: "ठीक आहे, मला फिकीर नाही..." आत्तासुद्धा त्याच्या मनात आले: "खचा:! .. अशक्य म्हणजे काय?"

मोन्याला सव्वीसावे वर्ष लागले होते. तो त्याच्या आजीबरोबर रहायचा. अर्थात कुठेतरी त्याचे आई-बाप होते, पण तो लहान असतानाच आजीने त्याला स्वतःपाशी ठेवून घेतले होते (त्याचे आई-बाप सतत विभक्त व्हायचे आणि परत एकत्र यायचे) आणि लहानाचे मोठे केले होते. मोन्या खेड्यात सातवीपर्यंत शिकला, मग दीड वर्ष शेतकी तंत्रविद्यालयात शिकला, तेथे आवडले नाही म्हणून शिक्षण सोडून सैन्यात भरती होईपर्यंतच्या काळात सामुदायिक शेतावर काम करत राहिला. सक्तीच्या लष्करी सेवेत तो ड्रायव्हरचे काम शिकला होता आणि आता सरकारी शेतावर ड्रायव्हर म्हणून काम करत होता. मोन्याचे केस तांबूस-पिवळे होते, गालांची हाडे उंच होती आणि खोल छोटे डोळे होते. त्याचा जबडा जोरदारपणे पुढे आला होता व त्यामुळे तो तापट आणि हट्टी दिसायचा. तर त्याच्या बाबतीत नेहमी जे घडायचे, ते आता घडले: जर त्याच्या कपाळात एखादी कल्पना घुसली – मग ॲकॉर्डियन वाजविण्याची असो, अथवा गेल्या वर्षी घडले त्याप्रमाणे कायद्यानुसार ०.१५ हेक्टर खाजगी मालकीची जमीन मान्य न करता ०.१७ हेक्टर-साठी तो भांडत राहिला – तेवढी जमीन त्याची आणि त्याच्या आजीची होती व म्हणून त्याने आपले कुंपण घरापाशी सरकवायचे होते – तर अशा कोणत्याही कल्पनेने मोन्या एकदा झपाटला, म्हणजे मग त्याला दुसरे काहीही सुचत नसे. ॲकॉर्डियन कसे वाजवायला शिकायचे अथवा ती ०.०२ हेक्टर अभागी जमीन गमावू नये म्हणून कोणत्या युक्त्या करायच्या, ह्यातच तो सर्वस्वी गुंतून जायचा. आणि नेहमी तो आपले म्हणणे खरे करायचा. आता ह्या इंजिनाबाबत तसेच घडले: मोन्याला भोवतालच्या सर्व गोष्टींचा विसर पडला. महान संशोधनाच्या कामी त्याने स्वतःला वाहून घेतले. तो कोणतेही काम करत असला – लॉरी चालविणे, जेवणे, टेलीव्हिजन पाहणे – तरी त्याच्या मनात सतत विचार होते इंजिनाबद्दलचे. एव्हाना त्याने जवळ जवळ दहा आराखडे बनवले होते, पण स्वतःच एकामागून एक रद्द केले होते. विचारचक्र जोरात चालू होते. मोन्या रात्री ताडकन उठायचा आणि कुठल्यातरी चाकाचा आराखडा बनवू लागायचा... त्याच्या संशोधनांमध्ये तो परत परत चाकाकडे वळायचा; त्याने थेट चाकापासून सुरुवात केली होती आणि ते चाक अखंडपणे कसे फिरत राहील ह्याचे नवनवे मार्ग तो शोधत होता.

अखेरीस त्याला मार्ग सापडला. तो असा: एक चाक घ्या, उदाहरणार्थ सायकलचे चाक आणि त्याला आडव्या आसावर बसवा. मग चाकाच्या कडेशी एक सरकती फळी ४५° कोनात घट्ट बसवायची, म्हणजे वजन, उदाहरणार्थ एक किलो वजन, फळीवरून सहजपणे फिरू शकेल. आता जर चाकाच्या आसाला धातूची एक सळई जोडली अथवा सांधली... जेणेकरून सळईचे दुसरे मोकळे टोक सरकत्या फळीवरील फिरणाऱ्या वजनावरून जाईल... थोडक्यात, सरकत्या फळीवरील गतिमान वजन सळईशी स्पर्शले म्हणजे ते सळईला ढकलेल अथवा धक्का न देता तिला चिकटेल. आणि सळई आसाला जोडलेली आहे, म्हणून ती आसाला फिरवील व त्यामुळे चाक गोल फिरू लागेल. ह्याचा अर्थ चाक आपोआप फिरत राहील.

मोन्याला ही कल्पना रात्री सुचली... तो ताडकन उठला. चाकाचे, सरकत्या फळीचे, सळईचे आणि वजनाचे आराखडे त्याने रेखाटले. पण त्याला खास आनंद झाला नाही, फक्त आश्चर्य वाटले: एवढा वेळ त्यांनी कशासाठी डोकेफोड केली! अत्यंत अभिमानाने आणि शांतपणे त्याने खोलीत येरझाऱ्या घातल्या. केवळ चड्डीत तो फिरत होता. मग खिडकीच्या चौकटीत बसून त्याने एक सिगारेट ओढली. रस्त्यावरचा गरम वारा खिडकीमधून आत येत होता. पुढच्या बागेतील भोजाची कोवळी झाडे डुलत होती आणि सळसळत होती. हवेत धुळीचा वास भरला होता. अचानक मोन्याच्या मनःचक्षूंसमोर त्याच्या मायभूमीचे, रशियाचे, चित्र उभे झाले–एक असीम मैदान. आणि खिशात हात घालून, संथ पावलांनी तो त्या मैदानावरून चालत होता. सभोवती पहात तो नुसता चालत होता, आणखी काहीही नाही. आणि ह्या नुसत्या चालण्यात मोन्याला स्वतःची थोरवी दिसत होती. माणूस असा धरतीवरून चालतो–आरडाओरडा नाही, आनंदाच्या आरोळ्या नांहीत, फक्त सभोवार पहात स्वतःच्या वाटेने चालत जायचे. मग लोकांना उशीरा खेद होईल: केवढ्या थोर माणसाकडे त्यांनी दुर्लक्ष केले! केवढा माणूस!–मोन्याने आणखी काही फेऱ्या मारल्या... जर चड्डीऐवजी त्याने विजार घातलेली असती, तर त्याने हात खिशात घातले असते व तो तसा चालत राहिला असता. त्याला तसे करावेसे वाटले, पण केवळ तेवढ्यासाठी विजार चढवायचा त्याने आळस केला. तो आळस नव्हता, तर त्याला उगीच अवडंबर माजविण्याची इच्छा नव्हती.

एका शांततेने, विलक्षण प्रभावी शांततेने, मोन्याचा कबजा घेतला. तो पलंगावर आडवा झाला, पण सकाळपर्यंत त्याला झोप लागली नाही. स्वतःच्या इंजिनाला आता त्याने हात लावला नाही – सर्व काही स्पष्ट होते. पांघरुणावर पडून खिडकीतून तारे पहात राहिला. सकाळच्या प्रहराला गरम वारा थोडा निवला होता, आता उबदार वाटत होते आणि घुसमटत नव्हते. काळोखे आकाश फिकट बनले व लौकरच धुतलेल्या फिकट निळ्या वस्त्राप्रमाणे दिसू लागले... आणि पहाटेची ती भित्री, तात्पुरती खास शांतता खिडकीबाहेर पसरली. पण लौकरच त्या शांततेचा भंग झाला – जवळपासच्या फाटकांची करकर सुरू झाली, मग विहीरींच्या साखळ्या खणखणल्या आणि रहाटांचे आवाज सुरू झाले... माणसे जागी होऊ लागली. मोन्या अजून तसाच पलंगावर पडून खिडकीबाहेर पहात होता. तसे काहीच बदलले नव्हते, पण आयुष्य किती प्रिय, मौल्यवान बनले होते. च्यायला, अगदी नकळत, तुमच्या भोवतीच्या सगळ्या गोष्टी अचानक अद्भुत बनतात, अत्यंत मौल्यवान बनतात! मोन्या आणखी अर्धा तास पडून राहिला आणि नंतर तोसुद्धा उठला. अजून तसा लौकरचा प्रहर होता, पण तरीही यापुढे झोप लागणे शक्य नव्हते.

टेबलापाशी बसून त्याने स्वतःचे आराखडे पाहिले... आश्चर्य म्हणजे त्याला हुरहुर वाटत नव्हती अथवा आनंदही झाला नव्हता. मनात विलक्षण शांतता नांदत होती. मोन्याने सिगारेट पेटवली, खुर्चीवर मागे रेलून तो बसला व काडीने दात कोरू लागला – अगदी उगीच; रात्री जे काही प्रचंड घडले होते आणि आता टेबलावर छोट्या आराखड्यांच्या रूपाने जे पडले होते, त्यावर ह्या क्षुल्लक कृतीने ठसा देण्याचा त्याचा यत्न होता. मोन्या स्वतःवर खूष होता: सतत चालणाऱ्या इंजिनाचा आराखडा समोर पडला होता आणि तो संथपणे दात कोरत होता. तर हे असे होते, प्रिय कॉम्रेडहो!.. ह्या भल्या सकाळी तुमच्या बायकांशेजारी गरम परांच्या बिछान्यांवर खुशाल निजा! वेडपटांनो, खुशाल मोठमोठ्यांदा घोरत पडा! मग स्वतःवर खूष होत रोजच्या कामांना लागाल, फालतू उद्योगांमध्ये गुंतून पडाल आणि जणू काही फार विचार करताय अशा थाटात कपाळांना आठ्या घालाल. ओ-हो-हो! तुम्हाला विचार करणेसुद्धा जमते? ठीक, ठीक. अर्थात जमते: हात धुण्यासाठी ती टांगती भांडी तुम्हीच शोधलीत. केवढी प्रचंड

बुद्धिमत्ता पाहिजे असा शोध लावायला... हाय! जनहो, जनहो! मोन्या उपहासाने हसला आणि हात-तोंड धुण्यासाठी गेला – माणसाने शोधलेल्या त्या वस्तूकडे.

नंतर सबंध सकाळ मोन्या तशा उपरोधिक मनःस्थितीत राहिला. आजीच्या लक्षात आले की, सकाळपासून स्वारीचा नूर काहीसा वेगळाच होता... ती उत्साही, खंबीर म्हातारी होती. मोतकावर तिचे प्रेम होते, पण उघडपणे त्या प्रेमाचे प्रदर्शन ती कधीही करत नसे. ती स्वतःसुद्धा लोकांबद्दल साध्या रीतीने विचार करायची: जगतात, चतकोर भाकरीचा तुकडा मिळवतात, आणि वेळ आली म्हणजे मरतात. महत्त्वाचे म्हणजे जेव्हा कठीण काळ येतो, तेव्हा आयुष्यावरची पकड सैल करायची नाही आणि वेळ निभावून न्यायची. उदाहरणार्थ, पूर्वी युद्धकाळात ती असे वागली होती: एका सामुदायिक शेताच्या धान्य-कोठारात फरशीवर फट पडल्याचे तिच्या ध्यानात आले होते आणि त्या फटीतून धान्य सांडत होते. कोठाराची मागील बाजू रस्त्यापाशी होती आणि तेथे रस्त्यावर खाजकुयलीच्या झुडुपांचे व गवताचे तण माजले होते. एका रात्री ह्या तणामधून वाट काढत काढत ती धान्यापाशी पोहोचली. कोठार खूप उंच होते, जमिनीपासून त्याची फरशी वर होती आणि एका माणसाला त्यात सहज घुसता येत होते. फटीतून खाली सांडलेले धान्य तिने पोत्यात भरून घेतले व सुरीने फट अधिक रुंद केली... पुढचा आठवडा प्रत्येक रात्री ती पोते घेऊन तेथे जात होती. स्वतःचा आणि नातवाचा त्यावर तिने बराच काळ निर्वाह चालविला. त्या भयाण उपासमारीच्या काळात रात्रीच्या वेळी ती हे धान्य खलबत्त्यात घालून कुटायची, भोजाच्या सालींमध्ये पीठ मिसळायची आणि पाव भाजायची. अशा रीतीने तिने मृत्यू टाळला. मोतका तिला स्वतःच्या मुलासारखा होता, कदाचित त्याहून जास्त प्रिय होता, कारण आता दुसरे जवळचे असे कुणी उरले नव्हते. अर्थात मुलगी होती, मोतकाची आई होती (म्हातारीचे दोन मुलगे युद्धात ठार झाले), पण ती स्वतःच्या नवऱ्याबरोबरच्या अस्थिर जीवनात फार गुरफटलेली होती, शहरी जीवनात अडकली होती, म्हातारीच्या दृष्टीने पूर्ण निरुपयोगी बनली होती व खेड्याकडे अजिबात फिरकली नव्हती. तेव्हा ती असून-नसून सारखीच होती.

"आज तू असा काय रे?" न्याहरीच्या वेळी आजीने विचारले.

"कसा ?" मोन्याने शांतपणे आणि नम्रपणे विचारले.

"स्वतःवर खूष दिसतोस. ऊन खाणाऱ्या बोक्यासारखा... काहीतरी छान स्वप्न पडलं होतं काय ?"

मोन्याने थोडा वेळ विचार केला... आणि मग गूढपणे म्हणाला:

"मला स्वप्न पडलं की, माझ्या हातपेटीत मला दहा हजार रूबल सापडले."

"काय बाई तुझं एकेक!" म्हातारी हसली, थोडा वेळ गप्प बसली व मग तिने विचारले: "मग, त्या पैशाचं तू काय करशील ?"

"काय ?.. तू काय करशील ?"

"मी तुला विचारतेय!"

"हं... नाही, तू काय केलं असतंस तेच सांग! तुला सर्वांत प्रथम काय पाहिजे ?"

"मला काहीही नको. कदाचित घराची दुरुस्ती करीन..."

"त्यापेक्षा नवीन घर बांधणं जास्त चांगलं. इथं काय दुरुस्त करणार – सगळं कुजून गेलंय."

आजीने उसासा टाकला. खूप वेळपर्यंत ती गप्प बसली.

"कुजलंय हे खरं... पण इथंच माझं आयुष्य सरणार. आता फार दिवस नाही उरले. एव्हाना मी विचार केलाय, मला इथून कसं घेऊन जातील त्याचा..."

"झाली सुरवात!" नाराजीने मोन्या म्हणाला. त्याचेही आजीवर प्रेम होते, जरी त्याची त्याला कधी फारशी जाणीव नव्हती. पण आजीमधील एक गोष्ट त्याला आवडत नसे: आगामी मरणाबद्दलचे तिचे बोलणे. शारीरिक दुबळेपणा, प्रकृती-अस्वास्थ्य अथवा सर्वनाशाची भावना, ह्यामुळे तसे बोलली असती तर एवढे वाटले नसते. पण प्रत्यक्षात आजीला जगण्याची प्रचंड हौस होती, मरणाचा तिला तिटकारा होता, पण मरणासमोर नम्रतेचा आणि दुबळेपणाचा ती आव आणत होती. "काय झालं परत तुला ?"

चतुर म्हातारी खोटया नम्रतेने हसली.

"काय त्यात ? मी काय दोनशे वर्षं जगणार आहे ? येणारच कधी तरी..."

"ठीक आहे, यायचं तेव्हा येईल. आधीपासूनच कशाला त्याबाबत बडबडत बसायचं ?"

म्हातारीला ह्या विषयावर खूप बोलावेसे वाटत होते, पण मोन्याला त्याचा विलक्षण तिटकारा होता, एवढीच तिची खंत होती. तिला त्याच्याशी गप्पा मारायला आवडायचे. तो खूप हुषार मुलगा होता असे तिचे मत होते आणि खेड्यातील लोक तसे मानत नव्हते ह्याचे तिला आश्चर्य वाटायचे.

"मग, काय स्वप्न पडलं?"

"काही नाही... सकाळ छान आहे, म्हणून मी आनंदात आहे, एवढंच."

"ठीक आहे. तरुण आहेस तोवर कर मजा. एकदा म्हातारपण आलं म्हणजे संपला सगळा आनंद."

"काही हरकत नाही!" न्याहरी संपवत मोन्या मोठ्यांदा, बेफिकीर आवाजात उद्गारला. "आम्ही अजून... दाखवू त्यांना! अजून आम्ही काहीतरी सांगू!"

आणि मोन्या गॅरेजकडे निघाला. पण वाटेत त्याने तरुण इंजिनिअर आंद्रेय निकोलायेविच गोलूबेवच्या घरी डोकावण्याचे ठरवले. शेताच्या ट्रॅक्टर दुरुस्ती खात्यात इंजिनिअर काम करीत असे. तो बाहेरून आलेला होता, बुद्धिमान होता, अर्थात काहीसा दुर्मुखला होता, पण उगीच बढाया मारणारा नव्हता. मोन्याने एक-दोनदा त्याच्याशी चार शब्दांची देवघेव केली होती आणि इंजिनिअर त्याला आवडला होता.

इंजिनिअर या क्षणाला आवारामध्ये स्वतःच्या फटफटीशी काहीतरी खुटखुटत होता.

"रामराम रे!" मोन्या म्हणाला.

"नमस्कार!" इंजिनिअरने पटकन प्रतिसाद दिला नाही. त्याने मोन्याकडे नाराजीचा कटाक्ष टाकला. कदाचित मोन्याचे जवळिकीचे एकेरी संबोधन त्याला आवडले नसावे.

"होईल सवय," मोन्याने विचार केला. "अजून तरुण आहे."

"एका विषयावर चर्चा करायला आलोय," आवारात प्रवेश करत मोन्या पुढे म्हणाला.

इंजिनिअरने परत त्याच्याकडे कटाक्ष टाकला.

"कोणता विषय?"

"शास्त्रज्ञांचं अखंड चालणाऱ्या इंजिनाबद्दल काय मत आहे?" मोन्याने तात्काळ सुरुवात केली. तो एका ओंडक्यावर बसला आणि

सिगारेटचे पाकीट त्याने पुढे केले... इंजिनिअरकडे वर पहात तो पुढे म्हणाला: "काय?"

"अखंड चालणारं इंजिन म्हणजे काय?"

"अखंड गतीबद्दल बोलतोय मी. अजून जे बनवू शकले नाहीत असं साधं अखंड चालणारं यंत्र."

"मग? त्याचं काय?"

"सध्या ह्याबाबत काय विचार करतात?"

"कोण करतंय विचार?" इंजिनिअरचा पारा वर चढू लागला होता.

"शास्त्रज्ञांचं जग... एकूण. ही समस्या त्यांनी बाजूला सारली काय?"

"अजिबात विचार करत नाहीत. दुसरा काय उद्योग उरला नाही, म्हणून ह्यावर विचार करायचा?"

"म्हणजे, समस्या बाजूला टाकली?"

इंजिनिअर परत फटफटीकडे वळला.

"होय. बाजूला टाकली."

"हे जरा लौकर झालं नाही का?" मोन्या त्याला संभाषणापासून दूर जाऊ देत नव्हता.

"काय लौकर झालं?" इंजिनिअरने परत कटाक्ष टाकला.

"बाजूला टाकणं. समस्या!"

इंजिनिअरने मोन्याला लक्षपूर्वक न्याहाळले.

"अखंड चालणाऱ्या इंजिनाचा तू शोध लावलास की काय?"

आणि मोन्यानेसुद्धा इंजिनिअरला लक्षपूर्वक न्याहाळले. आणि मुंग्यांच्या वारूळात काठी खुपसावी त्याप्रमाणे इंजिनिअरच्या पदवीधारी डोक्यावर त्याने शब्द फेकला:

"होय."

वर न उठताच इंजिनिअरने मोन्याकडे नजर लावली... आणि उघडपणे हसून त्याने मोन्यावर उलट प्रहार केला – अगदी अचूक आणि खवचटपणे:

"अभिनंदन!"

मोन्या अस्वस्थ बनला. स्वतःच्या शोधाबद्दल त्याच्या मनात शंका निर्माण झाली असे नव्हे, पण अखंड गतीचे इंजिन अशक्य आहे ही

कल्पना लोकांच्या मनात किती खोल रुजली आहे हे पाहून तो बेचैन झाला होता. एखाद्याने असे यंत्र शोधले तरी लोक आग्रहाने नकार देत राहतील असे त्याला वाटले. अशा लोकांशी वाद घालणे खेदजनक आणि व्यर्थ होते. लोकांसमोर विश्वासाने मन उघडे केल्यानंतर, त्यांच्या हल्ल्यापासून स्वतःला इजा होऊ नये म्हणून हट्टी आणि निग्रही वागणे, एवढेच मोन्याचे आत्मसंरक्षणाचे एकमेव साधन होते.

"आणि पुढं काय?" मोन्याने विचारले.

"कोणत्या अर्थानं?"

"तू माझं अभिनंदन केलंस... आता पुढं?"

"पुढं – पाठव त्याला नेहमीच्या मार्गानं... टप्प्याटप्प्यानं ढकल त्याला... एव्हाना तू बनवलंस काय? किंवा नुसत्या कल्पनेतच आहे?"

"कल्पनेत आहे."

"अस्सं..." डोके हलवत इंजिनिअर हसला. "तर मग हालचाल कर आता... लिहून काढ अथवा काय कर ते मी कसं सांगू..."

मोन्या थोडा गप्प राहिला. इंजिनिअरच्या हसण्यामुळे तो दुखावला होता.

"कशा प्रकारचं यंत्र आहे ह्याबद्दल तुला कुतूहल नाही वाटत? निदान त्याची तत्त्वं तरी विचारायचीस... तू इंजिनिअर आहेस ना स्वतः? खरंच तुला ह्यात काही गम्य वाटत नाही?"

"नाही," ठामपणे इंजिनिअर म्हणाला. "मुळीच गम्य नाही."

"का?"

इंजिनिअर फटफटीपासून दूर झाला, त्याने हात फडक्याला पुसले, फडके लाकडाच्या ओंडक्यांवर फेकले आणि सिगारेटसाठी स्वतःचे खिसे चाचपले. मोन्याकडे खाली पहात तो म्हणाला:

"तरुण माणसा... तू म्हणाला होतास की, तंत्रविद्यालयात काही दिवस शिकत होतास..."

"दीड वर्ष."

"पाहिलंस... मग अशी फालतू वटवट कशी करतोस? स्वतः ड्रायव्हर आहेस, तंत्रशास्त्राशी तुझी ओळख आहे... खरंच तुझा तुझ्या इंजिनावर विश्वास आहे?"

"त्याच्या कार्याचं तत्त्वसुद्धा तू मला विचारलं नाहीस आणि एकदम त्याला निकालात काढलंस!" मोन्या चकित होऊन म्हणाला.

त्या क्षणापासून हट्टीपणा त्याचा ताबा घेत होता हे त्याला जाणवले. छातीत गाठ बसल्याची परिचित जाणीव त्याला झाली. अप्रिय थंडपणा आणि तणाव त्याला छळू लागला.

"जाणून घ्यायची माझी इच्छा नाही."

"का?"

"कारण हा मूर्खपणा आहे. आणि तुला स्वतःला हा मूर्खपणा समजला पाहिजे."

"पण समज, हा मूर्खपणा नसला तर?"

"तपासून बघ. खात्री करून घे आणि मग ये... तुझ्या कार्याच्या तत्त्वासकट. पण जर माझा सल्ला मागत असशील, तर ही खात्री करून घेण्यावरसुद्धा वेळ वाया घालवू नको."

"सल्ल्याबद्दल आभार." मोन्या उठला. "एकूण भल्या शब्दांबद्दल..."

"बघितलंस..." काहीशा खेदाने, पण तरीही ठामपणे इंजिनिअर म्हणाला. "तुम्हाला एका शब्दानं दुखावण्याची सोय नाही. आणखी सांगत सुटशील की, मला इन्स्टिटयूटमध्ये शिकवलं..."

"इथं इन्स्टिटयूटचा काय संबंध! मी तुझ्यापाशी काही संदर्भासाठी आलो नव्हतो."

"मग काय ही... हौस म्हणायची!" इंजिनिअर उद्गारला. "जवळ जवळ नऊ वर्षं शिकलास... आणि म्हणे अखंड चालणारं इंजिन. काय म्हणू? एव्हाना अशा गोष्टी समजल्या पाहिजेत. तुला काय वाटतं. जर अखंड चालणारं इंजिन बनवणं शक्य असतं, तर एव्हाना त्याचा शोध लागला नसता?"

"सगळे हाच युक्तिवाद करतात: अशक्य आहे, संपलं. आणि हात झटकून मोकळे..."

"हात नाही झटकले, खूप पूर्वीच दाखवून दिलंय: अशक्य! ठीक आहे, माणूस चौथीपर्यंतच शिकलाय, पण तू तर साडेआठ वर्षं शिकलास! असं कसं काय?" इंजिनिअर आता पुरता चिडला होता आणि चीड लपविण्याचा त्याने प्रयत्न केला नाही. मोन्याकडे संतापाने आणि कठोरपणे तो पहात होता. त्याने प्रश्न केला: "साडेआठ वर्षं तू काय करत होतास?"

"एका पायावरून दुसऱ्या पायावर उड्या मारत होतो," मोन्या-

सुद्धा चिडून म्हणाला. त्यानेही इंजिनिअरच्या डोळयांना डोळे भिडवले. "सभेत बोलल्यासारखं काय बोलतोस? कसला दिमाख दाखवतोस? मी तुला कुठंही वर ढकलायच्या विचारात नाही."

"बघितलंस..." मोन्याच्या संतापाने आणि हट्टीपणाने इंजिनिअर किंचित वरमला, पण त्याचा स्वतःचा राग मुळीच शमला नाही. "बोलायची तर अक्कल आहे... म्हणजे अगदीच अडाणी नाहीस. मग त्या अखंड चालणाऱ्या यंत्राबद्दल निष्कारण एवढा गोंगाट कशाला माजवतोस? माणसं तुला हसतील." इंजिनिअरने सिगारेट खाली फेकली, तिच्यावर जोराने पाय आपटून तिला चुरडली आणि परत फटफटीकडे मोर्चा वळवला.

मोन्या आवारामधून बाहेर पडला.

ह्या इंजिनिअरने त्याला स्तंभित केले होते. त्याच्याकडून खरडपट्टी निघाल्याबद्दल त्याला लाज वाटली व आता इंजिनिअरचा त्याला विलक्षण राग आला... सर्वांत वाईट म्हणजे अखंड चालणाऱ्या इंजिनाबद्दल त्याला शंका वाटू लागली. तो थेट घरी गेला—आराखडे पहायला. खाली पाहून झपझप चालत होता. तशी शरम यापूर्वी कधीही वाटली नव्हती. सकाळच्या बेफिकीर, निःशंक आत्मसमाधानाच्या भावनेची त्याला लाज वाटत होती. सगळी व्यवस्थित खात्री करून घ्यायला हवी होती. त्या समाधानी मनःस्थितीत इंजिनिअरकडे जाण्याचा त्याने मूर्खपणा केला होता. अर्थात, आधी सर्व खात्री करून घ्यायला हवी होती.

आजी घरात नव्हती. छानच झाले. नाही तर एकदम काळजीत पडली असती, त्याच्यावर प्रश्नांचा मारा केला असता... मोन्या टेबलापाशी बसला व त्याने आराखडे जवळ ओढले. काय चुकले होते? वजन—तिथे होते—सळईवर दाब देत होते... दाब देत होते ना? दाबत होते. कसे काय दाबत नाही? तर मग काय करतेय? मोन्याला इंजिनिअरचा प्रश्न आठवला: साडेआठ वर्षं काय करत होतास?" त्याने संतापून बसल्या जागी हालचाल केली, पण परत स्वतःच्या शोधावर लक्ष एकवटले. मग? वजन सळईवर दाब देते, त्यामुळे सळई सरकते... सरकते. आणि तिचे दुसरे टोक आसाला गच्च सांधलेले आहे... उगीच का शिवीगाळ! का हे अशक्य? आता मोन्या उत्तेजित बनला. अधीरतेने त्याला झपाटले. बरोबर, साडेआठ वर्षे तो शिकला होता हे अगदी

खरे! पण हे यंत्र! मोन्या खुर्चीवरून ताडकन उठला आणि खोलीत फेऱ्या मारू लागला. त्याला समजत नव्हते: असे कसे ते लोक? वजन सळईला दाबत नाही आणि त्यामुळे सळई सरकत नाही, हे सिद्ध करून दाखवू देत. का सरकणार नाही? सरकते हे तुम्हाला मान्य आहे? तर मग आस... थू:! काय करावे ते मोन्याला समजत नव्हते. काही-तरी करणे आवश्यक होते – नाहीतर ह्या सर्व भानगडीपायी काळीज फुटले असते. ताणापायी कातडी फाटली असती. मोन्याने आराखडा उचलला व तो घराबाहेर पडला. तो कुठे निघाला होता हे अद्याप त्याला माहीत नव्हते. इंजिनिअरकडे तो गेला असता, पण एव्हाना इंजिनिअर निघून गेला असणार. कदाचित अजून गेला नसेल? मोन्या परत इंजिनिअरकडे गेला. परत तो झपझप चालत होता. आता लाज वाटत नव्हती, पण त्याच अधीरतेने त्याला झपाटले होते. धावण्याचा मोह त्याने कसाबसा आवरला. तसा मोन्या थोडासा धावलाही – गल्लीत, जेथे लोक नव्हते.

आवारात आता फटफटी नव्हती. मोन्या संतापला. कुठल्यातरी हेतूपेक्षा अधिक यांत्रिकपणे तो इंजिनिअरच्या घरात शिरला. घरा-मध्ये तरुण मालकीण एकटीच होती. ती नुकतीच झोपेतून उठली होती, अजून गाऊनमध्येच वावरत होती, तिचा चेहरा झोपेमुळे सुजलेला होता, केस विंचरलेले नव्हते.

"नमस्ते," मोन्या म्हणाला. "नवरा निघून गेला?"

"हो."

मोन्या तेथून जायला निघाला होता, पण थांबला.

"तुम्ही शिक्षिका आहात ना?" त्याने विचारले.

यजमानीण चकित झाली.

"हो. काय झालं?"

"कुठला विषय शिकवता?"

"गणित."

घरमालकीणीला लाजवणाऱ्या तेथील अव्यवस्थेकडे मुळीच लक्ष न देता, खुद्द घरमालकीणीकडे ध्यान न देता – तिने अद्याप वेणी-फणी केलेली नव्हती – मोन्या थेट टेबलापाशी गेला.

"जरा ह्यावर नजर टाका... तुमच्या नवऱ्याबरोबर माझा ह्याच्यावर वाद झाला... इकडं या."

ती तरुण बाई काही वेळ अनिश्चितपणे उभी राहिली व मोन्याकडे पहात राहिली. ती सुरेख आणि गुबगुबीत होती.

"काय?" मोन्याने विचारले.

"मामला काय आहे?" शिक्षिकेने टेबलापाशी येत विचारले.

"बघा," मोन्या तिला आराखडा समजावून देऊ लागला. "ही सरकती फळी चांगल्या दर्जाच्या पत्र्याची बनवलेली आहे. ठीक? तिला हे असं... ह्या कोनात चाकाशी जोडलंय. आता इथं आपण वरती वजन ठेवलं... आणि ही सळई आसाला सांधली आहे. वजन सरकायला लागतं, सळईला ढकलू लागतं... ते सळईला ढकलणार, होय की नाही?"

"दाबणार..."

"दाबणार! ह्या वजनामुळं सळई सरकणार, होय ना? तर मग आस काय करील? गोल फिरेल? आणि चाक? चाक आसाला घट्ट बसवलंय..."

"हे काय, अखंड चालणारं यंत्र की काय?" शिक्षिका चकित झाली.

मोन्या खुर्चीवर बसला. शिक्षिकेकडे त्याने पाहिले आणि तो गप्प राहिला.

"हे काय?" तिने विचारले.

"तुम्ही आत्ता स्वतःच सांगितलंत!"

"अखंड चालणारं यंत्र?"

"हो."

शिक्षिकेने आश्चर्याने स्वतःच्या ताज्या ओठांना मुरड घातली आणि खूप वेळपर्यंत आराखडा निरखून पाहिला... खुर्ची ओढून तीसुद्धा बसली.

"काय?" मोन्याने सिगारेट पेटवत विचारले. त्याच्या छातीत परत धडधड सुरू झाली होती, पण आता ती आनंदापायी आणि अधीरते-पायी होती.

"चाक फिरणार नाही," शिक्षिका म्हणाली.

"का?"

"अजून माहीत नाही... त्यासाठी गणितं मांडली पाहिजेत. ते फिरणार नाही."

मोन्याने स्वतःच्या गुडघ्यावर जोरात मूठ आपटली ... तो उठला व खोलीत येरझाऱ्या घालू लागला.

"मंडळी!" तो बोलू लागला. "मला समजत नाही: एक तर तुम्ही अति शिकलात, किंवा ... का फिरणार नाही?" मोन्या थांबला आणि बाईच्या डोळयांमध्ये थेट पाहू लागला. "का?"

बाईसुद्धा त्याच्याकडे चिंतातुर नजरेने पहात होती. ती थोडीशी घाबरलेलीही दिसत होती.

"ते फिरावं अशी तुमची इच्छा आहे?" तिने विचारले.

तिने हे मूर्खपणाने विचारले होते ह्याकडे मोन्याने दुर्लक्ष केले आणि परत आपलेच घोडे पुढे दामटले:

"का फिरणार नाही ते?"

"माझ्या नवऱ्यानं तुम्हाला काय सांगितलं?"

"नवऱ्यानं ... काहीही सांगितलं नाही. त्यानं मला भाषण ठोकायला सुरवात केली." परत मोन्या आराखड्यावर झुकला. "तुम्ही सांगा, चाक का ... वजन दाबतंय?"

"दाबतंय."

"दाबतंय. ह्या दाबामुळं सळई ..."

"जरा थांबा," मोन्याचे बोलणे शिक्षिकेने अर्ध्यावर तोडले. "कशाला इथं आपण तर्क करत बसलो आहोत? पदार्थविज्ञानाचे शिक्षक, अलेक्सान्द्र इवानोविच आपल्याला अगदी सोप्या रीतीनं समजावून देतील ... तुम्हाला माहीत नाहीत ते?"

"माहीत आहेत."

"इथून जवळच तर राहतात."

मोन्याने आराखडा उचलला. पदार्थविज्ञानाचे शिक्षक कुठे राहतात हे त्याला माहीत होते.

"मात्र माझ्यासाठी जरा थांबा, ठीक आहे?" शिक्षिकेने विनंती केली. "मी तुमच्याबरोबर येते. मलासुद्धा ह्यात रस वाटू लागलाय."

मोन्या खुर्चीवर बसला.

शिक्षिका चुळबुळली ...

"मला कपडे बदलायचे आहेत ..."

"अरे हो," मोन्याच्या डोक्यात प्रकाश पडला. "अर्थातच. मी बाहेर व्हरांड्यात थांबतो." मोन्या बाहेरच्या दारापाशी गेला,

पण उंबरठ्यावरून मागे वळून पहात हसून म्हणाला: "काय उद्योग आहे नाही? आं?"

"मी आत्ता आटपते," बाई म्हणाली.

पदार्थविज्ञानाचे शिक्षक गेकमान अत्यंत दयाळू गृहस्थ होते. उत्तेजित मोन्याची कहाणी त्यांनी सस्मित चेहऱ्याने ऐकून घेतली. मोन्याचे बोलणे संपल्यानंतर त्यांनी आराखडा पाहिला.

"बघा!.." तरुण शिक्षिकेला ते मन:पूर्वक कौतुकाने म्हणाले. "किती छान विचार केलेला आहे! आणि तुम्ही म्हणता..." आणि ते मोन्याकडे वळले. स्वत:चे विचार समजावून सांगताना हळू हळू त्यांचा उत्साहसुद्धा वाढत गेला: "इथं पहा—तुमच्या आराखड्यात मी काहीही बदल करणार नाही, फक्त छोट्या दुरुस्त्या सुचवतो. तुमची सरकती फळी आणि तुमचं वजन मी काढून घेतो. ह्या फळीऐवजी चाकाला मी आणखी एक सळई आडवी बसवणार, ही अशी," गेकमाननी स्वत:चे चाक रेखाटले आणि त्याला सळई जोडली. "आपण ती चाकाला अशी जोडू. ठीक?" गेकमान खूप खूष होते. "आता आपण ह्या आडव्या सळईला एक स्प्रिंग जोडणार—अशी." गेकमाननी स्प्रिंग रेखाटली. "आणि दुसऱ्या टोकाला..."

"असं यंत्र मी पुस्तकात पूर्वी पाहिलंय," मोन्याने शिक्षकांना थोपवले. "तसं चाक फिरणार नाही."

"अस्सं!" शिक्षक आनंदाने उद्‌गारले. "का बरं?"

"स्प्रिंग दोन्ही बाजूंनी सारखाच दाब देईल."

"म्हणजे एक गोष्ट स्पष्ट झाली. आता तुमचा नमुना घेऊ—वजनासकट. सरकत्या फळीवर वजन आहे आणि सळईवर ते दाब देतं. पण वजन स्प्रिंगप्रमाणंच आहे हे तुम्ही ध्यानात घेतलं, तर सर्व स्पष्ट होईल. तुमचं वजन सळईवर आणि सरकत्या फळीवर सारखाच दाब देतं, जास्त नाही अथवा कमी नाही. चाक फिरणार नाही."

मोन्याचा ह्यावर विश्वास बसेना.

"असं कसं होईल?" तो उद्‌गारला. "तुम्हाला काय झालंय? वजन फळीवरून नुसतं घसरतं, फळी आणखी अचूक कोनात बसवता येईल आणि वजन सळईवर पडतं. पण तुम्ही म्हणता, ते सारखंच?" मोन्या क्रुद्ध नजरेने शिक्षकमहाशयांकडे पहात होता. पण शिक्षक विलक्षण आनंदात होते.

"होय!" सस्मित मुद्रेने ते उद्‌गारले. यंत्रशास्त्राचे नियम एवढे अपरिवर्तनीय होते ह्याचाच जणू त्यांना आनंद झाला होता. "ते सगळं सारखंच आहे! तुम्हाला जो फरक वाटतो तो केवळ बाह्य फरक आहे, पण जरा बारकाईनं पाहिलंत, तर पूर्ण साधर्म्य आढळून येईल."

"तुम्ही आणि तुमचा सारखेपणा, चुलीत जा!" मोन्या अत्यंत कडवटपणे म्हणाला. त्याने आराखडा हिसकावून घेतला व तो तरातरा निघून गेला.

घराच्या दिशेने तो परत झपझप चालत होता. एकूण सगळा कट भासत होता. केवळ सैतानालाच खरे काय ते ठाऊक! त्या सगळ्यांनी मिळून करार केला होता. त्याचे चाक हमखास फिरणार हे शेंबड्या पोरालासुद्धा स्पष्ट होते. पण ती माणसे मान्य करायला तयार नव्हती. काय करणार?

मोन्या घरी धावत आला, आज प्रकृती बरी नाही अशी एक चिठी त्याने खरडली, परसदारीच्या वाफ्यात आजीला शोधून काढले, सरकारी शेताच्या कचेरीत तिला त्या चिठीसकट धाडले. आजीला काही खुलासा करण्याच्या भानगडीत तो पडला नाही. पडवीत जाऊन अखंड चालणारे यंत्र बनविण्याच्या उद्योगाला तो लागला.

आणि त्याने ते बनविले. संध्याकाळी खूप उशीरापर्यंत तो खपत होता. कंदिलाच्या उजेडात त्याने काम पूर्ण केले. त्याने आपली सायकल सोडवली (त्याला एक चाक पाहिजे होते), एका जुन्या जस्ताच्या बादलीपासून सरकती फळी बनवली, सळई न सांधता बोलटच्या मदतीने जोडली – सर्व काही त्याच्या योजनेप्रमाणे त्याने पार पाडले.

मोन्याने कंदील थोडा अधिक उंचीवर टांगला, स्वतःच्या चाकापाशी लाकडाच्या एका ठोकळ्यावर तो बसला आणि सिगारेट ओढू लागला. मग कोणत्याही रीतीने उत्तेजित न होता पायाने त्याने चाक ढकलले. काही कारणाने त्याने आपल्या यंत्राला पायाने ढकलून पहिली गती दिली. मग आरामशीरपणे भिंतीला टेकून फिरणारे चाक तो पाहू लागला. पण चाक थोडेसे फिरले आणि मग थांबले. मोन्याने परत त्याला गती दिली – ह्यावेळी हातांनी. त्याला पुनःपुन्हा चाकाला गती द्यावी लागत होती व चकचकीत काड्यांच्या त्या चमकत्या वर्तुळाकडे

तो आश्चर्याने व वाढत्या तिटकाऱ्याने पहात होता. ते वर्तुळ थांबत होते. दुसऱ्या वजनाची आवश्यकता होती असे मोन्याला वाटले. सरकती फळी आणि वजन त्यांचा समतोल साधायचा होता. त्याने त्यानुसार फेरफार करून पूर्ण ताकदीनिशी चाक परत फिरवले. पण थोड्याच वेळात चाक थांबले. चाकाचा चुराडा करण्याची मोन्याला तीव्र इच्छा झाली, पण त्याने संयम केला. आणखी थोडा वेळ तो तेथे बसून राहिला. मग अत्यंत हताश आणि पराभूत मनाने तो उठला आणि पाय नेतील तिकडे चालू लागला.

...तो नदीकिनाऱ्यापाशी येऊन बसला आणि छोटे गोटे गोळा करून काळया पाण्यावर फेकू लागला. नदीचे पाणी संथ नव्हते. लव्हाळयांशी झोंबत, खळखळ आवाज करत, समोरच्या तीराशी अंधारात उसासे टाकत, पाण्याचा प्रवाह धावत होता. सारी रात्र तो स्वतःशी पुटपुटत, अस्वस्थपणे वाहात होता. मधल्या धारेपाशी प्रवाह वेगवान होता तेथे पाणी चमकत होते, पण किनाऱ्यापाशी मात्र गोट्यांना हिंदकळत, जणू झुडुपांमधून कसलातरी शोध घेत, काहीवेळा संतापाचे चीत्कार काढत, तर काहीवेळा हलकेच हास्य करत पाणी वाहात होते.

मोन्याच्या मनाला मुळीच यातना होत नव्हत्या. उलट एकटे बसून राहणे त्याला आवडत होते. सगळे त्याला हसले होते आणि यापुढे हसणार होते: माणसे जरी असाधारण मूर्खपणाच्या गोष्टी करत असली, तरी सबंध खेड्यात अखंड चालणाऱ्या यंत्राचा शोध लावण्याचा खटाटोप केला नव्हता. आता काही काळपर्यंत त्यांना चेष्टेला विषय मिळाला होता. खुशाल करोत चेष्टा. लोकांची थट्टा केली पाहिजे. खूप कष्ट करणारी माणसे आहेत, त्यांना मनोरंजनाची खास साधने नाहीत. खुशाल हसोत. ह्या रात्री का कुणास ठाऊक, पण मोन्याला लोकांविषयी प्रेम जाणवत होते. अजिबात खेद न करता तो लोकांविषयी विचार करत होता. लोकांशी नेहमी एवढे वाद त्याने घालायला नको होते, असेसुद्धा त्याला वाटले. कशाला वाद घालायचा? माणसाने जगावे, स्वतःचा क्रूस मुकाट वाहून न्यावा... स्वतःबद्दलही त्याला थोडे वाईट वाटले.

पहाट फुटेपर्यंत मोन्या नदीतीरावर बसून राहिला. स्वतःच्या अपयशाबद्दल त्याला मुळीच चिंता वाटत नव्हती. त्याने नदीच्या पाण्यात हात-तोंड धुतले, तीराचा चढ चढून नदीकिनारीच्या रस्त्याने तो चालू

लागला. परत एकदा हेतूशून्यतेने तो भटकत होता. त्याला झोपण्याची इच्छा नव्हती. मोन्याच्या मनात विचार आला: लग्न केले पाहिजे, मुलांना – निदान तीन – जन्म दिला पाहिजे आणि ती कशी वाढतात ते पाहिले पाहिजे. आणि शांती प्राप्त केली पाहिजे. म्हणजे तसे सावकाश आणि भारदस्तपणे चालता येईल, प्रत्येक गोष्टीकडे निवांतपणे, मनसोक्तपणे, किंचित उपहासाने पाहता येईल. मोन्याला शांतस्वभावी शेतकरी फार आवडायचे.

आता पुरते उजाडले होते. इंजिनिअरच्या घरापाशी आपण कसे पोहोचलो हे मोन्याच्या ध्यानात आले नाही. अर्थात तो मुद्दाम तेथे आला नव्हता. सहज फिरता फिरता तो तेथपर्यंत आला होता आणि आवारात त्याला इंजिनिअर दिसला. इंजिनिअर परत स्वतःच्या फटफटीशी खटपटत होता.

"सुप्रभात!" कुंपणापाशी थांबून मोन्या म्हणाला. इंजिनिअरकडे त्याने शांतपणे आणि उल्हासाने पाहिले.

"रामराम," इंजिनिअरने प्रतिसाद दिला.

"फिरतंय!" मोन्या म्हणाला. "चाक फिरतंय!"

इंजिनिअरला स्वतःच्या फटफटीचे भान राहिले नाही... मोन्याकडे टक लावून पहात तो काही काळ उभा राहिला. अविश्वासाने नव्हे – मोन्याच्या बोलण्याचे त्याला चटकन आकलन झाले नव्हते.

"यंत्राबद्दल म्हणतोस काय?"

"होय: चाक तर फिरतंय. सबंध रात्रभर फिरत होतं... आत्तासुद्धा फिरतंय. बघायचा मला वीट आला, म्हणून थोडं फिरायला बाहेर पडलो."

आता इंजिनिअरला काहीच समजेनासे झाले होते. मोन्याचा चेहरा तर थकलेला आणि प्रामाणिक दिसत होता. एवढेच नव्हे तर त्यावर शरमेचा लवलेश नव्हता, उलट तेजाने चमकत होता.

"खरंच?"

"चल माझ्याबरोबर. स्वतःच्या डोळ्यांनी बघ."

इंजिनिअर आवारामधून मोन्यापाशी चालत आला.

"तू काहीतरी जादू केलेली दिसतेय." अजूनही त्याचा मोन्यावर विश्वास बसत नव्हता. "काहीतरी तयार केलंस मला बनवायला?"

"कसलीही जादू नाही!.. पडवीत... सारखं फिरतंय!"

"कोणतं चाक आहे?"
"सायकलचं."
इंजिनिअर थबकला.
"बरोबर. त्यात चांगली बॉल-बेअरिंग असतात. म्हणून ते फिरतं."
"होय," मोन्या म्हणाला. "पण सबंध रात्रभर तर नाही."
ते परत चालू लागले.

इंजिनिअरने पुढे प्रश्न विचारले नाहीत. मोन्याही गप्प राहिला. पण अजूनही त्याची प्रसन्न मन:स्थिती होती. त्याला स्वत:बद्दलच आश्चर्य वाटत होते.

"सबंध रात्र फिरतंय?" मोन्याच्या घराशी पोहोचण्याआधी न राहवून इंजिनिअरने परत विचारले. आणि मोन्याकडे निरखून पाहिले. मोन्याने त्याची नजर शांतपणे झेलली व स्वत:च चकित झाल्याप्रमाणे तो म्हणाला:

"सबंध रात्र! दहा वाजण्याच्या सुमाराला मी सुरू केलं – आता किती वाजले?"

इंजिनिअरने स्वत:चे घड्याळ पाहिले नाही. तो मोन्यापाठीमागून चालत राहिला. जरी तो मनातून गोंधळला होता, तरी तो गोंधळ प्रकट न करण्याची खटपट करत होता, स्वत:च्या इंजिनिअरच्या दर्जाला खाली न आणण्याचा प्रयत्न करत होता. इंजिनिअरकडे पाहताना मोन्याला मजा वाटत होती, पण तोसुद्धा स्वत:च्या भावना लपवत होता.

"तयार?" पडवीच्या दारापाशी थांबून त्याने विचारले. इंजिनिअरकडे एक कटाक्ष टाकून त्याने दार ढकलले... आणि इंजिनिअरला प्रथम चाक दिसावे म्हणून तो बाजूला झाला. चाक स्थिर पाहिल्यानंतर इंजिनिअरची कोणती प्रतिक्रिया होईल ते पाहण्यासाठी तो त्याच्या अगदी पाठोपाठ उभा होता.

"अस्सं," इंजिनिअर म्हणाला. "मला वाटलं, तू काहीतरी जादूची युक्ती केली असशील. पण गड्या, ह्यात काही गंमत नाही."

"मला माफ कर," स्वत:शी खूष होत मोन्या म्हणाला. "चल, माझ्या घरात कन्याक आहे... राखून ठेवली होती. पिऊ या थोडी?"

इंजिनिअरने कुतूहलाने मोन्याकडे पाहिले. तो हसला.

"चल."

ते दोघे घरात गेले. आवाज न करण्याचा प्रयत्न करत, सावधपणे

बाहेरच्या खोलीतून ते जवळ जवळ पार झाले... तेवढ्यात आजीचा आवाज आला :

"मोतका, सबंध रात्र कुठं होतास?"

"झोप, झोप," मोन्या म्हणाला. "सर्व ठीक आहे."

ते दोघे मोन्याच्या खोलीत गेले.

"बैस," मोन्या म्हणाला. "मी आत्ता सगळी व्यवस्था करतो..."

"अरे... कसलीही व्यवस्था करण्याचं कारण नाही!" इंजिनिअर दबत्या आवाजात म्हणाला. "सोड नाद. सकाळीच कसली व्यवस्था करतोस?"

"ठीक आहे," मोन्याने संमती दाखवली. "मी समोसा वगैरे काही बघत होतो... जाऊं दे."

एकेक छोटा चषक कन्याक पिऊन त्यांनी सिगारेटी शिलगावल्या, तेव्हा इंजिनिअरने परत मोन्याकडे कुतूहलाने पाहिले. त्याचे चतुर डोळे आकुंचित पावले होते व मुद्रेवर स्मित विलसत होते.

"माझ्या शब्दांवर विश्वास ठेवला नाहीस ना? करून बघितलंस... बहुधा सबंध रात्र खटपट करत होतास?"

मोन्या आता विचारमग्न आणि शांत बसला होता. जणू एव्हाना त्याला तीन मुले होती व ती कशी वाढताहेत हे तो पहात होता.

"काल सबंध दिवस वाया घालवला... महत्त्वाचं ते नाही," मोन्या बोलू लागला. त्याच्या बोलण्यात क्षुल्लक खंत मुळीच नव्हती, उलट गहन, प्रामाणिक कुतूहल होते. "ते का फिरत नाही हे मला अजूनही समजत नाही. ते फिरलं पाहिजे."

"ते फिरणार नाही," इंजिनिअर म्हणाला. "हाच तर महत्त्वाचा मुद्दा आहे."

त्यांनी एकमेकांकडे मुकाट पाहिले. इंजिनिअरने स्मित केले आणि स्पष्ट झाले की, तो वाईट स्वभावाचा माणूस नव्हता. त्याचे स्मित साध्या, विश्वासू मनाचे स्मित होते. त्याच्या तरुण वयामुळे आणि भिडस्त स्वभावामुळे सरकारी शेताने त्याच्यावर कामाचा एवढा डोंगर रचला होता की, त्यामुळे स्मित करायला अथवा नर्मविनोदाने बोलायला तो विसरला होता. तसे वागायला त्याला सवडच मिळत नव्हती.

"मित्रा, शिकलं पाहिजे," इंजिनिअरने सल्ला दिला. "तेव्हा सगळं समजेल."

"पण इथं शिकण्याचा काय संबंध?" मोन्या नाराजीने म्हणाला. "सारखं आपलं एकच तुणतुणं – शिकलं पाहिजे, शिकलं पाहिजे ... पण शिकलेल्यांमध्ये मूर्ख नसतात?"

इंजिनिअर खूप हसला आणि उठला.

"असतात! पण अडाण्यांमध्ये मूर्ख जास्त असतात. मी आत्ताच्या घटनेबाबत बोलत नाही ... एकूण. अच्छा!"

"आणखी एक ग्लास पिऊ या?"

"नको. आणि तूसुद्धा पिऊ नको."

इंजिनिअर मोन्याच्या खोलीबाहेर पडला आणि परत चोरपावलांनी बाहेरची खोली पसार करण्याचा त्याने प्रयत्न केला, पण आजी आता जागी होती व चुलाण्याच्या फळीवरून त्याच्याकडे पहात होती.

"उगीच चोरपावलांनी चालू नको. मी झोपलेली नाही," ती म्हणाली.

"नमस्ते आजी!" इंजिनिअरने अभिवादन केले.

"नमस्कार, लाडक्या. तुम्ही का झोपत नाही? तरुण वय असून म्हाताऱ्यासारखं वागता ... तुम्ही व्यवस्थित झोपलं पाहिजे."

"मग म्हातारपणी काय करणार?" इंजिनिअरने गंमतीने विचारले.

"म्हातारपणीसुद्धा नीट झोप मिळणार नाही."

"असं असेल तर नंतर केव्हातरी ... कुठंतरी."

"तिथं काय आहे ते ..."

मोन्या खोलीत खिडकीपाशी बसून होता. खिडकीच्या तावदानाची वरची बाजू लाल रंगात न्हायली होती – सूर्य उगवत होता. खेडे जागे होत होते: फाटकांच्या आपटण्याचे आवाज येत होते, कुरणात चरायला न्या म्हणून गायी हंबरून सांगत होत्या. लोक एकमेकांना साद घालत होते, अधूनमधून काहीजण मोठ्यांदा ओरडत होते. सर्व जसे असावे तसे होते. देवाची कृपा, निदान इथे सर्व स्पष्ट आहे – मोन्याच्या मनात विचार आला. सूर्य उगवतो आणि मावळतो, उगवतो आणि मावळतो, चिरंतन आणि अप्राप्य दरम्यान माणसे आपली नित्याची कामे करत असतात: ओरडत असतात, धांदल करतात, कामे करतात, कोबीला पाणी घालतात ... यशांचा आनंद साजरा करतात! माझ्या लाडक्या लोकांनो ... तुम्हाला माझा दंडवत!

# बेशरम

म्हातारा ग्लूखोव वयाच्या अड्डसष्टाव्या वर्षी विधुर बनला. म्हातारीचे त्याने दफन केले, मयतविधीला आलेल्यांना जेवण घातले... खूप रडला. म्हणाला:

"आता माझं कसं होणार? एकट्याचं?"

असे तो म्हणाला - विधुर म्हातारे नेहमी बोलतात त्याप्रमाणे. त्याला खरेच खूप दु:ख झाले होते, अत्यंत वाईट वाटले होते, पण तरीही "आता त्याचे कसे होईल" याबद्दल त्याने विचार केला नव्हता. दु:ख झाले होते, वेदना झाल्या होत्या, पण तेवढेच. पुढचा विचार केला नव्हता.

तर काळ उलटला. एक वर्ष उलटले. आणि म्हाताऱ्याला एकटेपणा खायला उठू लागला. तो झुरू लागला. मोठ्या घरात एकट्याने राहणे भयाण वाटू लागले. त्याचा धाकटा मुलगा होता (मोठे मुलगे युद्धात मारले गेले होते), पण तो शहरात रहात होता. हा मुलगा क्वचित यायचा - बटाटे, खारवलेला कोबी, काकड्या, लहान मुलांसाठी मध (म्हाताऱ्याने मधाची सहा पोवळी बाळगली होती), घरची डुकराची चरबी इत्यादी खाद्यपदार्थ घेऊन जाण्यासाठी... त्याच्या ह्या भेटींचा म्हाताऱ्याला आनंद होत नसे, उलट मन:स्ताप व्हायचा. डुकराची चरबी, मध, काकड्या देण्याबद्दल त्याला वाईट वाटत नसे. पण पोटचा मुलगा असूनही नसल्यासारखा होता, नुसता आश्रितासारखा वागत होता, ह्याचे म्हाताऱ्याला दु:ख वाटत होते, अपमान वाटत होता. मुलाला तो डुकराची चरबी, काकड्या द्यायचा... उत्तमोत्तम निवडून द्यायचा. दु:ख छातीत दाबून टाकायचा, कधी तक्रार बोलून दाखवायचा नाही. आणि समजा त्याने म्हटले असते: वान्का, माझ्या

मनात कसलीतरी हुरहुर वाटतेय... तर वान्का काय करणार होता? काय मदत करणार? फार तर दोघे एकत्र बसून उसासे टाकणार, बाटलीभर दारू पिणार आणि सामानाने भरलेली पेटी घेऊन वान्का शहरांत आपल्या बायको-मुलांकडे निघून जाणार. तर आयुष्य हे असे होते.

म्हणून म्हाताऱ्याने परत लग्न करण्याचा विचार केला. होय. आणि स्वत:ची भावी वधू त्याने मनाशी निश्चित केली.

९ मे चा दिवस. विजय-दिन. नेहमीप्रमाणे ह्या दिवशी सगळे खेडे स्मशानभूमीत जमले होते – युद्धात ठार झालेल्यांच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी. खेड्याच्या सोविएतचा प्रमुख एका स्टुलावर उभा राहिला आणि हातातील यादी वाचू लागला:

"ग्रेबत्सोव निकोलाय मित्रोफानोविच.

गुल्यायेव इल्या वासिल्येविच.

ग्लूखोव वासिली येमेल्यानोविच.

ग्लूखोव स्तेपान येमेल्यानोविच.

ग्लूखोव पावेल येमेल्यानोविच..."

हे तीन – म्हाताऱ्या ग्लूखोवचे मुलगे होते. नेहमी ह्या मुलांची नांवे जेव्हा वाचली जात, तेव्हा म्हाताऱ्याच्या नरडीला दु:खाची बोटे गच्च आवळत आणि त्याला श्वास घेणे अवघड होई... तो जमिनीवर नजर लावायचा, रडायचा नाही, पण त्याला काहीही दिसायचे नाही. असा खूप वेळपर्यंत तो उभा रहायचा. आणि खेड्यातील सोविएतचा माणूस पुढे वाचत रहायचा:

"ओपारीन सेम्योन सेर्गेयेविच.

पोपोव इवान सेर्गेयेविच.

पोपोव मिखाइल सेर्गेयेविच.

पोपोव वासिली इवानोविच..."

स्मशानात माणसे मूकपणे रडत. अगदी हळू. शालींच्या कोपऱ्यां-मध्ये, हातांच्या ओंजळीत, दबत्या उसाशांमधून; जणू त्या गंभीर क्षणांच्या शांततेचा भंग केल्यास अपमान होईल अशी त्यांना भीती वाटे. म्हाताऱ्याला जेव्हा किंचित हलके वाटे, तेव्हा तो भोवती नजर टाकायचा. आणि प्रत्येक वेळी तोच तो विचार त्याच्या मनात यायचा: "किती माणसं मारली गेली!"

यावेळी माणसांच्या गर्दीत त्याचे लक्ष ओताविना नांवाच्या म्हातारीकडे गेले. वस्तुत: ती ह्या गावची नव्हती, पण खूप काळापासून ह्या गावात रहात होती. ग्लूखोव तिला ओळखत होता. स्मशानात वाचून दाखविण्यात येणाऱ्या यादीत म्हातारीच्या कुटुंबातील कुणाचेही नांव नव्हते, पण तरीही ती सर्वांबरोबर रडायची आणि क्रूस-चिन्हे करायची. ग्लूखोवला धार्मिक प्रवृत्तींच्या माणसांबद्दल आदर वाटत होता. त्या माणसांचा पाठपुरावा होई, त्यांना इतर लोक हसत, पण तरीही ती माणसे संयम राखत, खंबीर रहात – म्हणून आदर वाटायचा. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आदर वाटायचा. त्याने ओताविनाकडे निरखून पाहिले... बाकदार नाकाची म्हातारी अजून भक्कम होती. भाजीच्या वाफ्याची मशागत सहज करू शकली असती, बान्या* तापवू शकली असती, पीठ मळून पाव भाजू शकली असती. दुकानातील "सरकारी पाव" खाणे म्हाताऱ्याला अशक्य होत असे. अचानक म्हाताऱ्याच्या मनात विचार आला: "हिलासुद्धा एकलेपण असह्य होत असणार... खरं ना?"

म्हातारा घरी आला. मुलांच्या स्मरणार्थ दारू प्यायला... आणि एकूण परिस्थितीचा विचार करू लागला: "स्वत:चं खोपट तिनं विकून टाकावं आणि माझ्यापाशी रहायला यावं. खोपट विकून आलेले पैसे खुशाल स्वत:च्या नांवानं बँकेत ठेवू दे तिला. माझ्याबरोबर राहिली म्हणजे घर तेवढं रिकामं भासणार नाही. मग मला बान्यात मस्त अंग शेकता येईल, नंतर कसलीही चिंता न करता आरामात पडून राहता येईल... टेबलावर जेवणाची मांडामांड करायला घरात कुणी असेल, जेवण तयार आहे अशी मला साद कुणी घालील. घरात जिवंत माणसाचा वावर नाही सध्या! पण जेव्हा चुलाण्यात चिमटा खडखडतो, भाजल्या पिठाचा खमंग वास दरवळतो, तेव्हा मामला वेगळाच! किंवा रात्री झोप येत नाही तेव्हा हळू आवाजात गप्पा मारता येतील... उदाहरणार्थ, सामुदायिक शेतावरच्या पथक-नायकावरचा राग चार शिव्या देऊन हलका करता येईल. अर्थात ही ओताविना धार्मिक वृत्तीची आहे. दुसरे शब्द वापरता येतील, शिव्याच घातल्या पाहिजेत असं नाही. सरतेशेवटी आता थडग्यात जायची वेळ होत आलीय – सबंध

* बान्या – वाफेचे स्नान करण्याचा रशियन हमामखाना – अनु.

आयुष्यभर शिव्याच घातल्या. आता पुरे. खरंच, जर ती रहायला येईल, तर फार छान होईल. काहीही झालं तरी घराला घरधनीण असल्याशिवाय शोभा नाही." म्हाताऱ्याच्या मनात असे विचार येत होते. तो कमालीचा उत्तेजित बनला होता.

त्याने रविवारचा दिवस निवडला आणि ओल्गा सेर्गेयेवना मालीशेवाकडे तो गेला. तीसुद्धा म्हातारीच होती, पण ओताविनापेक्षा तरुण होती आणि जास्त बुद्धिमान होती. ह्या ओल्गा सेर्गेयेवनावर म्हाताऱ्याने कधीतरी गुपचूप प्रेम केले होते. तेव्हा तो म्हातारा नव्हता, तर उमदा तरुण होता व सुंदर आणि लहरी ओल्गावर प्रेम करत होता. मालीशेवाकडे सोयरीकीसाठी माणसे पाठवण्याच्या तो बेतात होता, पण तेवढ्यात क्रांती सुरू झाली... खेड्यात एक तरुण कमिस्सार अवतरला, सज्ञान ओल्गाचे त्याने पटकन डोके फिरवले आणि तिला कुठेतरी तो घेऊन गेला. घेऊन गेला तो गेला, पण नंतर स्वत: कुठेतरी गायब झाला. बहुधा लढाईत ठार झाला असावा. ओल्गा सेर्गेयेवना घरी परतली आणि तेव्हापासून एकटी रहात होती. येमेल्यान ग्लूखोव अजून तरुण होता, पण एव्हाना विवाहित बनला होता. एक दिवस तो खेड्याच्या सोविएतमध्ये ओल्गा सेर्गेयेवनाकडे गेला (ती तेथे चिटणीस म्हणून काम करत होती) आणि त्याने आपले हृदय तिच्यापुढे उघडे केले. ओल्गा सेर्गेयेवना चिडली, रडली आणि म्हणाली की, शूर कमिस्सारानंतर दुसऱ्या कुणालाही तिच्या जीवनात स्थान नव्हते. ग्लूखोवने तिला समजावण्याचा प्रयत्न केला की, त्याच्या मनात कोणतेही वाईट हेतू नव्हते, फक्त त्याचे तिच्यावर प्रेम होते (त्यावेळी तो दारू प्यायलेला होता). त्याचे तिच्यावर प्रेम होते. त्यात काय विशेष? ओल्गा सेर्गेयेवनाला त्याचा जास्तच अपमान वाटला आणि ती पुन्हा म्हणाली की, जगातील सर्व पुरुषांना एकत्र केले तरी तिच्या अविस्मरणीय कमिस्साराच्या करंगळीची त्यांना सर नव्हती. अशा रीतीने तिने आपल्या कमिस्सारचा सर्वांना एवढा धाक घातला, की दुसरे पुरुष तिच्याजवळ जायला घाबरू लागले. पण नंतर खूप खूप वर्षे लोटली, सर्व काही विसरले गेले, सर्व नाहीसे झाले, नव्या जीवनाची धांदल केव्हाच सुरू झाली होती, धरतीवर दुसऱ्या प्रेमाच्या – त्यांच्या नव्हे – आरोळ्या उमटत होत्या. म्हातारा ग्लूखोव आणि पेन्शनर ओल्गा सेर्गेयेवना यांच्यात एक विचित्र मैत्री जमली होती. म्हातारा त्या एकट्या बाईला

घराबाहेरच्या कामांमध्ये मदत करायचा : हिवाळ्यात बर्फ खणून काढायचा, लाकडे फोडून द्यायचा, केरसुणीला दांडा बसवून द्यायचा, घराचे छप्पर शाकारून द्यायचा ... दोघे बसून गप्पा मारत. मालीशेवा टेबलावर दारूची छोटी बाटली ठेवायची. पण ग्लूखोव नेहमी तिला भीत राहिला आणि सोविएत सत्तेचे अमाप गुणगान करायचा.

"पहा कसं काटेकोर सरकार आहे! पूर्वी काय असायचं : पिकल्या वयापर्यंत माणूस जगायचा तेव्हा तो कुणालाही नकोसा व्हायचा. पण आता – पेन्शन. मी विचारतो, दर महिन्याला मला वीस रूबल कशाला देतात? माझा पोटचा मुलगा आहे – आला म्हणजे पाचाची नोट हातात कोंबतो, पुरेशी होते. आणि काही वेळा पैसे द्यायला विसरला तरी काही बिघडत नाही. पण सरकार नियमितपणं पैसे देतं. त्या कमिस्सारांना तेव्हाच सारं ठाऊक होतं. उज्ज्वल भविष्यकाळासाठी त्यांनी स्वतःचे प्राण वेचले. ओल्गा सेर्गेयेवना, मी सुचवतो की, त्यांच्या आठवणीदाखल आपण एक क्षणभर उभे राहू या."

त्यावर ओल्गा सेर्गेयेवना नाराजीने म्हणाली होती : "बैस. आता काय त्याचं?.. आता काहीही नाही!"

आता ती क्वचित कमिस्सारची आठवण काढायची. उलट रात्रीच्या वेळी तिला "विशिष्ट संवेदना" कशा होतात त्याचेच जास्त वर्णन करायची.

"अचानक सुरवात होते आणि वाटतं – संपलं सगळं... माझं मरण जवळ आलं..."

"कुठं जाणवतं असं? छातीत?"

"सगळ्या अंगभर. अगदी पायापासून डोक्यापर्यंत. वाटतं, संपलं सारं! मग एकदम शीण येतो. हातापायांमधले त्राण जातात. कुठंतरी तरंगत जातेय असा भास होतो. तरंगते... तरंगते..."

"हूं..." ग्लूखोव सहानुभूतीचा उद्‌गार काढायचा. "अशीच एक दिवस तरंगत जाशील. कायमची!"

म्हातारा ग्लूखोव बायकोच्या मरणानंतर मालीशेवाकडे वारंवार खेपा टाकू लागला होता. काहीतरी बारीकसे काम करायचा. पण व्हरांड्यात बसून चहा-मध प्यायला त्यांना जास्त आवडायचे. म्हातारा द्रोणामधून मध आणायचा. दोघे गप्पा मारत.

"झुरतोस?" मालीशेवा कुतूहलाने विचारायची.

ग्लूखोवला काय उत्तर द्यावे ते समजत नसे. चुकीचे उत्तर दिले जाईल अशी त्याला भीती वाटायची . मग मालीशेवाने त्याची लाज काढली असती. ती वारंवार त्याची लाज काढे असे नव्हे, पण त्याला जाणीव करून द्यायची की, लौकरच तो सत्तरीत जाणार होता आणि त्याने स्वत: गप्प बसून तिचे बोलणे ऐकणे अधिक इष्ट होते.

"झुरतोस?"

"असंच ..." ग्लूखोव संदिग्धपणे बोलायचा. "अर्थात वाईट वाटतं. नाही म्हटलं तरी आम्ही पन्नास वर्षं एकत्र जगलो."

"शंभर वर्षंसुद्धा राहता येतं... पण त्यात काही अर्थ होता? हत्ती दोनशे वर्षं जगतात. पण त्यात काय अर्थ?"

ग्लूखोव दुखावला.

"माझे तीन मुलगे युद्धात ठार झाले! आणि तू मला असं बोलतेस ..."

"मी काहीही बोलत नाही," मालीशेवाने प्रत्युत्तर केले. "ते मायभूमीसाठी मेले."

"अर्थात झुरतो," एव्हाना ग्लूखोव धिटाईने बोलला. "माझ्या-बरोबर तिनं किती सोसलं!.. फार सहन केलं. तरुणपणापासून तसा मी हूड होतो, दांडगट... माझी सगळी दांडगाई तिनं सहन केली. वाईट वाटतं!"

"सुबुद्धता, सुबुद्धता ..." मालीशेवा सुस्कारली. "तुम्हाला ठोकून ठोकून घडवलं पाहिजे! आणखी दोनशे वर्षं ठोकलं पाहिजे – तेव्हा कुठं माणसांसारखं वागायला लागाल. बघ, तिच्याबरोबर तू पन्नास वर्षं जगलास ... पुढं काय? सांगण्यासारखं काही नाही. माझ्या परसात तण उगवतात... नुसते वाढत राहतात. त्यांच्या जवळ – व्हिक्टोरिया स्ट्रॉबेरी. फरक आहे ना?"

"तुला राग कशाचा येतोय?" ग्लूखोव गोंधळून जायचा.

"फरक आहे ना? मी काय विचारतेय?"

"काय पण तुलना केलीस ..."

"करीन तुलना! कारण एक माणूस जगतो – जळतो, आणि दुसरा धुमसत राहतो. एकाचं आकंठ समाधान, तर दुसरा फक्त स्वतःचं काम करतो आणि संपलं. पैदाशीचे घोडे!"

"सगळेच कसे कमिस्सार होतील!" ग्लूखोव चिडून म्हणाला.

"पैदाशीचा घोडा" म्हणून त्याचा उल्लेख केल्याबद्दल त्याला अपमान वाटला होता.

"पन्नास वर्षं तिच्याबरोबर राहिलो," मालीशेवाने त्याची नक्कल केली. "पण त्यातल्या एका आठवड्याला तरी अर्थ आहे का?"

"भरपूर अर्थ होता, देवाच्या कृपेनं! गरजेपेक्षा जास्त!"

"दिसतंच आहे!" मालीशेवाने ओठांची मुरड घालून कोंबडीची चोच बनवली. "पैदाशीचे घोडे!"

ग्लूखोवला जाणवले की तिला त्याचा राग येत होता. पण त्याचे कारण मात्र त्याला उमजत नव्हते.

आणि तो मालीशेवाकडे जात राहिला. काहीवेळा त्यांची भांडणे होत, तर काही वेळा शांततेने एकमेकांचा निरोप घेत. संध्याकाळच्या वेळा नकळत पसार व्हायच्या.

ह्या रविवारी मात्र ग्लूखोव रिकाम्या हातांनी मालीशेवाकडे आला होता – ना कुऱ्हाड, ना करवत. बोलण्यासाठी आला होता. सल्ला घ्यायला. मदत मागायला आला होता.

"सेर्गेयेवना, तुझा सल्ला विचारायला आलोय.. मदत कर."

"असं काय घडलं?" मालीशेवाने कान टवकारले. दुसऱ्यांना सल्ला द्यायला तिला आवडत असे.

"म्हातारी ओताविना तुझ्या माहितीची आहे?"

"तिचं काय?"

"तिच्याशी बोल माझ्या वतीनं. विचार तिला – माझ्या घरी येऊन रहायला ती तयार होईल काय? स्वतःचं खोपट विकून टाक म्हणावं. किंवा तात्पुरतं घर बंद करून ठेवू दे. थोडे दिवस एकत्र राहू, कसं काय जमतं ते पाहू आणि मगच घर विकू दे. म्हणजे निष्कारण धोका पत्करायला नको. तुला काय वाटतं? मला एकट्याला तिच्याशी बोलण्याचा धीर होत नाही. पण तू हे बोलू शकशील. मी तिला दुखावणार नाही... चार पायांवर आम्ही जास्त भक्कम उभं राहू शकू... जरी आता आमचे पाय पूर्वीएवढे बळकट नसले तरी. काय मत आहे तुझं?" ग्लूखोवला नेहमीपेक्षा स्वतःबद्दल खूपच बोलायचे होते आणि तो भराभरा बोलत होता. त्याला शरम वाटत होती. "मी खूप खूप विचार केला आणि असं ठरवलं. एकटं राहणं काही खरं नाही. मला वाटतं, तिलासुद्धा सोपं होईल आयुष्य. काय वाटतं तुला?"

मालीशेवा अत्यंत चकित झाली होती. एवढी चकित झाली होती की, आरंभी काही शहाणपणाचे शब्द उच्चारणे तिला अशक्य ठरले.

"लग्न करायचं ठरवलंस?"

"आता कसलं आलंय लग्न?.. आयुष्य जरा सोपं व्हावं म्हणून एकत्र रहायचं, एवढंच!"

"कायद्यानं ह्याला लग्नच म्हणतात. उगीच का खोटं बोलतोस?"

ग्लूखोव थक्क झाला.

"ठीक आहे. मी लग्न करतोय. का, ह्यात काही गैर आहे?"

मालीशेवाने काहीशा बारकाईने आणि लपवलेल्या वैरभावनेने म्हाताऱ्याला न्याहाळून पाहिले.

"तिची मान्यता आहे? जरी म्हणत असलास की, अजून तिच्याशी बोलायला जमलं नाही..."

"तिला माहीत नाही याबद्दल! म्हणून तर आलोय तुला विचारायला: तू बोल ना तिच्याशी. बोल आणि थोडं मनसुद्धा वळव तिचं. ती म्हातारी धार्मिक आहे... म्हणायची, असं करणं पाप!.. कसलं आलंय पाप? तसा विचार केला तर. मी एकटा आणि तीसुद्धा एकटी..."

"तिची मुलगी शहरात आहे."

"मग त्यात काय झालं!.. माझाही मुलगा शहरात आहे. आजकाल त्यांना आमच्याबद्दल मुळीच आस्था राहिलेली नाही. पण आम्ही एकत्र राहिलो तर आयुष्याचे उरलेले दिवस जरा बरे जातील. आमच्यातला जो पहिला मरेल, त्याचे मरणसंस्कार करायला दुसरा असेल."

"पण तुम्हाला मुलं आहेत!" अचानक मालीशेवाचा स्वर उंच आणि चिडका बनला. "उगीच का स्वतःला पोरकं म्हणवून घेता?"

ग्लूखोव चूप बसला. आता त्याने मालीशेवाकडे लक्षपूर्वक आणि रोषाने पाहिले. अशी चिडतेय का? कशाबद्दल ती अशी तडकतेय?

"तुला काय झालं सेर्गेयेवना?" त्याने विचारले.

"मला काही झालं नाही. लग्न करायचा तुम्ही विचार करताय, मी नव्हे. आणि उलट तू मला विचारतोस: काय झालं मला? मला काहीही झालं नाही."

"तू चिडलेली दिसतेस..."

"मुळीच नाही! मी कशाला चिडू? खुशाल करा लग्न! ओता-

विनाशी बोलायची गरज आहे? बोलते बापडी..." आता मालीशेवा गोंधळली होती आणि एकाऐवजी दहा शब्द बोलत होती. "तिला बोलावून घेईन आणि बोलू आम्ही. मला काही अवघड नाही. माहिती करून घेते: तिची मान्यता आहे अथवा नाही? मला काय रागवायचं कारण? लोक हसतील तुम्हाला, मला नव्हे!"

"काय म्हणतेस?"

"काय?"

"लोक हसतील?"

"मग काय – खूष होतील?"

"पण असं काय घडत नाही – म्हाताऱ्यांच्या जोड्या जमत नाहीत?"

"घडतं, घडतं. उद्या दुपारी जेवणाच्या वेळी ये... त्याआधी मी तिला बोलावते, प्रथम तिला सगळं समजावून सांगते आणि तू थोडा उशीरा, जेवणाच्या वेळी ये. घडतं, असं घडतं. खूप वेळा घडतं! मी बोलते तिच्याशी, चिंता करू नको. सगळं समजावून सांगीन."

म्हातारा ग्लूखोव अनिश्चित मनाने मालीशेवाच्या घरून गेला. मालीशेवाच्या मनात वेगळेच काहीतरी शिजत होते असा त्याला संशय आला. म्हातारी काहीशी चमत्कारीक होती. सारखी चिडलेली, रागावलेली असते. सगळ्यांना बदलून टाकले असते तिने, वेगळी माणसे बनवून टाकले असते... सगळ्यांना तिने कसे जगायचे ते शिकवले असते, सगळ्यांना कायद्याच्या तराजूत बसवले असते. म्हाताऱ्याच्या मनात असाही विचार येऊन गेला: ताबडतोब तिच्याकडे परत जावे आणि कोणतीही मदत नको असे तिला सांगावे. स्वतःच ह्या मामल्याचा निकाल लावीन असे सांगावे. तो अक्षरशः रस्त्यात थांबला व त्याने विचार केला. मग त्याने निर्णय घेतला – ठीक आहे, मरो ती, बोलू दे तिला! त्याला स्वतःला नाही तरी बोलणे जमलेच नसते. ती चिडकी असली तरी कबूल केलेले काम ती नक्की पार पाडील, अशी त्याची खात्री होती.

दुसऱ्या दिवशी दोन म्हाताऱ्या – मालीशेवा आणि ओताविना – एकमेकींना भेटल्या. त्यांच्यात संभाषण घडले.

ओताविना मालीशेवाकडे आली. पहिल्यांदा तिने पुढच्या कोपऱ्यात

नजर टाकली ( देवाच्या तसबिरी आहेत का ? ), मग मखमाली आवरणाच्या दिवाणावर एका टोकाला ती अंग चोरून बसली. नमस्कार केला.

"मी तुला अशासाठी बोलावलंय," मालीशेवाने ताबडतोब सुरुवात केली, "म्हाताऱ्या ग्लूखोवला ओळखतेस?"

"येमेल्यान येगोरीचला? अर्थात, ओळखते. त्याचे तीन मुलगे मारले गेले..."

"तर त्याची तुझ्याशी लग्न करायची इच्छा आहे." मालीशेवाने प्रत्येक शब्दावर जोर देत सबंध वाक्य स्पष्टपणे उच्चारले. "तुझी मान्यता आहे?"

"देवा रे देवा!" ओताविनाने पटकन क्रूस केला. "त्याला काय झालंय असं?"

"काय व्हायचंय?" मालीशेवा अचानक उल्हसित बनली. "तुम्ही एकेकटी आहात... तू विचार कर. प्रथम विचार कर, उत्तर द्यायची घाई करू नको. तो इतरांसारखाच एडका आहे, पण तुझं उरलेलं आयुष्य जगायला तुला मदत करील. तुला स्वत:ला काय वाटतं? म्हणतो, सध्या तुझं खोपट विकू नको, बंद करून ठेव. जर एकत्र राहणं जमलं, तर विकून टाकायला हरकत नाही आणि मिळालेले पैसे तू तुझ्या नांवावर बँकेत ठेव. काय वाटतं तुला?"

"काय विचार करणार मी?" म्हाताऱ्या ओताविनाला खरेच काही माहीत नव्हते. "माझ्या डोक्यातले सगळे विचार केव्हाच पळून गेलेत. असं कसं बाई एकदम लग्न करायचं!" ओताविना सरळ मनाने किंचित हसली. "डोकं फिरून जायला एवढं पुरेसं आहे! काय पण शोभेन – नवरी म्हणून!"

"तोसुद्धा काय नवरा शोभतो? तर मग काय ठरलं?"

"जरा थांब, सेर्गेयेवना. अशी हातघाईवर येऊ नकोस. मला जरा मनाला सावरू दे..."

"तो आत्ता येईल इथं. उत्तर ऐकायला."

"अगबाई!" ओताविना एकदम दिवाणावरून उठली आणि तिने दाराकडे नजर टाकली. मग परत खाली बसली. "समस्या मोठी बिकट आहे!"

"पण मला दिसतंय, तू कबूल करायच्या बेतात आहेस!"

म्हातारी ओताविना अचानक गंभीरपणे विचारात गढली.

"मी तुला असं सांगत्ये, सेर्गेयेवना: तो म्हातारा तसा चांगला आहे, पीत नाही, देवाची फारशी टवाळी करत नाही, निदान मी कधी ऐकलं नाही... फक्त..." ओताविनाने सोयरीक जमवणारीकडे पाहिले. "तर काय? असं घडतं – म्हातारी माणसं काहीवेळा जोडया जमवतात..."

"होय, घडतं असं!"

"पण रात्रीचा तो त्रास तर देणार नाही?"

मालीशेवाने अक्षरश: तोंडाचा आ वासला.

"म्हणजे?"

"म्हणजे काय? तुला माहीत आहे हे पुरुष कसे असतात! सगळयात प्रथम मला खात्री करून घ्यायचीय की, तो तसं काही करणार नाही. आणि शिव्या घालणार नाही आई-माईवरच्या. तंबाखू ओढण्याच्या बाबतीत... पण सगळेच तंबाखू ओढतात. त्याला आवर घालणं शक्य नाही."

"तर तशी तू कबूल आहेस?" चकित होऊन मालीशेवाने विचारले.

"जरा थांब, असं घोडं पिटाळू नको. मी सांगत्ये: माझ्याकडून खूप अटी घातल्या जातील. हे चालणार नाही... ते चालणार नाही... शेवटी म्हातारा विचार करील आणि म्हणेल: 'तर मग नक्की काय करायला परवानगी आहे?' आणि आमची सोयरीक मोडेल." ओताविना परत सौम्य हसली. "कधी विचार केला नव्हता, कधी तर्क केला नव्हता... देवा रे देवा! तसं काय वाईट आहे म्हणा त्यात? पूर्वी मी रहायची त्या बूलानिखामध्ये राहणाऱ्या माझ्या एका जिवलग मैत्रिणीच्या बाबतीत असंच घडलं: एक म्हातारा तिच्याकडं आला, इकड-तिकडच्या चार गोष्टी केल्या आणि मग म्हणतो: 'ए कूझ्मोवना, चल, एकत्र राहू या!' आणि राहिले एकत्र. तो वारला दोन वर्षांपूर्वी... ती त्याच्या घरात राहते. मला माहीत आहे – छान राहिली दोघं. किती ठाऊक आहे? तब्बल पाच वर्षं. त्यानं तिला मुळीच दुखावलं नाही. आयुष्याच्या शेवटी माणसं शहाणी वागतात. आताच्या पोरांकडं जरा नजर टाक... देवा रे देवा! काय बोलावं त्यांच्याबाबतीत तेच समजत नाही. आयुष्याची अखेर उबदार घरात करायला मला आवडेल बाई! माझं खोपट तर पार मोडकळीला आलंय. हिवाळा संपलाय

म्हणून मला खरंच आनंद झालाय. घराला ऊब आणणं अशक्य ठरलंय. कितीही सर्पण जाळलं तरी घर आपलं थंडगार!"

"मुलीकडं का जात नाहीस रहायला?"

"तिच्यापाशी? आधीच तिथं दाटी झालीय... मी राहून बघितलंय. नातवंडं लहान होती तेव्हा. फार त्रास झाला. सगळ्यांचेच हाल झाले. आता पोरं शाळेला जायला लागलीत. आणि हे खोपट मला विकत घेऊन दिलं याचा खरंच खूप आनंद वाटतो. बूलानिखामधलं माझं स्वत:चं घर तर मी विकून टाकलं होतं. मुलीनं लग्न केलं तेव्हा विकलं. भक्कम घर होतं, आणखी शंभर वर्षं उभं राहील. पण विकलं, काय करणार? त्यांना सहकारी घरासाठी पैसे पाहिजे होते, कुठून आणायचे? जावई नुकताच सैन्यातून मोकळा झालेला आणि माझी पोरगी तंत्रविद्यालय नुकती पास झालेली. म्हणाली, आई विकून टाकू घर. आणि आमच्याबरोबर रहायची तुझी जर इच्छा नसेल, तर तुला नंतर दुसरं घर विकत घेऊन देऊ. तर राहिले त्यांच्याबरोबर, त्यांची लहान मुलं सांभाळली आणि मग सांगितलं बाई त्यांना – म्हटलं, लहान का होईना, मला एक खोपट विकत घेऊन द्या. शहरात राहणं जमत नाही, जीव घुसमटतो. बरीच कुरकुर केली त्यांनी सुरवातीला, शेवटी खोपटासाठी पैसे दिले. बूलानिखामध्ये घरं महाग आहेत आणि इथं त्यापेक्षा स्वस्त, म्हणून मी ह्या गावात रहायला आले. अर्थात म्हातारपणी छान उबदार घरात राहण्याची कल्पना काही तेवढीशी वाईट नाही."

म्हाताऱ्या बायकांचे संभाषण घडणार होते हे म्हाताऱ्या ग्लूखोवला माहीत होते, पण काय संभाषण घडले, ह्याची त्याला कल्पना नव्हती. तरीसुद्धा त्याने अंगात नवीन कोट घातला, खिशात दारूची बाटली कोंबली, मधाचा द्रोण घेतला आणि तो मालीशेवाकडे निघाला.

आला... रामराम केला. काहीसा अवघडला. मग टेबलावर त्याने बाटली व द्रोण ठेवले... तंबाखूच्या बटव्यासाठी खिसा चाचपडू लागला.

"जरा बाटलीला थांबवून धर तुझ्या," मालीशेवा म्हणाली. "एवढी घाई करू नको."

म्हाताऱ्याच्या काळजात धस्स झाले. ओताविनासह जगण्याची कल्पना एव्हाना त्याच्या मनात घट्ट मूळ धरून बसली होती, सर्व

बाजूंनी त्याने विचार केला होता – सगळे छान घडेल अशी त्याला खात्री वाटत होती. पण आता काय नवीन?

"तुम्हा दोघांचंही मी ऐकून घेतलंय... अर्थात ही तुमची खाजगी बाब आहे, तुम्ही लग्न करू शकता... काही माणसं पुरती वेडी बनतात, पण तरी काही बिघडत नाही. असं असलं तरीसुद्धा मी तुम्हाला विचारू इच्छिते: तुम्हाला शरम नाही वाटत? आँ?" मालीशेवाने हे शब्द ग्लूखोवच्या आणि ओताविनाच्या तोंडावर फेकले. कुठल्यातरी अनाकलनीय क्रौर्याने, कुठल्यातरी गुप्त वेदनेने आजारी असलेल्या तिच्या हृदयाने, ह्या शब्दांना भिरकावले होते. आणि ती कठोर शब्दांना भिरकावत राहिली – भावी जोडपे आपापल्या जागी चुळबुळत होते, शरमून लाल झाले होते, अत्यंत केविलवाणे बनले होते, ह्याची क्षिती न बाळगता ती ताडताड बोलत राहिली. "ह्यानंतर जगासमोर तुम्ही कोणत्या तोंडानं मिरवाल? आँ? सबंध आयुष्य एकाकी जगणारी माणसं आहेत... मी अख्खं आयुष्य एकटी राहिले, वयाच्या तेविसाव्या वर्षापासून एकटी जगतेय... आणि मला कुणी लग्नाची मागणी घातली नाही असं वाटतं? घातल्या होत्या मागण्या. रात्रीच्या प्रहरी माझ्या खिडक्या कुणी ठोठावल्या नाहीत असं वाटतं? आले होते, खिडक्या ठोठावत होते. तू, ग्लूखोव, खेड्यातल्या सोविएतच्या कचेरीत येऊन मला म्हणाला नव्हतास – माझ्याशिवाय जगू शकत नाहीस म्हणून? आला नव्हतास? बोल, सांग बघू!"

धरती दुभंगून आपल्याला पोटात घेईल तर फार बरे होईल असे ग्लूखोवला त्याक्षणी वाटत होते.

"तो माझा मूर्खपणा होता... त्यावेळी मी झिंगलो होतो," त्याने कबुली दिली. "मी तुला मागणी घातली नव्हती... तुला काय झालंय? उगीचच. त्या वयात मी कधीतरी..."

"मूर्खपणापायी! आणि आता हा शहाणा बनलाय – सत्तराव्या वर्षी लग्न करायला निघालाय. मोठा विद्वान! आणि तू तरी काय ग! 'बघते, विचार करते... उबदार घरात रहायला छान!' वा ग धर्मपरायण! ह्याच्या जातीतलीच... दुसऱ्या माणसांच्या पापांकडं बोटं दाखवता. पण स्वतः? कसला आदर्श ठेवताय तुम्ही तरुणांसमोर? तुम्हा दोघांनी याबाबत विचार केलाय? लोकांसमोरची स्वतःची जबाबदारी तुम्हाला समजते?" मालीशेवाने टेबलावर स्वतःची सुकलेली

रोड बोटे आपटली. "ह्याचा विचार केलात तुम्ही? नाही, केला नाही विचार. आत्मकेंद्री! माणसं तन-मन विसरून राबताहेत आणि तुम्ही लग्नाचे बेत रचत बसला आहात... दारू प्यायला आणि वाह्यात संबंध ठेवायला लोकांना उत्तेजन देत आहात. बेशरम!"

"कुठलं आलंय लग्न?!" ग्लूखोव उद्गारला. ओताविना तर मुखस्तंभ बनली. "शांतपणं जोडी जमवणार होतो. लग्न कुठलं?"

"अगदी... कुंपणाआडच्या जोडप्यांगत! थू: तुमच्यावर! जनावरं!"

"आता हे फार झालं हं!" म्हातारा उखडला. "गेलीस तू..." आणि त्याने आईवरून एक शिवी हासडली. धाडदिशी दार आपटून तो निघून गेला.

त्याच्या पाठोपाठच ओताविना तेथून बाहेर पडली. ती दोघे नुसती बाहेर पडली नव्हती – जणू वाफेने भाजल्यागत तेथून सुसाट पसार झाली होती. फाटकाबाहेर आल्यानंतर एकमेकांकडे कटाक्षसुद्धा न टाकता परस्परविरुद्ध दिशांना चालू लागली होती. वस्तुत: दोघांचीही घरे एकाच दिशेला होती.

म्हातारा ग्लूखोव सबंध खेड्याला एक मोठ्ठा वळसा घालून घरी परतला. तो सारखा थुंकत होता, आई-माईवरून शिव्या घालत होता. एका जागी स्वस्थ बसणे त्याला अशक्य ठरले... रागाच्या भरात त्याच्या मनात असाही विचार आला: "थेरडीचं घरच पेटवून देतो!"

अर्थातच त्याने मालीशेवाचे घर पेटवले नाही. पण तिच्याकडे न जाण्याची त्याने स्वत:शी शपथ खाल्ली. आणि रस्त्यात जर ती समोर दिसली, तर तो तोंड फिरवू लागला.

ओताविना शहरात गेली. चर्चमध्ये जाऊन तिने पापमुक्तीसाठी देवाच्या प्रार्थना केल्या. म्हातारी फार बेचैन बनली. मालीशेवाला भेटणे टाळू लागली.

ह्या असाधारण सोयरीकीसंबंधी मालीशेवा सबंध खेड्यात एकाही माणसापाशी अक्षराने काही बोलली नाही. पण ग्लूखोवला आणि ओताविनाला वाटले होते की, मालीशेवा गावभर बोभाटा करील. पण नाही, तिने एक शब्द उच्चारला नाही.

# विचार

आणि असे रोज रात्री घडत होते!

खेड्यात जराशी सामसूम झाली, माणसे झोपायच्या तयारीला लागली – तो सुरू करायचा... परपुष्ट लेकाचा. खेड्याच्या टोकापासून सुरू करायचा अ‍ॅकॉर्डियन वाजवायला.

त्याचे अ‍ॅकॉर्डियनही काही वेगळेच होते. भसाडे वाजायचे. सूर उमटत नसत त्यातून – नुसता भसाडा आवाज निघायचा.

नीन्का ऱ्हेचेतोवाला लोकांनी सल्ला दिला होता:

"लौकर लग्न कर बाई त्याच्याशी! तो सैतान आम्हाला जगणं अशक्य करतोय!"

नीन्का गूढ हसायची:

"तुम्ही ऐकू नका. गाढ झोपा."

"कसली आलीय झोप, जेव्हा तो ऐन खिडक्यांखाली पिळायला लागतो. लेकाचा नदीवर जाऊन वाजवत नाही सैतान, इथंच तडमडतो! मुद्दाम!"

खुद्द कोल्का मालाश्कीन, जाड ओठांचा धिप्पाड राक्षस, आपल्या बारीक डोळ्यांनी उर्मटपणे पहात म्हणाला होता:

"मला हक्क आहे. त्याविरुद्ध कोणताही कायदा नाही."

स्थानिक सामुदायिक शेताचा अध्यक्ष मत्वेय र्‍याझान्त्सेव याचे घर नेमक्या अशा जागी उभे होते, जेथून कोल्का गल्लीतून वळून मुख्य रस्त्यावर यायचा. त्यामुळे अ‍ॅकॉर्डियनचा भसाडा आवाज आधी गल्लीतच सुरू व्हायचा, मग घराभोवती घुमायचा आणि नंतर बराच वेळपर्यंत ऐकू येत रहायचा.

गल्लीत ते गर्जू लागले रे लागले की, मत्वेय पलंगावर उठून

बसायचा, पाय फरशीवर सोडायचा आणि म्हणायचा:

"बस्स! उद्याच सामुदायिक शेतावरून त्याला हाकलून लावतो! काहीतरी खुसपट काढतो आणि कामावरून कमी करतो!"

रोज रात्री तो असे म्हणायचा. पण त्याने कोल्काला कामावरून काढून टाकले नव्हते. फक्त दिवसा जेव्हा कोल्काशी त्याची भेट व्हायची, तेव्हा त्याला विचारायचा:

"आणखी किती दिवस तुझा निशाचरी उद्योग चालणार आहे? माणसं कामाच्या दिवसानंतर विश्रांती घेत असतात आणि तू त्यांना जागं करतोस, बाजावाल्या!"

"मला हक्क आहे," कोल्का परत म्हणाला.

"मी तुला दाखवतो हक्क! काढतो तुझा हक्क!"

एवढेच. एवढ्यावरच संभाषण संपायचे.

पण रोज रात्री मत्वेय पलंगावर बसून शपथ घ्यायचा:

"उद्या त्याला कामावरून काढून टाकतो!"

आणि नंतर खूप वेळपर्यंत बसून विचार करत रहायचा... ॲकॉर्डियन एव्हाना रस्त्यावरून निघून जायचे, त्याचा आवाज एव्हाना ऐकू येईनासा होई, पण मत्वेय तसाच बसून राही. खुर्चीवरील पाटलूण चाचपायचा, खिशातून सिगारेटी काढायचा आणि धूम्रपान सुरू करायचा.

"पुरे झालं धूर काढणं!" आल्योना, त्याची बायको, खेकसायची.

"झोप," मत्वेय तुटकपणे बोलायचा.

कशाबद्दल तो विचार करायचा? विशेष असा कशाबद्दलच नाही. आयुष्य आठवायचा. पण ठाम असे काही नाही. पुसट तुटके प्रसंग. पण एके रात्री, जेव्हा चांदणे पडले होते, जेव्हा ॲकॉर्डियन वाजले, जेव्हा उघड्या खिडकीतून गार वाऱ्याच्या झुळुकीबरोबर परसदारीच्या दवण्याचा कडवट उग्र दर्प खोलीत घुसला, तेव्हा दुसरी एक रात्र त्याला ठळकपणे आठवली. ती रात्र मात्र अंधारी होती. वडिलांबरोबर तो आणि त्याचा धाकटा भाऊ कुझ्मा खेड्यापासून पंधरा किलोमीटर अंतरावरच्या कूचूगूरीमध्ये गवतकापणीसाठी गेले होते. रात्री कुझ्माला घरघर लागली. दिवसा खूप उष्मा होत असताना घामेजल्या अवस्थेत तो ओढ्याचे पाणी प्यायला होता आणि रात्री त्याचा घसा "चोंदला." वडिलांनी मत्वेयला झोपेतून जागे केले, इग्रेन्काला (सर्वांत वेगवान घोडा) धरायला सांगितले आणि दूध आणण्यासाठी खेड्यात पिटाळले.

"मी इथं तोवर शेकोटी पेटती ठेवतो... तू दूध आणलंस, म्हणजे तापवू. पोराला दूध पाजलं पाहिजे, नाहीतर हातचा गमावून बसू त्याला," वडील म्हणाले होते.

घोडे जेथे चरत होते, तेथे केवळ आवाजावरून मत्वेयने इग्रेन्काला शोधून काढले, त्याला लगाम घातला आणि त्याच्या फऱ्यांवर पिळदार दोराने फटके मारत त्याला खेड्याकडे दौडवले. आणि मग... आता लौकरच मत्वेयला साठ वर्षं पूर्ण झाली असती, पण तेव्हा त्याचे वय बारा-तेरा वर्षांचे होते – तरीही त्या रात्रीतल्या एकूणएक घटना त्याला आत्ता आठवत होत्या. माणूस आणि घोडा एकरूप होऊन त्या काळोख्या रात्रीतून भरधाव जात होते. रात्र त्यांच्यावर जणू चालून येत होती, दवाने भिजलेल्या गवताच्या उग्र दर्पाचे सपकारे त्यांच्या तोंडांवर ती दाट काळोखी रात्र मारत होती. मत्वेयच्या अंगात कसलातरी जंगली उत्साह संचारला होता. मस्तकात रक्त चढले होते आणि कानशीले थाड थाड उडत होती. जणू तो जमिनीपासून वेगळा झाला होता आणि अधांतरी उड्डाण करत होता. भोवतालचे काहीही दिसत नव्हते: ना जमीन, ना आकाश; घोड्याचे डोकेसुद्धा दिसत नव्हते. फक्त कानां-पाशी सूं सूं आवाज जाणवत होता. फक्त रात्रीचे प्रचंड जग त्याच्या भेटीला चालून येत असल्याचे त्याला जाणवत होते. भावाची प्रकृती बिकट होती ह्याबद्दल तेव्हा त्याच्या मनात अजिबात विचार येत नव्हता. एकूण कसलाच विचार त्याच्या डोक्यात नव्हता. त्याचे मन हलके बनले होते; शरीरातील प्रत्येक धागा आनंदाने नाचत होता... उतू जाणाऱ्या आनंदाचा दुर्मिळ क्षण तो अनुभवत होता.

...नंतर दुःख आले तो दूध घेऊन आला तेव्हा त्याचे वडील धाकट्या मुलाला छातीशी कवटाळून शेकोटीभोवती चकरा मारत होते आणि मुलाची समजूत घालत होते:

"अरे बाळा... तू असं काय करतो रे? थोडा धीर धर सोनुकल्या. जरासा थांब. आत्ता दूध गरम करू, आत्ता तुझा श्वास मोकळा होईल, लाडक्या मुला... तो बघ मत्वेय दूध घेऊन आला!.."

पण छोटा कूझ्मा एव्हाना घुसमटून निळा पडला होता.

जेव्हा मत्वेयपाठोपाठ त्याची आई आली, तेव्हा कूझ्मा मेलेला होता. वडील दोन्ही हातांमध्ये डोके धरून बसले होते, डोलत होते आणि दबत्या आवाजात शोक करत होते. मत्वेयने आश्चर्याने आणि

काहीशा विचित्र कुतूहलाने भावाकडे पाहिले होते. अगदी कालपर्यंत तो त्याच्याबरोबर गवताच्या गंजीवर खेळत होता आणि आता तेथे अनोळखी, निळसर-पांढुरका परका मुलगा निजला होता.

...किती विचित्र: त्या नतद्रष्ट ॲकॉर्डियनने नेमक्या ह्याच घटनेची आठवण का बरे करून दिली? ह्याच रात्रीची? खरे तर त्यानंतर सबंध आयुष्य उलटले होते: लग्न, शेतीचे सामुदायिकीकरण, युद्ध. शिवाय वेगवेगळया घटनांच्या अनेक रात्री उलटल्या होत्या! पण त्या सगळया फिक्या पडल्या होत्या, भूतकाळात विरून गेल्या होत्या. मत्वेयने सर्व आयुष्यभर करायच्या त्या सगळया गोष्टी केल्या होत्या: त्याला म्हणाले – सामुदायिक शेतात दाखल झाले पाहिजे, तो दाखल झाला; लग्न करायची वेळ आली – लग्न केले; आल्योनाने आणि त्याने मुलांना जन्म दिले, मुले मोठी केली... युद्ध सुरू झाले – युद्धावर लढायला गेला. आणि जखमी होऊन इतर पुरुषांच्या आधी घरी परतला. त्याला सांगण्यात आले: "मत्वेय, सामुदायिक शेताचा अध्यक्ष हो. दुसरा कुणी माणूस नाही." तो अध्यक्ष झाला. ह्या कामाशी त्याने कसेतरी स्वतःला जुळवून घेतले आणि लोकांनाही त्याची सवय झाली. त्यामुळे अजूनही तो हेच काम ओढत होता. सबंध आयुष्यभर कामाशिवाय त्याच्या डोक्यात दुसरा विचार नव्हता. युद्धावरसुद्धा एकच विचार – काम. त्याचे सर्व आनंद, त्याची सर्व दुःखे, त्याच्या सर्व काळज्या, कामाशी निगडित होत्या. उदाहरणार्थ, त्याच्या भोवताली कधी त्याने "प्रेम" हा शब्द ऐकला, तर त्याला काहीसे समजायचे नाही. त्याला माहीत होते की, जगात प्रेम अस्तित्वात आहे, त्याने बहुधा कधीतरी आल्योनावर प्रेम केले होते (ती तरुणपणी सुंदर मुलगी होती), पण ह्या विषयाबद्दल त्याला आणखी काही माहीत होते असे सांगणे शक्य नव्हते. इतरसुद्धा उगीच बहाणा करत असा त्याला संशय होता: प्रेमाबद्दल गाणी गातात, उसासे टाकतात, गोळया झाडून आत्महत्या करतात असेसुद्धा त्याने ऐकले होते... कदाचित हा बहाणा नसेल, तर लोकांची सवय बनली असावी: प्रेमाबद्दल बोललेच पाहिजे, म्हणून प्रेमाबद्दल बोलत होते. महत्त्वाची बाब होती – लग्न करण्याची वेळ आली. आता हा कोल्का काय प्रेमात होता? अर्थात त्याच्या मनात नीन्का भरली होती – मस्त भरदार पोरगी. मूर्खाच्या लग्नाचा काळ आला होता, म्हणून लेकाचा रात्रीचा "बाजा बडवत" भटकतो. आणि

त्याने का भटकू नये? तरुण आहे, ताकद फुरफुरतेय... नेहमी असेच घडत आले आहे. आता पोरींपायी मारामाऱ्या होत नाहीत हे चांगले. पूर्वी दणदणून मारामाऱ्या व्हायच्या. खुद्द मत्वेयने अनेकदा मारामाऱ्या केल्या होत्या. मुठी शिवशिवायच्या आणि अंगात मस्ती जास्त झालेली असायची. कुठेतरी ती खुमखुमी जिरवणे भाग असायचे.

एके रात्री मत्वेय असाच पलंगावर बसून विचार करत होता. न राहवून त्याने बायकोला डिवचले:

"ऐक ग!.. जागी हो. मला काही विचारायचंय..."

"काय झालंय तुला?" आल्योना चकित झाली.

"तू कधी प्रेमात पडली होतीस? माझ्या किंवा दुसऱ्या कुणाच्या-तरी?"

आल्योना आश्चर्य करत बराच वेळ स्तब्ध पडून राहिली.

"तू जास्त दारू प्यायलास काय?"

"नाही ग!.. तू माझ्यावर प्रेम केलं होतंस... अथवा निव्वळ सवय म्हणून माझ्याशी लग्न केलंस? मी अगदी गंभीरपणं विचारतोय."

नवरा "झिंगलेला" नाही हे आल्योनाच्या ध्यानात आले. पण नंतर खूप वेळ ती गप्प बसली. तिलासुद्धा माहीत नव्हते. ती विसरली होती.

"असले विचार तुझ्या डोक्यात का आले?"

"कसल्यातरी गोष्टीचा थांग लावायला बघतोय. माझ्या काळजात काहीतरी अस्वस्थ वाटतंय. आजारपणासारखं खुपतंय..."

"अर्थातच प्रेम केलं होतं!" आल्योना ठामपणे म्हणाली. "जर प्रेम नसतं, तर तुझ्याशी लग्न केलं नसतं. मीन्का कोरोल्योव माझ्या कितीतरी पाठीस लागला होता. पण त्याच्याशी मी लग्न नाही केलं. पण आज मध्यरात्री तुला प्रेमाची काय आठवण झाली? अक्कल चालेनाशी झाली काय तुझी?"

"च्यायला...!" मत्वेय चिडला. "झोप!"

"उद्या गाय कळपात पाठव. मी सांगायला विसरले. सकाळी मी बायकांबरोबर रानफळं गोळा करायला जाणार आहे."

"कुठं?" मत्वेयने कान टवकारले.

"तुझ्या गवताच्या कुरणांमध्ये नाही. उगीच घाबरू नको."

"जर पकडलं तर प्रत्येकीकडून दहा रूबल दंड वसूल करीन."

“जिथं तुम्ही गवतकापणी करत नाही अशी एक जागा आम्हाला माहीत आहे. चिक्कार रानफळं उगवतात तिथं. गायीला कळपात पाठव.”

“ठीक आहे.”

तर त्या रात्री नेमके काय काय घडले होते, जेव्हा भावाला दूध आणण्यासाठी तो घोड्यावरून दौडत गेला होता? आत्ता अचानक त्याच्या मनात ही आठवण का आली होती?

“बहुधा मूर्ख बनत चाललोय,” मत्वेयच्या मनात दुःखी विचार आला. “म्हातारपणी सगळे मूर्ख बनतात.”

पण काळजातील खुपणे थांबले नाही. त्याच्या ध्यानात आले की, कोल्का स्वतःचा बाजा “पिळत” केव्हा येतो ह्याची तो वाट पाहू लागला. नेहमीपेक्षा कोल्काच्या फेरीला उशीर झाला, तर तो अस्वस्थ बनू लागला. नीन्कावर संतापू लागला: “तरणी घोडी साली!.. लौकर थोडीच सोडणार त्याला!”

मत्वेय वाट बघत बसून रहायचा. धूम्रपान करायचा.

आणि दूर गल्लीत ॲकॉर्डियन वाजायला आरंभ व्हायचा. मत्वेय-च्या काळजातील खुपणी सुरू व्हायची. पण हा आजार विचित्र होता – हवाहवासा वाटणारा. त्याच्याविना अपुरे अपुरे वाटायचे.

एकदा काही सकाळी आठवल्या... अनवाणी पायांनी गवतावरून चालत जात आहेस. गवतावर दवाचे मोती जमलेत. फक्त हिरवेगार ठसे मागे उरतात. दव पावलांना झोंबते. आत्तासुद्धा नुसत्या आठवणीने पाय शहारतात.

अचानक मृत्यूबद्दलचे विचार मनात घोळू लागतात. लौकरच सर्व संपणार. त्याची भीती नाही, वेदना नाही, पण नवल वाटतेय. जग पुढे चालत राहील, पण त्याला स्मशानात नेऊन जमिनीत पुरतील. पण जग तसेच कसे राहील? हे समजणे अवघड आहे. ठीक आहे: सूर्य उगवत आणि मावळत राहील. पण खेड्यात वेगळीच कुठलीतरी माणसे येतील – त्याला ती कधीही माहीत होणार नाहीत... हे मात्र समजत नाही. आणखी दहा – पंधरा वर्षे त्याची कदाचित आठवण काढतील की, मत्वेय न्याझान्त्सेव नांवाचा कुणी एक होता. पण नंतर – खलास. तरी इथली माणसे कशी जगतील हे जाणून घेण्याची त्याला फार इच्छा होतेय. गमावल्याची भावना नाही. त्याने सूर्याला भरपूर

पाहून घेतलंय आणि सणासुदींना खूप मौज केलीय ... छान काळ घालवलाय ... खेद नाही कशाचा. खूप पाहिलेय त्याने. पण जेव्हा विचार येतो : तो नाही, बाकीचे आहेत आणि तो इत:पर असणार नाही ... बहुधा त्याच्याविना इतरांना रिते रिते वाटेल. किंवा काहीच वाटणार नाही ?

"छी : ! ... नाही, म्हातारपण येतंय !"

अशा विचारांपायी त्याला खूप थकवा यायचा.

"ऐकलंस का ग ! .. जागी हो," मत्वेयने एकदा बायकोला झोपेतून उठवले. "तुला मरणाची भीती वाटते ?"

"पुरुष वेडा झाला !" आल्योना कुरकुरली. "त्या गवतकाप्याची कुणाला वाटत नाही भीती ?"

"मला नाही भीती वाटत."

"तर मग झोप मुकाट ! उगाच त्याचा विचार कशाला करतोस ?"

"झोप तू !"

पण त्या दाट काळोख्या रात्रीची परत आठवण झाली, जेव्हा तो घोड्यावरून दौडत गेला होता, म्हणजे हृदयात पिळवटल्यासारखे होते. त्यात एक गोड हुरहुर सुरू होते. नाही, आयुष्यात काहीतरी असे आहे, जे गमावल्याबद्दल त्याला फार दु:ख होईल. अगदी आसवे ढाळण्याइतपत दु:ख होईल.

एके रात्री कोल्काच्या ॲकॉर्डियनची त्याने व्यर्थ वाट पाहिली. फसाफसा धूर काढत राहिला ... पण पत्ता नाही. शेवटी आवाज आलाच नाही. वाट पाहून मत्वेय थकला.

दिवस फटफटायच्या सुमाराला मत्वेयने बायकोला जागे केले.

"आपला बाजावाला आज कुठं ऐकू आला नाही !"

"लग्न करतोय तो ! रविवारी लग्न व्हायचंय !"

मत्वेय एकदम निराश झाला. तो बिछान्यावर आडवा झाला. झोपायची त्याला इच्छा होती, पण झोप येईना. डोळ्यांची उघडझाप करत सूर्य उगवेपर्यंत पडून राहिला. स्वत:च्या आयुष्यातील आणखी काही आठवणी मनात घोळवण्याची त्याची इच्छा होती, पण डोके रिकामे राहिले. परत सामुदायिक शेताच्या चिंता सुरू झाल्या ... लौकरच गवतकापणीची वेळ येईल आणि निम्मे कापणीवाले लोहाराच्या भात्यापाशी मोडके विळे घेऊन अजून उभे आहेत. आणि हा चकणा फील्या

लोहार दारू पीत हिंडतोय. आता लग्नाच्या निमित्तानं आणखी एक आठवडा वाया गेल्यात जमा आहे.

"उद्या फील्याबरोबर बोललं पाहिजे."

...दुसऱ्या दिवशी जाड ओठवाल्या कोल्काशी गाठ पडली तेव्हा मत्वेय हसून म्हणाला:

"काय बंधू, वाजवायची हौस फिटली?"

कोल्काने रुंद स्मित केले... अगदी ह्या कानापासून त्या कानापर्यंत.

"बास्स, मत्वेय इवानीच, आता यापुढं तुमची रात्रीची झोपमोड करणार नाही. संपलं. नांगर टाकला."

"बरं, बरं," मत्वेय म्हणाला आणि आपल्या कामांना निघून गेला. पण त्याच्या मनात विचार आला: "अरे बैला, तुला आनंद कशाचा होतोय? आता ती नीन्का तुझ्या शिंगांना हात घालील. सगळे ऱ्येचेतोव त्याच जातीचे आहेत."

आठवडा उलटला.

रात्रीच्या वेळी खिडकीमधून तसेच चांदणे पाझरत होते. परसदारच्या वाफ्यामधून कडू दवण्याचा उग्र वास आणि नव्या बटाट्याच्या पानांचा वास दरवळत होता... आणि सारे काही शांत होते.

मत्वेयला चांगली झोप लागली नाही. सारखा जागा होत होता आणि धूम्रपान करत होता... बाहेर जाऊन क्वास* प्यायला. दाराजवळच्या पायऱ्यांवर बसून धूम्रपान करत राहिला. सबंध खेडे चांदण्याने उजळले होते. भयानक शांतता नांदत होती.

---

* क्वास – काळा पाव आंबवून केलेले रशियन पेय – अनु.

# बूट

सुटे भाग आणण्यासाठी शहरात गेले होते ... आणि सेर्गेय दूखानिनने तेथे दुकानात बायकांचे गुडघ्यांपर्यंतचे बूट पाहिले. आणि त्याची मन:शांती ढळली. बायकोसाठी तसले बूट विकत घेण्याची त्याला इच्छा झाली. निदान एकदा तरी तिला खास भेटवस्तू दिली पाहिजे असे त्याच्या मनाला वाटले. मुख्य म्हणजे सुंदर भेटवस्तू ... तसले बूट तिने स्वप्नातसुद्धा पायात घातले नसणार.

सेर्गेयने खूप वेळ बूट न्याहाळून पाहिले. मग काऊंटरच्या काचेवर नखांनी टिचक्या मारत उल्हासी स्वरात विचारले :

"ह्या नळकांडयांची किंमत काय?"

"कसली नळकांडी?" विक्रेत्या मुलीला समजले नाही.

"म्हणजे ... ते बूट."

"त्या नळकांडयांची किंमत ... पासष्ट रूबल."

सेर्गेयच्या तोंडून एकदम "अरे बापरे" असा उद्‌गार निघणार होता, पण त्याने ते शब्द गिळले आणि हेल काढत तो म्हणाला :

"होय ... चावतातसुद्धा."

विक्रेतीने त्याच्याकडे रागाने कटाक्ष टाकला. ही विक्रेती मंडळी मोठी विचित्र असतात. साधी एक किलोग्राम बाजरी विकतानासुद्धा असा काही आव आणतात की, जणू विसरले गेलेले कर्ज चुकते करत आहेत.

मरोत ते विक्रेते. सेर्गेयपाशी पासष्ट रूबल होते. नव्हे पंचाहत्तर रूबल होते. पण ... तो बाहेर रस्त्यावर गेला, त्याने सिगारेट पेटवली व तो विचार करू लागला. खरे म्हणजे खेडयातील चिखलात तसले बूट उपयोगाचे नव्हते. अर्थात बायकोने त्या बुटांना खूप सांभाळून वापरले

असते ... महिन्यातून एकदा कुठेतरी जायला वापरले असते. आणि चिखल असताना बूट घातले नसते. फक्त कोरडे असताना. पण आनंद केवढा! सूटकेसमधून तो जेव्हा बूट बाहेर काढील आणि तिला म्हणील: "घे, घाल;" त्या मिनिटाच्या सुखाचे मोल केवढे असेल!

दुकानापासून जवळच असलेल्या बीयरच्या स्टॉलपाशी सेर्गेय गेला आणि रांगेत उभा राहिला.

हे बूट पाहिल्यानंतर बायकोचे डोळे कसे चमकतील ह्याची सेर्गेयने मनाशी कल्पना केली. कधी कधी तिला अगदी लहान मुलाप्रमाणे डोळ्यातून पाणी येण्याइतपत आनंद होतो. एकूण ती छान होती. आमच्याबरोबर रहायचे म्हणजे फार सहनशीलता पाहिजे, असा विचार सेर्गेयच्या मनात आला. नतद्रष्ट पिण्याचा नुसता केवढा त्रास. शिवाय मुले, घरकाम ... छे:, एवढे सारे सोसायला खंबीरच पाहिजेत बायका. पुरुष थोडी दारू प्यायला, म्हणजे त्याच्या छातीवरचा भार हलका होतो. पण बायका बिचाऱ्या सकाळपासून रात्रीपर्यंत कारखान्यासारख्या अखंड काम करत असतात.

रांग फार हळू सरकत होती. पुरुष अखंडपणे "परत परत" ग्लास भरत होते. सेर्गेय विचार करत राहिला.

अर्थात ती काही अनवाणी फिरत नव्हती. उगीच कशाला दरिद्री म्हणवून घ्यायचे? खेड्यातली सगळी माणसे जशी वावरतात, तशीच ती वावरत होती ... बूट सुंदर होते, पण किंमत खिशाला परवडणारी नव्हती. विकत घेऊन घरी गेलो म्हणजे सर्वांत पहिल्यांदा तीच माझी खरडपट्टी काढेल. म्हणेल, कशाला एवढे महागडे बूट आणलेस माझ्यासाठी! त्यापेक्षा मुलींसाठी कोट वगैरे काही आणायचे होते — हिवाळा जवळ येतोय!

अखेरीस सेर्गेयने दोन ग्लास बीयर घेतली, तो थोडासा बाजूला जाऊन उभा राहिला आणि सावकाशपणे बीयरचे घुटके घेऊ लागला. त्याचे विचारचक्र चालूच होते.

असे आयुष्य चाललेय — पंचेचाळीस वर्षे झाली — अजून विचारच करतोस: कधीतरी छान जगायला मिळेल, चैन करता येईल. पण काळ उलटत असतो ... अचानक थडग्यात पडायची वेळ येते आणि जाणीव होते की, सबंध आयुष्य कशाची तरी वाट पहात राहिलास. पण कशासाठी अशी वाट पहायची? संधी असताना आनंद का लुटायचा नाही?

आता हेच पहा : जवळ पैसे आहेत, अत्यंत सुंदर बूट दुकानात आहेत – घे विकत. माणसाला आनंद लाभू दे ! कदाचित पुन्हा कधी अशी शक्यता यायचीही नाही. मुली अजून लग्नाच्या वयाच्या नाहीत – त्यांना अजून काहीही लेऊ घातले तरी चालेल. पण इथे – आयुष्यात एकदाच ...

सेर्गेय दुकानात गेला.

"जरा बघू दे बरं," तो म्हणाला.

"काय ?"

"बूट."

"काय बघायचं त्यांना ? कोणत्या नंबरचे पाहिजेत ?"

"मी एकदा नजर टाकतो. नंबर मला माहीत नाही."

"विकत घ्यायला येतोय आणि नंबर कोणता ते माहीत नाही. बूट पायात घालून बघितले पाहिजेत. ते म्हणजे घरात घालायच्या सपाता नव्हेत."

"सपाता नाहीत ते, मला दिसतंय. किंमतीवरूनच दिसतंय, ख्यँ, ख्यँ !.."

"त्यांना पाहण्याचं काही कारण नाही."

"पण मला विकत घ्यायचे असले तर ?"

"अहो, जर तुम्हाला माप ठाऊक नाही, तर विकत काय घेणार ?"

"तुम्हाला काय करायचंय ? मला पहायची इच्छा आहे."

"बघण्यासारखं काही नाही. असं प्रत्येकजण बघत बसेल ..."

"हे बघ लाडके," सेर्गेय संतापून म्हणाला, "मी तुमची चड्डी दाखवा असं तर म्हणत नाही, कारण ती पहायची माझी इच्छा नाही. पण काऊंटरवर पडलेले बूट दाखवा असं म्हणतोय."

"इथं उद्धटपणा करू नका, तुम्हाला बजावते ! दारू ढोसतात आधी आणि मग सुरू करतात ..."

"काय सुरू करतात ? कोण सुरू करतं ? तुम्ही काय तुमच्या पैशानं दारू पाजलीत मला, म्हणून असं बोलता ?"

विक्रेतीने त्याच्यासमोर एक बूट टाकला. सेर्गेयने तो उचलला, उलटसुलट पाहिला, कातडे चाचपून पाहिले, चकचकीत टाचेवर नखांनी टिचक्या मारल्या व त्या बुटाच्या मऊ पोकळीत हात घातला ...

"पाय ह्या बुटात अगदी मस्त झोपेल," आनंदाने त्याने विचार केला.

"अगदी बरोब्बर पासष्ट?" त्याने विचारले.

विक्रेती काही न बोलता त्याच्याकडे रागाने पहात होती.

"देवा रे!" सेर्गेयला आश्चर्य वाटले. "ती माझा तिटकारा करतेय. कशाबद्दल?"

"मी विकत घेतो," तो घाईने म्हणाला. आता तरी विक्रेती किंचित शांत होईल आणि त्याने तिला उगीच तसदी दिली नव्हती, तो खरेच बूट खरेदी करत होता, हा त्या घाईच्या बोलण्यामागील त्याचा हेतू होता.

"तुम्हाला पैसे द्यायचे अथवा कॅशियरला?"

विक्रेती तशीच टक लावून बघत हळू आवाजात म्हणाली:

"कॅशवर."

"बरोब्बर पासष्ट किंवा आणखी काही कोपेक?"

विक्रेती अजूनही त्याच्याकडे रोखून पहात होती. सेर्गेयने जेव्हा तिच्या डोळयांमध्ये लक्षपूर्वक पाहिले, तेव्हा खरोखरीच त्यांच्यात अत्यंत तिटकारा भरलेला त्याला आढळला. सेर्गेय घाबरला... मुकाट बूट फळीवर ठेवून तो पैसे द्यायला गेला. "काय झालंय तिला? टाळकं फिरलं काय? अशी चिडलीय का? अशानं करपून जाईल आणि लौकर मरेल!"

बुटांची किंमत बरोबर पासष्ट रूबलच होती. वर आणखी एकही कोपेक नव्हता. सेर्गेयने विक्रेतीला पावती दिली. तिच्या डोळयांमध्ये न पाहता त्याने तिच्या सपाट छातीच्या किंचित वर नजर लावली.

"बहुधा आजारी असावी," सेर्गेयला तिची दया आली.

विक्रेतीने पावती घेतली नाही. सेर्गेयने डोळे वर उचलले... आता विक्रेतीच्या डोळयांमध्ये तिटकारा नव्हता, तर एक विचित्र आसुरी समाधान होते.

"मला बूट द्या."

"माल देण्याच्या विभागात," ती हळू आवाजात म्हणाली.

"कुठं आहे तो?" सेर्गेयनेसुद्धा हळू आवाजात विचारले. त्या सुकडया विक्रेतीबद्दल त्याच्या मनातसुद्धा तिटकारा निर्माण होत असल्याचे त्याला जाणवले.

विक्रेती गप्प राहून पहात होती.

"कुठं आहे तो विभाग?" सेर्गेयने थेट तिच्या डोळयांमध्ये स्मित

केले. "आँ? लाडके, तशी बघू नको माझ्याकडं, नको बघू – माझं लग्न झालंय. माझ्या प्रेमात पोरी चटकन पडतात हे मला माहीत आहे, पण ... काय उपयोग? मुकाट सहन करायचं, दुसरं काय करणार? तर, कुठं आहे तो माल देण्याचा विभाग?"

विक्रेतीच्या छोटुकल्या तोंडानेसुद्धा नकळत आ वासला... तिला हे अनपेक्षित होते.

सेर्गेय माल देण्याचा विभाग शोधायला निघाला.

"ओ हो!" तो स्वतःशी चकित होत म्हणाला. "कुठून सुचलं! बाईला अशीच अक्कल शिकवली पाहिजे. पुन्हा उगीच चिडचिड करणार नाही. नाही तर उभी आहे धुमसत."

माल देण्याच्या विभागात त्याला बूट मिळाले आणि तो स्वतःच्या मित्रांकडे मोटारतळावर गेला. तेथून तो खेड्यात घरी जाणार होता. (ते स्वतःच्या लॉरी घेऊन आले होते – एक मेकॅनिक आणि दोन ड्रायव्हर.)

सेर्गेय मोटारतळाच्या कचेरीत गेला. त्याची अपेक्षा होती की, ताबडतोब सगळे त्याच्या हातातील खोक्याबद्दल कुतूहल दाखवतील आणि विचारतील: त्यात काय आहे? पण प्रत्यक्षात सेर्गेयची कुणी ढुंकून दखलसुद्धा घेतली नाही. नेहमीप्रमाणे त्यांचा वाद चालू होता. रस्त्यावर त्यांनी तरुण पाद्री पाहिला होता आणि त्याला किती पैसे मिळत असावेत ह्यावर आता त्यांचे तर्ककुतर्क चालू होते. सर्वांत मोठ्यां-दा ओरडत होता वीतका कीब्याकोव. फिकट कांतीचा, चेहऱ्यावर देवीचे वण असलेला, मोठ्ठ्या उदास डोळ्यांचा. जरी तो तावातावाने बोंबलत होता आणि प्रत्येकाचा अपमान करत होता, तरी त्याच्या डोळ्यांमध्ये तो उदास आणि शहाणपणाचा भाव कायम होता. जणू ते डोळे खुद्द वीतकाकडे निराश दुःखाने पहात होते.

"तुला माहीत आहे, त्याला खास ड्रायव्हरसकट 'वोल्गा' आहे?!" कानस ओरडला (वीतकाला 'कानस' अशा टोपणनांवाने हाक मारत). "आणि ते जेव्हा शिकत असतात, तेव्हा त्यांना स्टायपेंड एकशेपन्नास रूबल मिळतं! समजलं? स्टा-य-पें-ड!"

"त्यांना ड्रायव्हरसकट मोटारी मिळतात हे खरं आहे, पण तरुणांना नव्हे. तू काय मला सांगतोस? ज्यांना ड्रायव्हरसकट मोटारी मिळतात त्यांना... काय बरं म्हणतात त्यांना?.. धर्मप्रचारक... नव्हे... काय

बरं म्हणतात त्यांना ?"

"समजलं ? धर्मप्रचारकांना ड्रायव्हरसकट 'वोल्गा' मोटारी ! मठ्ठ खुंट लेकाचा ! तूच धर्मप्रचारक आहेस !"

"एकशेपन्नास स्टायपेंड ! तर मग पगार किती ?"

"तुला काय वाटतं, तुला तेवढाच मिळेल ? घे ! पाचशे रूबल पाहिजे ?"

"तो आस्तिक असला पाहिजे."

सेर्गेयला त्या वादात पडायची इच्छा नव्हती. अर्थात तो वाद घालू शकला असता. तरुण पाद्रयाला पाचशे रूबल–हे फार झाले. पण ह्यावर आत्ता वाद घालायचा ... नाही, सेर्गेय सर्वांना बूट दाखवू इच्छित होता. त्याने खोक्यामधून बूट बाहेर काढले व त्यांना न्याहाळू लागला. आत्ता सगळे त्या पाद्रयाबद्दलची चर्चा बंद करतील ... त्यांची तोंडे एकदम मिटतील. पण तसे घडले नाही. त्यांनी बुटांकडे नुसता एकदा कटाक्ष टाकला. फक्त एकाने हात पुढे केला– "दाखव." सेर्गेयने एक बूट दिला. ड्रायव्हरने (अनोळखी) चामड्याला स्पर्श करून पाहिला, पोलादी नखांनी टाचांवर ठोकले ... आणि घाणेरडा पंजा हिमधवल, नाजुक ... बुटाच्या पोकळीत खुपसला. सेर्गेयने चटकन बूट हिसकून घेतला.

"कुठं घालतोस तुझा दांडा ?"

ड्रायव्हर हसला.

"कुणासाठी हे ?"

"माझ्या बायकोसाठी."

आता मात्र सगळे एकदम गप्प झाले.

"कुणाला ?" कानसने विचारले.

"क्लावासाठी."

"बघू ..."

बूट सगळ्यांच्या हातांमधून आळीपाळीने फिरला. सर्वांनी त्याला गोंजारले आणि तळवा ठोकून पाहिला ... पण बुटाच्या पोकळीत हात खुपसायचा मात्र कुणीही धीर केला नाही. फक्त वरचे चामडे चिमटींमध्ये धरून चाचपले आणि शुभ्र, केसाळ पोकळीत डोकावून पाहिले. एकाने तर काही कारणास्तव आत फुंकर मारली. सेर्गेयने अनोळखी अभिमान अनुभवला.

"काय किंमत ह्यांची?"

"पासष्ट."

सर्वांनी आश्चर्याने थक्क होऊन सेर्गेयकडे पाहिले. सेर्गेय किंचित बावरला.

"तुझं टाळकं ठिकाणावर आहे?"

सेर्गेयने कानसच्या हातून बूट घेतला.

"वा!" कानस ओरडला. "सेर्गेयनं... कमाल केली! कशाला तुझ्या बायकोला असले बूट?"

"पायात घालायला."

सेर्गेयला शांत आणि ठाम वागायची इच्छा होती, पण त्याच्या अंतरात मात्र खदखदत होते. आणि मनात एकच मूर्ख विचार परत परत घोळत होता:

"अर्धी स्कूटर. अर्धी स्कूटर." जरी त्याला माहीत होते की, पासष्ट रूबल म्हणजे अर्धी स्कूटर नव्हते, तरीही मनात तो विचार टोचत होता: "अर्धी स्कूटर."

"तिनं तुला असले बूट विकत घ्यायला सांगितलं?"

"तिनं सांगितलं पाहिजे कशाला? विकत घ्यावेसे वाटले म्हणून घेतले."

"त्यांना केव्हा वापरणार ती?" त्यांनी सेर्गेयला हसत विचारले. "गुडघाभर चिखल असतो... आणि ह्या पठ्ठ्यानं पासष्ट रूबलचे बूट विकत घेतले."

"हे हिवाळी आहेत."

"हिवाळ्यात हे घालून कुठं जाणार?"

"शिवाय — हे शहरातल्या पोरीच्या पायाला शोभून दिसतील. क्लावाचा पाय ह्या बुटात शिरायचा नाही... तिच्या पायाचं माप काय? हा बूट फक्त तिच्या नाकाला बसेल."

"कोणत्या नंबरचे बूट ती वापरते?"

"च्यायला गेलात तुम्ही...!" अखेरीस सेर्गेय चिडला. "तुम्ही का एवढे हुरहुरताय?"

सगळे खदखदा हसले.

"गड्या, वाईट वाटतं सेर्योझा! तुला काही रस्त्यावर सापडले नव्हते — पासष्ट रूबल!"

"मी कष्ट करून मिळवले आणि इच्छा झाली तिथं खर्चले. उगाच काय गोंगाट माजवताय?"

"तिनं तुला बहुधा रबरी बूट विकत घ्यायला सांगितलं होतं ना?"

रबरी... सेर्गेयच्या अंगाचा तिळपापड उडाला.

"त्यापेक्षा पाद्र्याबद्दल वटवट करा – त्याला किती पगार मिळतो?"

"तुझ्यापेक्षा जास्त."

"रिकामटेकडे... दुसऱ्यांचे पैसे मोजत बसलेत!" सेर्गेय उठला. "दुसरा काही उद्योग नाही वाटतं?"

"उगीच का करपतोस? तू मूर्खपणा केलास, म्हणून तुला सांगितलं. असं संतापायचं कारण नाही..."

"मी नाही संतापत. पण माझी चिंता तू कशाला करतोस? आला मोठ्ठा चिंता करणारा! जणू काही मी ह्याच्याकडून उसने पैसे घेतले अथवा..."

"मी चिंता करतो कारण मूर्खांना स्वस्थपणं पहात बसणं मला जमत नाही. त्यांच्याबद्दल वाईट वाटतं..."

"वाईट वाटून घे गांडीवरच्या मधमाशीबद्दल! म्हणे वाईट वाटतं ह्याला!"

आणखी थोडा वेळ त्यांनी शब्दांची फेकाफेक केली आणि ते घराकडे निघाले.

रस्त्यावर सेर्गेयला मेकॅनिकने अगदी चीत केले (ते एकाच मोटारी-तून प्रवास करत होते).

"तिनं तुला कशासाठी पैसे दिले होते?" मेकॅनिकने विचारले. त्याच्या विचारण्यात दुष्टावा नव्हता, सहानुभूती होती. "दुसरी काही वस्तू घ्यायला?"

सेर्गेयला मेकॅनिकबद्दल आदर होता, म्हणून त्याने शिव्या हासडल्या नाहीत.

"काहीही घ्यायला सांगितलं नव्हतं. आता हा विषय पुरे."

संध्याकाळच्या सुमारास ते खेड्यात पोहोचले.

सेर्गेयने कुणाचाही निरोप घेतला नाही... सगळयांबरोबर घुटका

मारायला गेला नाही. तो वेगळा होऊन एकटाच गेला. घरी.

क्लावदिया आणि मुली जेवत होत्या.

"इतका उशीर का झाला?" क्लावदियाने विचारले. "मला वाटलं, तुम्ही तिथंच रात्रीचा मुक्काम करणार."

"सुटे भाग घेण्यात वेळ गेला, मग मोटारतळावर जाईपर्यंत आणखी वेळ गेला... मग वेगवेगळ्या ठिकाणांना वाटप करण्यात वेळ गेला..."

"बाबा, तू काहीही विकत आणलं नाहीस?" थोरल्या मुलीने, ग्रूशाने, विचारले.

"काय?" घरी परतण्याच्या वाटेवर सेर्गेयने असा निर्णय केला होता: जर क्लावदियाने आकांडतांडव सुरू केले, ह्या महागड्या बुटां-ऐवजी... वगैरे पुराण सुरू केले, तर सरळ ते बूट विहीरीत फेकून द्यायचे.

"आणलंय."

तिघींनीही टेबलापासून वळून त्याच्याकडे पाहिले. त्याच्या "आणलंय" मध्ये स्पष्ट जाणवले होते की, नवऱ्याने, बापाने, चार रूबलचा रुमाल अथवा खिमा बनवण्याचे यंत्र विकत आणले नव्हते. त्याच्याकडे वळल्या... वाट पहात राहिल्या.

"सूटकेसमध्ये आहे." सेर्गेय खुर्चीवर बसला आणि सिगारेटसाठी त्याने खिसे चाचपले. तो इतका अस्वस्थ झाला होता की, त्याच्या हाताची बोटे थरथर कापत होती.

क्लावदियाने सूटकेसमधून खोका बाहेर काढला आणि खोक्यातून बूट डोकावत होते... विजेच्या दिव्याच्या उजेडात ते आणखीच सुंदर दिसत होते. खोक्यात ते बूट जणू हसत होते. मुली टेबलापासून उठून धावल्या... आश्चर्याचे आणि आनंदाचे चीत्कार त्यांच्या तोंडून उमटले.

"बाई ग!.. कुणासाठी?"

"अर्थात तुझ्यासाठी."

"देवा रे!" क्लावदिया धप्पकन पलंगावर बसली. तिच्या वजनाने पलंग करकरला... शहरचा बूट त्या दणकट शेतकरी पायाला धैर्याने सामोरा गेला. आणि अडकला. सेर्गेयच्या काळजात कळ उमटली. बुटात पाय पुढे सरकेना... पाय बुटापेक्षा मोठा होता.

"माप काय?"

"अडतीस..."

नाही, बूट पायात सरकले नाहीत. सेर्गेय उठला आणि त्याने बुटात पाय दाबण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ.

"माप तर... माझंच आहे."

"इथं घट्ट होताहेत. पोटरीवर."

"काय मेले माझे नतद्रष्ट पाय!"

"थांब! अगदी पातळ मोजे घालून बघ!"

"काय उपयोग! बघितलंस?.."

"होय..."

"मेले माझे पायच दळभद्री!"

सगळा उत्साह एकदम मावळला.

"छी:!" क्लावदियाने उसासा टाकला. "काय माझे पाय तरी! काय किंमत बुटांची?.."

"पासष्ट." सेर्गेयने सिगारेट पेटवली. त्याला भासले की, क्लावदियाला किंमत ऐकू गेली नाही. "त्यांची किंमत पासष्ट रूबल आहे."

क्लावदिया बुटांकडे रोखून पहात होती आणि गुळगुळीत कातड्यावर यांत्रिकपणे हात फिरवत होती. तिच्या डोळ्यांमध्ये, पापण्यांवर, अश्रू चमकत होते... तिने किंमत ऐकली होती.

"मसणात गेले माझे पाय!" ती म्हणाली. "आयुष्यात एकदा नशीबानं लाभलं... पण मी मेली फुटक्या कर्माची!"

सेर्गेयच्या काळजात परत कचकन वेदना झाली... करुणा, प्रेम... जे काहीसे विसरले गेले होते. बुटाला कुरवाळणाऱ्या बायकोच्या हाताला त्याने स्पर्श केला व नंतर हळूच तिचा हात दाबला. क्लावदियाने त्याच्याकडे पाहिले... डोळ्यांची भेटाभेट झाली. क्लावदिया कसनुशी हसली, तिने मानेला झटका दिला... तरुणपणी ती मानेला असा झटका द्यायची. ह्या विभ्रमात खट्याळपणा असायचा, काहीसा पुरुषी थाट असायचा, पण मान आणि आत्मगौरवही असायचा.

"ग्रूशा, तुझं नशीब जोरावर ठरलं बाई." तिने बूट मुलीपुढे धरले. "घे, घालून बघ."

मुलगी गोंधळली.

"अग, घे!" सेर्गेय म्हणाला. त्यानेही मानेला झटका दिला "जर दहावी छान पास झालीस – तर तुझे!"

क्लावदिया मनापासून हसली.

...झोपण्यापूर्वी सेर्गेय नेहमी स्वयंपाकघराच्या दारात एका बैठ्या स्टूलावर बसायचा आणि शेवटची सिगारेट ओढायचा. आजही तो बसला... धूम्रपान करताना परत एकदा आजच्या खरेदीबद्दल त्याच्या मनात विचार सुरू झाले. त्या घटनेचा अनपेक्षितपणा उमजून घ्यायचा त्याने प्रयत्न केला, तेव्हा तिच्यात आता त्याला गहन अर्थ जाणवला. अंतःकरणात छान वाटत होते. अशी छान मनःस्थिती, असा दुर्मिळ मौलिक क्षण, जर कशामुळे तरी बिघडला असता, तर फार वाईट वाटले असते.

क्लावदिया बिछाने घालत होती.

"झोपायला ये..." तिने हाक मारली.

तो मुद्दाम गप्प राहिला – पुढे ती काय बोलेल?

"सेर्गून!" क्लावाने प्रेमाने साद घातली.

सेर्गेय उठला, त्याने सिगारेटचे थोटूक विझवले आणि तो खोलीत गेला. स्वतःशीच हसत त्याने मानेला झटका दिला... "बूट विकत घेतले. म्हणून ती प्रेमात आली होती" असा मात्र विचार त्याच्या मनात आला नाही. अर्थात बुटांचा इथे संबंध नव्हता. कारण... कारण होते...

असो, सर्व छान होते.

## माननीय वाचक !

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे. आमचा पत्ता: 'रादुगा' प्रकाशन, १७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को ११९८५९, सोविएत संघ.

नजीकच्या काळात पुढील पुस्तके प्रकाशित होतील:

**'सोविएत नाटके'** ह्या संग्रहात समाविष्ट केलेली तीन नाटके वाचकांना सोविएत नाटयशास्त्रातील काही पानांची ओळख करून देतील.

अलेक्सेय अर्बूझोव यांचे 'तान्या', अलेक्सान्द्र वाम्पीलोव यांचे 'थोरला मुलगा', विक्तर रोझोव यांचे 'बंधू आल्योशा' ही नाटके माणसाच्या आंतरिक जगातील शिष्टाचारविषयक, नैतिक-आचरणविषयक समस्यांचा परामर्श घेतात.

**मा. गोर्की. 'नाटके'.** नामवंत रशियन लेखक, सोविएत साहित्याचे संस्थापक मास्किम गोर्की ह्यांच्या प्रस्तुत संग्रहात चार नाटके निवडली आहेत: 'गंजलेले घर', 'तळागाळातली माणसे', 'दाचावाले' आणि 'वैरी'.

ही नाटके पहिल्या रशियन क्रांतीपूर्वी लिहिण्यात आली. रशियाचे नवे मालक आणि पुढील क्रांतीकारक घडामोडी याबद्दलचे विचार त्यात प्रकट झाले.

" जेव्हा लोकांना सखोल अंतरंग जाणून घ्यायची इच्छा होती, तेव्हा त्यांनी तो क्षण गमावला नाही. आणि अत्यंत साध्या, कसलेही शौर्य नसलेल्या, प्रत्येकाशी जवळीक असलेल्या गोष्टीं-बद्दल तेवढयाच साधेपणाने, हळू आवाजात, अत्यंत विश्वासाने त्यांनी कथन केले. ह्यातच शुकशीन ह्यांच्या प्रतिभेची भरारी आहे, अनेक लोकांच्या काळजाला हात घालण्याच्या त्यांच्या कौशल्याचे रहस्य आहे..."

मिखायल शोलोखोव

"जर वासिली शुकशीन फक्त नट असते, फक्त दिग्दर्शक असते, फक्त पटकथालेखक आणि नाटककार असते व सरतेशेवटी फक्त लेखक असते, तर ह्या प्रत्येक वेगवेगळ्या परिस्थितीतही आमच्यासमोर एक विलक्षण प्रतिभावंत उभा असल्याचे आम्हाला जाणवले असते. पण हे सर्व गुण एका माणसाच्या अंगी एकवटले होते. आमच्या कलेला अद्याप असे लोकविलक्षण मिश्रण माहीत नव्हते."

सेर्गेय झालीगिन